# विचार विहार

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ३२४

REFBK-0019155



— वा. म. जोशी

# विचार-विहार

क्र. १९१५५

**वा. म. जोशी**

एम्. ए.

**Bombay Agents :—**

Shri Samarth Book Depot.

Book Sellers & Publisher,

[illegible] Bombay 4.

REFBK-0019155

किंमत ४ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक :
ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी,
१९१, शनवार, पुणें २

संचालक :
भ. व्यं. देशमुख,
बी. ए., एल्एल्. बी.

१ पुढील आवृत्तीचे सर्व हक्क श्री. ग. वा. जोशी यांच्या स्वाधीन आहेत.
२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.
३ चित्रांचें ब्लॉक बॉम्बे प्रोसेस स्टोडीओंत केलें आहेत.

मुद्रक :
रमाकांत यशवंत वेलदे
अत्रे प्रिंटिंग प्रेस,
३६२, विठ्ठलभाई पटेल रोड,
मुंबई.

## दोन शब्द

वामनरावजी जोशी गतवर्षी मुंबई येथें दिवंगत झाले. मुंबईला जातांना आपण पुण्याला पुन्हां परत येणार नाहीं अशी त्यांना शंकासुद्धां आली नसेल. त्यामुळें त्यावेळीं त्यांनीं आपल्या वाङ्मयीन अथवा इतर व्यवहारांचीं निरवानिरव मुळींच केली नव्हती. ' देशमुख आणि कंपनीकडे त्यांनीं स्वतःचे कांहीं लेख एकत्रित करून छापण्याकरितां दिले होते; पण त्या लेखसंग्रहाची रचना किंवा त्याचें नांव या गोष्टी त्यांनीं निश्चित केल्या नसल्यामुळें त्याचें प्रकाशन तसेंच रेंगाळत पडलें होतें. सामान्यतः लेखकाला आपलें पुस्तक शक्य तितक्या लवकर निघावें अशी इच्छा असते: पण जेथें इतरांची. लग्न घाई असायची, तेथें वामनरावांची दिरंगाई दिसायची या नियमाला त्यांचें प्रकाशनसुद्धां अपवाद होऊं शकलें नाहीं.

वामनरावांच्या आकस्मिक निधनानंतर त्यांनीं निवड करून दिलेले लेख, तसेच राहूं देणें इष्ट नव्हतें. म्हणून त्यांच्या मृत्यूनंतर महिन्याच्या आंतच तो लेख-संग्रह " विचार लहरी " या नांवानें ' देशमुख आणि कंपनीनें ' प्रकाशित केला. वाचकांनीं त्याचें जें स्वागत केलें, त्यावरून आजच्या संक्रमण काळांत सखोल आणि समतोल दृष्टीनें विविध सामाजिक व वाङ्मयीन प्रश्नांचें विवेचन करणाऱ्या साहित्यिकाची समाजाला किती आवश्यकता आहे हें सहज दिसून आलें.

तो लेख-संग्रह प्रकाशित केल्यानंतर लवकरच एक गोष्ट आमच्या लक्षांत आली. वामनरावजींनीं आपले प्रसिद्ध झालेले सर्व लेख पाहून आणि चाळून कांहीं ती निवड केली नव्हती. विस्मरणामुळें असेल, स्वतःच्या वाङ्मयाकडे परक्याच्या दृष्टीनें पाहाण्याचीं दुर्मिळ कला साध्य झाल्यामुळें असेल, किंवा लेखांचीं कात्रणें कुठें तरी पडून राहिल्यामुळें असले, आपले कांहीं अत्यंत वाचनीय लेख वामनराव " विचार-लहरीं " त समाविष्ट करूं शकले नव्हते हें उघड दिसत होतें. त्यांचे चिरंजीव श्री० ग. वा. जोशी यांनीं आमच्या विनंतीला मान देऊन आपल्याकडे असलेले त्यांचे सर्व लेख आमच्या स्वाधीन केले. त्या लेखांतून "विचार-विहार" संपादित करून आम्हीं तो आज वाचकांना सादर करीत आहों.

या संग्रहांतला " गीतेंत कार्याकार्य-निर्णयाची कसोटी आहे काय ? ' हा लेख वामनरावांनीं बडोद्याला दिलेले एक व्याख्यान आहे. " मुलांची हंसरी सृष्टि " हें अंमळनेरच्या शाळेंत केलेलें भाषण आणि " कला व नीति " हें तिथेंच दिलेलें

व्याख्यान. " स्त्रियांच्या हक्कासंबंधीं प्रश्न " व " पक्षभेद आणि पक्षद्वेष " हीं राष्ट्रसेवादलाच्या स्त्री-शाखेच्या बौद्धिक शिक्षणवर्गातर्फे दिलेलीं व्याख्यानें आहेत. या लेखसंग्रहांतलीं वामनरावांचीं हीं पांच संक्षिप्त व्याख्यानें वाचून एका गोष्टी-बद्दल हळहळ वाटल्यावांचून राहात नाहीं. वामनरावांनीं आपल्या आयुष्यांत-विशे-षतः त्यांची प्रज्ञा परिणत झाल्यावर-ठिकठिकाणीं जी अनेक विचार परिप्लुत व्याख्यानें दिलीं त्यांचे सारांश जर कुणी याच पद्धतीनें टिपून ठेवले असते, तर किती बरें झालें असतें ! असल्या सारांशांत भाषेचा विलास किंवा वक्तृत्वाची रंगत आढळणार नाहीं, हें खरें; पण विचारांना चालना देण्याच्या दृष्टीनें ते अत्यंत उपयुक्त असतात. विशेषतः वामनरावाच्यां सारख्या रसिक तत्त्वज्ञाचें कुठल्याही विषयाचें विवेचन मतामतांच्या गलबल्यांत गोंधळून गेलेल्या सामान्य मनुष्याला अनेकदां मार्गदर्शक होऊं शकतें.

या लेख संग्रहांतल्या इतर लेखाचे सामाजिक आणि वाङ्मयविषयक असे मुख्य दोन्हीं भाग होतात. या दोन्हीं प्रकारच्या लेखांतलीं वामनरावांचीं अनेक मतें मोठीं मार्मिक आणि कांहीं कांहीं वेळां विचारप्रेरक अशींच आहेत. " नवमत-वादाविषयीं माझे कांहीं स्फुट विचार " हा या पुस्तकांतला पहिलाच लेख पहावा. या लेखांतल्या विचारांचे सविस्तर व सोदाहरण विवेचन करावयाचें ठरवून वामन-रावांनीं तें काम पार पाडलें असतें, तर एका अतिशय सुंदर प्रबंधाची भर मराठींत पडली असती असें मनांत आल्यावांचून राहात नाहीं. कुठ-ल्याहि विवाद्य प्रश्नाच्या दोन्हीं बाजू शास्त्रशुद्ध दृष्टीनें पाहून मगच वामनराव त्या विषयींचा आपला अभिप्राय अत्यंत सौजन्यानें, पण तितक्याच स्पष्टपणानें सांगतात. ' संशयात्मा ' म्हणून त्यांची संभावना करणाऱ्या लोकांना जीवन हें नेहमींच दुहेरी असतें, हें लक्षांत घेण्याची आवश्यकताच भासत नसावी ! पण वामनरावांच्या विचारशक्तीचा मोठा गुण जीवनाचा बहुरूपीपणा प्रामाणिकपणानें जाणणें हाच आहे. ॲडलर, फ्रॉईड वगैरे शास्त्रज्ञांसंबंधीचे त्यांचे स्फुट लेख वाचलें म्हणजे वामनरावांच्या मृत्युनें मराठी साहित्याची केवढी हानि झाली याची कल्पना येते. नवे नवे समाजशास्त्रज्ञ, त्यांचे संशोधन, व त्या संशोधनामुळें जीवनमूल्यांत पडूं पाहाणारा फरक यांचे पूर्वग्रह-रहित आणि प्रगतीला उपकारक असें विवेचन करण्याची त्यांची शक्ति पूर्णपणें या कामीं खर्च झाली असती तर—

'तर' हा 'पण' प्रमाणेंच मनुष्याच्या इच्छांचा आणि आकांक्षांचा सर्वांत मोठा शत्रू आहे. सामाजिक मूल्याप्रमाणें वाङ्मयीन मूल्यांचे वामनरावांचे विविध विवेचनही यापुढें त्रुटित लेखांतच रसिकांना वाचावें लागणार आहे. मात्र त्यांचे हा सर्व लेख त्रुटित असले तरी त्यांत विखुरलेले विचारकण अत्यंत मोलाचें आहेत असेंच दिसून येईल. " विकृत विज्ञासेच्या तृप्तीकरितां अमंगल, ग्राम्य व हिंडिस गोष्टीचें वर्णन, तें केवळ यथार्थ ( realistic ) आहे एवढ्यानेंच समर्थनीय ठरत नाहीं. त्या वर्णनाच्या पाठीमागें कांहीं तरी कलात्मक, ज्ञानदानात्मक, सुसंस्कारात्मक भाग असला पाहिजे." ( पृष्ठ २१ ) 'कलेंतील आनंद होतो तो विरोधामुळें होतो.' झगड्यांतून तो आनंद निर्माण होतो. कांहींतरी आकांक्षा, कर्तृत्व प्रेरणा यांतून सूख मिळतें. हा झगडा जेवढा उच्च भूमिकेवरून होईल, तेवढा अधिक आनंद. झगडा जितका महत्त्वाचा, तितकी ती कलाकृति अधिक चिरंजीव व थोर होते. ( पृ. १५९ ) 'भांडण्यास कारण असेल तर भांडलेंच पाहिजे; पण त्यांत असूया असावी, कुत्सित बुद्धि असावी, असें बिलकूल नाहीं.' ( पृ. १६७ ) अशीं वाक्यें वामनरावांच्या इतर वाङ्मयाप्रमाणें या संग्रहांतही विपुल आढळतील. वामनरावांचें खरें बळ अशा विचारविलासांतच आहे व त्याच्यासाठींच ते दीर्घकाल वरच्या दर्जाच्या वाचकांचे आवडते लेखक राहतील.

अनेक कारणामुळें हा लेखसंग्रह घाईघाईनें प्रकाशित होत आहे. त्यामुळें संपादनांत अनेक उणीवा राहिल्या आहेत, याची आम्हांस जाणीव आहे. पुढल्या आवृत्तीच्या वेळीं हीं वैगुण्यें दूर करण्याचें आश्वासन देऊन वाचकांची रजा घेतों.

—प्रकाशक

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ फुलें आणि दगड (आ. दुसरी) ३
२ घरट्याबाहेर ,, ३
३ पहिली लाट ,, ३
४ कलिका २।
५ स्त्री आणि पुरुष २
६ मृगजळांतील कळ्या २।
७ कालचीं स्वप्नें ३
८ हिरवा चांफा (आ. तिसरी) ५
९ दोन ध्रुव ,, ५
१० पहिलें प्रेम (आ. दुसरी) ३
११ क्रौंचवध ,, ५
१२ पांढरे ढग ,, ४।
१३ जळलेला मोहर ३
१४ सायंकाल (आ. दुसरी) २॥
१५ अविनाश १॥।
१६ मंदाकिनी १॥।
१७ सहा भाषणें २
१८ फुलें आणि कांटे २।

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ अवशेष २
२ नागकन्या २
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार (जप्त) ४
५ चंदनवाडी ६॥
६ व्यक्तिरेखा २।

## ना. धों. ताम्हनकर

१ तात्या भा. १ ला (आ.दुसरी) ४
२ तात्या भा. २ रा ३
३ निवाडे भा. १ ला. २॥
४ निवाडे भा. २ रा. ४
५ चकमकी १॥
६ बच्चा नवरा १॥
७ अनेक आशीर्वाद ३॥
८ दाजी भा.१ ला. (आ.तिसरी) ३॥

## चिं. वि. जोशी

१ आणखी चिमणराव (आ.दुसरी) ४
२ नवें भारूड २
३ स्टेशनमास्तर २

## साने गुरुजी

१ पुनर्जन्म (आ. दुसरी) ३
२ आस्तिक ,, ३
३ सोन्या मारुति ? ,, २
४ गोड निबंध भा. १ ला. ३
५ गोड निबंध भा. २ रा ३

## दत्तु बांदेकर

१ सख्या हरी १॥
२ नवी आघाडी १॥
२ तूं आणि मी २।

## प्र. के. अत्रे

१ साखरपुडा १॥
२ ललित वाङ्मय ३॥

## द. र. कवठेकर

१ अपुरा डाव ३
२ रेशमाच्या गांठीं ३

## वा. म. जोशी

१ स्मृति-लहरी २
२ विचार-लहरी २।
३ विचार-विहार ४

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

### पु. य. देशपांडे
१ नवें जग ? २॥

### भाई बेके
१ रॉयचरित्र १॥

### परिचय लेखक वि. स. खांडेकर
१ काव्यज्योति १

### आनंदीबाई जयवंत
१ पारंब्या २

### लक्ष्मण सरदेसाई
१ ढासळलेले बुरुज २

### प्रो. वि. ह. कुळकर्णी
१ व्यक्तिचित्रें २॥

### ना. ह. आपटे
१ फसगत १॥
२ साजणी ५

### शकुंतला परांजपे
१ भिल्लिणीचीं बोरें २।

### कृष्णाबाई मोटे
१ मीनाक्षीचें जीवन २।

### र. गो. सरदेसाई
१ चलतीं नाणीं २

### रा. श्री. जोग
१ सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

### ना. म. पटवर्धन
१ हितपत्रें ३
२ वा. म. जोशीचरित्र ४।

### वि. वि. बोकील
१ बेबीची वहीण ३

### सत्याग्रही
१ ग्रह आणि तारे ४॥

### अनंत काणेकर
१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३
२ पिकलीं पानें (आ. दुसरी) १॥

### काकासाहेब कालेलकर
१ ब्रह्मदेशचा प्रवास १॥

### य. दि. पेण्ढरकर
१ प्रापंचिक पत्रें ३
२ घायाळ २

### वि. म. भुस्कुटे
१ स्टॅलिन ३॥

### कमळाबाई टिळक
१ आकाशगंगा २॥

### रामतनय
१ साखरगोटी ५

# देशमुख आणि कंपनीचीं आगामीं प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

१ आजचीं स्वप्नें
२ सुवर्णकण
३ बुद्ध आणि हिटलर
४ मराठीचा नाट्यसंसार
५ मंजिऱ्या
६ अश्रु
७ चल ये राणी
८ विसावें शतक
९ तिसरी भूक
१० वर्षाकाल
११ छाया
१२ वालुका
१३ चार भिंती
१४ कल्पलता
१५ चक्रवर्ति
१६ बडी मां
१७ उद्यांचीं स्वप्नें
१८ माझ्या कादंबऱ्या

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ति उदयन
५ ऊर्वशी
६ ऊमरखय्याम
७ विलापिका
८ हें युद्ध
९ दोन तप

### द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी
४ आभाळाची सांवली

### ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई
२ शेजारी

### प्र. के. अत्रे

१ 'मी' कसा झालों !
२ दुर्वा आणि फुलें

### कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली
४ गुणाची पोर

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरण यात्रा

### अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

### चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा
३ नटश्रेष्ठ
४ लंका वैभव

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुली जबाब
३ नजरबंदी

### कुसुमावतीबाई देशपांडे

१ मोळी

### शकुंतला परांजपे

१ चांदणी

### १ ? आचार्य भागवत

### १ ? क्षमाबाई राव

### साने गुरुजी

१ गोड निबंध भा. २

# नवमतवादाविषयीं माझे कांहीं स्फुट विचार

नवमतवाद हा धुक्यासारखा अस्पष्ट आणि अनिश्चितरूप आहे. त्याचा ख्राइस्ट-महंमदासारखा प्रणेता नाहीं व वेद-कुराण बायबलांप्रमाणें त्याचा ग्रंथराज नाहीं, म्हणून त्याचें गुणदोषात्मक विवरण करणें कठीण आहे. वाऱ्याची झुळूक जशी स्पष्ट दिसत नाहीं पण आहे असें कळतें, तशी या वादाची स्थिति आहे. हा वाद निघाला आहे त्यावरून समाजांतील विचार-विकार कोणत्या दिशेनें वाहत आहेत एवढें स्थूल मानानें कळतें एवढेंच. या प्रवृत्तींना अद्यापि स्थिरत्व व निश्चितत्व आलेलें नाहीं ही गोष्ट चर्चेच्या सोयीच्या दृष्टीनें वाईट असली, तरी समाजाच्या हिताच्या दृष्टीनें चांगली आहे. कारण अशा स्थितींतच त्या प्रवृत्तींना विशिष्ट दिशा दाखवतां येईल आणि त्यांना इष्ट वळण व आकार देतां येईल.

आजकाल समाजामध्यें हरएक बाबतींत असमाधान आहे. शेती खालावलेली, व्यापार बसलेला. उद्योगधंदे बाल्यावस्थेंत आहेत आणि त्यांना उर्जितावस्था येण्याची आशा फारशी दिसत नाहीं. दारिद्र्य अठरा विश्वें आहे आणि तें दवडण्याचा मार्ग दिसत नाहीं. अज्ञान, भोळसटपणा, धर्मवेडेपणा इत्यादिकांचें साम्राज्य आहे, पण तें उलथून पाडण्याची कोणांत धमक नाहीं. नीति आणि धर्म यांची अवनति होत आहे असें म्हणतात; पण अवनति होत आहे ही आपत्ति खरी धरली तरी तिच्याहूनहि बलवत्तर आपत्ति अशी कीं धर्म आणि नीति यांच्या इष्टतेबद्दलच संशय येऊं लागला आहे. निदान एवढें खरें कीं त्यांचें स्वरूप काय याबद्दलच

एकवाक्यता नाहीं ! राजकारणांतलें शल्य बोलून दाखवेण्याची जरूर नाहीं; पण तें शल्य कधीं काळीं निघेल किंवा नाहीं आणि निघालें तर कसें निघेल याबद्दल रणें माजत आहेत. अशा स्थितींत विचारवंतांचीं देखील मनें भांबावून जातील, मग उत्साह पुष्कळ आणि अनुभव कमी अशा तरुणांचीं मनें भांबावून गेलीं तर नवल काय ? आणि त्यांनीं अगतिक होऊन धाडसाचे, किंबहुना आततायीपणाचे मार्ग सुचवले तर त्यांत नवल काय ?

अगतिक स्थिति प्राप्त झाली असतां इटली, जर्मनी व रशिया या राष्ट्रांतील कांहीं दृढनिश्चयी व ध्येयवादी लोकांनीं विशिष्ट ध्येयें आखून घेऊन तीं वस्तुस्थितींत उतरवण्याकरितां जरूर तो कठोरपणा स्वीकारला, कोणाची भीडभाड ठेवली नाहीं, कोणाची दयामाया केली नाहीं, ‘ इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा ’ हा निष्ठुर न्याय स्वीकारून सामान्य परिस्थितींत इष्ट व पूज्य वाटणाऱ्या व्यक्तींना, नीति-नियमांना व सामाजिक संस्थांना गुंडाळून ठेवून त्यांचीहि ध्येयसिध्द्यर्थ केलेल्या महायज्ञांत आहुति दिली, रक्तोदकांचे अर्घ्य देऊन रक्त-गंगेंत अवभृत स्नान केलें आणि इष्ट सिद्धि प्राप्त करून घेतली. हे सर्व प्रकार पाहून आपणहि सध्यांच्या अगतिक भासणाऱ्या परिस्थितींत असेंच केलें तर काय वाईट, निदान असें करण्याची पूर्वतयारी केली तर काय वाईट, अशा प्रकारचे विचार पुष्कळांच्या मनांत डोकावूं लागले, कांहींच्या मनांत घोळूं लागले आणि कांहींचीं मनें त्यांनीं काबीज केलीं तर त्यांत काय आश्चर्य आहे !

विशेषेंकरून रशिआचें उदाहरण अशा काळीं आकर्षक वाटणें साहजिक आहे. कारण तेथील परिस्थितीचें आपल्या परिस्थितीशीं कांहीं बाबतींत साम्य आहे; तेथील नव-नायकांच्या ध्येयांत तरी निदान जाति-वंशादि भेदविरहित सर्वभूतहितरतत्व सर्व-मनुष्य-समत्व, सर्वस्वातंत्र्य इत्यादि उच्चतम व सात्त्विकतम सत्तत्त्वांचा समावेश केलेला आहे; साधनांत व मार्गांत साहस, स्वार्थत्याग, पराक्रम इत्यादि तरुणप्रिय सद्‌गुणांना वाव आहे; आणि सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कार्ल मार्क्स, लेनिन वगैरे ध्येयनिष्ठ, संयमनिष्ठ, इतिहासाच्या व तत्त्वज्ञानाच्या मननानें व निदिध्यासानें विश्वघटनेचें रहस्य ज्यांना कळलें आहे अशा त्रिकालज्ञ, केवळ ज्ञाननिष्ठच नव्हे तर ‘ शापादपि शरादपि ’ असें म्हणूं शकणाऱ्या आधुनिक मंत्रद्रष्ट्या, ऋषींनीं ‘ धनोपनिषद् ’ (“ Capital ”) वगैरे ग्रंथ लिहून या ध्येयांना, विचारांना, साधनांना, मार्गांना इतिहासाचा व तत्त्व-

ज्ञानाचा पाठिंबा आहे, तीं सद्य:कालीन समाजघटनेशीं सुसंगत आहेत इतकेंच नव्हे तर विश्वगंगेचा प्रवाहच मुळीं त्या दिशेनें चालला आहे आणि अपरिहार्यतेनें जाणार आहे, आणि या विश्वप्रवाहाला व्यर्थ अडथळा न करतां त्यांत ज्ञानपूर्वक समरस होण्याची त्याची गति यथाशक्ति वृद्धिंगत करण्यांतच खरी माणुसकी आहे, असें युक्तिवादानें दाखवून आणि उदाहरणानें पटवून दिलें आहे. रशिआंतला साम्यवाद म्हणजे विश्वकुटुंबवाद, हा केवळ बोलण्यांतला वाद नाहीं, यांत केवळ शाब्दिक घट-पटादि खटपट नाहीं. तो आचरणांत आणलेला सिद्धान्त आहे आणि तो अमान्य करणें म्हणजे जाणूनबुजून डोळे मिटून घेऊन आडमुठेपणानें अंधासारखें वागणें आहे, असें तेजस्वी, पराक्रमोत्सुक पण अननुभवी असलेल्या, नवतरुणांना हिन्दुस्थानाच्या सध्यांच्या परिस्थितींत वाटलें तर तें यथोचितच आहे यांत शंका नाहीं.

## आगरकरी नवमतवाद

कै. गोपाळ गणेश आगरकर यांनीं ‘सुधारक’ काढून व ‘बोले तैसा चाले’ याप्रमाणें वागून महाराष्ट्रांत बुद्धिवाद किंवा विवेकवाद (Rationalism) याचें धैर्यानें व धडाडीनें बीजारोपण केलें, आणि माझ्या मतें खरा नवमतवाद म्हणजे हाच बुद्धिवाद. परंतु ‘नवमतवाद’ म्हटला म्हणजे अलीकडे कांहीं विशिष्ट मतें अस्पष्टपणें सूचित होतात. त्यांकडे वळण्यापूर्वीं माझ्यामतें खरा जो नवमतवाद, म्हणजे बुद्धिप्रामाण्यवाद त्याविषयीं थोडक्यांत चार शब्द लिहितों. अमुक एक गोष्ट चांगली किंवा वाईट, खरी किंवा खोटी, हें ठरवण्याची अंतिम कसोटी शास्त्र किंवा आप्तवाक्य न मानतां स्वत:ची विवेकबुद्धि ही अंतिम कसोटी मानणें म्हणजे बुद्धिवादी असणें होय. बुद्धिवादी ‘आप्तवचना’ला महत्त्व देतात, आप्तवचन मननीय मानतात, पण त्यांचें प्रामाण्य अगदीं स्वत:सिद्ध आहे, तें अशंकनीय किंवा अविचारणीय आहे, असें ते मानीत नाहींत. बुद्धिवादी भावनांनाहि महत्त्व देतात, त्यांचें व्यक्तिजीवनांतील व समाजजीवनांतील मूल्य, सामर्थ्य व कार्यप्रेरकत्व ते ओळखून असतात, पण भावना झाल्या तरी त्यांची उत्पत्ति कशी होते, त्यांचें सहजप्रेरणांशीं संबंध काय आहेत, त्यांचें अन्योन्य-सापेक्ष मूल्य काय इत्यादि प्रश्नांचा निर्णय बुद्धीच्या न्यायासनासमोरच झाला पाहिजे, असें बुद्धिवादी लोकांचें म्हणणें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सद्भावना जरी

झाल्या तरी त्यांचें सत्त्व कशांत आहे, त्यांना कोणत्या परिस्थितींत कोणत्या मर्यादेपर्यंत कोणी महत्व द्यावें, वगैरे गोष्टी विवेकपूर्वकच ठरवल्या पाहिजेत, असें बुद्धिवाद्यांचें म्हणणें. रूढींच्या बाबतींतहि त्यांचें असेंच म्हणणें. नीति व धर्म यांनाहि बुद्धीचें सार्वभौमत्व मान्य केलें पाहिजे असें त्यांचें म्हणणें. परंपरावादी, रूढीवादी, श्रद्धावादी, आप्तवचनवादी, सनातनी लोकांना हा बुद्धिवाद पसंत नाहीं; तेव्हां अर्थात् तो त्यांच्या डोळ्यांत सलतो. त्याला 'नवें बंड', पाखंड, आधुनिक 'सुधारकीपणा' अशा प्रकारचीं नांवें आगरकरांच्या कालखंडांत ठेवण्यांत येत असत. 'नवमतवाद' हा शब्द त्या वेळीं प्रचारांत असता तर त्यास लोकांनीं तेंच नांव दिलें असतें. हा नवमतवाद मला पसंत आहे आणि या अर्थानें मी नवमतवादी आहें.

आजकालचा नवमतवाद

अलीकडे 'नवमतवादी' म्हणून जी अनिश्चितस्वरूप विचारप्रवृत्ति दृग्गोचर होत आहे ती कांहीं बाबतींत मला मान्य आहे व कांहीं बाबतींत अमान्य आहे. प्रथम मान्यता कोणत्या बाबतींत आहे तें सांगतों. सामाजिक बाबतींत सर्व माणसांमध्यें समता—म्हणजे संधि-समता—असावी; कृत्रिम जातिभेद नसावा; स्त्रियांना स्वातंत्र्य असावें; विवाहसंस्था आदरणीय, पूज्य व पवित्र असली तरी तिचें भलतें स्तोम माजवूं नये, तर योग्य परिस्थितींत योग्य ते अपवाद आपद्धर्म म्हणून मानण्यांत यावेत व कांहीं कृत्रिम निर्बंध सैल करण्यांत यावेत—अशा प्रकारचा नवमतवाद मला मान्य आहे. आर्थिक क्षेत्रांत गरिबांना (मजुरांना, शेतकऱ्यांना, कारकुनांना, शिक्षकांना वगैरे) आजकाल नांवाचेंच स्वातंत्र्य आहे, तर ही परिस्थिति बदलून त्यांनाहि अधिक वेतन मिळेल, अधिक सुट्या व अधिक सवलती मिळतील, नालायक श्रीमंतांचें त्यांना पोटाकरितां दास्य करावें लागणार नाहीं, राष्ट्रांतील खाणी, रेल्वे, मोठमोठे कारखाने व मोठ्या प्रमाणावर चालणारे कांहीं उद्योगधंदे हे राष्ट्राच्या ताब्यांत असावेत, निदान त्यांच्यावर योग्य ते निर्बंध असावेत, अशी समाजाची आर्थिक व्यवस्था मला पाहिजे आहे. राजकारणांत जातीच्या, पैशाच्या व पाशवी बलाच्या जोरावर एका जातीनें, वर्गानें किंवा राष्ट्रानें दुसऱ्यावर अंमल गाजवूं नये असें मला वाटतें. अशा प्रकारच्या माझ्या मतांना नवमतवाद म्हणावयाचें असल्यास मी नवमतवादी आहें; पण...

पण परंपरावाद्यांना उठल्यासुटल्या शिव्या देणें, जातिजातींत द्वेष माजवणें, स्त्रियांना पुरुषांनीं मुद्दाम दुष्ट बुद्धीनें दास्यांत कोंडलें आहे असें भासवून स्त्रीपुरुषांत तेढ उत्पन्न करणें, कामवासनेचा कोंडमारा होत आहे तेव्हां तो उचित मार्गानें कमी करण्याचा प्रयत्न न करतां विवाहसंस्थेवरच आघात करून स्वैराचाराचा पुरस्कार करणें, इत्यादि गोष्टी मला अविचाराच्या वाटतात.

## ‘ फुलपात्री ’ नवमतवाद

साम्यवादी ( Socialists ) किंवा कम्युनिस्ट हे स्वैराचाराचा पुरस्कार करतात असें कांहीं समजतात; पण मार्क्स, लेनिन वगैरेंना स्वैराचार पसंत नव्हता. आपल्या इकडेहि स्वैराचाराचा उघडउघड प्रचार कोणी साम्यवादी करीत नाहीं. परंतु कांहीं तुरळक व किरकोळ लोक लघुकथांमध्यें, कादंबऱ्यांमध्यें आणि स्फुट लेखांमध्यें विवाहसंस्थेंतील व्यंगें अशा तऱ्हेनें दाखवतात कीं त्यांना हीं संस्थाच नको कीं काय अशी शंका येते, या अशा लोकांना स्त्री–समागम म्हणजे ( मृच्छ-कटिकांत शकार म्हणतो त्याप्रमाणें ) वापी–स्नानासारखा आहे, म्हणजे कोठल्याहि विहिरीवर कोणीहि आपआपल्या सोयीप्रमाणें स्नान करण्यासारखा तो प्रकार आहे. यालाच रशियामध्यें फुलपात्रांतून पाणी पिण्याचा प्रकार ( glass of water theory ) म्हणतात. याचा पुरस्कार करणारे तिकडे कांहीं लोक असतील, पण जबाबदार कम्युनिस्ट त्यापैकीं नव्हत, हें ध्यानांत धरलें पाहिजे.

*　　*　　*　　*

ही ‘ फुलपात्री मीमांसा ’ मला मान्य नाहीं. कारणें सांगण्यापूर्वी आज-काल विवाहसंस्थेमुळें पुष्कळ कोंडमारा होत आहे, त्यामुळें स्त्री–पुरुषविषयक म्हणजे कामविषयक विचारांना मनुष्याच्या जीवनांत भलतेंच महत्व येत आहे, चांगल्या चांगल्या लोकांच्याहि मनांत कामविषयक विचार–विकारांची दाबादाबी व दडपा-दडपी होऊन उच्च विचारांच्या व आचारांच्या मार्गात नसतीं विघ्नें उत्पन्न होतात, कांहीं सात्त्विक स्त्री–पुरुषांचें जीवित कामविषयक अतृप्तीमुळें उत्साहरहित, तेजो-हीन, कळाहीन, फिक्कट, रोगट, कर्तृत्वशून्य होत आहे, चोरटीं व्यसनें आणि पापें करण्याकडे प्रवृत्ति वरून दिसते त्याहून अधिक आहे, इत्यादि गोष्टी मान्य केल्या पाहिजेत.

तसेंच ही गोष्ट कबूल करण्यास हरकत नाहीं कीं, विवाह ही संस्था समा-

जाच्या गरजेमुळें परिस्थितीला अनुरूप असें रूप घेऊन निर्माण झालेली आहे. ती 'दैवी' नाहीं. विवाह हा संस्कार आहे (Sacrament) आहे, करार (Contract) नाहीं, असें म्हणतात; पण हें लाक्षणिक अर्थानें खरें आहे. म्हणजे विवाहसंस्थेमुळें समाजधारणा होते व संस्कृतिवर्धन होतें म्हणून ती पूज्य मानावी, बाजारांतला माल आज घेतला, उद्यां परत केला किंवा दुसऱ्याला देऊन टाकला अशा प्रकारचा पति-पत्नीचा देवघेवीचा बाजारी व्यवहार होऊं नये, एवढाच विवक्षित अर्थ. विवाहसंस्था ही मनुष्यकृत आहे, निरनिराळ्या समाजांत एतद्विषयक निरनिराळ्या समजुती आहेत, एका काळीं जें पुण्य समजलें जात होतें तें दुसऱ्या काळीं पाप समजलें जातें, एका देशांत जें नीतिचें तें दुसऱ्या देशांत अनीतीचें ठरतें, असा एकंदर प्रकार असल्यामुळें अर्थात् विवाहसंस्थेंत देश-काल-वर्तमानानुसार इष्ट तो फरक घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यांत कांहींएक दोष नाहीं, उलट हें समाजशास्त्रज्ञ विचारवंतांचें कर्तव्य ठरतें, किंबहुना विवाहसंस्थाच समाजहितांच्या दृष्टीनें अनिष्ट ठरली तर तीहि नष्ट करून टाकली पाहिजे, हेंहि मान्य केलें पाहिजे.

आजकाल किंवा दृष्टिपथांत येणाऱ्या दोनचार हजार वर्षेपर्यंत तरी, विवाहसंस्था आवश्यक आहे असें मला वाटतें. असें जें वाटतें त्याच्या पाठीमागें केवळ रूढिप्रियता नाहीं, हें स्पष्टपणें समजावें म्हणून मी एखाद्या कल्पनिक समाजांत विवाहसंस्था नसली तरी चालेल असें म्हणतों आणि हा काल्पनिक समाज कोणत्या स्वरूपाचा असला पाहिजे याचें दिग्दर्शन करतों. या काल्पनिक समाजांत सर्व मुलांची जबाबदारी समाजानें संभाळली पाहिजे व समाजांतील बालसंगोपनगृहांत काम करणारी मंडळी उच्च ध्येयानें प्रेरित, प्रेमळ व समंजस असली पाहिजेत. विवाह-बंधन नसलेल्या समाजांत स्त्रिया व पुरुष यांमध्यें इतकें आत्मसंयमन आणि इतकी जबाबदारीची जाणीव पाहिजे कीं कोणींहि दुसऱ्याची इच्छा नसतांना तिला किंवा त्याला त्रास देणार नाहीं. आज आपल्या घरीं असलेली स्त्री ( किंवा असलेला पुरुष ) उद्यां दुसऱ्या घरीं गेल्यास असूयेचा कोणामध्येंहि प्रादुर्भाव होणार नाहीं. आपणांवर अवलंबून असलेल्या आपल्या मुलाबाळांकरितां पत्नीकरितां किंवा क्वचित् प्रसंगीं पती-पत्नी करितां हरतऱ्हेच्या हालअपेष्टा भोगून त्यांच्या सुखसोयीकरितां जिवाचें रान करण्याची आज जी प्रवृत्ति दिसते तीच प्रवृत्ति विशिष्ट स्त्री ही आपली पत्नी नव्हे, तिला झालेलीं मुलें ही

आपलीच असतील असें नाहीं, अशा प्रकारची जाणीव उत्पन्न झाल्यावरहि केवळ समाजहितेच्छेच्या प्रेरणेनें कायम राहिली पाहिजे. आजकाल पति-पत्नीमध्यें—कांहीं पति-पत्नीमध्यें तरी—जें प्रेम दिसतें तें अखंड साहचर्याच्या अभावीहि राहिलें पाहिजे. 'हा माझा पति' किंवा 'ही माझी पत्नी' असें वाटण्यामध्यें एक प्रकारचें 'ममत्व' आहे किंवा अलीकडच्या मानसशास्त्रीय भाषेमध्यें बोलावयाचें म्हणजे स्वामित्वभावनेचें व विजयित्वभावनेचें व निश्चिततेचें जें आज समाधान आहे तें समाधान आपल्या काल्पनिक समाजांत नष्ट झालें तरी लोकांना त्याचें कांहीं विशेष वाटणार नाहीं अशी त्यांची मनोघटना असली पाहिजे. अशा तऱ्हेच्या आणखी इतर कांहीं गोष्टी असलेल्या समाजांत विवाहसंस्था नसली तरी चालेल. पण--

जोंपर्यंत मनुष्यस्वभाव हा आहे तसा आहे तोंपर्यंत विवाह-संस्था व कुटुंबसंस्था या आवश्यक आहेत. आतां ही गोष्ट खरी, कीं मनुष्यस्वभावांतहि फरक होणें शक्यच नाहीं असें नाहीं. पण हा पुष्कळ कालावधीचा प्रश्न आहे; त्याचप्रमाणें समाजरचना आमूलाग्र बदलली तरच (यदाकदाचित् झाला तर) हा फरक होईल. असूया, युयुत्सा (Pugnacity), स्वामित्व अथवा स्वकीयत्वस्थापन (the possesive instinct) या व इतर ज्या सहजप्रेरणा (Instincts) आहेत त्या जन्मजात, नित्य व अनिर्मूलनक्षम आहेत किंवा नाहींत याबद्दल वाद आहे. उदाहरणार्थ सहजप्रेरणांच्या बाबतींत तज्ज्ञ गणलेला मॅक्डूगल हा युयुत्सा (Pugnacity) ही सहजप्रेरणा मानतो; पण कांहीं लोकांना ती परिस्थितिजन्य व उपार्जित (acquired) वाटते. एवढी गोष्ट खरी, कीं मनुष्यस्वभावांत फरक घडवून आणणें कठीण आहे. परिस्थिति बदलली असतां स्वभावांत थोडाबहुत फरक होऊं शकेल, परंतु परिस्थिति बरीचशी आमूलाग्र व पुष्कळ काळ पर्यंत बदलावी लागेल. परिस्थितींमध्यें असा फरक होईतोंपर्यंत आहे तो मनुष्यस्वभाव धरूनच समाजव्यवस्थेचा विचार करणें प्राप्त आहे. याचा असा अर्थ नव्हे, कीं निराळी परिस्थिति व निराळा मनुष्यस्वभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करूं नये. याचा अर्थ एवढाच विवक्षित आहे कीं, विशिष्ट परिस्थिति निर्माण होईतोंपर्यंत जी समाजव्यवस्था ठेवावयाची ती (कदाचित् पुढें होऊं शकणारा मनुष्यस्वभाव गृहीत धरून नव्हे तर) आज दिसून येणाऱ्या व नित्यस्वरूप भासणाऱ्या मनुष्यस्वभावावर आधारलेली असावी.

( परिस्थितीवर निश्चयेंकरून अवलंबून असलेल्या किरकोळ स्वभाव-विशेषांची गोष्ट अर्थात् वेगळी आहे. )

अर्थ स्पष्ट समजण्याकरितां उदाहरण घेऊं या. पोषाकासंबंधीं, अलंकारासंबंधीं खाण्यापिण्यासंबंधीं, बोलण्याचालण्याच्या चालीरीतीसंबंधीं, इष्टानिष्टतेच्या ज्या कल्पना आणि ज्या भावना आहेत त्या उघड उघड सवयींवर आणि त्या त्या परिस्थितीवर अवलंबून आहेत. धनलोभ हा देखील पुष्कळसा परिस्थितीवर अवलंबून आहे. खाण्यापिण्यास सर्वांना पुरसें असलें, मुलांना शिक्षण देणें शक्य असलें, आजारीपणांत कुटुंबियांना औषधपाणी करणें सर्वांच्या आटोक्यांत असलें, व समाजांतील मानमान्यता श्रीमंतीवर अवलंबून नसून गुणांवर अवलंबून असली तर 'लोभमूलानि पापानि' असें जें आपण म्हणतों तें म्हणावें लागणार नाहीं, चोऱ्या करण्याची इच्छा फारच थोड्या लोकांना होईल. परिस्थितींत क्रान्ति घडवून आणली तर 'लोभ' अशा रीतीनें पुष्कळसा आटोक्यांत आणणें शक्य आहे असें वाटतें.

या सवयी व ही परिस्थिति बदलणें हें शक्य कोटींतलें आहे आणि अर्थात् या कल्पना व भावना बदलणेंहि शक्य कोटींतलें आहे. या बाबतींत कांहीं फरक करणें इष्ट वाटत असल्यास तत्संबंधीं प्रयत्न करणें वावगें नाहीं. पण ज्या प्रवृत्ति व भावना परिस्थितीवरच अवलंबून आहेत अशी खात्री नाहीं आणि आहेत असें गृहीत धरलें तरी परिस्थिति बदलणें आटोक्यांत आहे अशी खात्री नाहीं, त्यांच्या बाबतींत सर्वच गोष्टी गृहीत धरून पुढें यदाकदाचित् संभवनीय होणाऱ्या स्वभाव-विशेषांच्या आधारें आजच वर्तन करण्यास सांगणें अनुचित होय. अशा दृष्टीनें विचार करतां कुटुंबव्यवस्था व विवाहसंस्था यांबद्दल अनादर उत्पन्न होईल असा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष उपदेश करणें मला गैर वाटतें. एतद्विषयक चर्चा मोकळे-पणानें करण्यास मात्र केव्हांहि हरकत नाहीं. कारण कोणत्याही सत्यशोधनात्मक चर्चेस प्रतिबंध नसावा असें माझें मत आहे. चर्चेच्या द्वारें मनुष्यसमाजाची प्रगति व्हावयाची आहे आणि विवाहसंस्थेमध्यें ज्या सुधारणा व्हावयाच्या आहेत त्या खुल्या दिल्यानें केलेल्या चर्चेशिवाय होणें शक्य नाहीं.

विवाहसंस्थेंत अर्थ नाहीं, व्यभिचारांत कांहींच पाप नाहीं, किंबहुना व्यभिचार या शब्दाला अर्थच नाहीं, तत्कालीन प्रेरणेवर, वासनेवर किंवा प्रेमावर

स्त्रीपुरुषसंबंध आधारलेले असावेत, हा उपदेश समाजाला अपायकारक आहे. आज विवाहसंस्थेमुळें कोंडमारा होत आहे वगैरे सगळया गोष्टी मान्य; पण आजचे निर्बंध अजीबात काढून टाकले तर कोंडमारा आजच्यापेक्षां अधिक होईल अशी मला भीति वाटते! हें म्हणणें चमत्कारिक दिसेल, पण तें खरें आहे. आजचे निर्बंध कांहींसें अंगवळणीं पडलेले आहेत, लोकमताचा आणि कायद्याचा त्यांना जबरदस्त पाठिंबा आहे, त्यामुळें मन कितीहि ओढाळ असलें तरी तें आटोक्यांत ठेवणें सुलभ नाहीं तरी कांहीं अंशीं तरी शक्य होतें. पण निर्बंध दूर केल्यास कोठल्याहि स्त्रीकडे कोठल्याहि पुरुषाचें मन धावेल आणि मग नियमन करण्याचीं सध्याचीं कारणें नष्ट झाल्यामुळें आणि सर्व वासनांचें सर्व काळीं समाधान होणें शक्य नसल्यामुळें, 'कोंडमारा' अधिक होईल, आणि तो अधिक जाचक होईल. मोटारी डाव्या बाजूनेंच न्याव्यांत व भररस्त्यांतून अमुक वेगापेक्षां अधिक वेगानें चालवूं नयेत, अशा प्रकारचे विधिनिषेधात्मक 'कृत्रिम,' 'समाजकृत' व कित्येक वेळां नाहक जाचक होणारे नियम असतील; पण हे नियम काढून टाकले आणि पाहिजे त्यानें पाहिजे तशा मोटारी हाकाव्यात असें 'स्वातंत्र्य' दिलें, तर या 'स्वातंत्र्याचा' दुरुपयोग होणारच नाहीं अशी खात्री देतां येईल काय? हे नियम थोडेसे जाचक आहेत, थोडासा कोंडमारा करणारे आहेत, पण त्या योगेंच सुव्यवस्था राहिली आहे. विवाहविषयक नियमांचें असेंच आहे. या नियमांच्या अभावी सामाजिक 'अनवस्थाप्रसंग' येईल अशी भीति विचारवंतांना वाटणें साहजिआहे. सगळे लोक समंजस आहेत, ते स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणार नाहींत, हें गृहीत धरणें साध्या मोटारी चालवण्याच्या बाबतींत जर धोक्याचें आहे, तर तें दुर्दमनीय अशा कामवासनेच्या बाबतींत किती धोक्याचें असेल, याची कल्पना करावी. ज्या नियमनांच्या योगें सुव्यवस्था राहते आणि ज्यांच्या अभावीं सामाजिक अनवस्था-प्रसंग येण्याचा संभव असतो तीं नियमनें इष्ट असतात, तीं असावींत, किंबहुना तीं राहूं द्यावींत असा आग्रह धरावा, इतकेंच नव्हे तर, अशीं नियमनें असणें यांतच संस्कृतिरक्षणाचें व वर्धनाचें बीज असल्यामुळें-संस्कृति त्यामुळेंच शक्य असल्यामुळें-तीं नियमनें असणें हा आपला सामाजिक व्यवस्थेचा पाया आहे, तो आपला हक्क आहे. 'Restraints are our rights' असें बर्कनें म्हटलें तें याच अर्थानें.

विवाहसंस्थेंत सुधारणा अवश्य

मला असें म्हणावयाचें नाहीं कीं, विवाहविषयक सध्याचीं नियमनें सगळीं चांगलीं आहेत आणि तीं तशींच राहूं द्यावींत. पुनर्विवाहाच्या किंवा मिश्रविवाहाच्या आड येणारे निर्बंध कमी केले पाहिजेत; विवाह घडून येण्याची शक्यता वाढविण्याकरितां तरुण स्त्रीपुरुषांना एकत्र येण्याची व बोलण्याचालण्याची संधि अधिक दिली पाहिजे; विशिष्ट परिस्थितींत संततिनियमनाची परवानगी दिली पाहिजे; घटस्फोटाची परवानगी दिली पाहिजे; कौमार्यावस्थेंत मूल झालें असल्यास त्या मुलाकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे व त्याच्या कपाळावर अकीर्तीचा डाग कायमचा लावूं नये; अशा 'कुमारी मातां'कडेसुद्धां इतक्या कठोरतेनें पाहूं नये कीं, पुढील आयुष्य कंठणें त्यांना अशक्य होईल. इत्यादि इत्यादि सुधारणा सध्याच्या वैवाहिक व्यवस्थेंत झाल्या पाहिजेत. परंतु त्या करतांना कांहीं तरी वैवाहिक व्यवस्था जरूर आहे, आणि या व्यवस्थेच्या अनुषंगानें येणाऱ्या निर्बंधांमुळें होणारा कोंडमारा अपरिहार्य आहे आणि तो समाजधारणेच्या व संस्कृतिरक्षणाच्या दृष्टीनें सहन केला पाहिजे, अशा प्रकारची आपली दृष्टि पाहिजे.

आर्थिक-क्षेत्रामध्यें नवमतवाद हा भांडवलशाहीच्या विरुद्ध आहे. शेती, खाणी, सर्व गिरण्या व इतर सर्व उत्पादनाचीं साधनें, जकाती, नाणीं व देवघेवीचे सर्व मोठे व्यवहार, सैन्य, आरमार व लढाईचीं साधनें, पोस्ट खातें, रेल्वेखातें, शिक्षण, वैद्यकीय सोई, सिनेमा, नाटकगृहें व इतर मोठीं करमणुकीचीं साधनें, ही सर्व राष्ट्राची समजून राष्ट्रहिताकरितां राष्ट्राच्या वतीनें कांहीं प्रतिनिधींनीं ताब्यांत घेऊन तीं चालवावयाची, अशा प्रकारचें जें नवमत प्रतिपादिलें जात आहे. त्यांतील गर्भित तत्त्व 'भांडवलशाही' म्हणून जी संबोधिलीं जातें तिच्यांतहि मान्य केलेलें आहे, हें पुष्कळांच्या ध्यानांत येत नाहीं. भांडवलशाहींत देखील सैन्य व आरमार हीं खाजगी मालमत्तेचीं नाहींत, आणि महायुद्धाच्या प्रसंगीं दारुगोळ्याचे वगैरे कारखानेहि खाजगी राहात नाहींत. रेल्वे, पोस्टऑफिसें, मोठमोठें रस्ते वगैरे सार्वजनिकच असतात. अर्थात् भांडवलशाहीला देखील कांहीं गोष्टी खाजगी ठेवतां येत नाहींत. उलटपक्षीं कम्युनिस्टांना देखील कांहीं छोटे व्यवहार तरी खाजगी ठेवावे लागतात. तेव्हां या दोन 'शाहींमध्यें' व्यवहाराच्या क्षेत्रांत तरी तत्त्वापेक्षां तपशिलांतच फरक आहे, असें दिसतें.

तात्त्विक चर्चेमध्येंसुद्धां तत्त्वांमध्यें जेवढा फरक वाटतो तेवढा नाहीं. कारण, व्यक्तितत्त्वाला महत्त्व देणारे लोक जनहित हें व्यक्तित्वाला महत्व दिल्यानेंच साधेल असें म्हणतात व कम्युनिस्ट हे समाजाला विशेष महत्त्व देतात असें दिसलें, तरी व्यक्तीचें खरें व्यक्तिमत्व या मार्गानेंच व्यक्त व विकसित होईल असें मानतात व अप्रत्यक्ष रीतीनें व्यक्तीचेंच माहात्म्य कबूल करतात. व्यक्तीचा पूर्ण विकास हें दोनहि पद्धतींचें ध्येय आहे; भेद जो आहे तो हा विकास समाजाकडे बहुतेक सर्व मालकी हक्क दिल्यानें होईल, का अगतिक असेल, तेथेंच समाजाकडे मालकी हक्क दिल्यानें होईल या बाबतींत आहे.

## सार्वजनिक भांडवल पद्धति

हल्लींच्या भांडवलशाहींतल्यापेक्षां अधिक बाबतींत सार्वजनिक सत्ता असावी, पण कांहीं कम्यूनिस्टांना पाहिजे इतकी ती व्यापक नसावी, असें माझें मत आहे. अमुक गोष्टी सरकारी केल्याशिवाय चांगल्या चालावयाच्या नाहींत असें सिद्ध झाल्यावर त्या सरकारी कराव्यात, एरव्ही त्या व्यक्तिगत असाव्यात असें मला वाटतें. आतां कोणत्या गोष्टी सरकारी झाल्याच पाहिजेत आणि त्या कां झाल्या पाहिजेत, हा तपशिलाचा प्रश्न आहे आणि त्यांत मी शिरूं इच्छीत नाहीं.

बहुतेक सर्व व्यवहार सरकारी करण्यामध्यें एक मोठा दोष असा कीं, त्या योगें व्यक्तिस्वातंत्र्य कमी होण्याचा संभव असतो; निदान रशियांतली सध्याची स्थिति पाहिली म्हणजे वरिष्ठ सरकारी सूत्रधारांना किंवा कर्णधारांना जीं मतें नापसंत आहेत, जे कलाप्रकार आवडत नाहींत, जे आचार अप्रिय आहेत, त्यांच्या पुरस्कर्त्यांना स्वातंत्र्य जेवढें असावयास पाहिजे, तेवढें नाहीं हें कबूल करणें प्राप्त आहे. उदाहरणें दिलींच पाहिजेत असें नाहीं म्हणून तीं देत नाहीं. पण ललित वाङ्मयावर देखील विलक्षण प्रकारचीं बंधनें होतीं आणि तीं आतां थोडींशीं शिथिल झालीं असलीं तरी पुढेंमागें तीं दृढ होणारच नाहींत अशी खात्री बाळगतां येत नाहीं. कांहीं अर्थशास्त्रज्ञांना आपलीं मतें प्रसिद्ध करण्याचीं चोरी होती व आहे. अशा प्रकारची रशियांतली स्थिति वाचली म्हणजे कम्यूनिझममध्यें पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य भविष्यकाळीं केव्हां मिळेल तेव्हां मिळो, आजउद्यां तरी तें बरेंच मर्यादित राहणार हें कबूल केलें पाहिजे.

येथें हें लगेच कबूल केलें पाहिजे कीं, भांडवलशाहीमध्यें जें व्यक्तिस्वातंत्र्य

दिसतें तें, बरेचसें शाब्दिक व आभासात्मक आहे. मजुराला विशिष्ट पगारावर व विशिष्ट परिस्थितींत काम करण्याची किंवा न करण्याची तत्त्वतः मुभा असते; पण व्यवहारांत त्याला गत्यन्तर नसल्यामुळें तो खरोखर दासच असतो. मजुरांचेंच कशाला, कारकून, मामलतदार, शिक्षक, प्रोफेसर, वगैरे लोकांचेंहि पुष्कळसें असेंच आहे ! त्याचप्रमाणें हेंहि ध्यानांत धरलें पाहिजे कीं रशिआंत कोणतेंहि धोरण ठरवतांना व पुढारी नेमतांना लोकमत व्यक्त होण्यास पुष्कळसा अवसर दिला जात आहे आणि या अर्थानें व्यक्तींना खरें स्वातंत्र्य आहे; पण सर्वांना अद्यापि सत्तेचे वांटेकरी करण्यांत आलेलें नाहीं हें एक, सामाजिक सत्तेच्या कल्पनेचें फाजील स्तोम व्यवहारांत तरी दिसतें हें दुसरें आणि आर्थिक व इतर बहुतेक सर्व व्यवहार सरकारी रीतीनेंच करणें उपपत्तीच्या दृष्टीनें सर्वथा व सर्वदा फायदेशीरच होईल हें सिद्ध झालेलें नाहीं हें तिसरें. या कारणांस्तव कम्यूनिझमच्या आर्थिक व्यवस्थेसंबंधानें मन साशंक असणें साहजिक आहे.

## एका हातानें टाळी वाजत नाहीं

हें म्हटल्यानंतर लगेच हेंहि सांगून टाकावेसें वाटतें कीं, हिंदुस्थानांतील व इतर देशांतील भांडवलवाल्यांचेहि डोळे अद्यापि उघडत नाहींत आणि ते स्वार्थ साधण्याकरितां मजुरांचें व राष्ट्राचे अत्यन्त अनहित करीत आहेत. (स्वतःचेंहि ते अनहितच करून घेतात ! ) त्यांचे डोळे लवकर जर उघडले नाहींत तर कम्यूनिझम बळावणार यांत शंका नाहीं. भांडवलशाहींत देखील समाजहित साध्य होऊं शकेल असें माझ्यासारखे लोक उपपत्तीच्या दृष्टीनें कितीहि म्हणाले तरी प्रत्यक्ष अनुभव जर उलट येऊं लागला आणि बडगा बसल्याशिवाय भांडवलवाले जागे होत नाहींत असे वारंवार अनुभव येऊं लागले, तर या आत्मघातकी भांडवलवाल्यांचें समर्थन कोणालाही पटणार नाहीं. (आणि कां पटावें ?) वर्गकलहाची भाषा उगाच येत नाहीं. एका हातानें टाळी वाजत नाहीं.

वाङ्मयाच्या क्षेत्रांत असंस्कृत वास्तववाद (Crude realism) जो येऊं पाहत आहे तो एक नवमतवादाचाच प्रकार दिसतो, वेळेच्या अभावीं त्याचा विस्तारानें विचार न करतां एवढेच सांगतों, कीं अमुक एक गोष्ट आहे म्हणजे तिचें काळ वेळ स्थळ न पाहतां पाहिजेल तेव्हां इत्थंभूत वर्णन केलेंच पाहिजे असें शास्त्र नाहीं. तें सांगण्याची जरूर असली पाहिजे, तें सांगण्यांत

सांगणाराची कांही तरी दृष्टि असली पाहिजे, कांहीं तरी चांगला हेतु असला पाहिजे, *नीतिबोध असला पाहिजे असें मला म्हणावयाचें नाहीं,* तर *कांहीं लोकांना कांहीं* गोष्टी—उदाहरणार्थ कांहीं उत्तान-शृंगारात्मक गोष्टी-वाचण्यास आवडतात एवढेंच त्यांचें समर्थन असेल तर तें समर्थन लंगडें आहे, असें मला म्हणावयाचें आहे. वैद्यकीय पुस्तकांत किंवा मानसशास्त्रीय पुस्तकांत, कामविषयक उत्तान गोष्टी खुशाल लिहाव्यात. कादंबऱ्यांत, नाटकांत, लघुकथांतहि लिहिण्यास हरकत नाहीं, पण केव्हां, तर त्या कांहीं लोकांना आवडतात याहून अधिक बलवत्तर त्यांचें समर्थन असेल तर. म्हणजे त्या लिहिण्यानें आवश्यक असें ज्ञान लोकांना मिळालें तर; किंवा त्या लिहिल्यानें लोकांच्या दृष्टींत किंवा वृत्तींत इष्ट असा फरक होण्याचा संभव असेल तर; किंवा त्या वाचण्यानें वाईट परिणाम न होतां शुद्ध आनंद होत असेल तर. विकृत जिज्ञासेच्या तृप्तीकरितां अमंगल ग्राम्य हिडिस गोष्टींचें वर्णन, तें केवळ 'यथार्थ' आहे एवढ्यानेंच समर्थनीय ठरत नाहीं, तर त्या वर्णनाच्या पाठीमागें कांहीं तरी कलात्मक, ज्ञानदानात्मक, सुसंस्कारात्मक भाग असला पाहिजे असें मला थोडक्यांत म्हणावयाचें आहे.

## वाङ्मयक्षेत्रांतील नवमतवाद

वाङ्मयाच्या क्षेत्रांत नवमत वादाच्या आणखी दोन परस्परविरुद्ध भासणाऱ्या प्रवृत्ति दिसत आहे. ती कला "कलेकरितां कला" मानण्याची एक प्रवृत्ति व "जीवनोपकारक जी कला ती कला" असें मानण्याची दुसरी प्रवृत्ति. व्यक्तीचें ध्येय केव्हांहि जीवन—म्हणजे उच्च अर्थानेंच जीवन—हें आहे. याचा अर्थ असा, कीं मनुष्याला नुसतें जगावयाचेंच नाहीं, केवळ सुखच मिळवावयाचें नाहीं, तर आपल्या अंगांतील सर्व सत्प्रवृत्तींना वाव मिळेल व सर्व सात्त्विक शक्तींचा विकास होईल अशा तऱ्हेनें जगावयाचें आहे. 'स्वत्वा'मध्यें जें जें चांगलें आहे त्याचें पोषण व्हावें, त्याचा विकास व्हावा, अशी मनुष्यमात्राची इच्छा आहे. थोडक्यांत म्हणजे सर्वांगीण विकास हें आपलें ध्येय आहे. अर्थात् 'कला' ही जर अशा आपल्या ध्येयाच्या आड येईल तर कला वाईटच म्हटली पाहिजे. पण हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं कलात्मक आनंद व कलादृष्टीचा विकास हें देखील स्वत्व-विकासाचें किंवा आत्मप्राप्तीचें ( Self-realisation ) चें एक अंग आहे, इतकेंच नव्हे तर प्रमुख अंगांपैकीं एक आहे. अर्थात् या अंगाची उपासमारी किंवा

गळचेपी इतर अंगांकडून शक्यतोंवर होणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. आणि अशी जर खबरदारी घ्यावयाची असेल तर कलेचें स्वातंत्र्य मान्य करावयाचें आणि होतां होईल तों तिच्या क्षेत्रांत ढवळाढवळ करावयाची नाहीं, असें इतर अंगांचें धोरण असलें पाहिजे. अगदीं अगतिक झाल्यावरच कलेवर बंधनें घालण्यांत यावें आणि हें अगतिकत्व ठरवतांना बरीचशी उदार वृत्ति ठेवावी. कलेनेंहि हें ध्यानांत धरलें पाहिजे, कीं कलादृष्टि हें एकच मनुष्याचें अंग नाहीं. मनुष्याला सर्वांगीण उन्नति करून घ्यावयाची आहे, तर या सर्वांगीण उन्नतीच्या आड निश्चयेंकरून येईल असें आपलें धोरण नसावें. कांहीं विशिष्ट लोकांना तें सर्वांगीण उन्नतीच्या आड येणारें आहे असें वाटतें याला कलेनें वाटलें तर महत्त्व देऊं नये, कारण लोकमत किंवा शिष्टमत नेहमींच खरें असतें असें नाहीं. तें कित्येक वेळां अंध असतें आणि त्याविरुद्ध बंडखोरी पुकारणें हें विचारवंताचें कर्तव्यकर्मच असतें. कलेनेंहि अशी बंडखोरी पुकारल्यास त्यांत वावगें काय आहे? तसें पाहूं गेलें तर विचारवंतांच्या 'नवनीती' नें अनेकदां बंडें केल्यामुळेंच नीतीची सुधारणा व उन्नति झालेली आहे असें इतिहास सांगतो. मग कलावंतानें तरी प्रचलित नीतीच्या विरुद्ध जाणाऱ्या आपल्या सत्कल्पनांना (प्रबळतर कारण नसल्यास) आळा कां घालावा? कलावन्ताच्या बाजूनें एवढें म्हटल्यानंतर त्यानें हें मान्य केलें पाहिजे कीं, आपल्या कलेचा विलास हा एकंदर जीवनाच्या ध्येयाला अपायकारक होणार नाहीं असें आपलें धोरण असलें पाहिजे. आपल्या कलाविषय आकांक्षा न सोडतां शक्य असेल तेथें आपली कला उत्तम जीवनाला उपकारक व्हावी अशीहि त्यानें आकांक्षा धरली तर तें उत्तमच आहे हें सांगावयला नकोच.

खरी गोष्ट अशी आहे कीं, मनुष्यामध्यें तीन मुख्य लालसा आहेत. ज्ञानलालसा, सौंदर्यलालसा आणि समाजहित-लालसा. आणि या तीन लालसांपैकीं कोणीहि सासू नाहीं आणि कोणी सून नाहीं, त्या जावाजावाहि नाहींत, तर त्यांनीं तीन मैत्रिणीप्रमाणें आपआपल्या घरीं पूर्ण स्वामित्वानें, पण शेजारणीच्या स्वातंत्र्यास बाधा न येईल अशा रीतीनें वागावयाचें आहे. या तिघींमध्यें विरोध उत्पन्न होऊं नये, त्यांच्यामध्यें स्नेहभाव असावा, हें ध्येय. पण स्नेह कायम राहणें अशक्यच झालें तर एकंदर जीवनाचें जें ध्येय, म्हणजे सर्वांगीण उन्नति व विकास या ध्येयाच्या अनुरोधानें सर्वांनीं वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

कला व जीवन यासंबंधीं विचार करतांना जीवन म्हणजे गरीब मजुरांचें

असें म्हणणें चूक आहे. त्याचप्रमाणें गरीब–श्रीमान, मजूर–भांडवलवाले यांचा कलह कलेमध्यें प्रतिबिंबित झालाच पाहिजे, किंवा या कलहाचा अंत वर्गविहीन समाजरचनेनें जो होणार आहे तो कलाकृतीनें अल्पांशानें तरी जवळ आणला पाहिजे, अशा प्रकारच्या आकांक्षा धरणेंहि चुकीचें आहे. कलेचें असें एक स्वतंत्र घर आहे, आणि तेथें तिनें आत्मानंदांत खुशाल कालक्रमण करावें हें जो मानीत नाहीं असा आग्रह धरून बसतो कीं कलेनें नेहमीं ज्ञानाच्या घराची आपल्यापरीनें धन केली पाहिजे किंवा नीतीच्या मन्दिरांत जाऊन नेहमीं फुलें वाहिलींच पाहिजेत, तो दुराग्रहीच म्हटला पाहिजे असं मला वाटतें. मूर्तिकला, चित्रकला, गायनकला, नर्तनकला, यांपासून ज्ञानामध्यें भर पडणें व नीतीचें पोषण होणें शक्य आहे, पण तसा आग्रह धरणें असमंजसपणाचें आहे हें सहज दिसून येण्यासारखें आहे.

कलेचें घर स्वतंत्र आहे असें म्हटलें तें अर्थवादात्मक, प्रस्तुत-गौरवार्थ म्हटलें. वास्तविक पाहतां आत्मा हा पदार्थ अखंड अविभाज्य आहे. त्याचीं सर्व अंगें–उपांगें अन्योन्यसंबद्ध व अन्योन्याश्रयी आहेत. सामान्य व्यवहाराच्या सोयीकरितांच निरनिराळ्या अंगोपांगांचें स्वतंत्र अस्तित्व मानावयाचें आहे. वाङ्मयात्मक कलेसंबंधानें बोलतांना तर हें तत्त्व विशेषतः ध्यानांत धरलें पाहिजे. वाङ्मयात्मक कलेचा ज्ञानाशीं आणि नीतीशीं अत्यंत निकट, गुंतागुंतीचा व जिव्हाळ्याचा संबंध आहे. ‘कलेकरितां कला’ असें आग्रहानें म्हणणारे प्रो. फडके देखील Depth of feeling and profundity of thought (भावनांचा सखोलपणा व विचारांचा भडकपणा) वाङ्मयात्मक कलाकृतीमध्यें पाहिजे असें कबूल करतात हें त्यांच्या एका लेखावरून दिसून येतें.

कलेपासून बोधप्राप्ति होऊंच नये किंवा नीतिसंवर्धन होतांच कामा नये, असें ते केव्हांहि म्हणत नव्हते. आणि आतां ते वरचेवर विचार आणि वरवरच्या भावना यांनी वाङ्मयात्मक कलेला तेज येत नाहीं असें मानतात, तेव्हां वादाचें क्षेत्र पुष्कळच आकुंचित झालें आहे. आतां प्रश्न एवढाच राहिला कीं, जिच्या पोटीं विचार शून्य आहे आणि भावनाहि शून्य आहे, अशी वाङ्मयात्मक कला असूं शकेल काय? शक्य नसेल तर केवळ ‘कलेकरितां कला’ म्हणणें म्हणजे हवेंत किल्ले बांधतां येतील असें म्हणण्यासारखें आहे. विचार व भावना या

वाङ्मयात्मक कलेच्या गाभ्यांत आहेत, केवळ त्यांवर तिचें सौंदर्य अवलंबून नाहीं. पण त्याशिवाय ती पोकळ होईल.

दुसरा असा एक पक्ष संभवनीय आहे, कीं विचार व भावना कलेच्या पोटीं असतील त्या असोत; कलेकडे पाहतांना तिच्या आकाराकडे आणि नाकाडोळ्यांच्या ठेवणीकडे पाहावें, अंतरंगांत असलेल्या गोष्टींकडे पाहूं नये. पण अंतरंगाकडे डोळेझाक करून केवळ रूपाकडे पाहणें कांहीं वेळ आणि अल्प प्रमाणांत शक्य असलें तरी ही वृत्ति फार वेळ टिकूं शकत नाहीं. आणि वाङ्मय वाचून एकंदर व कायमचा संस्कार काय होतो हें जर त्याची मूल्यमीमांसा करतांना पाहावयाचें नसेल तर अंतरंग-विरहित वाङ्मय-रूप शक्य असेल तर-तें अगदीं खालच्या दर्जाचें ठरेल. अंतरंग शुद्ध व ससत्त्व असेल तर तें कलाजन्य आनंदाचें एक अंगभूत कारण होईल आणि अंतरंग किडलेलें—सडलेलें असेल तर कलाजन्य आनंदाचा विरस करील इतकेंच नव्हें तर त्याच्या मूळावरच येईल!

---

## सत्त्वपरीक्षा

रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे गुंफित असेलेल्या गद्य नाटकमालेंतील 'सत्त्वपरिक्षा' हें एक ताजें फूल आहे. हिरव्या चांफ्याच्या वासाप्रमाणें या फुलाचा वास सुवास आहे किंवा कसें, हें एकदम सांगणें जरासें कठीण आहे. सुवास आहे यांत शंका नाहीं, असें एकपरी तर वाटतें; परंतु जवळ घेऊन व हुंगून बारकाईनें त्याचा वास पाहूं लागल्यावर त्याच्या सुवासाबद्दल किंचित् शंका येऊं लागते.

नाटक हें एक 'दृश्य' काव्य आहे, हें कोणी मान्य करील; पण या दृश्य काव्याकडे कोणत्या दृष्टीनें पाहावें याविषयीं मतभेद असणें शक्य आहे. भाषाशास्त्र, अलंकारशास्त्र, वगैरेंच्या चिकित्सक दृष्टीनें नाटकाकडे पाहणारे कांहीं लोक असतात; कांहीं लोक संविधानक, अभिनय, सीनसीनरी, इत्यादि गोष्टीकडे लक्ष देऊन नाहक मनोरंजक व उत्कटविकारोत्पादक आहे किंवा नाहीं, हें पाहत असतात; कांहीं लोक नाटकापासून बोध काय घ्यावा, या दृष्टीनें नाटकाकडे पाहात असतात; दुसरी कांहीं मंडळी अशी असते कीं, त्यांना बोध नको असतो, ते नाटकांतील विनोदी भाषणें ऐकण्याकरितां, विदूषकी हावभाव पाहण्याकरितां, हंसण्याकरितां, दुःखीकष्टी मन कसें तरी रिझविण्याकरितां व आपणांस दुःख देण्याचा निश्चय जणूं केला आहे, अशा देवाच्या किंवा दैवाच्या हातावर तुरी देऊन कांहीं घटका तरी आनंदांत घालविण्याकरितां नाटक पाहण्यास जात असतात; कांहीं लोक नाटकांतील भाषेवर, संविधानकावर, वगैरे आढ्यतेनें टीका करण्यापूर्वी तें पाहण्यास जात असतात; व दुसरे कांहीं जण नाटक चालू असतां वारंवार टाळ्या पडाव्यांत म्हणून टाळ्या वाजविण्यास आरंभ करण्याकरितां ठेविलेले असतात.

नाटक पाहणाऱ्या लोकांचे असे आणखी अनेक वर्ग आहेत. 'सत्त्वपरीक्षा' हें नाटक बहुतेक वर्गांतील लोकांना थोडाबहुत तरी संतोष देण्यासारखें असल्यामुळें

**'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्'**

या कवीच्या उक्तीला पुष्टि देणारें आहे. यांतील भाषा कित्येक ठिकाणीं फारच चांगली आहे. अलंकारांची तर रेलचेल आहे; सुभाषितांचीं व उदात्त विचारांचीं रत्नें जागोजाग चमकत आहेत; बोधामृताचा झरा एका बाजूनें सतत वाहत आहे; या बोधामृताच्या सुंदर झऱ्याजवळच कुचक्या विनोदाचें एक नासकें तळें आहे,–ग्राम्यलोकांनीं त्यांत यथेच्छ डुंबावें, व हंसावें, खेळावें, हा या तळयाचा उद्देश दिसतो. पोरासोरांना पोट धरधरून हंसण्याकरितां माकडचेष्टांचीही या नाटकांत सोय केलेली आहे. एकंदरींत कोणत्याही वर्गाच्या मनुष्याला या नाटकांत ग्राह्यांश सांपडेल.

सत्यव्रत हरिश्चंद्राची कथा 'सत्त्वपरीक्षा' नाटकास आधारभूत आहे. या पुण्यश्लोक राजाचें सत्त्व पाहण्याकरितां विश्वामित्र ऋषीनें त्याच्याकडून राज्यदान कसें मागून घेतलें, त्या राजाला रंक केलें इतकेंच नव्हे, तर साध्वी तारामती राणी व सुपुत्र रोहिदास यांसह त्याला दास्य स्वीकारावयास लावून त्याचा नाहीं नाहीं तो कसा छळ करविला, व त्या तिघांनींहीं अनिर्वाच्य हाल-अपेष्टा सोसल्या, पण आपलें 'सत्त्व' कसें राखलें इत्यादि गोष्टी प्रसिद्धच आहेत. त्या तिघांचें श्रेष्ठ धारिष्ट, त्यांचा करारीपणा, त्यांची सात्विक वृत्ति, त्यांची धीरोदात्तता, इत्यादिकांचें प्रथम वर्णन करून त्यांच्या सच्चारित्र्याची आठवण ज्या कवीनें अजरामर करून ठेवली, त्याचे आपणां आर्य लोकांवर फार उपकार आहेत, यांत शंका नाहीं. सत्त्वपरीक्षा नाटकांत याच कथानकास दृश्य स्वरूप दिलेलें असल्यामुळें तें नाटक उच्च ध्येयांच्या रम्य व आदरणीय मूर्ति प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर ठेवितें, व अर्थात् सदुपदेशाच्या दृष्टीनें हें नाटक उच्चतम प्रतीचें आहे यांत शंका नाहीं. स्वीकारलेलें व्रत किंवा अंगीकारलेलें कर्तव्य किती हाल-अपेष्टा सोसाव्या लागल्या तरी सोडूं नये; धन-दौलतीचें व ऐषारामाचें सुख बहुधा अल्पकाल टिकणारें व शेवटीं दुःख देणारें असतें; सत्यव्रतपालनानें ऐहिक शारीरिक सुख मिळेलच असें जरी नाहीं, तरी त्या योगेंकरून प्राप्त होणारें सात्विक निःश्रेयस सुख विश्वामित्रासारख्या राजसी किंवा तामसी तपस्व्यालाच नव्हे, तर प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही हिरावून घेतां येणार नाहीं. समाजांतील

श्रेष्ठ लोक जो कित्ता घालून देतात, तोच कित्ता सामान्य जनसमूह आपापल्यापरीनें कमीअधिक उत्साहानें व कौशल्यानें गिरवीत असतो, आणि म्हणून लोकनायकांनीं साधुवृत्तीचा व सद्वर्तनाचा सर्वोत्कृष्ट धडा घालून देणें समाजाच्या दृष्टीनें किती आवश्यक आहे; इत्यादि गोष्टी सत्त्वपरीक्षा नाटकावरून मनोवेधक रीतीनें कळून येतात व घटका चार घटका तरी त्यांचा ठसा हृत्पटलावर उमटल्याशिवाय राहत नाहीं. हरिश्चंद्र, श्रीरामचंद्र इत्यादि विभूतींचीं चरित्रेंच मुळीं अशीं आहेत कीं, तीं वेड्यावांकड्या शब्दांनीं जरी कोणी सांगितली तरी तीं हृदयांमधील कोमल व सात्विक वृत्ति जागृत करतात; आणि वर्णन करणारा जर कुशल असेल, तर मग बघावयासच नको–तो दगडासारख्या कठोर हृदयाला देखील रडावयास लावील व नवनीताप्रमाणें कोमल असलेल्या मनाला आपल्या सात्विक तेजाच्या योगानें वज्रासारखे कठोरही करील.

हरिश्चंद्रादिकांचें चरित्र सुवासिक पुष्पांच्या मालेसारखें आहे. माला कशीही गुंफलेली असो, तिला सुवास आल्याशिवाय राहाणार नाहीं. आतां एवढें खरें कीं, मालाकार अडाणी किंवा अरसिक असला, तर तो फुलें कशीतरी ओंवून माळ अगदी बेढब करून सोडील, व एखादें वेळेस चुकीनें चांगल्या ताज्या फुलांबरोबर दुर्गंधयुक्त फुलें किंवा पानें घालील व त्यामुळें सुपरिमलाबरोबर कुपरिमलाची छटाही मालेंतून निघूं लागेल. सत्त्वपरिक्षा नाटकांत हरिश्चंद्रकथेचा सुवास एकसारखा सुटलेला असतोच; पण त्या पुण्यश्लोक राज्याच्या, पतिव्रता तारामती राणीच्या व सुपुत्र रोहीदासाच्या नैतिक पराक्रमाच्या पुष्पांबरोबरच रा. खाडिलकर यांच्या विनोदाची व कृत्रिम भाषाशैलीची कांहीं दिसण्यांत खराब, कांहीं कुचकी व कांहीं शिळीं अशीं फुलें या मालेंत गुंफलीं गेल्यामुळें तीं जितकीं आल्हाददायक व्हावीं तितकी झालेलीं नाहींत.

सामान्य विधानें आढ्यतेनें ठोकून देऊन मोकळें होण्याची या लेखकाची इच्छा नाहीं. म्हणून कांहीं विशिष्ट गुणदोषस्थलें येथें दाखविण्याचें योजिलें आहे. आधीं दोषविवेचन करूं या.

रा. खाडिलकरांच्या या व इतर नाटकांतला मुख्य दोष त्यांच्या विनोदांत गुरफटलेला आहे. विनोद म्हणजे बाष्कळपणा, फाजीलपणा, ग्राम्यता किंवा बीभत्सपणा नव्हे; हें तत्त्व कित्येक वेळां ते विसरलेले दिसतात. हास्य व बीभत्स हेसुद्धां रस आहेत व ते कित्येक प्रसंगीं इतर रसांस पोषकही होऊं शकतात हें

कबूल; पण ही रसपोषकता साध्य होईल अशा रीतीनें त्यांचा उपयोग करणें हें फार नाजूक काम आहे; इतकें कीं, तें फार थोड्यांसच साधतें. आतां हें खरें कीं, एकाला जें रसहानिकारक वाटेल तें दुसऱ्याला कदाचित् वाटणार नाहीं. सदभिरुचीचा बिनचूक तराजू अद्यापि कोणी शोधून काढला नसल्यामुळें या बाबतींत मतभेत होणें अपरिहार्य आहे. तेव्हां या लेखकाचें मत सदोष असण्याचा संभव आहे, हें प्रांजलपणें कबूल केलेलें बरें. सत्त्वपरीक्षा नाटकांत रत्नपाल नांवाच्या व्यापाऱ्याची सुवर्णदासी नांवाची एक वाईट चालीची बायको होती, असें दाखविलें आहे; व एके प्रसंगीं तिच्याकडे बोट दाखवून चित्रदास नांवाचा त्यांचा कारकून रत्नपालाला प्रत्यक्ष तिच्या नवऱ्याला-विचारीत आहे कीं, ‘ काय हो, ही तुमची बायको का माझी ? ’ हें वाक्य ऐकून सर्वांना हंसूं येतें, ही गोष्ट खरी; पण कित्येकांना हंसल्यावर असल्या विनोदाचा थोडासा किळस वाटूं लागतो, हीही तितकीच खरी गोष्ट आहे. नटवी सुवर्णदासी ही एके प्रसंगीं म्हणतें कीं, ‘ खेटर अडलें आहे माझें, हिशेबांत तरी कारकुंड्याची बायको म्हणून घ्यायला ? ’ या वाक्यांतली भाषा कांहीं विशेष गोड आहे असें नाहीं. तथापि भाषेचा प्रश्न सोडून दिला तरी, या वाक्यांतील विनोद कितपत सहृदयतेचा आहे. याबद्दल या लेखकाला बरीच शंका आहे. ‘ गंपू ’ नांवाचें हास्यरसोत्पादक असें दुसरें एक पात्र या नाटकांत आहे. आपलें गणपतीसारखें मोठें पोट बरोबर घेऊन हा बावळा व भंगट मुलगा एका प्रवेशांत रंगभूमीवर आल्यावर त्याच्या पोटावर खरपूस मार बसतो, तो मग खालीं पडतो, लुटून आणलेल्या लाडवांच्या टोपलींतले लाडू घेऊन मग तो सभोंवतालच्या मंडळीला मारूं लागतो, अशा अनेक माकडचेष्टा पाहून लहान पोराबळांसच नव्हे, तर पोक्त व भारदस्त माणसासही अनावर हंसूं येतें. हेंच वात्रट पोर एके प्रसंगीं आपल्या आईला म्हणतें कीं,—

“ हें काय ग आई, बाबांचा जिथें तिथें आप्पलपोटेपणा ? श्राद्ध आपणच करतात, एवढा मी मोठा झालों तरी मला एक वर्ष देखील श्राद्ध करूं दिलें नाहीं; लोक मला मुली कशा देतील ? श्राद्धपक्षाचें राहूं दे, परवां मेहुतराचें आमंत्रण आलें होतें, मी म्हटलें तुमच्या जागीं मी पानावर बसतो, साफ नाहीं म्हणून सांगितलें त्यांनीं ! बाबा कारकून होते, त्या वेळीं लोक त्यांना भारवाहक म्हणत, मूर्ख म्हणत–गर्दभ म्हणत–पण मी म्हणतों बाबा पेढीवाले झाले तरी अजून जसेच्या तसेच आहेत. ”

आपल्या बापाला आईसमक्ष 'गाढव' म्हणणारें पोर पाहून हंसूं येणारच; आणि बाबाच्याऐवजीं स्वतःबरोबर 'मेहुतराच्या' जेवणाला चलण्याविषयीं आईला सूचना करणाऱ्या पोराची मूर्ति रंगभूमीवर पाहिली म्हणजे टाळ्यांचा गजरही व्हावयाचाच. अशा प्रसंगीं कोणी झाला तरी हंसणारच. पण कित्येकजण त्या प्रसंगीं आपलें सुदैव समजतील कीं, रा. खाडिलकरांचें वर्णन तेवढ्यावरच थांबलें; नाहीं तरी आईला मेहुतराच्या भोजनासाठीं बाबाच्या ऐवजीं स्वतः घेऊन जाण्याचा विचार करणाऱ्या गंपूच्या तोंडांत आणखी कांहीं घातलें असतें तर त्याचें तोंड किंवा रा. खाडिलकरांचे हात कोणी धरले असते? बाकी 'गंपूच्या' आईला कदाचित् त्याचे कांहींच वाटलें नसतें; कारण ती आपल्या पतीविषयीं आपल्या लाडक्या मुलाजवळ म्हणते कीं,—

"अहो, अजून आहेत तसेच मूर्ख–गाढव आहेत. कारकुनींत सगळा जन्म गेला, आतां या वयांत किती धुतलें–किती कान कापले–तरी थोडेंच घोड्याचें रूप येणार आहे."

पण ती कांहीं अगदींच निसवलेली दिसत नाहीं,–कारण, मुलाजवळ आपल्या पतीला 'मूर्ख-गाढव' म्हणाली तरी—'आपलींच माणसें, आपण असें रत्स्यांत बोलूं नये झालें,' असें म्हणण्याइतकी तिला जनलज्जा आहेच!

अशा या दिव्य पात्रांचीं अशीं भाषणें ऐकावयास लावून हास्यरसाचा पूर आणणें सोपें आहे. हंसूं काय, पाहिजे त्याला पाहिजे तेव्हां हंसवितां येईल. पण हंसविणें हेंच केवळ नाटकारांचें ध्येय नसावें; चांगली कोटि लढवून किंवा गमतीचा योगायोग जुळवून आणून हंसविण्यांत नाटककारांचें कौशल्य दिसून येतें. लाडवांची मारामारी आणि बुक्क्यांचा धांगडधिंगा दाखवून किंवा ग्राम्य व मूर्खपणाचीं भाषणें ऐकवून हंसविल्यानें लेखकाच्या विनोदशक्तीचें दिवाळें निघण्याची वेळ आली आहे कीं काय अशी शंका येऊं लागते.

अलीकडील नाटकांमध्यें विदूषकाला अर्धचंद्र मिळाल्यासारखा दिसतो. पण खरी गोष्ट तशी नाहीं. इतर सर्व लोकांनीं जसा आपला पोषाख बदलला आहे, तसा विदूषकानेंही आपला पोषाख बदलला आहे, एवढेंच. पण एखाद्या काळ्या पारशानें युरोपियनचा अपटुडेट पोषाख केला असला तरी पारशी तो पारशीच, तसेंच अलीकडील विदूषकानें विसरभोळ्या ब्राह्मणाचें सोंग घेतलें, किंवा 'हर्र' च्या बाराखडीवरच आपला भावार्थ कळविण्याचें काम भागवून घेणाऱ्या 'बृहस्पति'

ऋषीची दाढी लावली किंवा ‘ व्यतिपाता ’ सारखे चाळे केले, अथवा मारवाड्याच्या वह्या जवळ घेतल्या, किंवा ‘ सुवर्ण दासी ’ हें नांव घेऊन वेश्येसारखा नटला थटला, किंवा ‘ श्रृंगीभृंगी ’ च्या तो कोट्या लढवूं लागला, किंवा घोटा पिऊन ‘गपूंसारखें त्यानें पोट मोठें फुगवून घेतलें-तरी विदूषक तो विदूषकच ! नांवें व सोंगें बदलली म्हणून त्याचें खरें स्वरूप भारीच बदलणार आहे, किंवा पूर्णपणें लपणार आहे ?

नाटकांत हास्यरस असलाच पाहिजे कीं काय, या तात्त्विक व शालोचित (Academic) प्रश्नाचें उत्तर देण्याचें येथें विशेष प्रयोजन नाहीं; सर्व उत्तम उत्तम नाटकांत कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें विदूषक वावरत असतो, हें पूर्वींच्या व अलीकडच्या, आपल्या इकडील व परदेशांतील, नाटककारांच्या कृतीवरून स्पष्ट होतें, ही गोष्ट मात्र ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. सर्व नाटककारांच्या कृतींकडे व श्रोतृसमाजाच्या मनःस्थितीकडे पाहिलें असतां हास्यरस हा नाटकास आवश्यक नसलाच, तर निदान तो फार उपयुक्त तरी आहेच आहे, असें म्हणावें लागेल. हास्य उत्पन्न करण्याचें मार्ग कोणते याविषयीं मात्र नाटककारानें आपल्या मनाशीं निश्चय करून ठेविलेला असावा. विदूषकी विनोद अवश्यक असेल; पण विदूषका-विदूषकांत फरक असतो. अलीकडच्या नाटकांत विदूषक एक प्रकारचा असतो असें नाहीं; त्यांची संख्या बरीच असून ते आपलें नांवगांव बदलून नाटकांतील साम्राज्यांत बिनदिक्कत वावरत असतात, हें वर दिग्दर्शित केलेंच आहे. अर्थात् त्यांच्या विनोदामध्यें व कोट्यांमध्यें पूर्वींपेक्षां अधिक विविधता व अधिक मनोहारित्व आलें आहे, यांत शंका नाहीं. परंतु या वर्गाची अजून सुधारणा होणें शक्य आहे. विदूषक मूर्ख किंवा हलकट असलाच पाहिजे असें नाहीं; कंटाळवाण्या कोट्यांचें त्याच्याकडून रंगभूमीवर चर्वितचर्वण करविलें नाहीं तरीही चालण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, एका आधुनिक नाटकांतील ‘बृहस्पति’ हें नामाभिधान धारण करणाऱ्या ऋषीनें ‘हा-ही-हे’ या मंत्राचा एकसारखा जप चालविला नसता, तरी त्याच्याकडून विदूषकी कार्य नाटककर्त्यास करवून घेतां आलें नसतें, असें नाहीं. तसेंच टीकाविषयीभूत ‘ सत्त्वपरीक्षा ’ नाटकांतील ‘ चित्रगुप्त ’ कारकूनाला आपल्या हिशेबी वह्यांचें घटकाभर विस्मरण झालें असतें, व दुसऱ्या कोटया त्याला सुचल्या असत्या, तर श्रोतृसमाज अगदीं दुर्मुख बसला असता असें नाहीं. स्थानींअस्थानीं हिशेबाची चोपडी आणल्यानें चित्रगुप्ताच्या नीरस विनो-

दाची कटकट शेजारच्या दारीं धरणें धरून बसणाऱ्या मारवाड्याच्या ओरडी-प्रमाणें कित्येकांना त्रासदायक होते. तसेंच, काशी नगरांतील रस्त्यावर लाडवांचे व मिठाईचे कमी ढीग पडले असते, तर रंगभूमीवर लाडवांची जरी यदाकदाचित् मारामारी व फेंकाफेकी दाखवितां आली नसती, तरी कोमल सात्विक विनोदाची गति तेथें कुंठित झाली नसती असें वाटतें. याच नाटकांत शेवटल्या अंकांतील एका प्रवेशांत मांत्रिक येतो. तो स्वतःच उघड म्हणतो कीं, "मूर्खा, कोणाला जगविण्याकरितां कां मांत्रिकाला बोलावला आहे कोणी?" हें वाक्य मांत्रिका-शिवाय दुसऱ्या एखाद्याच्या तोंडांत कांहीं तरी शोभलें असतें; पण त्याच्याच तोंडून तें वाक्य आलेलें ऐकून कसेंसेंच वाटतें. त्याच प्रवेशांतील 'बच्चाजी' व मांत्रिक यांच्या संभाषणांतील ग्राम्येतर जो विनोद असेल त्यांतील बहुतेक भाग या अनौचित्य दोषानें दूषित झालेला आहे. असो. सांगण्याचा भावार्थ एवढाच कीं, विदूषकी विनोद जरी नाटकाला उपयुक्त किंवा आवश्यक असला तरी तो अमर्दी उत्तान, नागडा, किंवा चर्वितचर्वणात्मक असला पाहिजे असें नाहीं. असला विनोद प्रहसनामध्यें किंवा तमाशामध्यें उचित असेल; नाटक या उच्च नांवानें प्रथित असलेल्या प्रबंधांत तरी तो नसावा, असें या लेखकाला वाटतें.

एक गोष्ट मात्र येथें सांगून ठेविली पाहिजे. ती ही कीं, समाजाच्या विशिष्ट स्थितींत विशिष्ट प्रकारचा विनोद ज्या नाटकांत असेल तेंच यशःप्रद म्हणजे लोकमान्य सुवर्णफलदायक-होऊं शकतें. गाढवाला जशी गुळाची चव नसते, तसेंच एखाद्या समाजाला व्यंग्य, कोमल व सुसंस्कृत विनोदाची चव नसते. माकडाला रत्नापेक्षां बोर अधिक आवडतें, तद्वतच एखाद्या समाजाची स्थिति असते. या सर्व गोष्टी ध्यानांत ठेवूनच नाटककाराला नाटक लिहावें लागतें, नाहीं तर त्याचें नाटक रंगभूमीवर न येतां फार तर स्वप्नांतच त्या नाटकाचे खेळ व्हावयाचे! आपलें नाटक केवळ दप्तरांतच पडून रहावें व फार झालें तर, कांहीं मंडळींनीं वाचावें, एवढीच ज्याची इच्छा असेल त्याची गोष्ट वेगळी; पण ज्याला कल्पनासृष्टि व व्यवहार यांची सांगड घालून व्यवहारामध्यें शक्य तेवढें कल्पनासृष्टींचें रम्यत्व व उच्चत्व आणावयाचें आहे, त्याला आपल्या कृतींत कल्पनासृष्टींतील उच्चतम सर्वांगसौंदर्य कायम राखणें अशक्यप्रायच आहे. निदान बहुजनसमाज जोंपर्यंत उच्चतम स्थितीला पोंचलेला नाहीं, तोंपर्यंत तरी हें अशक्य-प्रायच आहे. कल्पनासृष्टींत विहार करून आनंदोपभोग घेणाऱ्या व या आनंदाचे

इतर लोकांनीं वांटेकरी व्हावें अशी इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्याला त्या 'इतर' लोकांच्या मनःस्थितीकडे लक्ष देणें आवश्यक आहे. लोकांना जे आवडतें तें थोडेबहुत देऊन मग आपणांस जें आवडतें तें त्यानें दिलें, तरच त्याचा हेतु सफल होईल. तेव्हां कोणत्या प्रकारच्या विनोदाची चटणी वाढली म्हणजे सदुपदेशाचें वगैरे जे पक्वान्न आपणांस वाढावयाचें आहे तें लोकांना रुचेल, याचा सारासार विचार करूनच काव्यनाटकादि भोजन तयार केलें पाहिजे. या दृष्टीनें पाहतां रा. खाडिलकरांसारख्या अनुभविक नाटककारांची कृति दोषास्पद नाहीं, असेंच कदाचित् म्हणावें लागेल. कदाचित् या दृष्टीनेंहि दोषास्पद ठरेल; पण हा प्रश्न अर्थात् व्यावहारिक अनुभवाचा आहे. तेव्हां त्याचा निर्णय ज्याच्या त्याच्या अनुभवावरच सोंपविलेला बरा.

रा. खाडिलकरांचा दुसरा एक दोष म्हटला म्हणजे अलंकारिक व वक्तृत्व-सूचक भाषा वापरण्याची फाजील हांव हा होय. या हांवेमुळें त्यांच्या भाषेंतील अलंकार कित्येक वेळां अस्थानीं भासतात व कित्येक वेळां त्यांच्यांत कृत्रिमपणाची छटा दिसते. अलंकार किंवा वक्तृत्त्व ही अस्थानीं, अकालीं किंवा कुपात्रीं दिसल्यास शोभा-हानिकारक होतात. अलंकारांत पोकळपणा किंवा दिखाऊपणा नसावा; प्रसंगाला, कालाला, पात्राला व स्थानाला शोभतील असेच ते असावेत; नाहीं तर ते शोभादायक होण्याच्या ऐवजीं धारण करणाऱ्यांची भलत्याच अर्थानें 'शोभा' करतात. सत्त्वपरीक्षा नाटकांत अलंकाराचें अनौचित्य कित्येक वेळां दिसून येते. रा. खाडिलकरांजवळ उपमारूपकादिकांची खाण आहे हें जरी या नाटकांवरून दिसून येतें, तरी सुवर्णकाराची कुशलता व विनयशील पतिव्रतेची अलंकारधारणेचे बाबतींतील सदभिरुचि, यांची क्वचित् ठिकाणीं वाण दिसून येतें. 'क्वचित् ठिकाणीं' म्हणण्याचें कारण अर्थात् हें आहे कीं, रा. खाडिलकर यांचा अलंकारिक व वक्तृत्वपूर्ण भाषा लिहिण्यांत हातखंडा आहे, हें या नाटकांतील कोणतेही पान वरवर वाचणाऱ्यांसही कळून येण्यासारखें आहे. परंतु दोषस्थळें आधीं दाखविण्याचें या लेखकानें ठरविलें असल्यामुळें आतांची टीका एकांगी होणार आहे हें वाचकांनीं ध्यानांत ठेवावें.

या नाटकांतील अन्नपूर्णाबाईची व वाचकाची थोडीशी ओळख पूर्वी झालेलीच आहे. आपल्या पतीला मुलाजवळ गाढव म्हणणारी ही बाई खाणाव-

ळीणबाई होती. तिच्याकडे तारामती राणी नोकर म्हणून राहिली होती. ही खाणावळीणबाई तारामतीला रागावून म्हणतेः—

"मेले, गाणीं म्हणायला लागलीस म्हणजे जसे गोडगोड लाडके सूर काढतीस तसेंच स्वयंपाकांत आहे हो; अग्नीच्या ज्वाळेची ताण गोलचीदार वर जाऊन पटदिशीं परतावी लागते तरच पदार्थ मधुर होतात."

ही अलंकारयुक्त भाषा गंपूच्या आईला उचित आहे असें या लेखकाला तरी वाटत नाहीं. या खानावळबाईनें एखादें वेळेस उंची उंची दागिने उसने किंवा भाड्यानें आणून मिरविले असतां ते जितके तिला शोभले असते, तितकीच ही अलंकारिक कृत्रिम भाषा तिला शोभते. 'अग्नीच्या ज्वाळेची गोलचीदार ताण' ही कल्पना 'मधुर' आहे. पण हे शब्द अन्नपूर्णाबाईच्या तोंडून ऐकून असले हे 'गोड गोड लाडके लाडके सूर' काढणारी व्यक्ति अन्नपूर्णाबाई आहे का रा. खाडिलकर आहेत अशी शंका उत्पन्न होते. असो.

अलंकाराच्या अनुचिततेचें दुसरें एक उदाहरण आतां घेऊं. अन्नपूर्णाबाईला जरी उंची अलंकार व वस्त्रें शोभण्यासारखीं नव्हतीं, तरी राजकुलांत जन्मलेल्या तारामतीला कोणताही उंची अलंकार अर्थात् शोभण्यासारखा होता. पण तारामती-राणी झाली म्हणून अलंकार घालतांना काल, स्थल, प्रसंग वगैरे पाहणें आवश्यक होतें. तिच्या भाषणांत अन्नपूर्णेपेक्षां अधिक मोलाचे व अधिक सुंदर अलंकार उचित असले तरी भलत्या प्रसंगीं ते मिरविणें त्या राणीलाही दोषास्पदच झालें असतें; पण रा. खाडिलकर यांच्याजवळ वाङ्मयात्मक अलंकारांचें भांडार असल्यामुळें त्यांनीं तारामती राणी आपला लहान पुत्र जो रोहिदास त्याच्याशीं एके ठिकाणीं बोलत असतां तिच्या तोंडीं त्याला न समजण्याइतकी जड व अलंकारप्रचुर भाषा घातली आहे. रोहिदास हा इतका लहान होता कीं, 'आई मला कांहीं तरी खायला दे ना ग?' असा लडिवाळपणा तिच्याशीं करीत असे; दास्य म्हणजे काय याचा त्याला अर्थ कळत नव्हता, व तो 'आई, तुला विकायचें म्हणजे काय ग?' असें आपल्या आईला एकसारखें विचारून त्या बिचारीला नको नकोसें करीत होता. "अब्रू म्हणजे काय ग आई" असें त्यानें विचारलें असतां शोकाकुल झालेली तारामती पुढील भाषण करीत आहे असें रा. खाडिलकर यांनीं दाखविलें आहे.

" तारुण्याचें फूल प्रथम ज्याप्रमाणें शरीराला येतें आणि मग कर्तेपणाचे फळ ज्याप्रमाणें शरीराला लागतें, त्याप्रमाणें अब्रूचें फूल प्राणांना येतें आणि नंतर सत्याचें फळ प्राणांना लागतें."

अर्थगांभीर्याच्या, भाषाशास्त्राच्या किंवा अलंकारशास्त्राच्या दृष्टीनें तारामतीचें हें भाषण कदाचित्–कदाचितच–चांगलें असेल, पण प्रसंगाला हें किती उचित आहे, याबद्दल अवाक्षरही काढण्याचें कारण नाहीं. कारण, ' अब्रूचें फूल प्रथम प्राणांना येतें ' आणि ' सत्याचें फळ मग प्राणांना लागतें ' या वाक्यांचा अर्थ रोहिदासाला कदाचित् एकदम कळणार नाहीं असें जणूं काय वाटल्यामुळेंच तें लगेच तारामतीच्या मुखानें म्हणतात:—" तूं मोठा झालास म्हणजे तुला हें आपोआप कळूं लागेल." हें आश्वासन दिलेलें आहे म्हणून ठीक आहे. नाहीं, तर नाटकाला आलेल्या श्रोतृमंडळींपैकीं वयोवृद्ध पण ज्ञानबालक असलेल्या पुष्कळ लोकांना मगाचेंच वाक्य ऐकल्याबरोबर अर्थ कळला नाहीं म्हणून निराशेनें दुर्मुख बसावें लागलें असतें !!

नाटकांतील प्रत्येक वाक्य श्रोतृमंडळींपैकीं प्रत्येकाला कळलेंच पाहिजे असें कांहीं शास्त्र नाहीं, हें हा टीकाकार जाणूनच आहे. प्रत्येक नटानें उच्चारलेले प्रत्येक वाक्य नाटकगृहांतील तिसऱ्या मजल्यावर बहिरटालासुद्धां ऐकूं जाईल अशी जशी नाटकमंडळी हमी घेत नाहीं, तसा नाटककारही आपलें प्रत्येक वाक्य सगळ्यांना समजेलच अशी हमी घेऊं शकत नाहीं. पण नाटककंपनी जशीं सगळ्यांना नाहीं तरी पुढच्या खुर्चीवर बसणारांना सर्व संभाषण ऐकूं जाईल अशाविषयीं बरीच खबरदारी घेते. तशी नाटककारानें देखील आपल्या अर्थाविषयीं घेतली पाहिजे; म्हणजे, आपण लिहिलेलें वाक्य नटानें उचित अभिनयपूर्वक, स्पष्ट व मोठ्यानें उच्चारलें असतां त्याचा अर्थ कांहीं थोड्यांना–पांचसहा जणांना तरी चांगला कळावा, अशी वाक्याची रचना असली पाहिजे. पण अलंकारिक भाषेची आवड रा. खाडिलकरांना एखादे वेळेस मोह पाडते व मग त्यांच्या लेखणींतून पुढील प्रकारचें वाक्य बाहेर पडतें. हरिश्चन्द्र हा वक्तृत्वाच्या भरांत येऊन 'क्षुद्र सुखाकरितां मी आपलें सत्यव्रत कधींही सोडणार नाहीं ' असा भावार्थ विश्वामित्राला विदित करीत आहे, हा पुढील वाक्याचा संदर्भ आहे. हरिश्चंद्र म्हणतो:—

" मानवी समाजाच्या महोदधीवर क्षणाक्षणाला नाचणाऱ्या इच्छास्वरूपीं

लहरींना मर्यादेंत ठेवून गंभीर संसारावर सुखद सौंदर्याचें तरल वस्त्राभरण घालणाऱ्या संभोगी आत्म्याची संयमन–शक्ति हीच माझी किमया ! ”

हें वाक्य वाचतांना रूपकांच्या भडिमारामुळें मन गोंधळून गेल्यामुळें तें सावकाश सावकाश वाचल्याशिवाय त्याचा अर्थ या लेखकाला स्पष्टपणें कळला नाहीं, हें सांगण्यास त्याला लाज वाटत नाहीं. हीच गोष्ट पुढील वाक्याची. विश्वामित्र म्हणतोः—

“ हट्टांत जितका जीव आहे, तितकाच जीव कालाच्या चंचलतेवर दया करण्यांत आहे. असा माझा अनुभव असल्यामुळें चपल कालाच्या वाहत्या रसाला तुच्छ मानून कालाची शेंडी हातांत धरून, आसन स्थिर करून त्याला निश्चल करूं पाहणार वसिष्ठासारखे मुनी सुखाला स्वतः आंचवितात असा मला साक्षात्कार झाला आहे. ”

पुस्तकाच्या साहाय्याशिवाय नाटक पाहणाऱ्यांपैकीं एकाला तरी या वाक्याचा अर्थ समजत असेल किंवा नाहीं, याची या टीकाकाराला अटकळ आहे; पण ती स्पष्टपणें सांगण्याची जरूरी नाहीं. बाकी प्रत्येक वाक्य श्रोतृमंडळीला समजलेंच पाहिजे असें कांहीं शास्त्र नाहीं, हें वर म्हटलेंच आहे. अशा प्रकारचीं विद्वत्तापरिपूर्ण व वक्तृत्वसूचक भाषणें करण्याचें काम उत्तम नटाकडे असलें म्हणजे त्याच्या अभिनयावरून तो कांहींतरी जोराचे, वीर्याचें, व नीतिधर्याचें भाषण करीत आहे, एवढें श्रोत्यांना समजतेंच व तेवढ्यावर नाटककाराचें बरेंच काम भागतें. किंबहुना, अशीं न करणारीं जोराचीं व अलंकारिक भाषणें नाटकांत मधून मधून कांहीं असावींतच ! कारण, ‘ जें समजत नाहीं त्याची वाखाणणी होते ’ ( What is un-understood is admired ) या न्यायानें नाटककाराच्या विद्वत्तेविषयीं व वाक्प्रभुत्वाविषयीं आदर उत्पन्न करण्यास अशीं वाक्यें उपयोगीं पडतात !

व्यवहारांत सोन्याचे खरे अलंकार कोणते व पितळेचे कोणते, हें जसें कित्येक वेळां पाहिल्याबरोबर कळतें; तसेंच कृत्रिम भाषा किंवा कृत्रिम कोटि कोणती आणि स्वाभाविक व सुंदर कोणती हें पुष्कळ वेळां ताबडतोब समजतें. उदाहरणार्थ पुढील वाक्य पहाः—

“रत्नपालाचा म्हातारा डोळा हिच्या डोळ्यावर असल्यामुळें वडस वाढल्यासारखी हिची दृष्टी झाली आहे; आतां कुठली ती आम्हांला विचारणार ? ”

एखाद्या हरिणाक्षीच्या 'डोळ्यांवर एखादा म्हतारा डोळा' असला तर तो त्या डोळ्यांना चिकटतो व मग वडस वाढल्यासारखी तिची दृष्टि होते, असें या वाक्यावरून दिसतें. आतां एखाद्या तरुणाचा डोळा एखाद्या स्त्रीवर-नव्हे, तिच्या डोळ्यांवर–जर असला, तर तिची दृष्टि कशी होईल याचा शोध नयनशास्त्राज्ञांनीं लावावा ! दुसरा असाच प्रश्न येथें सुचतो कीं, ती हरिणाक्षी जर लज्जेनें खालीं पाहूं लागली, तर तिच्या डोळ्यांवर असलेला तरुण किंवा 'म्हातारा डोळा' गुरुत्वाकर्षणाच्या जोरानें खालीं पडेल कीं काय ? हो, तसाच जर कांहीं धोका असेल, तर त्यांना सावध राहण्यास सांगतां येईल !

रा. खाडिलकरांच्या विनोदांतील किंवा भाषेंतील दोषांचें एवढें नमुनें पुरें झाले. आतां या नाटकांतील पात्रांच्या स्वभावपरिपोषांत जीं एक दोन व्यंगें दिसतात, तीं दाखवून मग गुणवर्णनाकडे वळूं. राजपुत्र रोहिदास किंवा विश्वामित्र ऋषि हीं पात्रें 'सत्त्वपरीक्षा' नाटकांत दुय्यम-तिय्यम महत्वाचीं नव्हेत, तर चांगली प्रमुख पैकीं आहेत ; पण त्यांचा स्वभावपरिस्फोट करण्याकडे नाटककारानें जितकें लक्ष द्यावयास पाहिजे होतें, तेवढें दिलेलें दिसत नाहीं. विश्वामित्रऋषीच्या दुष्ट आग्रहाचें मूळ शेवटपर्यंत बहुतेक गूढच राहतें व एका अंकांतील रोहिदास आणि दुसऱ्या अंकांतील रोहिदास या दोन निरनिराळ्या व्यक्ति आहेत असें एखाद्याला वाटेल, इतकी त्या निरनिराळ्या प्रसंगांच्या भाषणांत व कृतींत विसंगतता दिसते. या शेवटल्या मुद्याचें पूर्वीं थोडेंसें दिग्दर्शन झालेंच आहे. तेव्हां तोच विवेचनाकरितां आधीं घेऊं. रोहिदासाचें वय काय, हें शाळेंतल्या दाखल्याप्रमाणें मिति, तारीख, वार, शकें, सन यांसह नमूद करणें जरी नाटकांत आवश्यक नसलें तरी स्थूलमानानें त्याचें अनुमान करतां येईल, इतकी तरी नाटककारानें खबरदारी घ्यावयास पाहिजे होती. निदान, एकाच वयाला साजतील अशीं भाषणें व कृति त्या पात्राच्या स्वभावाविष्कारणांत दृग्गोचर होतील, अशाविषयीं तरी दक्षता दिसून यावयास पाहिजे होती. "ज्या वयांत मुलें आईच्या ताब्यांतून सुटून स्वतःच्या पायांवर उभीं राहण्याकरितां बापाच्या पावलांवर पावलें टाकण्यास शिकत असतात, त्या वयांत तूं आहेस." अशी त्याची आई तारामती राणी एके ठिकाणीं म्हणते; पण यावरून त्याच्या वयाच्या दोन मर्यादा ठरल्या जातात; वय स्पष्टपणें कळत नाहीं. भाषणावरूनच व कृतीवरूनच नाटककार पात्रांचें वय बहुधा सुचवितात; पण हा कौल लावून

पाहिला तर परस्परविरुद्ध उत्तरें मिळतात. रोहिदास याला आपली आई मोलकरीण झाली आहे, हें चांगलेंसें कळत नाहीं व तो भाकरीच्या तुकड्यासाठीं तिजवळ रडूं लागतो; ‘ आई, तुला विकणार म्हणजे काय ग ? ’ असें आग्रहपूर्वक विचारून आधींच दुःखाग्नीनें होरपळलेल्या आपल्या आईला शोकसागरांत लोटून तिचें दुःख शतगुणित करतो; जीभ कोरडी पडली, अंग फणफणलें व हातपाय कांपूं लागले तरी त्याच्या पोरबुद्धीला आपणास ताप आला आहे एवढें देखील समजत नाहीं; परंतु तोच मुलगा त्याच दिवशीं ‘ पितृऋण ’ फेडण्याच्या व सत्यप्रतिज्ञत्वाच्या गोष्टी सांगूं लागतो आणि घोर ‘ प्रतिज्ञा ’ करून ती कडेपर्यंत पाळतो ! ज्याला दास्य किंवा ताप, या साध्या गोष्टी कळत नव्हत्या त्या अर्भकाला ‘ पितृऋण ’ फेडण्याकरितां जरूर पडल्यास ‘ आत्मयज्ञ ’ करणें आपलें कर्तव्य आहे इत्यादि मोठे पोक्त विचार एकाएकीं कसे सूचूं लागले कोणास ठाऊक ! “ वयापेक्षां प्रसंगानें मनुष्य लवकर मोठा होतो. राजपुत्राचा गुलाम होण्याबरोबर हा चिमुकला रोहिदास एकदम मोठा झाला आहे. ” असें ‘ चिमकुला ’ रोहिदास पोक्तपणें आपणांस शिकवीत आहे, हें खरें; पण त्याच्या पुढील भाषणावरून तो चिमुकलाच राहिला आहे, असें वाटतें.

अशा या रोहिदासाला “ कारट्या तुझें पोट आडवें येत आहे ना ? तुझ्या पोटाचें तूं काय करणार ? ” असें नीच चित्रगुप्त ‘ कारकुंडा ’ जेव्हां म्हणतो, तेव्हां त्याच्या अंगांत सात्विक वीर्याचा व तात्विक ज्ञानाचा जणूं काय एकदम संचार होऊन, ‘ माझ्या पोटाचें मी काय करणार ? हें पोट फेंकून दिलें. ’ असें तो अलंकारिकभाषेंत म्हणतो व भाकरीचा तुकडा फेंकून देऊन ‘ पुण्यशील आईच्या ’ व ‘ सत्यप्रतिज्ञ बापाच्या ’ पायाची शपथ घेऊन आईबाप जिवंत असे तोंपर्यंत “ अन्नाचा एकही कण माझी जीभ पोटांत लोटणार नाहीं. ” अशी घोर प्रतिज्ञा अलंकारिक भाषेंत करतो. या विसंगत वर्णनावरून अशी शंका येते कीं, निरनिराळ्या प्रसंगांना अनुरूप अशी रोहिदासाची मूर्ति रा. खाडिलकर यांच्या मनःचक्षूंसमोर उभी होती व पूर्वापार संगतीकडे लक्ष न देतां त्यांनीं प्रसंगानुसार तिचीं शब्दचित्रें कुशलतेनें रेखाटलीं.

‘ कुशलतेनें ’ म्हणण्याचें प्रयोजन असें कीं, करुणरसाचीं उत्कृष्ट उदाहरणें एखाद्यास पाहावयाचीं असल्यास त्यानें रोहिदास व त्याची आई तारामती राणी, हीं रत्नापालाकडे चाकरीस असतां त्यांचीं जीं संभाषणें झालीं तीं या नाटकाच्या

पुस्तकांत वाचावीं किंवा जमल्यास या नाटकाचा प्रयोग पाहण्यास जाऊन ते प्रसंग चर्मचक्षूंनीं पाहावेत. आधींच मुलांचें दुःख पाहणें हृदयद्रावक असतें, त्यांतून रोहिदासासारख्या राजपुत्रावर आलेला प्रसंग फारच कठीण, व तो जेव्हां आपल्या आईजवळ भाकरीच्या तुकड्यासाठीं गयावया करितो, व एके वेळीं नवखंड पृथ्वीची राणी असलेल्या त्याच्या आईला भाकरीचा तुकडा देखील देण्याची सत्ता नाहीं असें जेव्हां मनुष्य प्रत्यक्ष पाहतो, तेव्हां त्याचें हृदय न द्रवल्यास तो मनुष्य नव्हे असें म्हणावें लागेल. तसेंच, ' दास्य ' म्हणजे काय, हें पुरतें न समजल्यामुळें आपल्या प्रेमळ मातेला पुनः पुनः त्याचा अर्थ तो विचारीत आहे व तारामतीला त्या प्रश्नाचें त्याला समजेल असें उत्तर शोकाकुलत्वामुळें सांगतां येत नाहीं, हा प्रसंग रंगभूमीवर पाहतांना मनाची समता ठेवणें व डोळ्यांतील अश्रूं आवरणें बरेंच कठीण पडतें. रोहिदास हा आईबापांच्या पायांची विश्वामित्रासमोर शपथ घेऊन अन्नत्यागाची जेव्हां कठोर प्रतिज्ञा करतो, तो प्रसंग करुणात्मक जरी आहे, तरी त्या बालवीराच्या नैतिक करारीपणामुळें व अकल्पित आणि प्रशंसनीय धाडसामुळें तो प्रसंग प्रत्यक्ष पाहात असतां मानवी मन क्षणभर तरी दिव्य आनंदामृताचा आस्वाद घेतें.

सारांश, हृदय उचंबळून सोडणें, मनोविकार जागृत करणें, इत्यादि गोष्टी या प्रसंगांत मार्मिकतेनें रा. खाडिलकर यांनीं साधल्या असल्यामुळें नाटकलेखनकलेंत ते चांगले वाकबगार आहेत, असेंच म्हणावें लागेल. पण, त्या प्रसंगाचें बारकाईनें परीक्षण करूं लागल्यावर त्यांत कांहीं दोष दिसून येत असल्यामुळें, आपल्या कलेंत ते पूर्ण निष्णात नाहींत असें तरी एक म्हणावें लागेल किंवा ते लक्ष देऊन काम करीत नाहींत असें तरी कबूल करावें लागेल.

विश्वामित्रऋषीनें हरिश्चंद्राच्या सत्त्वाची परीक्षा पाहाण्याकरितां त्याचा जो छळ आरंभिला व त्या छळाला न जुमानतां त्या राजानें आपलें सत्यव्रत पाळलें, इत्यादि कथा या नाटकाला आधारभूत आहे, हें वाचकांना कळून चुकलेंच आहे. ही कथा सर्व चांगलीच आहे. पण विश्वामित्रासारख्या ज्ञानी, व निग्रही ऋषीचें त्या सत्त्वस्थ राजाचें सत्त्व निष्ठुरपणें पाहण्याशिवाय काय अडलें होतें, याचा विचार होणें आवश्यक आहे. एखाद्याचें मन पाहण्याकरितां थोडासा त्याला त्रास देणें मानवी स्वभावाला अनुरूप आहे; पण अंगावर शहारे येण्यासारखे एखाद्याचें सुखासुखीं हाल करणें, हें कसेसेंच दिसतें. कनकाच्या किंवा कान्तेच्या लोभानें

किंवा मत्सरानें एखादा मनुष्य दुसऱ्याचा दुष्टपणें छळ करील, पण केवळ 'सत्त्व' पाहाण्याच्या निरुद्योगी कुतूहलानें सुखासुखी एखाद्या राजाला रंक करवून त्याच्या पत्नीला व पुत्रालाही नरकतुल्य यातना भोगावयास लावणारा मनुष्य विरळा. मग विश्वामित्र ऋषीनें ही कठोर–किंबहुना दुष्टपणाची-उठाठेव कां केली ? याचें उत्तर न समजल्यास विश्वामित्रांचा स्वभाव पूर्णपणें कळून येणें शक्य नाहीं. पण ही महत्वाची गोष्ट सत्त्वपरीक्षा नाटकांत शेवटपर्यंत गुलदस्तांतच राहते. विश्वामित्राची तपश्चर्या 'अस्थिर' किंवा 'चंचल' होती असें रा. खाडिलकर यांनीं अनेक पात्रांच्या तोंडून वदविलें आहे. पण या अनतिस्फुटार्थक शब्दांवरून या लेखकाला जो बोध होतो तो असा कीं, विश्वामित्रानें मनांत आणलें असतें तर पाहिजे तसा मनोनिग्रह करण्याची त्याच्यामध्यें शक्ति होती; पण त्याचेमध्यें निश्चितता नसल्यामुळें म्हणा, अभिमानामुळें म्हणा किंवा मनोविकार आवरण्याचा तो कधीं कधीं प्रयत्नच करीत नसे म्हणून म्हणा, त्याच्या चरित्रांत सुसंगति नव्हती. परंतु अशा प्रकारें तपश्चर्या 'चंचल' किंवा 'अस्थिर' असली म्हणून त्यानें उगीच एखाद्या सात्विक राजाचा छळ मांडावा हें कांहीं जुळत नाहीं. त्याची तपश्चर्या 'चिरडखोर' होती असें एके ठिकाणीं या नाटकांत म्हटलें आहे. तपश्चर्येला 'चिरडखोर' हें विशेषण लावणें हा अलंकार आहे का भाषादोष आहे, इकडे लक्ष न देतां विश्वामित्र ऋषि चिरडखोर होता. एवढा भावार्थ ह्यावरून घेऊन या त्याच्या स्वभावदोषाच्या आधारें वरील कूटप्रश्न सुटतो का पाहूं या. मनुष्य चिरडखोर असला व दुराग्रही असला, तर तो आपल्या शत्रूचे हालहाल करील हें संभवतें यांत शंका नाहीं; पण हरिश्चंद्र हा विश्वामित्राचा शत्रु होता, काय ? विश्वामित्राला इतकी चीड यावी, असें हरिश्चंद्रानें त्याचें काय मोठें घोडें मारलें होतें ? सत्त्वपरीक्षा नाटकावरून तरी याचा कांहीं उलगडा होत नाहीं. हरिश्चंद्राबद्दल विश्वामित्राच्या मनांत प्रेम होते व त्याला राजाबद्दल आदरही वाटत होता, हें त्या ऋषीच्या एका स्वगत भाषणावरून स्पष्टपणें दिसून येतें. तारामतीचा लिलांव झाल्यावर तिच्याकडे व हरिश्चंद्राकडे पाहून त्या कठोर व चिरडखोर ऋषीचेहीं मन द्रवलें व डोळ्यांत प्रगट होऊं लागलेल्या सरस्वतीला डोळ्यांतल्या डोळ्यांत कोंडून ठेवणें त्याला कठीण पडलें. इतकें त्याचें मन शुद्ध होतें तर मग विश्वामित्रानें छळ आरंभिला तरी कां ? आरंभ केल्यावर दुराग्रही स्वभावामुळें त्यानें आपला हट्ट सोडला नसता हें कबूल; पण छळाला आरंभ तरी त्यानें कां केला ?

केवळ सत्व पाहण्याकरितां का तो चिडला होता? चिडला म्हणावें तर चिडायला तरी असें काय कारण झालें होतें?

सत्यव्रताची हरिश्चंद्राला घमेंड झाली होती असें तर त्याला वाटत नव्हतें ना? 'मी घमेंडीनें ह्या सुखापासून पराङ्मुख होत आहें, असें मानूं नका,' असें तो साधाभोळा राजा त्या तपस्व्याला एके ठिकाणीं म्हणत आहे. "सत्यव्रताची द्वाही फिरविण्याची घमेंड जर तुला मिरवावयाची असेल तर द्रव्ययज्ञाचें वचन तूं पाळलें पाहिजेस," असें विश्वामित्रही त्याला पहिल्याच अंकांत म्हणतो. या वाक्यांवरून हरिश्चंद्राच्या घमेंडीची विश्वामित्राला चीड आली होती, असें दिसतें. पण हरिश्चंद्र घमेंडखोर होता, किंवा घमेंडखोर होता असें विश्वामित्राला वाटावें असें त्याचें आचरण होतें, हें या नाटकांत स्पष्ट होत नसल्यामुळें सत्त्वाची परीक्षा पाहण्याकरितां तपश्चर्या सोडून गडबडीनें धांवत धांवत येण्याचें विश्वामित्राला काय प्रयोजन होतें, हें उघड दिसत नाहीं. बाकी विश्वामित्र सभेंत आल्यावर हरिश्चंद्रानें केलेल्या बेफिकीर व उतावीळ भाषणानें चिरडखोर विश्वामित्र हट्टास पेटला असेल, हें साहजिक आहे. पण हरिश्चंद्राची खरीखोटी घमेंड व विश्वामित्राचा तद्विषयक तिटकारा, हीं नाटकांत स्पष्ट न झाल्यामुळें विश्वामित्राच्या स्वभावचित्रलेखनांत एक मोठेंच व्यंग राहिलें असें दिसतें.

या नाटकांत असेच दुसरे कांहीं दोष किंवा अशींच व्यंगें दाखवितां येतील; पण दोषाविष्कारणाचें काम एवढें पुरें झालें. अंबलेल्या भाताच्या एक दोन शितांवरून सर्व भाताची कल्पना करतां येईलच. पण एवढें मात्र ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, सत्त्वपरीक्षा नाटकांत रा. खाडिलकरांनीं लाडवांच्या व मेवा-मिठाईच्या राशीच्या राशीही ठेविलेल्या आहेत आणि त्या लुटण्याची सर्व नगराला परवानगी दिली आहे! असो.

थट्टेचा आतां विषय नव्हे, खरोखरच हें नाटक म्हणजे उत्तम व नाजूक मेवा-मिठाईचें एक भांडार आहे. त्यांतील कांहीं मेवा वाचकांना चाखण्यास देऊन मग त्यांची रजा घ्यावी. रा. खाडिलकरांच्या लेखनपटुत्वाची, कल्पनाशक्तीची, कल्पकतेची व स्वभावभेदज्ञानाची आज कोणी नव्यानें स्तुति करावयास पाहिजे असें नाहीं. अलीकडील ललित वाङ्मय लिहिणारांची गणती चालली असतां पहिल्या-प्रथम जरी त्यांचें नांव निघालें नाहीं—करंगळी जरी त्यांनीं पटकावली नाहींतरी पहिल्या पांच बोटांपैकीं एकावर त्यांना स्थान मिळेलच, यांत शंका नाहीं. सत्त्व-

परीक्षा या नाटकांत त्यांचें नांवाजलेलें वाक्प्रभुत्व चांगलें दिसून येतें. कल्पकता म्हणजे रम्यनववस्तुनिर्माणशक्ति–ही देखील या नाटकांत दृग्गोचर होते; पण ती प्राधान्यें करून दिसून येत नाहीं. कल्पनाशक्तीचे खेळ मात्र येथें पुष्कळच दिसून येतात. आतां एवढें खरें कीं, रा. खाडिलकरांची कल्पनाशक्ति ही पुष्कळ वेळां सर्कशींतल्या कसरतीसारखें ओढून ताणून काम करीत आहे असें वाटतें,–स्वाभाविक उत्साहानें किंवा आनंदानें सहसा नृत्य करतांना आढळत नाहीं, किंवा उच्च उड्डाण करून आकाशांत भराऱ्या मारतांना ती सहसा दिसत नाहीं. परंतु कांहीं झालें तरी त्यांच्या कल्पनाशक्तीचे खेळ प्रेक्षणीय होतात यांत शंकाच नाहीं. सदुपदेश हा या नाटकांत बराच प्राधान्येंकरून दिसून येतो. काव्य हें कांतेप्रमाणें सदुपदेश करतें, असें म्हणतात. या दृष्टीनें पाहतां सत्त्वपरीक्षा नाटकांत बरेंच काव्य आहे, असें म्हटलें पाहिजे. विनोद क्वचित् क्वचित् बालिश किंवा ग्राम्य असला तरी पुष्कळ ठिकाणीं तो वाखाणण्यासारखाही आहे. रा. खाडिलकरांचें निरीक्षण सूक्ष्म आहे असें जागोजाग दिसून येतें पण सूक्ष्म भेद दाखविण्यापेक्षां स्थूल भेद दाखविण्याची विशेष हौस दिसते. स्वभावचित्र काढतांना लहान ब्रशापेक्षां मोठा ब्रश घेऊन भडक रंगांत काम करण्याची त्यांना आवड दिसते व तशी हातोटी त्यांना साधली आहे.

नाटक वाचणारांना काय आवडेल, इकडे त्यांचें जेवढें लक्ष असतें, त्यापेक्षां नाटक पाहणारांना काय आवडेल, हे ते अधिक पाहत असतात. नाटक हें लोकांनीं पाहावें म्हणून करावयाचें असतें. टीकाकारांना किंवा कॉलेजांतील विद्यार्थ्यांना सुभाषितांच्या वगैरे द्वारें खुष करणें हा त्याचा मुख्य हेतु नसतो व नसावा, या दृष्टीनें पाहतां ही प्रवृत्ति चांगलीच आहे. परंतु यांत दोष एवढाच आहे कीं, नाटक पाहाणारांपैकीं असुसंस्कृत वर्गाला खूष करण्याचा नाटककाराला मोह पडून, मनोवृत्ति निर्धूत व शुद्धतर करण्याचें नाटकांचे श्रेष्ठ कार्य एकादे वेळेस बाजूला राहतें. तथापि, एकंदरींत प्रेक्षकांच्या मनावर चांगलाच ठसा उमटणें, हा कस सत्त्वपरीक्षा नाटकास लावला तर तें बरेंच उच्च दर्जाचें ठरेल. किरकोळ दोष असले तरी या व अशाच अनेक गुणांनीं मंडित असल्यामुळें या नाटकाचा आस्वाद रसिकांना बराच आल्हाददायक होईल, यांत संदेह नाहीं.

नाटकामध्यें थोडक्या शब्दांत पुष्कळ कार्य करून दावयाचें असल्यामुळें भाषा जोरदार, खोंचदार व तेजस्वी असावी लागते. सत्त्वपरीक्षा नाटकांतील भाषेंत बराच

जोर आहे, खोंचा तर पुष्कळच आहेत, व मधून मधून तेजही त्यांत झळकत आहे. कित्येक वेळां जोर ओढून ताणून आणलेला दिसतो हें खरें; कांहीं थोड्या खोंचा विशेष सभ्य नाहींत हेंही खरें; कांहीं ठिकाणीं तेजापेक्षां लखलखीत झिलई अधिक दिसते हेंही खरें; पण एकंदरीत सत्त्वपरीक्षा नाटकांत रा. खाडिलकरांचें वाक्प्रभुत्व चांगलेंच निदर्शनास येतें. तारामतीचीं व हरिश्चंद्राचीं भाषणें वक्तृत्वदृष्टीनें नमुन्यालायक आहेत. दर्भाचे बोरू होतील, पण तलवार कधीं होणार नाहीं;' इत्यादि सुभाषितेंही ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. सुंदर उपमांचा व रूपकाचा तर सुकाळच आहे. माळ्याच्या दुकानांत फुलांच्या जशा अनेक राशी अस्ताव्यस्त पडलेल्या दिसतात, तशांतली रा. खाडिलकरांच्या भाषेंत उपमादिकांची स्थिति आहे. अतिरेक हा केव्हांही वाईटच, परंतु अशा अलंकाराच्या अतिरेकामुळें अप्रशस्तता जरी थोडीशी दिसली किंवा किंचित् सौंदर्यहानि जरी झाली, तरी बुद्धिमत्तेच्या व कल्पनाशक्तीच्या दारिद्र्यदोषांतून रा. खाडिलकर हे खास मुक्त होतात. 'चंचल व खोटा यांत विशेष फरक नाहीं' अशा प्रकारचीं वाक्यें किंवा 'नालायकांचा नरक' अशा प्रकारचे शब्दसमुदाय, मराठींत अपरिचित आहेत; परंतु असे अपरिचित परंतु उपयुक्त प्रयोग रा. खाडिलकरांसारखे नांवाजलेले लेखक करीत आहेत, व अर्थव्यंजनाशक्ति विविध करीत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे.

हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास यांच्या वीर्याचें सुंदर चित्र उठावदार काढून व त्या चित्राला अधिक शोभा आणण्याकरितां लुच्चा चित्रगुप्त, नटवी सुवर्णदासी, इत्यादिकांचीं हिडीस चित्रें कांहीं मागें व कांहीं आजूबाजूला काढून, रा. खाडिलकरांनीं आपल्या नाटकाच्या द्वारें सत्यव्रताचा उपदेश फारच मनोवेधक व चिरपरिणामकारक रीतीनें केलेला आहे. तारामती व रोहिदास यांचा दैन्यात्मक संवाद; एके काळीं राजा असलेल्या हरिश्चंद्रानें आपल्या वांट्याच्या भाकरींतला दिलेला चतकोर सहन न होऊन सुवर्णदासीसारख्या नीच स्त्रीनें केलेला त्याचा अपमान; हा अपमानही गिळून स्वस्थ बसण्याचा त्या तेजस्वी राजावर आलेला प्रसंग, इत्यादि गोष्टींचा देखावा फारच हृदयद्रावक आहे. पण त्यांत मौज ही आहे कीं, या करुणरसात्मक प्रसंगाच्या अश्रुपूरांत सात्विक वीर्याचीं किरणें झळकत असल्यामुळें, एकीकडे पाऊस वर झिरपत आहे व एकीकडे कोमल ऊन पडलें आहे, अशा पावसाळ्यांतल्या देखाव्याप्रमाणें ते

प्रसंग भासतात आणि शेवटल्या अंकांत हरिश्चंद्र राजावर आपल्या प्रियपत्नीचा वध करण्याची जेव्हां पाळी येते, आणि हें अप्रिय काम टाळण्याची व आपलें राज्य पुन्हां मिळविण्याची संधि जणूं काय आपण होऊन हात पसरीत आली असतां देखील, तो जेव्हां तें उग्र कर्म करण्यासही प्रवृत्त होतो व तारामती राणीहि अशा मरणास न कचरतां आलेल्या भोगास धैर्यानें सादर होते, तेव्हां तर कारुण्यात्मक सात्विक वीर्याचा कडेलोट होतो व प्रेक्षकांची वृत्ति, सहसंवेदनात्मक दुःख, त्या वीरांच्या श्रेष्ठ चारित्र्याबद्दल आदर, पुढें काय होणार याबद्दल कुतुहल, इत्यादि विरोधी मनोविकारांनीं क्षुब्ध होऊन क्षणभर चकितस्तिमित व स्तब्ध एकाग्रतेचें सुख किंवा दुःख अनुभविते. हरिश्चंद्राची कथा जरी सर्वविश्रुत आहे तरी तिची मांडणी करण्यांत रा. खाडिलकरांनीं जें कौशल्य दाखविलें आहे, त्याबद्दलचें त्यांना श्रेय न देणें न्यायाचें होणार नाहीं. सुवर्णदासी, चित्रगुप्त कारकून, बच्चाजी दलाल, इत्यादि पात्रें त्यांनीं कल्पनेनें निर्माण केलेलीं आहेत व त्यांतही त्यांची कल्पकता थोडीशी दृष्टोत्पत्तीस येतेच. अशीं पात्रें निर्माण करून आपल्या स्थूल विनोदास त्यांनीं अवसर करून घेतला आहे, व या पात्रांच्या कमीअधिक कृष्णच्छवीच्या सांनिध्यांत हरिश्चंद्रादिकांचें तेजस्वी चरित्र दाखविण्यांत त्यांनीं नाटककाराचें आपलें कसब व्यक्त केलें आहे.

आणखी असेंच पुष्कळ गुणवर्णन करतां येईल; तारामती व रोहिदास यांच्यावर आलेला किंवा स्वतः आणलेला–प्रसंग पाहून विश्वामित्राचे डोळे पाण्यानें भरून आले, व त्याचा वज्रतुल्य दुरभिमान विरघळूं लागला, हा मार्मिक विचार, क्षेत्रांतील पंड्यांच्या नीतिमत्तेचें काढलेलें विनोदी चित्र, ‘ चित्रदास गुप्तदास पेढीवाले ’ हें बडें नांव धारण करणाऱ्या व अनेकदां दिवाळें काढणाऱ्या ‘ चित्रगुप्त कारकुंड्या’च्या मिषानें व्यापारी वर्गावर जाताजातां ओढलेले कोरडे, इत्यादि गोष्टी नाटककलेच्या दृष्टीनें रा. खाडिलकरांना उच्चस्थान देण्यास साहाय्यक होण्यासारख्या आहेत. त्यांतही दोष आहेत, नाहीं असें नाहीं. पण स्नेहदृष्टीनें नाहीं तरी न्यायदृष्टीनें पाहिल्यास रा. खाडिलकरांचें या नाटकांत बरेच गुण दिसून येतील, त्यांत शंका नाहीं. त्यांचें आणखी बरेंच वर्णन करतां येईल. पण लेखणी आतां आवरती धरतों; याचें एक कारण असें कीं, लेख अंदाजापेक्षां आधींच जास्त वाढला आहे; व दुसरें असें एक कारण असण्याचा संभव आहे कीं, गुणप्रशंसेपेक्षां दोषाविष्करण करतांना मनुष्यजातीस अधिक उत्साह वाटतो ! कसेंही असो. ‘ सत्त्वपरीक्षे’चें परीक्षण आतां आटोपतें घेतों, ही गोष्ट खरी.

## नीतिशास्त्राविषयीं कांहीं विचार

नीतिशास्त्र शिकून काय करायचें ? या शास्त्राचें अध्ययन केल्यानें कोणतें फल मिळतें ? असा कांहींजण पुष्कळदां प्रश्न करीत असतात. या प्रश्नाचें सरळ उत्तर असें आहे:—ब्रह्मज्ञानाचें विवेचन करणारा जसा ब्रह्मवेत्ता ठरत नाहीं; व्याकरणाचें अध्ययन केलेला नेहमीं व्याकरणशुद्ध बोलतों असें जसें नाहीं; काव्याचें पठन केल्यानें कोणी जसा कवि होत नाहीं; युद्धकलेवरचीं पुस्तकें वाचल्यानें सेनापतीचे गुण अंगीं येतातच असें ज्याप्रमाणें नाहीं; त्याप्रमाणेंच नीतिशास्त्राचें अध्ययन किंवा अध्यापन केल्यानें नीतिमत्ता उच्चतर होतेच असा नियम नाहीं, हें प्रथमच आम्ही कबूल करतों. उपनिषदांत म्हटलें आहे कीं, 'आत्मप्राप्ति' ही बुद्धितेजानें, बहुश्रुतपणानें, किंवा वक्तृत्वानें होण्यासारखी नाहीं. नीतिमत्तेचेंही असेंच आहे. हृदयदरींत जर प्रेमाचा मूळचा झरा नसेल, तर तो शास्त्र-संस्कारानें उत्पन्न होणार नाहीं. शास्त्रसंस्काराचा उपयोग एवढाच होतो कीं, या झऱ्यांत क्षुद्र मनोवृत्तींचीं पानें, मुळें, माती वगैरे पडून तो झरा जर गढूळ झाला असेल किंवा त्याच्या तोंडाशीं कांहीं तार्किक धोंडे आडवे आले असतील, तर ती घाण काढून व ते धोंडे दूर सारून त्याची गति अप्रतिबंध, आणि पाणी शुद्धतर करावें. नीतिमत्ता ही प्रकृतिस्वभाव, संवयी, शिक्षण, श्रेष्ठ जनांचीं उदाहरणें, तात्विक मतें, इत्यादिकांवर अवलंबून असते. यांतील प्रकृतिस्वभाव हा नीतिशास्त्राध्ययनानें बदलणें कठीण आहे. पण अमुक एक मनोवृत्ति किंवा इंद्रियक्षोभ वाईट असें बुद्धीला कळलें आणि त्याविषयीं मनुष्य वारंवार विचार करूं लागला, म्हणजे इंद्रियांचें नियमन करण्याकडे त्याची प्रवृत्ति होऊं लागतें. संवयी ह्या आई-

बापांच्या व इतर गुरुजनांच्या शिस्तीवर व उदाहरणावरच बऱ्याच अंशानें अवलंबून असतात. तथापि त्याही विवेकानें बदलतां येतात. " **यद्यदाचरते श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः** " हें जरी सामान्यतः खरें आहे, तरी प्रत्येक मनुष्याला सत् व असत् यांमध्यें विवेक करण्याची बुद्धि व आपल्या मताप्रमाणें चालण्याची शक्ति दिलेली असते. श्रेष्ठजन सांगतील तसेंच किंवा वागतील तसेंच मनुष्य वागतो किंवा त्यानें वागावें असें नाहीं. कारण, कांहीं व्यावहारिक 'श्रेष्ठ' प्रत्येक बाबतींत व सदासर्वदा श्रेष्ठ असतात असें नाहीं. असो. सुसंस्कृत मनुष्य होतां होईतों विचारपूर्वक वागण्याचा प्रयत्न करीत असतो. अमुक एक माझें ध्येय आहे, अमुक रीतीनें वागण्याचा मी प्रयत्न करीन असा तो आपल्या मनाशीं निश्चय करीत असतो. हा निश्चय हरतऱ्हेच्या विषयेच्छेमुळें कित्येक वेळां डळमळीत होतो हें जरी खरें असलें, तरी यावरून जन्मसाफल्य कशांत आहे, खरें ध्येय कोणतें असावें, कसें वागलें असतां आत्मप्राप्ति होईल, इत्यादि नीतिशास्त्रांतर्गत गोष्टींचें ज्ञान हें मनोवृत्तिरूपी तुरगींना लगामासारखें आहे.

दुसरें असें कीं, जीविताचें ध्येय किंवा नैतिक तत्त्वें निश्चित ठरलीं नसलीं, तर आज एक आणि उद्यां दुसरें कांहीं तरी, अशा धरसोडीचें धोरण मनुष्याच्या वर्तनांत दिसून येतें. अमुक एका स्थानीं आपणांला जावयाचें आहे, हें ज्या प्रवाश्यानें ठरविलें नाहीं, तो जसा उगाच पाहिजे तिकडे हिंडून कालाचा व पैशाचा अपव्यय करील, तशीच गोष्ट जीविताची इतिकर्तव्यता काय, पुरुषार्थ कशांत आहे, नीतीचें बीज काय, कार्याकार्य कसें ठरतें, इत्यादि गोष्टींबद्दल निश्चित मत नसलेल्या मनुष्याची होईल. तुमचें ध्येय 'स्वतःचें सुख' ठरो, 'हित' ठरो, 'पुष्कळांचें पुष्कळ हित' ठरो, 'मोक्ष' ठरो, 'आत्मप्राप्ति' ठरो, कांहींही ठरो; तें निश्चित झाल्यावर तें प्राप्त करून घेण्याच्या मार्गाला लागणें सुलभ होतें, व त्या दिशेनें दिवसेंदिवस प्रगति करतां येतें. पण अनिश्चिततेमुळें वर्तनांत विसंगतत्व येतें आणि आज जें जीविताच्या पाटीवर लिहिलें तें उद्यां पुसटलें अशांतली स्थिति होते!

तिसरें असें कीं, नीतिविषयक व तत्त्वज्ञानविषयक भलत्या कल्पनामुळें नीतीच्या नौकेला भलती दिशा लागण्याचा संभव असतो. 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' असें शिकविणारें हेत्वाभासात्मक तत्त्वज्ञान प्रथमदर्शनीं बरें व खरेंही वाटतें. कारण, वरवर पाहूं गेल्यास सुखाशिवाय किंवा स्वार्थाशिवाय जगांत

दुसरें कांहीं ग्राह्य दिसत नाहीं, व ईश्वराचें अस्तित्व, आत्म्याचें अमरत्व, इत्यादि गोष्टी तर्कदृष्टया सिद्ध करून दाखविणें कठिण–किंबहुना अशक्य भासतें. अलिकडील शास्त्रांच्या प्रगतीमुळें अनात्मवादाला बरीच पुष्टि मिळालेली दिसते. सर्व गोष्टी सृष्टिनियमानुसार कार्यकारणभावानें बद्ध होऊन घडून येत असतात; देव, धर्म, वगैरे सर्व थोतांड आहे, निदान वेडसरपणा आहे–किंवा हाही शब्द कठोर वाटत असल्यास ' भोळसटपणा ' आहे, अशा प्रकारचे विचार पुष्कळांच्या मनांत येऊन जातात. मनांत येणाऱ्या अशा प्रकारच्या विचारांचा अनेक शास्त्रांच्या आधारें ऊहापोह केला नाहीं, तर मनुष्याची नीतिमत्ता आहे तशीच राहणें अशक्य आहे. तात्विक कुकल्पनांची छाया व्यवहारावर पडणार नाहीं कशावरून ? कुकल्पनांचें कशाला ? साध्या संशयात्मक वृत्तीनें देखील व्यावहारिक नीतिमत्तेमध्यें फरक होतो. अर्जुनाला तात्विक संमोह झाल्यामुळें त्याचें क्षात्रकर्तव्य बाजूस राहण्याची वेळ आलीच कीं नाहीं ? नैतिक तत्वांचें ज्ञान झालें म्हणून नैतिक आचरण हातून घडेलच असें जरी नाहीं, तरी नैतिक ऊहापोह करून तत्त्वें निश्चित व स्थिर केल्यास अप्रत्यक्षपणें त्याचा फायदा होतो. नीतिविषयक ऊहापोहामध्यें प्रत्यक्षपणें नीतिप्रवर्तकता नाहीं. प्रेरकत्व हें, प्रेम इतर मनोवृत्ति मनुष्याला भलत्या मार्गावर ओढून नेत असल्यास हें ज्ञान त्याला योग्य वेळीं इशारा देऊं शकतें. जीवितरूपीं रथाचें वाहकत्व मनोवृत्तींकडे आहे. व सारथ्य ज्ञानाकडे आहे. सारथ्य करणाऱ्याला रथ ओढतां आला नाहीं, म्हणून तो कुचकामाचा ठरत नाहीं !

आणखी असें कीं, व्याकरण शिकल्यानें भाषाप्रभुत्व जरी आलें नाहीं किंवा साहित्यशास्त्र शिकल्यानें कवित्वाची जरी स्फूर्ति झाली नाहीं तरी, हीं शास्त्रें जशीं निरुपयोगी नव्हेत; त्याप्रमाणेंच नीतिशास्त्र शिकण्यानें मनुष्याचें शील बदलून साधुसंतांच्या मालिकेंत बसण्याच्या लायकीचा तो जरी होत नसला, तरी हें शास्त्र निरुपयोगी नव्हे. नैतिक आचरणाला ज्ञानाचें साहाय्य होतें, हें कोणालाही कबूल करावें लागेल. हें साहाय्य मर्यादित स्वरूपाचें आहे यांत शंका नाहीं; पण साहाय्य होतें, हें निर्विवाद आहे.

आतां हें कांहीं खोटें नाहीं कीं, नीतिविषयक अतिविचाराच्या योगानें मनुष्य व्यवहाराला किंचित् नालायक होतो. त्याचें मन कित्येक वेळां अधिक कठोरही होतें. आपल्या इकडील जुन्या चालीचे वेदान्ती, हरिदास, पुराणिक वगैरे लोक;

किंवा नवीन चालीचे वक्ते, लेखक वगैरे लोक यांपैकीं कांहीं जणांच्या वर्तनाकडे पाहिलें तर असें वाटतें कीं, ज्ञानाग्नीच्या उष्णतेनें कोमल प्रेमाचा व सात्विकतेचा झरा आटतो ! याचें एक कारण असें आहे कीं, त्यांचें जें ' ज्ञान ' असतें तें खरें ज्ञान नसतें, शाब्दिक असतें. दुसरें असें कीं, त्यांच्या हृदयांतील ओलावा मूळचाच कमी असतो. ते विद्वान्, कर्तृत्वकुशल, सूक्ष्म भेद जाणणारे, मोठे तत्त्वविवेकच असतात, पण त्यांच्या तत्त्वज्ञानाचा निर्णय नीतीला पोषक असा न झाल्यामुळें त्याचें विद्वत्व आणि कुशाग्रबुद्धित्व यांचा उपयोग स्वार्थ साधण्याच्या व असें क्षुद्र आचरण करूनही स्वतःची समाधानवृत्ति न बिघडूं देणारा युक्तिवाद शोधण्याच्या कामीं होतो.

यासंबंधीं आणखी एक मुद्दा विचार करण्यासारखा आहे. तो हा कीं, कर्म करण्यामध्यें व्यापृत झालेला मनुष्य सहसा सात्विक काथ्याकूट करीत बसत नाहीं. आणि नैतिक आचरणाला शाब्दिक वादाची किंवा चर्चेची जरूरही नाहीं. लिहितां वाचतांसुद्धां न येणाऱ्या कितीक तरी प्रेमळ माता आपल्या अर्भकाकरितां निःस्वार्थबुद्धीनें रात्री जागून काढीत आहेत ! कार्याकार्यव्यवस्था शिकविणाऱ्या गीतेवरचें विद्वत्ताप्रचुर पुराण ऐकतां ऐकतां त्यांना झोंप येईल; पण यावरून त्यांची नीतिमत्ता कमी दर्जाची ठरेल काय ? स्वामिभक्तीनें धारातीर्थीं प्राण सोडणाऱ्यांना ' स्वार्थत्यागा ' वर व्याख्यान देतां आलें नसतें, म्हणून त्यांचा स्वार्थत्याग ' स्वार्थत्याग ' नव्हे काय ?

" नैतिक ऊहापोहाची आवड 'नीति थंडावलेली आहे' असें दर्शविते काय ?" हा एक मनोरंजक प्रश्न आहे. कर्म करण्यामध्यें रत किंवा उत्साहयुक्त लोक तद्विषयक सूक्ष्म व विद्वत्तापरिपूर्ण शाब्दिक ऊहापोहाच्या भानगडींत पडत नाहींत. कामान्ध मनुष्य ' कामा'च्या युक्तायुक्ततेचा विचार करीत नाहीं; क्रिकेट खेळणारा मुलगा ' चेंडू अमुक रीतीनें मारला असतां तो अमुक दिशेनें कां जातो ? ' याचा विचार करीत नाहीं. कामविकारावर काव्य करणारा कवि काव्य करते वेळीं तरी कामान्ध नसतो; क्रिकेट शिकविणाऱ्या मास्तराचा क्रिकेटचा उत्साह थंड झालेला असतो. याचप्रमाणें नीतितत्त्वांचा बारीक कीस काढणाऱ्यांचा नीत्युत्साह थंडावलेला असतो, असें कोणी म्हणाल्यास त्यांतही थोडासा तथ्यांश आहे. पण ' थोडासाच ' आहे, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. इतर महत्वाचीं कर्तव्यें काकुळतीनें हांक मारीत असतां ज्या वेळेस एखादा मनुष्य तात्विक नीतिचर्चेच्या

व्यसनाला अधीन होतो त्या वेळेसच त्याच्या नीतिमत्तेची विरी गेली आहे असें समजावें, एरव्हीं नाहीं.

नीतिविषयक अतिविचारामुळें मनुष्य दोन तऱ्हेनें व्यवहाराला निरोपयोगी होतो. एक तर त्याची सदसद्विवेकबुद्धि इतकी नाजूक होते कीं, या जगांतील कठोर व्यवहाराचा तिला दूरून देखील स्पर्श सहन होत नाहीं. पायांखालीं कीड किंवा मुंगी चुकून सांपडेल तीसुद्धां चिरडूं नये, म्हणून खालीं बारीक नजरेनें पहात पहात चालणाऱ्याला मोटार, ट्रॅम, सायकल, घोडागाडी वगैरेच्या धुमधडाक्यांत जाणें जसें अशक्य, तसेंच अति सूक्ष्म दृष्टीनें नीतिविचार करणाराचें व्यवहारांत होते.

नीतिशास्त्राचीं सूक्ष्म तत्त्वें चांदण्यासारखीं आहेत. या तमःप्रचुर संसारांत या चांदण्यांच्या प्रकाशाचा उपयोग फार आहे; पण या तारकाप्रकाशाचा उपयोग सत्पथ आक्रमणाच्या कामीं न करतां कोणती चांदणी कोठें, किती मोठी आहे, हें सूक्ष्म रीतीनें पहात बसण्याचा कांहीं जणांना नाद असतो. डोळे वर करून तारकांकडे वारंवार सूक्ष्मपणें पहात जाणारे हे सूक्ष्मदर्शी लोक कंटकमय संसारांत कित्येक वेळां ठेंचा खातात व खांचखळग्यांत पडतात. नीतितत्त्वांचा प्रकाश काय, किंवा कोणताही प्रकाश काय, तो इतर वस्तु पाहण्याकरितां दिलेला असतो, त्या प्रकाशाच्या साहाय्यानें त्या प्रकाशाचें पृथक्करण करण्याकरितां नव्हे. प्रकाशाची कारणमीमांसा, व त्यांचे पृथक्करण करणें वाईट नव्हे, पण प्रकाशाचा हा आत्मपरीक्षणपर उपयोग अगदीं गौण आहे. नैतिक दृष्टि हीं आचरणांत शुद्धता व उच्चता आणण्याकरितां दिलेली आहे; नीतितत्त्वांची शाब्दिक चर्चा करण्याकरितां नव्हे. ‘सद्विचार’ कोणता याचा सूक्ष्म ऊहापोह करण्याच्या नादांत ‘सद्वर्तन’ करण्याचें राहून जातें!

हा दोष कित्येक वेळां अनिवार्य असतो. कांहीं लोक जितका जितका अधिक विचार करूं लागतात, तितके तितके ते संशयरूपी चिखलांत अधिक रुतूं लागतात, असा एखादे वेळेस नीतिचर्चेचा विपरीत परिणाम होतो, आणि मग असें लोक व्यवहाराच्या अगदीं निरुपयोगी ठरतात. समरांगणांत हातीं घेतलेलें शस्त्र संशयाकुलतेमुळें टाकून देणाऱ्या अर्जुनाची गोष्ट प्रसिद्धच आहे. विद्वत्वाबरोबर कित्येक वेळां संशयाकुलतेच्या निरुत्साहाचा—व एक प्रकारचा आलस्यात्मक निवृत्तीचा दोष येतो.

पण नीतिविचाराच्या परिणामाचे असले हे प्रकार अपवादात्मक आहेत, हें अनुभवावरूनच सिद्ध आहे. नीतिचर्चा कर्मप्रवृत्तीला विघातक नाहीं, तर ती उलट संसाररूपी रथ भलत्या मार्गानें जात असल्यास तो सत्पथावर आणण्याला साहाय्यभूत होते, असा अनेक लोकांचा अनुभव आहे. नीतिशास्त्राच्या दीपाचा कार्याकार्यविमूढ झालेल्या लोकांना मोहान्धकारांत किती तरी उपयोग झालेला आहे! किती तरी लोकांना या शास्त्रानें योग्य मार्ग दाखवून अध्यात्माच्या शांत उद्यानांत नेऊन सोडलें आहे. शास्त्राला डोळ्याची उपमा देतात, ती अगदींच यथार्थ आहे. कारण चर्मचक्षूंनींच पाहणाऱ्याला जगांतील नव्याण्णव-शंभरांश भाग दृष्टीस पडणार नाहीं इतकेंच नव्हे, तर तो 'आहे' एवढें देखील कळणार नाहीं. नीतिशास्त्राचे डोळे आपल्या स्वाभाविक सदभिरुचीची दृष्टि अधिक सूक्ष्म व व्यापक करतात. पण डोळे किती जरी चांगले असले, तरी मार्ग आक्रमून जाण्याला पायांची आवश्यकता राहतेच, त्याप्रमाणें नीतिशास्त्रानें संसारांतील गूढ स्थलें कितीहि सुप्रकाशित केलीं, तरी सद्वासना, सुशिक्षण, सत्संगति इत्यादि प्रवर्तक कारणांशिवाय हा प्रकाश फुकट जाण्याचा संभव आहे.

## भंगलेलें देऊळ

रा. गजानन त्र्यंबक माडखोलकर यांनीं लिहिलेली ' भंगलेलें देऊळ ' ही कादंबरी भंगलेल्या देवळाप्रमाणें सदोष असली तरी ती केव्हांहि वाङ्मयभक्तांस वंदनीय वाटेल. कारण दोष आहेत ते गौण, निष्काळजीपणामुळें उत्पन्न झालेले आहेत. गुण मात्र प्रतिभेच्या स्वतःसिद्ध सामर्थ्यामुळें व पावित्र्यामुळें आलेले आहेत. या कादंबरींत ' मृत्युशय्येवर पडून स्वतःच्या गतायुष्याचें चिंतन ' करणाऱ्या ' अनू ' नांवाच्या एका परित्यक्तेचें आत्मचरित्र आलेलें आहे. आत्मचरित्र जर कांहीं एक न गाळतां, कांहीं एक न लपवितां लिहिलें तर सामान्य मनुष्यालाहि एका चांगल्या पुस्तकाची भर वाङ्मयांत घालतां येईल, मग एकाद्या ( कल्पित का होईना ) विदुषी युवतीनें लिहिलें तर तें मनोरंजक होण्याचा पुष्कळच संभव आहे. त्यांत पुनः प्रेमाच्या कहाण्या असल्या, तर मग बघावयासच नको. माडखोलकरांच्या या कादंबरींत युवतींच्या प्रेमानुनयांचीं, प्रेमविलासांची व प्रेमभंगांचीं वर्णनें आहेत; पण तीं अशा वातावरणांत, अशा संदर्भांत व अशा शुद्ध भावनेनें व असा संयम ठेवून वर्णिलेलीं आहेत कीं, त्यांचा आस्वाद घेतांना सदभिरुचीच्या मनुष्याला केव्हांहि लज्जा किंवा जुगुप्सा वाटणार नाहीं.

कथानक अगदीं थोडक्यांत व जणूं कांहीं चेष्टा करीत आहे अशा तऱ्हेनें सांगावयाचें म्हणजे तें असें आहे. अनूचें प्रेम अरूवर असतें, अरूचें मनूवर असतें. अरू आपल्याशीं लग्न करीत नाहीं असें निश्चित झाल्यावर अनूचें मन बॅरिस्टर अनिरुद्धावर बसतें. त्यांचें लग्न होतें, कांहीं दिवस सुखांत जातात, पण

अनूची प्रकृति बाळंतपणामुळें अत्यंत बिघडल्यामुळें बॅ. अनिरुद्ध (अनूच्या विनवण्यावरूनच) मनूला तिच्याशीं बोलण्याचालण्याकरितां घरीं आणतात व मग जें व्हावयाचें तें होतें, म्हणजे मनूचें आणि बॅ. अनिरुद्धाचें जमतें आणि मग अनू आपल्या मुलांसह माहेरी येते व मनाला विरंगुळा म्हणून आत्मकथा लिहिते.

या कादंबरीच्या कथानकाचा रंग-रूप-अलंकारविहीन सांगाडा पाहिला तर त्यांत विशेष असें कांहीं आढळणार नाहीं. पण माडखोलकरांचें खरें कौशल्य कथानकाच्या गुंतागुंतीच्या जुळणींत नसून साध्यासुध्या कथानकाला सद्भावना, सूक्ष्म निरीक्षण व यथार्थ वर्णन यांच्या साहाय्यानें जिवंतपणा व रसत्व आणण्यामध्यें आहे. कादंबऱ्यांमध्यें आपण पुष्कळ नायिकांचीं ‘स्वभाव-चित्रें’ पाहतों; पण तीं जिवंत वाटत नाहींत. तीं चित्रें पहावयाचीं व लवकरच विसरावयाचीं. पण या अनूची एकदां ओळख झाली म्हणजे तिची आठवण आपणांला सदैव राहणार व तिच्याबद्दल सहानुभूति सदैव वाटणार. अरूवर तिचें लहानपणापासूनचें प्रेम. कॉलेजमध्यें दोघेंजण गेल्यावर एकत्र बसणें, उठणें, राहाणें, चर्चा-वादविवाद करणें, यांमुळें या प्रेमांकुराला पालवी फुटली. अरविंदाचेंहि तिच्यावर उत्कट प्रेम, पण—भागिनीसारखें! अनूची बिचारीची निराशा होते, अरूचा किंचित् रागहि येतो, पण सुदैवानें (का दुर्दैवानें कोणास ठाऊक?) बॅरिस्टर अनिरुद्धांशीं कालिन्दी नांवाच्या उभयान्वयी मैत्रिणीच्या द्वारें तिचा परिचय वाढत जातो व बॅरिस्टरसाहेब दिसण्यांत रुबाबदार, बोलण्यांत हुशार, व वागण्यांत दिलदार असल्यामुळें या परिचयाची प्रेमांत परिणति होते. या मिश्रविवाहाला आईची विशेष संमति नव्हती, पण वडिलांनीं संमति दिल्यामुळें व कन्याप्रेमामुळें तिनें आपला हेका चालविला नाहीं. उलट अभिष्ट चिंतनच केलें. बॅरिस्टर अनिरुद्ध, अलिकडील स्त्रिया पुरुषांना म्हणतात त्याप्रमाणें, ‘भ्रमर-वृत्तीचे’ होते. विलायतेंत असतांना त्यांनीं थोडेसे गुण उधळले होते. पण अनूच्या पवित्र व प्रेमळ सांनिध्यामुळें त्यांनीं हे गुण सोडले होते इतकेंच नव्हे, तर मदिरापान व धूम्रपान हीं देखील सोडलीं होतीं. उभयतांच्या दुर्दैवानें अनूची प्रकृति बाळंतपणामुळें खालावली. ती अर्धवट पंगु झाली. मनू नांवाच्या विधवा बाल मैत्रिणीला ती सोबतीला म्हणून घरीं आणते; पण ज्या गोष्टी आपण चांगल्याकरितां करतों त्याच अपायकारक होतात! वास्तविक मनू कांहीं मूळची वाईटांपैकीं नव्हे. तिच्यावर अनूनें अनेक उपकार केलेले. अनूवरतींहि तिचें सात्त्विक व कृतज्ञतायुक्त प्रेम. पण; अनू आजारी पडल्यावर अनि-

रुद्धाशीं तिचा अधिकाधिक संबंध येऊं लागला व अखेर तिचा मुळचा चांगुलपणा आणि अनिरुद्धांचा पत्नीप्रेमामुळें आलेला चांगुलपणा निरुपयोगी ठरून यौवनसुलभ मोहाला तीं दोघेंजण बळी पडलीं ! मनूनें, खरें म्हटलें असतां, मन आंवरावयाचें, पण अनू ज्याप्रमाणें अनिरुद्धांच्या रूपाला, रुबाबाला वगैरे भाळली, त्याप्रमाणेंच तीहि भाळली. अनिरुद्धांनीं देखील मन आंवरण्याचा थोडासा प्रयत्न केला, पण बायका म्हणतात, तेंच खरें असेल—" **पुरुष भ्रमर-वृत्तीचे.**" ( भ्रमरांप्रमाणें भ्रमरीहि जीवकोटींत असतात पण हा वाद येथें नको. तरुण स्त्रीपुरुषांनीं अशा परिस्थितींत सांपडूं नये हेंच खरें. ) अनिरुद्ध आणि मनू यांचा चोरटा संबंध ध्यानांत आल्यावर अनू कांहीं दिवस त्या घरांत राहिली. कारण बोभाटा केल्यास मुलांच्या मनावर वाईट परिणाम होण्याची तिला भीति होती. पण अखेर पतिगृह सोडून माहेरीं येणें तिला भाग झालें व आतां बिचारी मृत्युशय्येवर पडून स्वतःच्या मनाला विरंगुळा म्हणून ती आपल्या बऱ्या-वाईट आठवणी लोकांना सांगत आहे. ध्यानांत धरावयाची गोष्ट ही कीं, पतीनें एवढे अपराध केले असून देखील त्याच्या-बद्दल तिच्या मनांत अद्यापहि प्रेम वसत आहे. पतीचे दुर्गुण आठवून ती एकाद-दुसरा कठोर शब्द उच्चारते, पण काय असेल कोणाला ठाऊक; अरूवर तिचें पहिलें प्रेम व त्याच्याबद्दल मनांत अत्यन्त आदर असून 'अरू'बद्दल ती एकवचनांत बोलते, पण अनिरुद्ध म्हणजे तिला 'ते.' अनिरुद्ध अद्यापिहि तिच्याकडे येतात-जातात व मुलांशीं गप्पागोष्टी करतात. त्यांच्यावरचा तिचा राग मधून मधून थोडासा उसळत असला तरी आतां तो ओसरला आहे, इतका कीं मला असं वाटतं कीं मनूचं कांहीं बरं-वाईट झालं आणि अनिरुद्ध जर पुनः मनधरणी करूं लागले, तर ती पुनः त्यांच्याकडे येईल ! मनूबद्दल तिच्या मनांत रोष आहेच, पण तिलाहि तिनें क्षमा केलेली दिसतें. सामान्य तरुण-तरुणींकडून असामान्य आत्मसंयमाची अपेक्षा करण्यांत अर्थ नाहीं, अशा प्रकारची तिची विचारसरणी दिसते.

अनूच्या स्वभावाचें जें वर दिग्दर्शन केलें आहे, त्यावरून माडखोलकरांच्या असामान्य शब्दचित्रणकलेची, भाषा-सौंदर्याची व उच्च वातावरण निर्माण कर-ण्याच्या कलेची कल्पना येऊं शकणार नाहीं. ती कल्पना येण्यास मूळच वाचलें पाहिजे. तथापि, अनूच्या स्वभाव-चित्रणांत ( नीतिदृष्ट्या नव्हे तर कलादृष्ट्या ) दोष आहेतच. अरु हा तिच्या आईला व वडिलांना तिच्या भावासारखा वाटतो व त्या उभयतांचें प्रेम बहीणभावंडांच्या प्रमाणें वाटतें. अरूचेंहि

तिच्यावरचें प्रेम त्याच प्रकारचें असतें. मग अनू कशी भलता ग्रह करून घेते. कोणाचें प्रेम कशाप्रकारचें आहे हें बायकांना जणु अंतःसाक्षात्कारानें ताबडतोब कळतें असें पुष्कळ लोक व माडखोलकर हेहि म्हणतात; मग अनूसारखी सुशिक्षित, एम. ए., मार्मीक मुलगी येथें कशी फसली? अरू-अनूंच्या प्रेमाबद्दल कॉलेजांतल्या मुलांमध्यें बरीच चर्चा व थट्टामस्करी चाले. अशा स्थितींत तीं एकमेकांजवळ या संबंधांत कधींच बोललीं नसतील हें असंभवनीय दिसतें. ज्या युव-युवतींबद्दल लोकापवाद असतात तीं या लोकापवादाबद्दल बोलल्याशिवाय रहात नाहींत व कित्येक वेळां नसलेलें प्रेमहि या लोकापवादामुळें, उत्पन्न झालेल्या सानुभावामुळें, आणि विश्वस्त संभाषणामुळें मुळांत प्रेम नसतांनाहि तें अंकुरित होतें, मग मूळचेंच असल्यास तें व्यक्त व पुष्पित होईल हें काय सांगावयास पाहिजे? असा एकंदर मनुष्यस्वभाव असल्यामुळें एका घरांत राहणाऱ्या व अनेकदां एकान्तांत येणाऱ्या अनूला अरूच्या प्रेमाची किंवा प्रेमाभावाची म्हणा यथार्थ कल्पना नसणें अस्वाभाविक वाटतें. तिच्या बाजूनें फार तर एवढेंच म्हणतां येईल कीं, अरूनें एकदां दोनदां बहीण-भावंडाच्या प्रेमाहून वेगळें प्रेम दर्शविणाऱ्या एकदोन गोष्टी केल्या होत्या. उदाहरणार्थ, अरूनें लिहिलेली एक कविता तिला न दाखवितां परस्पर 'मनोरंजन'कडे पाठविली म्हणून अनू रागावली असतां त्यानें तिच्या खांद्यावर हात ठेविला व तो हात ती रागानें बाजूला सारणार इतक्यांत "त्याचे थरथरणारे ऊन ओठ आंसवांनीं भिजलेल्या तिच्या पापण्यांना येऊन भिडले." (पान. ४१) नयनचुंबनाचा हा प्रकार एकाहून अधिक दृष्टीनें अस्वाभाविक वाटतो. पण क्षणभर तो स्वाभाविक धरला तरी देखील एवढ्यावरूनच अनूसारख्या प्रौढ समंजस व मार्मिक मुलीला आपल्यावर अरूचें विवाह-सूचक प्रेम आहे असें वाटावें, इतर बोलणें चालणें निराळ्या प्रकारच्या प्रेमाचें दिग्दर्शन करतें हें तिच्या ध्यानांत येऊं नये, हें जरा चमत्कारिकच वाटतें.

त्याचप्रमाणें बॅरिस्टर अनिरुद्ध हे एका स्त्रियेशीं विवाह न करतांच विवाह झाल्याप्रमाणेंच वागतात हें प्रत्ययाला आल्यावर व स्वतःला त्यानें टाकून दिल्यावर देखील तिचें प्रेम त्यांच्यावर राहतें व ती घटस्फोट मागत नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांचें तिच्याकडे येणें-जाणें चालू राहतें याची कारण-मीमांसा जितकी समर्पक असावयास पाहिजे होती तितकी झालेली नाहीं. अशा स्थितींतहि प्रेम राहूं शकेल

हें मात्र मला मान्य आहे. एकपत्नीत्वाबद्दलचा तात्त्विक पुरस्कार मी पुष्कळ वाचलेला आहे; बायकामध्यें असूया असते आणि एका पतीच्या दोन पत्नींचें जुळणें कठीण आहे हेंहि मला समजतें; पण पतीनें दुसरें लग्न केल्यांवरहि त्याच्यावर पहिल्या बायकोचें थोडेंबहुत प्रेम असणें शक्य आहे हें मला म्हणावेंसें वाटतें. अर्थात् तशींच कांहीं कारणें असतील तर हीं कारणें माडखोलकरांनीं समर्पकतेनें मनोगाहन करून सांगावयास पाहिजे होतीं; पण तसें झालेलें नाहीं हें एक व्यंगच आहे.

अरूचें चित्र पाहिलें तर तें अस्पष्ट व कांहीं बाबतींत विसंगत आहे. त्याचें मनूवर सुप्त-गुप्त प्रेम होतें व अनूवर बहीणभावंडाचें प्रेम होतें हें स्पष्ट झालें आहे. पण अनूचें आपल्यावर कशाप्रकारचें प्रेम आहे हें तिच्या नित्य सांनिध्यांत राहून व एकान्तांत विश्वस्त रीतीचीं हरतऱ्हेचीं बोलणीं-चालणीं होऊन देखील त्याच्या ध्यानांत येऊं नये हें त्याच्या मार्मिकतेला कमीपणा आणणारें आहे. एखाद्या युवतीचें प्रेम नसतांना देखील तें आहे असें पुरुषांना वाटतें असें कालिदासापासून सगळे लोक म्हणत आले आहेत. मग एखाद्या युवतीचें प्रेम आपल्यावर खरोखर असून तें त्या तरुणाला न उमगलें तर तें आश्चर्यच म्हणावयास नको का? प्रेमाचा मुद्दा सोडून दिला तरी पुढें अनूचें लग्न होतें, मुलें बाळें होतात, पतिपत्नींमध्यें वितुष्ट येतें, अनू घरीं येते, वगैरे सगळ्या गोष्टी होत असतांना हा अरू जिवंत होता का मेला होता? मेलेला खास नव्हता. कारण "कवि म्हणून, तत्त्वज्ञ म्हणून तो आज कीर्तीच्या शिखरावर आरूढ झालेला आहे" असें अनू (पान २ वर) सांगते. मग कवि, तत्त्वज्ञ, उदार बुद्धीचा, प्रेमळ, म्हणून वर्णिलेला अरू अनूबद्दल कांहीं एक पूसतपास करीत नाहीं याचा उलगडा कसा करावयाचा? "अनू, तुला खरोखरीच कधीं माझ्या भावना कळतील" असें अरू अनूला (पान. ५५ वर) म्हणतो. अनूलाच काय, दुसऱ्या कोणालाहि त्या कळणार नाहींत,—निदान या पुस्तकावरून कळत नाहींत असेंच कोणीहि वाचक म्हणेल!

बॅरिस्टर अनिरुद्धांचा स्वभाव नीतिदृष्ट्या जितका गर्हणीय दाखविला आहे, तितकाच तो कलादृष्टीनें सुंदर चित्रिलेला आहे. अनूसारख्या पत्नीकडे दुर्लक्ष करून मनूशीं राजरोस व्यभिचार करीत तो राहातो यापेक्षां उघड द्वितीय विवाहच कां करीत नाहीं याचा उलगडा माडखोलकरांनीं केला असता तर कलादृष्ट्या या स्वभावचित्रांत व्यंग राहिलें नसतें.

अनूची आई व तिचे वडील, मनू, वगैरे पात्रें गौण असून योग्य प्रमाणांत त्यांचें स्वभावचित्रण झालें आहे. मनू ही व्यभिचारास कशी प्रवृत्त झाली हें अधिक स्पष्ट व्हावयास पाहिजे होतें, पण ही कादंबरी अनूच्या मुखानें सांगितलेली असल्यामुळें मनूच्या अंतर्गत गोष्टी तिला सांगणें अशक्यप्राय होतें. कारण त्या अंतर्गत गोष्टी तिला कळल्या तर ती सांगणार ना ?

माडखोलकरांची या पुस्तकांतली भाषा त्यांच्या '**मुक्तात्म्यां**'तील भाषेपेक्षां कमी संस्कृतप्रचुर व अधिक स्वाभाविक आणि रसयुक्त आहे. ती अतिशय चांगली, किंबहुना आदर्शभूत आहे, असेंहि मी म्हटलें असतें. पण जगांत कांहीं निर्दोष असूं नये अशीच घटना दिसते. कारण स्वाभाविकतेच्या नादीं लागून क्रिया-पदाच्या पुढें कर्ता, कर्म, क्रियाविशेषणें वगैरे घालण्याच्या लकबेचा त्यांनीं अतिरेक केलेला आहे.

ही पद्धति वास्तविक संभाषणांत स्वाभाविक आहे. पण तशी वाचण्याची संवय नसल्यामुळें तिचा अतिरेक झाला आहे असें वाटतें. सांकेतिक नियमांचे बंधन झुगारलेंच पाहिजे; पण कलावंतानें सुद्धां मनांत भरेल, मनाला बोंचणार नाहीं इतक्याच बेतानें रूढीभंग केला तरच त्याची कलाकृति सुंदर वाटेल. वाचकांना संवय होईपर्यंत तरी निदान ही लकब अतिरेकाला नेलेली असें वाटणार; व तोंपर्यंत तरी हा दोषच गणला जाईल. कांहीं काळपर्यंत तरी वाटणारा हा दोष वगळला तर माडखोलकरांच्या भाषेची स्तुति करावी तेवढी थोडीच. कोट्या काय, उपमा काय, उत्प्रेक्षा काय, दाखले काय, वाङ्मयात्मक उल्लेख व सूचना काय, स्वरचित सुभाषितें काय, सर्वच कांहीं वाङ्मयभक्तांना आनंददायक झालें आहे

ही कादंबरीं घटस्फोटाची आवश्यकता पटविण्याकरितां लिहिलेली आहे असें कांहीं लोक म्हणतात. मला असें वाटत नाहीं. अनूला घटस्फोट मिळणें शक्य होतें, पण घटस्फोट करून घेण्याची तिला इच्छाच होत नाहीं, यावरून अनुमान काढावयाचें झालें तर घटस्फोट करून घेऊं नये, असेंहि अनुमान काढतां येईल ! कादंबरीच्या अखेरीस थोडीशी अनवश्यक असलेली जी व्याख्यानबाजी अनूनें केलेली आहे तींत " स्त्रियांना घटस्फोटाचा हक्क पाहिजे " असें म्हटलेलें आहे. पण घटस्फोटाची आवश्यकता किंवा अनवश्यकता याबद्दल कादंबरीच्या कथानकाचा असा कांहींच ठसा उमटत नाहीं. विवाहसंस्था

हें भंगलेल्या देवळाप्रमाणें आहे. त्याचा जीर्णोद्धार करावा, पण ‘ तें अजीबात पाडून टाकून मानवजातीच्या हातीं स्वैराचाराची सनद मात्र देऊं नका ” असें म्हणून अनू आपली व्याख्यानबाजी संपविते, पण कादंबरीचा असा विवाह-संस्थेच्या इष्टानिष्टतेबद्दल कांहींच ठसा उमटत नाहीं. खरी गोष्ट अशी दिसतें कीं, माडखोलकरांनीं वरील प्रकारचे ठसे उमटविण्याच्या उद्देशानें ही कादंबरी लिहावयास घेतली असल्यास तो हेतु होताच असें म्हणण्यास शेवटच्या व्याख्याना-शिवाय दुसरा पुरावा काय ? अनूच्या मनःस्थितीचें व स्वभावविशेषांचे चित्रण हा या आत्मचरित्राचा उद्देश मानणें मला प्रशस्त वाटतें व तो चांगला सफल झालाहि आहे असें लगेच सांगावेसें वाटते.

ही कादंबरी लिहितांना मुंबईच्या किंवा दुसऱ्या कोठल्यातरी जिवंत व्यक्ति माडखोलकरांच्या डोळ्यांपुढें होत्या काय, असा कांहीं लोकांनीं मला प्रश्न विचारला. या संबंधानें मला निश्चियानें कांहींच सांगतां येणार नाहीं, पण एक गोष्ट ध्यानांत धरावीं कीं, कादंबरीकारानें वर्णिलेल्या पात्रासारखी थोडीबहुत परिस्थिति असलेली एखादी व्यक्ति दिसली म्हणजे त्या व्यक्तिचेंच चित्र कादंबरीकारानें काढलेलें आहे हें अनुमान फार धोक्याचे आहे. मी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या ‘ इन्दु काळे व सरला भोळे ’ या कादंबरींत एका इतिहाससंशोधकाचे पात्र आहे तें प्रो. पोतदाराचें स्वभावचित्र आहे असें मनांत ठरवून एकानें तर मला पत्रद्वारा दोष दिला. त्या गृहस्थास प्रो. पोतदारांशिवाय इतिहाससंशो-धक ठाऊक नाहीं हा काय माझा दोष ? दुसऱ्या एकानें दुसऱ्या एका इति-हास–संशोधकाचें नांव घेतलें तें अधिक मार्मिक होतें. कारण या दुसऱ्या इतिहास संशोधकाच्या बाबतींत एक प्रेमकथा तरी प्रसिद्ध होती. पण कादंबरींतील प्रेमकथा आणि ही प्रेमकथा यांत साम्य मुळींच नव्हते ही मोठीच गोम होती ! तात्पर्य, अशीं अनुमानें करण्यांत अर्थ नसतो.

या गोड कादंबरीचे परीक्षण संपविण्यापूर्वी एका क्षुल्लक मुद्याचा थोडक्यांत उल्लेख करतों. कॉलेजांत वगैरे तरुण–तरुणी एकत्र येत असल्यामुळें त्यांच्यामध्यें प्रेमभाव अंकुरित होण्याचा संभव असतो; अर्थात् कोणासंबंधानेंहि कधींहि किंचित्‌हि प्रेमभाव उत्पन्न झालेला नाहीं असें तरुण किंवा अशा तरुणी यापुढें सांपडणें कठीण. याविषयीं विवेचन करतांना कादंबरींतील अनू ( माडखोलकर

नव्हेत ) म्हणते कीं, "अनाघ्रात पुष्पांचीं अपेक्षा करण्याचें तें युग संपलें आतां." हें शब्द कॉलेजांतील युव-युवतींची नालस्ती करणारे आहेत असें कांहींचें म्हणणें आहे, आणि मीं प्रथम वरवर जेव्हां ही कादंबरी वाचली तेव्हां मलाहि असेंच वाटलें. पण अनूचे शब्द किंचित् कठोर असले तरी त्यांचा आशय असा नाहीं कीं, आधुनिक विद्यालयीन तरुण-तरुणींनीं विवाहापूर्वीं प्रेमलीला अनुभविलेल्या असतात. तिच्या म्हणण्याचा भावार्थ एवढाच कीं, त्यांच्या मनांत प्रेमविषयक विचार आलेले असतात. आणि हें खरें आहे 'अनाघ्रात पुष्प' हे शब्द मात्र जरूरीपेक्षां अधिक कठोर आहेत आणि माडखोलकरांनीं दुसऱ्या आवृत्तींत ते बदलावेत असें मी त्यांना सुचवीन.

परीक्षण संपविण्यापूर्वीं माडखोलकरांचीं कांहीं सुंदर वाक्यें उद्धृत करण्याची इच्छा होती, पण आधींच अपेक्षेबाहेर विस्तार झाल्यामुळें मोह आवरतों.

---

## ध्येय हाच देव

ता. ३१ मार्च १८६७, फाल्गुन वद्य एकादशी म्हणजे पापमोचनी, एकादशी, या दिवशीं मुंबईस प्रार्थसमाजाची स्थापना झाली. अर्थात् या समाजाच्या स्थापनेला आतां ६० वर्षे होऊन गेलीं. या अवधींत या समाजानें यश व अपयश कितपत संपादिलें याचा आढावा घ्यावा असें पुष्कळ दिवस माझ्या मनांत होतें. सुप्तावस्थेंतल्या या इच्छेला **'प्रार्थनासमाजाचा इतिहास'** या पुस्तकानें चालना दिली आहे. रा० द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनीं सहा महिन्यापूर्वी हें पुस्तक प्रसिद्ध केलें व त्यावर अभिप्राय मागितला, पुस्तकांत प्रार्थनासमाजाच्या आद्य-प्रवर्तकांची हरतऱ्हेची माहिती आहे. प्रार्थनासमाज कोणत्या परिस्थितींत व कोणत्या हेतूस्तव स्थापण्यांत आला हें सविस्तर व सुंदर रीतीनें सांगितलें आहे व हा समाज आज धार्मिक व सामाजिक उपयुक्ततेचीं कार्यें काय काय करीत आहे हें मुंबई, पुणें, नगर इत्यादि ठिकाणच्या समाजांनीं चालविलेल्या शाळांची, वर्गांची वगैरे माहिती देऊन सांगितलें आहे. पुस्तक अर्थात् अत्यंत उपयुक्त आहे, पण त्याचें परीक्षण न करतां त्याचें केवळ निमित्त करून स्वतःचे धर्मविषयक विचार जनतेपुढें मांडण्याचें मनांत योजिलें आहे.

हें विचार वाचतांना कांहीं वाचकांना विजेचे धक्के बसल्यासारखे कदाचित होईल. कारण एक तर मी संक्षेपात्मक पद्धति स्वीकारणार आहें व दुसरें आणि खरें कारण म्हणजे माझीं मतेंच मुळीं कांहींजणांना चमत्कारिक वाटतील अशीं झालीं आहेत.

*　　*　　*　　*

असें सांगतात कीं, पुरातनकाळीं गंधर्वनगरीहून हजारोंपट अशी एक अति प्रचंड जगड्व्याळ देवनगरी होती. त्यांत प्रत्येक देवाला एक असे तेहतीस कोटी वाडे होते. एका देवाच्या भक्तांना असे वाटत असे कीं, इतर देव खोटे, वाईट, दुष्ट आणि आपला देव तेवढा खरा, चांगला व सुष्ट. या खोट्या देवांचा नाश व्हावा म्हणून त्यांनीं त्या वाड्यांना आग लावून दिली. सर्पसत्रांत ज्याप्रमाणें सर्प जाळले गेले, त्याप्रमाणें या देवसत्रांत देवांचे वाडे आणि देव पार साफ होऊन गेले. दुर्दैवाची अशी गोष्ट कीं, त्या आगीचा इतका भडका झाला, कीं त्याच्या नुसत्या धगीनेंच त्या भक्तांच्या 'खऱ्या' देवाच्या वाड्याचा कोळसा झाला आणि लवकरच तो देवही त्या भडाक्यांत सांपडून होरपळून अग्निसात् झाला! ३२ कोटि ९९ लक्ष ९९ हजार ९ शें ९९ देवांना जाळणारी आग लहानसहान का असेल? आपल्या लाडक्या देवाला वांचविण्याचे त्या भक्तांनीं खूप प्रयत्न केले तरी ते सर्व प्रयत्न निष्फळ झाले यांत नवल काय? घरदार व शरीर अग्निसात् झालेल्या या देवाचा आत्मा आतां स्वर्गवासी–नव्हे, ' आकाशवासी ' झाला असून त्याचे एकेश्वरी हिंदु, मुसलमान, क्रिस्ती भक्त त्याला " आकाशांतला बाप " या नांवानें अद्यापि ओळखतात!

* * * *

देवाला, उदाहरणार्थ मारुतीला, एक लांब शेंपटी आहे असें एखाद्यानें मानलें तर ही देवाची कल्पना अज्ञानमूलक व भोळसटपणाची आहे असें प्रार्थना समाजिस्ट वगैरे एकेश्वरी लोक म्हणतात. कबूल आहे; पण हें त्यांनीं कसें ठरविलें? विवेकबुद्धीच्या आधारेंच ना? मग ही विवेकबुद्धिच 'ईश्वर' हा मायाळू आहे, तो 'दयाघन' आहे, या विधानांसंबंधीं संशय घेऊं लागली, तर तिला गप्प बसविण्याइतका पुरावा या जगांत–दुःखानें गांजलेलीं हजारों माणसें ज्यांत विव्हळताहेत व किंकाळताहेत किंवा न बोलतां, न ओरडतां झुरताहेत व मरताहेत-अशा या कठोर जगांत विवेकबुद्धीच्या संशयाचें निर्मूलन करील, असा पुरावा आहे काय? नसेल तर मग देवाबद्दलची चार तोंडाची कल्पना किंवा लांब शेपटी असल्याची कल्पना जशी प्रार्थनासमाजिस्टानें सोडली, तशी ही दयाघनत्वाची कल्पना सोडण्यास तो तयार आहे काय? निदान 'ही कल्पना चुकीची असण्याचा संभव आहे' इतकें तरी कबूल करण्यास तो तयार आहे काय?

* * * *

मौज अशी कीं, प्रार्थनासमाजिस्टांचा देव 'निर्गुण' आहे असें त्यांच्याच लेखांत आपण वाचतों, पण क्षणार्धांत हा निर्गुण देव, कसा काय कुणाला ठाऊक, सगुण होतो व तो अनादि, अनंत, चैतन्ययुक्त, सर्वसाक्षी, आनंदयुक्त इतकेंच नव्हे, तर सर्वैश्वर्यपूर्ण होतो !

*　　　*　　　*　　　*

हा देव बालपणीं 'निर्गुण-निराकार' असतो. हळुहळू तो गुण प्रकट करूं लागतो व अखेर अखेर 'अनिर्वचनीय गुण' होऊन निर्गुणांत पुनः विलीन होतो आणि या

*　　　*　　　*　　　*

" आकाशांतला बाप दाखव नाहीं तर त्या बापाचे श्राद्ध कर " असें एक बेजबाबदार तरुण कांहीं वर्षांपूर्वी रविवारच्या बाजारांत उभे राहून उपदेश करणाऱ्या एका मिशनऱ्याला म्हणाला. आपणांला इतका आततायीपणा करावयाचा नाहीं, पण तुमच्या त्या एकमेवाद्वितीयं, अनादि, अनंत, निर्गुण व सर्वगुणसंपन्न देवाच्या अस्तित्वाबद्दल पुरावा काय असें विचारण्यांत कांहीं पाप नाहीं.

*　　　*　　　*　　　*

प्रार्थनासमाजाचे एक अध्वर्यु परलोकवासी डॉ० भांडारकर यांनीं हा प्रश्न 'आपल्या धर्मपर व्याख्यानां'त अनेकदां उपस्थित केला आहे व उत्तरहि दिलेलें आहे. तें म्हणतातः—जगामध्यें सुव्यवस्था आहे, सुसंगति आहे, सौंदर्य आहे, तेव्हां कोणी तरी दूरदर्शी योजक असलाच पाहिजे. योजना दिसते तेव्हां योजक असलाच पाहिजे असा हा युक्तिवाद. Argument from design या नांवानें तो युरोपांत पुष्कळ शतकें ओळखला जात आहे. पण तेथें काय, किंवा येथें काय, कोणाचें समाधान करूं शकेल इतकें सामर्थ्य त्यांत नाहीं.

*　　　*　　　*　　　*

पहिल्या प्रथम असा आक्षेप येतो कीं, जगांत जशी सुव्यवस्था आहे, तशी कुव्यवस्थाही आहे, सौंदर्य आहे तशी कुरूपताही आहे, स्वच्छता आहे तशी घाण आहे, सुख आहे तसें दुःख आहे, पुण्य आहे तसें पाप आहे; मग सुव्यवस्था सौंदर्य इत्यादिकांचा कर्ता जसा ईश्वर मानावयाचा, तसा कुव्यवस्थादिकांचा कर्ता सैतान मानावयाचा कीं काय ?

*　　　*　　　*　　　*

दुःख, पाप, कुरूपता, कुव्यवस्था इत्यादि आभासात्मक आहेत असें येथें कोणी म्हणेल. पण म्हणणें सोपें आहे एवढेंच याला उत्तर. नुसतें 'नाहीं'

म्हणून जर दुःख, पाप इत्यादि गोष्टी नष्ट होत असल्या तर मग तुरुंग, इस्पितळें, महायुद्धें इत्यादिकांचें अस्तित्वच खुंटलें असतें !

* * * *

तिळानें किंवा कृष्णकेशांनीं जसें एखाद्या गौरवर्ण युवतीचें तोंड खुलतें किंवा आमावस्येच्या काळोखानें जशा तारका अधिकच खुलतात, तसें या विश्वाचें सौंदर्य दुःखपापदिकांनीं खुलतें, इतकेंच नव्हें तर सौंदर्याला तें आवश्यक आहे असें कविसम्राट् रवीन्द्रनाथ टागोर म्हणतात. उपमा, उत्तम आहे पण उपमा म्हणजे प्रमाण नव्हे, आणि कविसृष्टि म्हणजे खरी सृष्टि नव्हे !

* * * *

जगांत केशपाशानें किंवा गालावरील तिळानें अधिक मोहक होणाऱ्या युवतीच असत्या तर किती चांगलें झालें असतें ! पण खऱ्या जगांत लुल्या-पांगळ्या, म्हाताऱ्या-कोताऱ्या, कुब्जा-शूर्पणखा, इन्दु-बिन्दु किती तरी आहेत ! आग्रहानें ‘ नाहींत ’ असेंच म्हणावयाचें असलें तर गोष्ट वेगळी.

* * * *

रुपकाची भाषा सोडून याचा भावार्थ सांगावयाचा म्हणजे कांहीं दुःखें, आपत्ति, संकटें वगैरे इष्ट, आवश्यक व रम्य असतील; पण इतरांचें स्वरूप हिडिस व भेसुर आहे हें कबूल करणें भाग आहे.

* * * *

शिवाय असें कीं, जग हें पूर्णपणें व सर्वत्र सुव्यवस्थित आणि सुंदर आहे असें घटकाभर म्हटलें तरी कोणी तरी ईश्वरानें बुद्धिपुरःसर तें निर्माण केलें, असें सिद्ध होतें असें नाहीं. पोटांत चाललेली पचनाची क्रिया किती सुव्यवस्थित व सुंदर असते, पण ती कोणी तरी पोटांत बसणारा ईश्वर करतो काय ? वेली सुंदर असतात, त्यांवरील फुलें तर फारच सुंदर असतात, तेव्हां त्यांच्या मुळांत ठाणें देऊन बसलेला कोणी ईश्वर हीं सौंदर्यें निर्माण करतो म्हणावयाचें काय ? यावर कदाचित् कोणीं म्हणेल कीं, “ प्रत्येक वेलीच्या मुळाशीं किंवा प्रत्येक प्राण्याच्या पोटांत ईश्वर मानावयाचा नाहीं तर सर्व विश्वाहून वेगळा व विश्वाबाहेर असलेला ईश्वर आपल्या स्वतंत्र सामर्थ्यानें सर्व विश्वाचीं सूत्रें हातांत धरून लीलेनें हरतऱ्हेचीं सौंदर्यें निर्माण करतो असें मानावयाचें आहे. ” पण अशी कल्पना केली तरीसुद्धां

किमीहः किंकायाः स खलु किमुपायस्त्रिभुवनं
किमाधारो धाता स खलु किमुपादान इति च ।

अशा प्रकारचे अनेक जाचक प्रश्न उत्पन्न होणारच आणि तत्त्वज्ञानांना त्यांचें उत्तर विचारलें असतां ' नेति नेति ' याशिवाय दुसरें उत्तर देणें कठीण पडतें, हें तत्त्वाभ्यासकांना विदितच आहे.

* * *

अलीकडच्या शारीर-विज्ञान-शास्त्रज्ञांना ( Physiologists ) विश्वाच्या मुळाशीं कांहीं तरी सहेतुक प्रबळ प्रेरणा आहे असें मानावें लागत आहे व या प्रेरणेला ते ( Directive force, vital urge, Elan Vital ) इत्यादि नांवांनीं ओळखीत आहेत हें तुम्हांला ठाऊक आहे ना ? असें मला कोणी विचारील. प्रश्न बरोबर आहे. पण हा Directive force मनाला म्हणजे लौकिकांतला देव किंवा ' एकेश्वरी ' लोकांचा देव मानला असें होत नाहीं. दुसरें असें कीं, Directive force सगळेंच मानतात असें नाहीं. आणखी असें कीं, आपलें ज्ञान सध्यां तरी इतकें अल्प आहे कीं, जीव कसा उत्पन्न होतो या साध्या गोष्टीचे देखील समर्पक ज्ञान आपणांस नाहीं. अशा स्थितींत जडापासून जीव उत्पन्न होणें शक्य आहे किंवा नाहीं इत्यादि प्रश्नांबद्दल कोठलाही सिद्धान्त आग्रहपूर्वक न सांगणें हाच मार्ग प्रशस्त व शास्त्रोचित आहे.

* * *

महाभारतकार व्यास म्हणतात कीं, देव मानावा, तो नसला तरी मानावा, तो कां तर, मानण्यानें नुकसान होत नाहीं ! देव खरोखरच असला तर त्याचें अस्तित्व मानणें युक्तच आहे व तें फायद्याचेंही आहे, आणि न मानणें हें धोक्याचें आहे. शंकराचार्यांच्या गादीवर अधिष्ठित असलेले डॉ॰ कुर्तकोटी हे या युक्तिवादाला पुष्टि देण्याकरितां आधुनिक Pragmatism चें साहाय्य घेतात; पण या युक्तिवादांत हेत्वाभास-बुद्धिदृष्ट्याच नव्हे तर नीतिदृष्ट्या घातुक असें हेत्वाभास किती आहेत पहा.

* * *

" ईश्वर नसला तरी माना " असें सांगतांना हें गृहीत धरलें आहे कीं, विचारी मनुष्याला पाहिजे तें मानतां येईल. पण काळ्याला एक वेळ मी पांढरें म्हणूं शकेन, पण मानूं मात्र शकणार नाहीं, अर्थात् वेड जोंपर्यंत लागलें नाहीं तोंपर्यंत !

दुसरें असें कीं, ईश्वर नसतांना त्याचें अस्तित्व मानतां आलें तरी तें अनिष्ट आहे. 'ईश्वर मानण्यांत कांहीं नुकसान नाहीं ना ?' हें म्हणणें फोल आहे, कारण जी गोष्ट नाहीं ती आहे म्हणणें म्हणजे विवेकी जीवनाला रजा देणें होय !

* * *

शारीरिक जीविताचा कंटाळा आला तरी आत्महत्या करणें कठीण असतें; पण ती एक वेळ सुकर म्हणतां येईल व ती कदाचित् एखाद वेळेस इष्टही असेल. पण बौद्धिक जीवनाची हत्या करायची कशी? आणि या आत्महत्येपासून बौद्धिक आत्म-नाशच नव्हे तर नैतिक-आध्यात्मिक-आत्मनाश आहे !

* * *

व्यवहारांत आपण पुष्कळ खरेंखोटें बोलतो, पण सत्य काय आहे हें प्रमाणांवरून न ठरवितां नफ्यातोट्यावरून आपण ठरवूं लागलों म्हणजे मग नीतिमत्तेची चांगलीच प्रगति झाली म्हणावयाची !

* * *

वुइल्यम् जेम्सचा 'हितसत्यवाद' (हित तेंच सत्य असा वाद, Pragmatism) असें सांगत नाहीं कीं, बुद्धीला जी गोष्ट पटत नाहीं तीहि खरी माना; न पटणारी गोष्ट खरी मानूं लागण्याचा प्रयत्न केल्यास मनःक्षोभ होईल व या दृष्टीनें 'हितसत्यवाद'च म्हणेल कीं, "पटत नसल्यास ईश्वर मानूं नका."

* * *

एखादें अस्तित्व मानल्यानें मनांत मनोव्यापारांची विसंगति उत्पन्न होत नाहीं तर त्यांची सुसंगति व सुव्यवस्था लागतें असा प्रकार असेल तेथेंच भरभक्कम पुराव्याच्या अभावीं एखादें अस्तित्व गृहित धरण्याची Pragmatism नें परवानगी दिली आहे. ईश्वराचें अस्तित्व मानण्यास अशी अनुकूल परिस्थिति असल्यास गोष्ट वेगळी; पण एरव्हीं Pragmatism चा आधार घेण्यांत अर्थ नाहीं.

* * *

"ईश्वर असला आणि त्याचें अस्तित्व आपण मानलें नाहीं तर कसें होईल?" हा युक्तिवाद आपणांस दरडावून घाबरवून राजाच्या जुलमी अधिकाऱ्याप्रमाणें राजनिष्ठेची शाब्दिक शपथ आपणाकडून घेऊं पहात आहे. पण असल्या दहशतीला भिणें हें अनिष्ट आहे; हा भ्याडपणा आहे. आध्यात्मिक

पूर्णतेला गेलेला स्थितप्रज्ञ 'निर्भय' असतो असें आपलीं उपनिषदें सांगतात. आध्यात्मिक मार्गातल्या लोकांमध्यें पूर्ण निर्भयत्व आलेलें नसलें तरी "प्रमाणाशिवाय कोणतेंही अस्तित्व मी मानणार नाहीं–" असें जगांत नव्हे, लौकिकांत नव्हे, व्यवहारांत नव्हे, तर मनांतल्या अगदीं आंतल्या गाभाऱ्यांत, आपल्या स्वतःशींच, एका कानाचे दुसऱ्या कानाला ऐकूं जाणार नाहीं अशा रीतीनें, म्हणण्याइतकें धैर्य माणसामध्यें नसेल तर तो आध्यात्मिक मार्गातला कसला ?

* * *

ईश्वर असला आणि आपण प्रमाणाभावीं त्याचे अस्तित्व मानलें नाहीं तर तो रागावेल, किंवा आपलें नुकसान करील हें म्हणणेंच ईश्वराची अब्रुनुकसानी करणारें आहे ! कारण ज्ञान हें ईश्वराला प्रिय आहे व तो न्यायी आहे असें आपण म्हणतो, तें सत्य मानणाऱ्यावर रागवेल किंवा त्याचे नुकसान करील हें संभवनीयच नाहीं. तो उलट त्याचें अभिनन्दन करील.

* * *

एखादा मुद्दा न समजतां तो सजमला आहे असें एखाद्या विद्यार्थ्यानें सांगितलें तर सामान्य शिक्षकालाही आनंद होत नाहीं. प्रमाण पटलें नसतां पटलें आहे असें मानणारा भक्त देवाला प्रिय होईल असें वाटत नाहीं. ( बाकी, **देवानां प्रियः** याचा मौजेचा अर्थ ज्याला माहीत आहे तो मनुष्य अशा भक्ताला डोळे मिचकावून 'देवानां प्रिय' म्हणेल हें मी ओळखून आहें म्हणा ! )

* * * *

ईश्वर मानला नाहीं तर नीति निराधार होईल असें कांहीं म्हणतात ( व मीही कांहीं दिवस मानीत होतों. ) नीति ही धर्माची सहधर्मचारिणी झाली म्हणजे सौभाग्यानें ती जशी शोभते तशी धर्माशीं फटकून वागणारी कौमार्यावस्थेंतली नीति शोभत नाहीं असें मी म्हणत असें व म्हणतोंहि; पण ईश्वराशिवाय धर्माचें धर्मत्त्व नष्ट होतें असें मात्र मला अलीकडे वाटत नाहीं.

* * * *

आस्तिक्यबुद्धि वाईट असें मीं अद्यापपर्यंत म्हटलेलें नाहीं, तर आस्तिक्यबुद्धि नसतांना तिचें सोंग करणें वाईट असें मी म्हणत आहें. ज्याच्यांत आस्तिक्यबुद्धि आहे तो मनुष्य चुकतो आहे असें मला म्हणावयाचें नाहीं तर ओढूनताणून बळेंच तिला खेंचून आणण्याचा प्रयत्न करणें निष्फळच नव्हे, तर घातुक आहे असें मला दाखवावयाचें आहे.

* * * *

देव नसेल तर नीतिला आधार काय असें विचारणाऱ्याला मी विचारतों कीं, २+२=४ हें तूं ईश्वर असला किंवा नसला तरी खरें मानतोस ना? मग नीतिनियमांनाच तुला ईश्वराचें अस्तित्व कशाला लागतें?

* * * *

पूर्वी कांहीं लोकांना असें वाटे कीं, पृथ्वीला कांही तरी आधार असला पाहिजे,-ती कांहीं अंतराळांत तरंगूं शकणार नाहीं. अर्थात् पृथ्वी ही शेषाच्या फणेवर आधारलेली आहे, अशी एका कवीनें कल्पना लढविली व ती कांहींनीं मान्यही केली! त्या शेषाला आधार काय असा प्रश्न लगेच उत्पन्न होऊन त्याला आधार म्हणून कासवाची पाठ देण्यांत आली. या कासवाला आधार पाण्याचा, आणि हें पाणी एका सरोवरांत, आणि हें सरोवर अष्टदिग्गजांच्या डोक्यावर, अशी एक पौराणिक कल्पना. आपण आतां पृथ्वी अंतराळी लटकते आहे असें मानतों, आणि त्यांत कांहीं चुकत आहे असें धार्मिक लोकही म्हणत नाहींत. नीतिच्या बुडाखालचे काल्पनिक आधार आतां आपण मानले नाहींत तरीही असेंच चालण्यासारखें आहे.

* * * *

शेष, कूर्म, दिग्गज इत्यादि पृथ्वीचे आधार गेले, तरी न्यूटननें शोध लावलेलें गुरुत्वाकर्षण मानावें लागतेंच. त्याप्रमाणें तुमच्या नीतिला ईश्वराभावीं काय आधार मानतां असें कोणीं विचारल्यास दोन अधिक दोन बरोबर चार याला जशा प्रकारचा आधार आहे, तशा प्रकारचा नीतिनियमांना आहे असें उत्तर आहे. माझी मुलगी लहान असतांना तिला मी विचारलें, 'तीन दाहे किती?' ३० म्हणून उत्तर आल्यावर मीं म्हटलें, 'तीस नाहींत, तीन दाही ९४'. ती अर्थात् हें कबूल करीना, पण कारण विचारतां "बाई"नीं आम्हांला 'तीन दाहे तीस' असं शिकवलं आहे" याशिवाय उत्तर मिळेना. तिला आतां हाच प्रश्न विचारला तर ती बाईचा आधार न देतां 'अमुक अमुक कारणास्तव ३ × १०=३०' असें सांगेल अशी माझी समजूत आहे. बाईचा ती आतां आधार देत नाहीं ही गोष्ट अभिनन्दनीय का अनभिनन्दनीय?

* * * *

पूर्वी अमुक अमुक शास्त्रांत सांगितलें आहे म्हणून खरें मानावयाचें असें आपण म्हटलें म्हणून अजूनदेखील तेंच म्हणत रहावयाचे? त्यांतली न्यायाची गोष्ट अशी आहे कीं, 'शास्त्रांत सांगितलें आहे म्हणून अमुक अमुक गोष्ट खरी'

तरी असा प्रकार नसून " ज्यांत बुद्धीला पटणाऱ्या खऱ्या गोष्टी सांगितल्या असतात तें शास्त्र. " असा वास्तविक प्रकार आहे.

* * * *

निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या देशांत, निरनिराळ्या चालीरिती रूढ असतात, व निरनिराळे नीतिनियम मान्य असतात, तेव्हां स्थिर नित्य त्रिकालाबाधित नीतिनियम आहेत किंवा नाहींत असा येथें प्रश्न उपस्थित होईल, त्रिकालबाधित नीतिनीयम पाहिजे असल्यास ते सर्व समंजस माणसांना शान्तपणें विचार केला असतां केव्हांही कोठेंही पटण्यासारखी पाहिजेत. " असा नियम तर एकदेखील सांपडणार नाहीं " असें कोणी म्हणेल. नाहीं सांपडणार कदाचित्; पण असा नियम सांपडावा म्हणून विवेकबुद्धि गहाण ठेवून एखाद्या शास्त्रापासून किंवा देवापासून 'त्रिकालाबाधित' नियम उसना आणावा इतका कांहीं मी त्रिकालाबाधित्वाला भाळलेला नाहीं.

* * * *

तसेंच पाहिलें, तर भौतिकशास्त्रांतल्या उपपत्ति वारंवार बदलत नाहींत काय ? आणि गणितशास्त्र एवढें आपण त्रिकालाबाधित म्हणतों, पण त्यांत देखील Einstein यानें ( कोठल्या तरी एका विशिष्ट अर्थानें ) न्यूटन वगैरेंचे सिद्धान्त अपर्याप्त किंवा अयथार्थ ( inadequate ) आहेत असें दाखविलें आहेच ना ? प्रत्येक शास्त्रांत अशी प्रगति होत आहे, नियम बदलत आहेत, नवीन नवीन प्रश्न उत्पन्न होत आहेत, तर मग नीतिशास्त्रांत नित्यता व स्थिरता कशी राहणार ?

* * * *

नीति-नियम बदलले म्हणजे ते वाईट आणि ते कायम मानले म्हणजे मात्र ते चांगले, असें म्हणण्यांत न्याय कोठेंच नाहीं. आग्रहपूर्वक वादच करावयाचा असेल तर स्थितिपेक्षां गतीमध्येंच अधिक जीवन आहे, व अधिक मौज आहे—एकच एक सूर एकसारखा लावण्यापेक्षां निरनिराळे सूर ऐकण्यास चांगलें. आकाशाचा एकच एक रंग पाहण्यापेक्षां ढगांवरचे बदलणारे रंग पाहणें चांगलें— असें म्हणतां येईल. पण म्हणण्याचा हा प्रश्न नसून समंजसपणाचे काय आहे हा प्रश्न आहे आणि नियम चांगला कोणता या प्रश्नाचें समंजसपणाचें उत्तर हेंच कीं, समंजस माणसाला शान्त विचार करून जो पटतो तो नियम खरा.

तो सर्व देशांत सर्व कालीं सर्व लोकांकडून मानिला जात होता किंवा नाहीं, अथवा जात आहे किंवा नाहीं, हा प्रश्न अगदीं गौण आहे.

* * * *

या विचारपद्धतीला अनुसरलें असतां त्या त्या व्यक्तीपुरतें ते ते नियम खरे असें म्हणावें लागेल व शाश्वत कांहींच राहणार नाहीं; नीति ही या दृष्टीनें वस्तुनिष्ठ (Objective) नसून व्यक्तिनिष्ठ (Subjective) होईल, हें खरें; पण वस्तुनिष्ठता बळेंच कां आणावयाची आहे ? आणि ती यावी म्हणून विचारशक्तीचें जन्मसिद्ध हक्क सोडावयाचे ? वारंवार स्थानांन्तर करावें लागले म्हणून कंटाळलेल्या एका वेड्यानें पृथ्वीच्या उदरांत कायमचें स्थान मिळेल या आशेनें स्वतःला पुरून घेतलें असें सांगतात, त्यांतलाच हा प्रकार !

* * * *

'देवा'बद्दल नवीन पिढी 'ध्येय' हा शब्द वापरूं लागली आहे, प्रत्येकाचें ध्येय निराळें असतें, अर्थात् प्रत्येकाचा 'देव' निराळा झाला. पण पूर्वीं तरी काय होतें ? शिव, विष्णू, शंकर, गणपति, राम, मारुती, अल्ला, Our Father In Heaven, Jehova, इत्यादि अनेक देव पूर्वींदेखील होतेंच व त्यांच्या स्वरुपांविषयींच्या कल्पना व्यक्तिपरत्वें भिन्न होत्याच.

* * * *

आपआपलें ध्येय जें असेल त्याची काया-वाचा-मनेंकरून पूजा करणाऱ्यांना किंवा करूं पाहणाऱ्यांना मी आस्तिक समजतों. देवाचें अस्तित्व मानणाऱ्यांना आस्तिक म्हणावें, हें लक्षण ध्येय नामक देवाची पूजा करणाऱ्यांनाही लागू पडते. 'देव' शब्द शि व असा लिहिला तरी चालतों, वि-ष्णु, असला लिहिला तरी चालतो, G-o-d असा लिहिला तरी जर चालतों, तर मग ध्ये-य असा लिहिला म्हणून बिघडलें कोठें ? या शाब्दिक कोटीचा भावार्थ असा कीं, उच्च तर अशा कशावर तरी सात्त्विक दृढ श्रद्धा असली म्हणजे तेथें आस्तिक्य आहे, असें जर आपण मानतों, 'जेथें ज्याचा भाव, तेथें त्याचा देव' असें जर आपलें आप्तवचन आहे तर मग ध्येयपूजा करणाऱ्यांना उगीच नास्तिकांत कां काढावें ? आणि माझ्यासारखे जे कोणी ध्येयपूजा हातून चांगलीशी घडत नाहीं तरीसुद्धां ध्येयपूजा व्हावी अशी इच्छा करणारे आहेत, त्यांना तरी नास्तिकांत कां काढावें ?

* * * *

आपापल्या कल्पनेप्रमाणें आपापल्या ध्येयाचें रम्य मानसिक ध्यान कल्पून आपल्या मानसपूजेनें, वाचिकपूजेनें व कायिक पूजेनें त्याला मूर्त, सत्य, सजीव, आनंदायक स्वरूप देणारे सच्चिदानंदाचीच भक्ति करीत नाहींत काय?

*　　　*　　　*　　　*

'विश्वात्मक' देवाची पूजा करणारे ज्ञानदेव; जनताजनार्दनाची पूजा करणारे लोकमान्य टिळक; 'निर्गुणब्रह्म' ची पूजा करणारे अद्वैत वेदान्ती; हे जर निन्दाव्यंजक अर्थानें नास्तिक नव्हेत, तर 'ध्येयात्मक देवा'ची पूजा करणारे तेवढे नास्तिक कां गणावयाचे?

*　　　*　　　*　　　*

खरोखर पाहिले असतां ईश्वराचें अस्तित्व संशयित आहे असें मनांत वाटत असतां जे लोक बाहेरून स्वतःस एकेश्वरी म्हणविणारे किंवा अनेकेश्वरी म्हणविणारे खरे नास्तिक. ज्या लोकांची खरी श्रद्धा असेल त्यांची गोष्ट वेगळी; पण या तार्किक युगांत असले लोक पुष्कळ असण्याचा संभव कमी आहे.

*　　　*　　　*　　　*

ब्रॅडलॉ, मिल, आगरकर, इत्यादिकांना कांहीं लोक अश्रद्ध म्हणतात! म्हसोबावर, किंवा आपल्या मुलाला बळी देणाऱ्या 'आकाशांतल्या बापा'वर, किंवा द्रौपदीची हांक ऐकून वस्त्राचें रूप घेणाऱ्या कृष्णावर किंवा भयंकर सूड घेऊं इच्छिणाऱ्या 'जेहोव्हा'वर किंवा आहिल्याजार इन्द्रावर विश्वास ठेवणारें किंवा ठेवतों असें दाखविणारे भाविक, सात्त्विक व आस्तिक आणि आगरकरांसारखे लोक नास्तिक, तामसी व अभाविक! जे लोक आपल्या देवाकरितां इकडची काडी-तिकडे करणार नाहींत ते भाविक आणि आस्तिक; पण ध्येयाकरितां जिवापाड श्रम करणारे व वेळ प्रसंगीं जीवही देण्यास न डगमगणारें नास्तिक!

*　　　*　　　*　　　*

सश्रद्ध जर कोणी असतील तर आगरकरांसारखे लोक. त्यांची आपल्या ध्येयावर जितकी व जशी जिवंत जाज्वल्य श्रद्धा होती, तशी श्रद्धाळू म्हणविणाऱ्या एकेश्वरी वा अनेकेश्वरी किती लोकांमध्यें असेल?

*　　　*　　　*　　　*

" आमच्या नेहमींच्या देवाची पूजा केली म्हणजे आमच्या मनाला जी प्रसन्नता येतें, जी शांति मिळते, जो आनंद होतो, जी कार्यक्षमता येते, ती ध्येयपूजा करणाऱ्यांना शक्य आहे काय ? " असें मला कांहींजण विचारतात. माझें उत्तर असें आहे कीं, ध्येयपूजा म्हणजे काय हें सहानुभूतिपूर्वक पाहिलें म्हणजे प्रसन्नता, शान्ति कार्यक्षमता इत्यादि बाबतींत ध्येयपूजा देवपूजेहून कांकणभर अधिक आहे असें कबूल करावें लागेल.

*          *          *          *

देवपूजा करणाऱ्यांना

God is in His Heaven.
All's right with the world.

असें वाटत असतें; देव हा दीनांचा दयाळू व कष्ट करणाऱ्यांचा कनवाळू आहे, तो सर्वसाक्षी आहे, तो सज्जनांचा वाली आहे, इत्यादि गोष्टींवर त्यांची खरीखुरी श्रद्धा असते; अर्थात् त्यांना एकप्रकारचें सात्त्विक समाधान वाटणें व त्यांच्या मनाला प्रसन्नता येणें साहजिक आहे. ध्येयावर भक्ति करणाऱ्यांना केवळ असलाच आनंद मिळणार नाहीं, पण याहून उच्चतर असा आनंद मिळूं शकतो. दीनावर दया करण्याला ईश्वर कांहीं धांवून येणार नाहीं, तर दया करावयाची असल्यास आपणांसच कंबर बांधली पाहिजे; कष्ट करणारांचे कष्ट कमी करावयाचे असल्यास देवाकडे बोट दाखविण्यांत अर्थ नाहीं, तर त्या बाबतींत आपणाच हात-पाय हलविलें पाहिजेत; जगाच्या सुव्यवस्थेकडे देव पाहतो आहे तेव्हां आपल्या उद्योगाला आपण लागावें आणि देवावर इतर सगळा भार टाकावा अशी विचार-सरणी चूक असून जगांत जी कांहीं सुव्यवस्था-कुव्यवस्था असेल तिच्यांत फरक करावयाचा असल्यास तो आपल्या सारख्यांनींच केला पाहिजे; आपलें पीठ दळा-ण्याला देव एखाद्या बाईचें सोंग घेऊन येणार नाहीं किंवा आपल्या पैशाचा भरणा करण्याकरितां शूद्राचें सोंगही कोणी देव घेणार नाहीं,—अशा प्रकारची एकदां निश्चित वृत्ति झाली व आपली जबाबदारी पूर्णपणें ध्यानांत आली म्हणजे जो उत्साह वाटतो, जें ' निश्चयाचें बळ ' येते, जें श्रेष्ठ धारिष्ट वाटतें, त्यापुढें ' देव सगळ्या गोष्टी पाहतो आहे ' अशा प्रकारच्या भावनेमुळें उत्पन्न होणारें समाधान अगदींच फिकें आहे.

*          *          *          *

नेहमींची देवाची कल्पना रम्य असेल, पण एकेका ध्येयाचें चित्र डोळ्यापुढें आणलें म्हणजे ध्येयें हीं किती तरी पटीनें रम्यतर असतात. निसर्गापेक्षां कविसृष्टि जशी अधिक सुंदर असते, तसेंच ध्येयसृष्टिचेंही आहे. William Morris चें News from Nowhere वाचा म्हणजे मी काय म्हणतों, याची थोडीबहुत कल्पना येईल. किंवा आधुनिक कालांतील कांहीं समाजसत्तावादी लोकांचीं ध्येयें मनांत चित्रित करा म्हणजे ही गोष्ट ध्यानांत येईल. हें जग आपण सुंदर म्हणतों, पण हल्लीं आहेत त्यापेक्षां अधिक उद्यानें त्यांत केलीं तर तें कुरूप का होईल ? जागजागचें दलदलीचें, रोगराईचें, कांटेरी झाडांचें भाग साफ करून तेथें स्वच्छतेचें, आरोग्याचें व सुफलतेचें साम्राज्य केलें, तर जगाच्या सौंदर्यांत भर पडणार नाहीं ? आजच्या समजांतली विषमता, घातुक चढाओढ, असूया, द्वेष, स्वार्थपरायणता, इत्यादि दोष काढले तर समाज अधिक सात्त्विक, अधिक कार्यक्षम व अधिक सुंदर होणार नाहीं ? प्रत्येक मनुष्याला राहण्याला एक, हक्काची झोपडी आहे, त्याला शिक्षण हक्कानें मिळत आहे; मोठेपणीं चार तासांपेक्षां अधिक काम नाहीं; होतां होईतों ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणेंच काम द्यावयाचें, अधिक सामर्थ्यवान् किंवा बुद्धिमान् मनुष्याला अधिक वेतन नाहीं तर हल्लींच्या कुटुंबव्यवस्थेंत ज्याप्रमाणें लहान व अशक्त मुलांना व म्हाताऱ्याकोताऱ्यांना दूध वगैरे अधिक मिळतें, त्याप्रमाणें व त्याच तत्त्वानुसार ज्याला जास्ती जरूर त्याला अधिक वेतन मिळावयाचें; एकमेकांना मारणारी चढाओढ मुळींच चालूं द्यावयाची नाहीं; कोठल्याही राष्ट्राशीं वैरभाव नाहीं; जगांतले सर्व लोक जणुं कांहीं एका कुटुंबांतलें अशा नात्यानें वागताहेत; कामचुकारपणा कोणी करीत नाहीं, कारण आवडीचें काम असल्यावर कोण काम चुकविणार ? लोभाला थाराच नाहीं, कारण खाजगी मिळकतीचें विषारी मूळच काढून टाकलेलें; ज्याला त्याला आपल्या कामापासून अधिकांत अधिक पैसे कसे मिळतील असें वाटत नाहीं तर अधिकांत अधिक तें चांगलें, उपयुक्त व सुंदर कसें होईल आणि ज्याच्याकरितां तें केलें असेल तो पूर्णपणें कसा खूष होईल अशा प्रकारची ज्याची त्याची दृष्टि; प्रत्येक मनुष्याला चांगलें शिक्षण मिळालेलें आहे, हरतऱ्हेच्या काव्यनृत्यगायनादि कलांचे सात्त्विक विलास उपभोगण्याची संधि मिळत आहे; कोणी तत्त्वचिंतनांत गुंतलेले आहेत, कोणी विद्यार्थिविद्यार्थिनींना शिकविताहेत, कोणी शेतकी सुधारण्याचे प्रयत्न करीत आहेत, कोणी सुंदर चित्रें काढण्यांत गढून गेले आहेत, अशा प्रकारें जो तो आपाआपल्या कामांत रममाण झाला आहे; ज्याला जें काम वांट्याला

आलें असेल तें त्यानें करावयाचें, त्यांत उच्चनीय भाव मानावयाचा नाहीं, आणि मानावयाचा असला तर जो आपलें काम चुकवितो किंवा आळसून करतो किंवा कसें तरी करतों तो नीच ( मग त्याचें काम मॅनेजरचें असो किंवा गव्हर्नरचें असो ) व जो आपलें काम मनापासून, उत्साहानें, जसें करावयास पाहिजे तसें करतों, तो उच्च ( मग तें काम चांभाराचें असो किंवा भंग्याचें असो ); जातिभेद नाहीं, स्त्री-पुरुषभेद देखील अनुभविक पोक्त तज्ज्ञांनीं जेवढा व ज्या बाबतींत आवश्यक व इष्ट म्हणून ठरविला असेल, तेवढाच व त्याच बाबतींत; शरीर काय, बुद्धि काय, आत्मा काय, प्रत्येकाचा पूर्णपणें विकास पावतो आहे व प्रफुल्लित होतो;—अशा प्रकारचें ध्येय मनश्चक्षूं पुढें ठेवलें तर हें ध्येय रम्य नाहीं म्हणावयाचें ? व हें ध्येय यथामति, यथाशक्ति, यथाकाल व यथासंभव मूर्त स्वरूपांत आणण्याचा प्रयत्न केला तर अशा प्रकारची ध्येयपूजा मनाला शान्ति व प्रसन्नता आणणार नाहीं ?

*   *   *   *

वरील प्रकारचें ध्येय अशक्य कोटींतील आहे असें वाटण्याचा संभव आहे, पण तें तसें नाहीं. आपण अद्यापि हक्काची, खाजगी संपत्तीची, चढाओढीची, शक्तीची भाषा जाणतों; पण मनुष्याच्या खऱ्या आत्म्याची ही भाषा नाहीं. तो प्रेमाची भाषा बोलूं इच्छितो; त्याला कर्तव्यांतच आनंद आहे, '**वसुधैव कुटुंबकम्**' अशी त्याची खरी वृत्ति आहे; पण या अभागी देशांत ज्याप्रमाणें जन्मभाषा जाऊन अपरिचित भाषा आपल्या बोकांडी बसली आहे व तीच कांहींना स्वाभाविक वाटत आहे, त्याप्रमाणेंच विकृत समाजरचनेमुळें भलत्याच गोष्टींचीं मनुष्यावर दडपणें बसली आहेत व मनुष्य आपली जन्मभाषा विसरत चालला आहे. राष्ट्राराष्ट्रांतला संशय नुसता दूर झाला, तर एवढ्याशा गोष्टीनें कोट्यवधि रुपये वांचतील व लाखों लोक जे आज विनाशक कार्यांची व साधनांची पूर्वतयारी करण्यांत गुंतले आहेत, ते उत्पादक व उपयुक्त कार्ये करतांना दृष्टीस पडतील ! हें ध्येय किंवा असलीं ध्येयें शक्य कोटींतील नाहींत असें आज म्हणतां येणार नाहीं; समाजसत्तावादाचा व Communism च्या कांहीं तत्त्वांचा थोड्याबहुत फरकानें दिवसेंदिवस विजय कसा होत चालला आहे हें जो उघडया डोळ्यांनीं पाहील व मनुष्याच्या वृत्तींत भिन्न परिस्थितींत कसा क्रांतिकारक फरक होतो हें ज्याला ठाऊक आहे, तो तर असें म्हणणार नाहीं.

*   *   *

पण हें ध्येय बरोबर आहे का चूक आहे हा मुळीं मुख्य प्रश्नच नाहीं. या ध्येयाचें वर्णन उदाहरणादाखलच केलें होतें; पण तें आवश्यकतेपेक्षां थोडेंसें अधिक विस्तृत झालें एवढेंच. ध्येय तें असो, नाहीं तर दुसरें एखादें असो; मोठें व्यापक

असो कीं, लहानशा खेडेंगांवची किंवा संस्थेची, किंवा कुटुंबाची अथवा स्वतःची उन्नति करावयाची अशा प्रकारचें आकुंचित स्वरूपाचें असो, त्याच्यावर दृढश्रद्धा असली म्हणजे तो सश्रद्ध, तो आस्तिक, तो धार्मिक असें माझें मत आहे.

*                *                *

हें ध्येय प्रत्येक व्यक्तीचें भिन्न असेल हें उघड आहे, पण यांत बिघडलें कोठें ? हिंदुस्थानांत पूर्वी ३३ कोटि देव नांदले तशी आतांहि ३३ कोटी ध्येयें नांदतील? पूर्वीच्या देवांमध्यें लढे लागत असत असें पुराणान्तरी वाचतों, तसें या ध्येयामध्यें लागतील. पण हें लढे मला पत्करतील. ध्येययुद्धें, म्हणजे जेथें दोन्हीं पक्षांना प्रामाणिकपणें आपलें ध्येय न्यायाचें वाटतें अशीं ध्येययुद्धें मला प्रिय आहेत. कारण हीं फार दिवस टिकत नाहींत, व जोंपर्यंत चालतात तोंपर्यंत देखील त्यांत विषारी दूषक भाग नसतो.

*                *                *

एखाद्या मनुष्याचीं ध्येयें वयोमानानुसार किंवा अनुभवानुसार किंवा विचारानुसार बदलत जातात; तेव्हां त्याचे भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न देव मानावयाचे काय, असा कोणीं आक्षेप घेतल्यास ' होय ' असेंच सरळ उत्तर द्यावयाचें. आज तरी काय स्थिति आहे ? लहानपणीं स्नानसंध्या करणारा विष्णुभक्त किंवा शिवभक्त मोठेंपणीं कोठें विष्णूचीं पूजा करतो ! आणि स्नानसंध्या तरी कोठें करतो ?

*                *                *

आपलें ध्येय चुकीचें होतें, अशक्य कोटींतलें होतें, असें कळून आल्यावर आपला आपल्यालाच तिट्कारा येणार नाहीं काय ? नाहीं. ध्येय चुकीचें नसतें तर बरें झाले असतें असें कोणालाहि वाटणें साहजिक आहे; पण अगदीं ध्येयशून्य असण्यापेक्षां चुकीच्या ध्येयाच्या पाठीमागें लागलेंलें कांही वाईट नाहीं असेंच कोणीही म्हणेल. आपलें ध्येय आपल्या आटोक्यांतलें नव्हतें असें मागाहून कळून आलें तरीसुद्धां—

It is better to have loved and lost
Than never to have loved at all

या न्यायानें त्याचें देखील विशेष वैषम्य बाळगण्याचें कारण नाहीं.

*                *                *

अस्तु. विस्तार आणखी पुष्कळ करतां येतील; पण ज्या हेतूस्तव मुद्दाम अर्धवट सूत्रात्मक पद्धति स्वीकारली, त्याच हेतूस्तव आतां लेखणी आंवरणें इष्ट आहे.

**ॐ तत्सद्ध्येयार्पणमस्तु ।**

## श्यामसुंदर ( परीक्षण )

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची नुकतीच प्रसिद्ध झालेली "श्याम-सुंदर" नांवाची कादंबरी नांवाप्रमाणें सुंदर आहे व तिच्यांत 'श्यामत्व' ही आहे, असें पहिल्याप्रथम सांगण्यास हरकत नाहीं. कोल्हटकरांच्या कादंबऱ्यांतील पात्रांचीं नांवें बहुधा साभिप्राय असतात. उदाहरणार्थ, नायिका जी आहे तिचें लहानपणचें माहेरचें नांव चिमणी, ती राहाते चिमणपुरांत व तिच्या नवऱ्याचें नांव असतें चिमणराव. '**श्याम-सुंदर**' हा 'मराठा' म्हणून वावरतो; पण तो मराठा नसतो म्हणून त्यानें धारण केलेलें नांव 'नाना मराठे.' 'श्याम-सुंदर' हा वर्णानें 'श्याम' असतो, पण त्याच्या स्वभावांत सौंदर्य असतें म्हणून त्याचेंही नांव सार्थच आहे. कादंबरीचेंही तेंच नांव ठेवण्यामध्यें कोल्हटकरांचा हेतु कादंबरीच्या गुणदोषांचें त्या नांवामुळें दिग्दर्शन व्हावें असा नसेल, पण तसें घडलें आहे खचित! या कादंबरीच्या भाषेकडे पाहिलें, तिच्यांतील जागजागीं विखुरलेल्या विचाररत्नांकडे पाहिलें, तिच्यांतील तार्किक वादविवादाकडे किंवा रसपूर्ण प्रसंगांकडे पाहिलें, तर त्या त्या वेळीं 'सुंदर' 'सुंदर' असेच उद्गार असूयाविरहित वाचकांच्या मुखांतून बाहेर पडतील. पण कथानकाच्या रचने-विषयीं किंवा स्वभावचित्र-लेखनाविषयीं किंवा साहित्योचित संयमाविषयीं विचार करूं लागल्यावर सरळ बुद्धीच्या वाचकांची मान साहजिकपणेंच हलून व नाक मुरडून त्याचें असमाधान चेहऱ्यावर व्यक्त झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

श्याम-सुंदर हा बळवंतराव नांवाच्या एम्. ए., एल.एल. बी. इनामदा-राचा एकुलता एक मुलगा. त्याची आई सुंदराबाई वर्णानें व रूपानें जरी

चांगलीं नसली तरी तिचा स्वभाव फार प्रेमळ, सरळ व सुंदर होता. ती बुद्धीनें जडच होती. हल्लीं ज्याला आपण शिक्षण म्हणतों ते पुस्तकी शिक्षण तिला मुळींच नव्हतें; पण तिचें जात्याच कोमल, प्रेमळ, सरळ व श्रद्धाळू असलेल्या मनाचें सहज-सौंदर्य पुस्तकी-शिक्षणाच्या अभावामुळें लुप्त होणें शक्य नव्हतें. श्यामसुंदर वर्ण, रूप, बुद्धि, स्वभाव इत्यादिकांत सर्वतोपरी आईच्या वळणावर होता. बळवंतरावांना आपली पत्नी सुशिक्षित ( म्हणजे हल्लींच्या अर्थानें ' सुशिक्षित, ' म्हणजे ग्रंथशिक्षित ) असावी असें वाटे; पण ते मागच्या पिढींतले असल्यामुळें त्यांच्या नशिबीं तें सुख नव्हतें. मुलगा तरी सुशिक्षित होईल अशी त्यांना आशा होती; पण श्यामसुंदर आधींच घरचा श्रीमंत व लाडावलेला, आणि खरें म्हटलें तर जात्याच तो आईसारखा मंदबुद्धीचा आणि–टाकाऊ म्हटलें तरी देखील हरकत नाहीं. स्वारी कशी तरी प्रवेशपरीक्षेपर्यंत आली, पण घोकंपट्टी करून तीन वाऱ्या केल्या तरी परीक्षेचा पंढरी कांहीं प्रसन्न होईना. बळवंतरावांना त्याचा इतका राग आला व त्याच्याबद्दल इतका तिरस्कार वाटला कीं, ते त्या परीक्षेचा निकाल ऐकल्याबरोबर म्हणाले, " आजपासून तुझा माझा संबंध सुटला. आतां मीं तुला मेलों आहे आणि तूं मला मेला आहेस. यापुढें मी तुझें तोंड पाहणार नाहीं व तूं माझें पाहूं नकोस."

श्यामसुंदरच्या आईला हा प्रकार पाहून अतिशय वाईट वाटलें; पण करते काय ? रदबदली करण्याचा प्रयत्न तिनें केला असता, पण बिचारीला संधिच मिळाली नाहीं; कारण चिरंजीवांना वरील शिक्षा फर्मावून बळवंतराव लगेच बाहेर गेले, व ते परत येण्यापूर्वींच श्यामसुंदर कोठें निघून गेला तो गेलाच ! पत्ता कोठें लागेना. ' गरूड ' नांवाच्या सुप्रसिद्ध वर्तमानपत्रांत जाहिरात दिली पण व्यर्थ.

श्यामसुंदरचा ' दगडू ' नांवाचा एक मित्र होता. घरांतील मोलकरणीचा तो मुलगा. तो शाळेंत जात असे, व प्रवेशपरीक्षेंत या वर्षीं पासही झाला होता. त्याच्या झोंपडीवजा घरांत जाऊन श्याम रात्रीपर्यंत बसला, व रात्रौ त्याच्या घरांतील पंचा, कुडतें वगैरे पेहरून व वाकळ, घोंगडी वगैरे घेऊन मजुराच्या वेषानें स्टेशनवर गेला, आणि चिमणपूरचें तिकिट काढून तेथें पोंचल्यावर एका आगगाडींतच ओळख झालेल्या "मल्हारीबाबा " नांवाच्या म्हाताऱ्या कुळंब्याकडे राहिला. लवकरच चिमणपूर स्टेशनावर तो हमाली

करून स्वतःचें पोट भरूं लागला. थोड्या अवधींत हमालांत त्यानें चांगलें वजन बसविलें, पांढरपेशा मंडळीवरही त्यानें एक प्रकारची छाप पाडली व वर्षाच्या आंत तेथें शूद्रांच्या शिक्षणाकरितां रात्रींची शाळा काढून स्वच्छतेसंबंधानें सुद्धां त्यांच्यामध्यें तो सुधारणा घडवून आणूं लागला.

गोष्टच आहे ही, तेव्हां लिहायला कांहीं हरकत नाहीं कीं, दोन वर्षें होण्यापूर्वी चिमणपूर गांवांत जादूची कांडी फिरल्याप्रमाणें मोठीं क्रांति होऊन गेली. निरक्षरता नष्ट झाली. कुळंब्या–माळ्यांच्या मुली देखील वाचूं, लिहूं लागल्या-म्हातारे–कोतारे पाटी–पेन्सिली घेऊन रात्रीं शाळेंत बसूं लागले, दारुबाजी बहुतेक गेलींच, घरें-दारें स्वच्छ दिसूं लागलीं; फार काय, पोषाख, चर्या वगैरेमध्यें शूद्रांत इतकी सुधारणा झाली कीं, रस्त्यांतून ते ब्राह्मण नाहींत असें कोणाला म्हणतां आलें नसतें ! श्याम इतकें सगळें करूं शकला त्याचें कारण त्याचा गोड स्वभाव, त्याची खरी कळकळ, त्याची निरभिमानता व त्याचा स्वार्थत्याग ही तर गोष्ट खरीच; पण या यशाचा थोडा तरी अंश शारदाबाई देशपांडे या सुविनीत बाईकडे जातो. लहानपणीं जी चिमणपूरची चिमणी होती, ती आतां मोठी विवाहित व सुशिक्षित झाल्यामुळें शारदाबाई देशपांडे या बड्या नांवानें ओळखली जात होती, चिमणपूरची चिमणी ही हरिणपूरच्या हरिणाची ( म्हणजे बाल श्यामसुंदरची) दूरची नातलग होती. ती त्याच्याकडे अगदीं लहानपणीं गेलेली होती. 'चिमणीच्या दांतानें' फोडलेली सुपारी श्यामनें त्यावेळीं खाल्लीं होती. " चिमणपूर हें गांवाचें नांव, ' चिमणी 'च्या नांवावरूनच पडलें आहे कीं काय " अशी त्या बालबालिकांना शंका आली होती; व अशाच इतर बालोचित गोष्टींवरून बालोचित स्नेहभाव त्यांमध्यें उत्पन्न झाला होता. पुढें लवकरच ती मुलगी श्यामला सांगून आली होती, पण ती तेव्हां अशिक्षित असल्यामुळें शिक्षणाभिमानी बळवंतरावांकडून नाकारली गेली. कालांतरानें चिमणीचें चिमणराव देशपांडे, बी. ए., एल्एल्. बी, वकील, यांच्याशीं लग्न झालें व तिचें शिक्षण थोडेंबहुत होऊन ती या वेळीं चिमणपुरांत श्रीमंत व सुशिक्षित युवती म्हणून ओळखली जात होती. तिची श्यामच्या कार्याला फार सहानुभूति होती; व या सहानुभूतीमुळें तिनें आपल्या वडिलांकडून शाळेकरितां व मोफत लायब्ररीकरितां एक घर फुकट देवविलें होतें. तिनें श्याम हा मजूर हा खरोखर कोण आहे हें ओळखलें होतें; पण श्यामनें शपथ घातल्यामुळें तिनें तें गुह्य फोडलें नाहीं.

श्यामला इतकें यश आलें खरें; पण हैबती नांवाच्या एका दारुड्याला कांहीं कारणामुळें त्याचा राग येऊन तो त्याचें वैर साधूं लागला. पुराणाभिमानी कांहीं ब्राह्मणांनाही श्यामनें चालविलेला जातिभेदविध्वंस मान्य नव्हता. या पक्षानें उचल करून श्यामविरुद्ध गांवांत काहूर उठविलें व कांहीं आगंतुक कारणांची त्यांत भर पडून श्याम अप्रिय होऊं लागला व अखेर त्याला अंगीकृत कार्याच्या हिताकरितांच आपण स्थापिलेल्या संस्थेची चिटणीसी सोडून द्यावी लागली. तथापि, तो दुरून दुरून का होईना, त्या कार्याला शक्य तेवढी मदत करीत होताच. पण या मदतीकरितां त्याला आतां तेथें आपल्याला निरंतर डांबून घेणें जरूर नव्हतें. म्हणून तो आपल्या प्रिय मातेला व वडिलांना नकळत भेटावें व तिची काळजी कांहीं अंशांनीं तरी दूर करावी म्हणून हरिणपुराला जाण्यास निघाला. जातांना वाटेंत त्याचा वैरी जो हैबती, त्यानें त्याला काळोखांत गांठून सोटा लगावला. त्याबरोबर तो निश्चेष्ट पडला. हैबतीनें पुरता सूड उगविण्याकरितां त्याच्या तोंडावर एक जलाल अर्क ओतला व त्याचें तोंड भाजून काढून त्याचा चेहरा अधिकच कुरूप करून टाकला. अकल्पित झालेल्या अपघातामुळें व दुःखाच्या कहरामुळें श्यामचे केसही एकदम पांढरे झाले. त्याला श्याम म्हणून कोणीही ओळखणें शक्य नाहीं इतका त्याच्यांत आतां फरक झाल्यामुळें, त्याला चिमणपुरच्या ज्या एका अतिशूद्रानें मदत करून घरीं आणलें त्यालाच काय, त्या गांवच्या कोणालाही, तो ओळखूं आला नाहीं. अतिशूद्रांना त्याच्या चर्येवरून वगैरे तो कोणी महान् साधु वाटला व त्याच्या ते भजनीं लागले; इतके कीं, त्याच्याकरितां त्यांनीं आपला अमंगळपणा, आपलीं व्यसनें आपली जातिजातींतील भांडणें टाकलीं व गुण्यागोविंदानें राहून शिक्षण घेऊं लागले. कांहीं महिने झाले नाहींत तोंच या साधूची कीर्ति चिमणपुरांतल्या पांढरपेशांत पसरून त्यांच्यांतलेही कांहीं लोक त्याच्या दर्शनास येऊं लागले. जो दर्शनाला येईल त्यानें महारामांगाच्या हातच्या भाकरीचा तुकडा प्रसाद म्हणून खाल्ला पाहिजे असा साधूचा दंडक होता, व अशा रीतीनें अतिशूद्रांची अस्पृश्यता त्यानें चुटकीसरशी नष्ट करण्याचा घाट घातला, व त्यांत त्याला बरेंच यशही आलें. चिमणी-नव्हे, शारदाबाई देशपांडे याही आपल्या मातोश्रींना व वडिलांना घेऊन बुवांच्या दर्शनाला गेल्या होत्या, व सगळ्यांनीं प्रसाद ग्रहणही केलें होतें. श्यामच्या वैऱ्यानें तिचा व श्यामचा संबंध भलताच जोडून तिच्याविरुद्ध तिच्या पतिराजांचें मन कलुषित करण्याचा

प्रयत्न निनांवी पत्रांच्याद्वारें चालविलाच होता. या पतिराजांना जेव्हां आपल्या पत्नीला सासरी नेण्याकरितां चिमणपूरला यावें लागलें तेव्हां कर्मधर्मसंयोगानें अस्पृश्यांशीं उघडपणें सहभोजन करण्याचा बूट निघाला. चिमणराव देशपांडे हे राष्ट्रीय पक्षाचे होते, पण राजरोस अस्पृश्यांशीं सहभोजन करण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यांनीं असें सांगितलें कीं, जाहीर सभा भरवून जाहीर वादविवाद करूं या व यांत मी पराभूत झालों तर मी अस्पृश्यांसह भोजन करीन, नाहीं तर हा खुळा नाद लोकांनीं सोडून द्यावा.

झालें, सभा भरली, भाषणें झालीं व चिमणराव देशपांडे वादांत जिंकले गेले. " सगळे लोक बोलतात मात्र, कोणीही ब्राह्मण उघडपणें अस्पृश्यांशीं रोटीव्यवहार करणार नाहीं " असें ठासून सांगून, " मला एक तरी असा छातीठोक ब्राह्मण दाखवा, म्हणजे मी आपली चूक कबूल करतों " असें ते बोलून गेले होते. लगेच एक साधु म्हणजे नाना मराठे नांवाचा मजूर, म्हणजे श्याम-सुंदर, हरिणपूरचा ब्राह्मण मुलगा व चिमणपूरच्या चिमणीचा नातलग, पुढें आला. देशपांडे वकील साहेबांनीं हा गोसावडा कसला आला आहे ब्राह्मण, असें म्हटलें व बुवांची फजिती होण्याची पाळी आली. इतक्यांत स्त्रियांच्या सज्जांतून हा ब्राह्मणच आहे, तो माझा नातलग आहे, असे उद्गार शारदाबाई देशपांडे यांच्या म्हणजे आपल्या चिमणीच्या तोंडून बाहेर पडले. श्यामसुंदरसारख्या सज्जन व परोपकारी पुरुषाची फजिती नाहक व्हावी, हें तिला खपलें नाहीं पण, सत्यकथनानें आपण आपल्याला व पतीला मेल्यापेक्षां मेलें केलें आहे ही गोष्ट तेव्हां तिच्या ध्यानांत आली आणि श्यामचा आणि आपला संबंध कुट्याळ लोकांनीं कसा जोडला आहे, आपल्या पतीलाही आपल्याविषयीं कसा संशय आहे, इत्यादि गोष्टी जेव्हां तिच्या ध्यानांत आल्या तेव्हां आधींच चिंतेनें व गर्भारपणामुळें अशक्त झालेलें तिचें शरीर खालीं धाडकन् पडलें व ती जी आजारी पडली ती उठलीच नाहीं ! काळानें तिला या जगांतून ओढून नेलें हा कठोरपणा केला काय ? कोणाला ठाऊक ! भलते अपवाद उठल्यावर व नवराही भलभलते संशय घेऊं लागल्यावर अशारीतीनें सोडवणूक झाली तर स्त्रियांना कठोर भासणाऱ्या काळाचा हा उपकारच वाटेल. असो. इकडे समाजसुधारक साधुबुवा म्हणजे आपला आवडता श्यामसुंदर हाही आजारी पडून मरणोन्मुख झाला, व तोही चिमणीच्या पाठोपाठच स्वर्गाला गेला. स्वर्गवासी होण्यापूर्वी बिचाऱ्याला आईचे दर्शन झाले,

ही त्यांतल्या त्यांत सुदैवाची गोष्ट. आईनें त्याचे ते पांढरे केंस आणि डाग पडलेलें तोंड आणि कृश झालेलें शरीर जेव्हां पाहिलें, तेव्हां पहिल्या प्रथम तर तिला तो ओळखूं देखील आला नाहीं. पण क्षणार्धांतच ओळख पटून जेव्हां त्याची ती दशा तिच्या ध्यानांत आली, तेव्हां त्या माउलीला काय वाटलें असेल, हें आईचें हृदय जाणणारे जाणतील; वर्णन करून सांगणें शक्य नाहीं. बिचारीनें त्याला मरणसमयीं बरें वाटावें म्हणून अस्पृश्यांना स्पर्श केला इतकेंच नाहीं, तर जातिभेदाचीं सर्व बंधनें पुत्रवात्सल्यानें प्रेरित होऊन सोडून दिलीं व त्याची अखेरची इच्छा तृप्त केली ! आईचें प्रेम हें असें आहे; पण सृष्टिदेवतेला या प्रेमाचें काय कौतुक ? या देवतेनें तिच्या पुत्राला तिजपासून बळजबरीनें ओढून घेतलेंच व प्रेमाचें बक्षिस म्हणून तिला भ्रान्तचित्त करून सोडलें ! मुलगा प्रवेश-परीक्षेंत नापास झाला म्हणून त्याला घरांतून घालवून देणाऱ्या बळवंतरावांना मात्र या सर्व प्रकारामुळें डोळ्यांत चांगलेंच अंजन पडलें. पण सोन्यासारखा मुलगा दवडला व प्रेममूर्ति पत्नीला वेड लाविलें, हाच आपल्या पुस्तकी शिक्षणा-बद्दलच्या आग्रहाचा परिणाम, असा विचार मनांत येऊन त्यांना काय होत असेल, हें देखील अशाच प्रकारचे अनुभव ज्यांना असतील त्यांनाच समजेल, इतरां-करितां वर्णन करून सांगण्यांत अर्थ नाहीं. अस्तु.

कथानकाच्या या अशा प्रकारच्या स्थूल रूपरेषेमध्यें सूक्ष्मरेषा व हरतऱ्हेचे रंग भरण्याच्या फंदांत न पडतां गुणदोष-चर्चेच्या ओघानेंच हें कार्य जितकें साधेल तेवढें साधून घ्यावें असें मनांत आणून प्रथम दोषाविष्करणाकडे वळतों. पहिला मोठा दोष असा कीं, गोष्ट अखेर अखेर स्वप्नसृष्टीसारखी वाटूं लागते. श्यामसुंदरसारखा १८–२० वर्षांचा मुलगा तो काय आणि तो अवघ्या १–१॥ वर्षांच्या अवधींत चिमणपूरमधील शूद्रांची निरक्षरता आणि दारूबाजी घालवतो तो काय, सगळाच हा कल्पनेचा पोरखेळ वाटतो. तसेंच, तो एक-दीड वर्षांत अतिशूद्रांमधील अमंगळता, अक्षरशून्यता, कलहप्रवृत्ति वगैरे घालवितो आणि ब्राह्मणांना महारामांगांच्या हातच्या भाकरीचे तुकडे खायला लावतो, हा त्या कल्पनाबालिकेच्या खेळाचा पसारा आवरण्यापूर्वीचा घाईघाईचा चट्टामट्टा भासतो. बळवंतरावासारखा घरंदाज, प्रौढ, एम्. ए., एल्‌एल्. बी., झालेला इनामदार आपला मुलगा आपल्याकडून शिकस्त करीत असतां देखील नापास झालेला पाहून फार तर दुःखी-कष्टी होईल; पोटच्या पोराला तो घरांतून घालवून देईल

हें असंभवनीय नसलें तरी अस्वाभाविक खरेंच. श्यामसुंदर मजुरांत मजूर म्हणून एकवेळ गणला गेला असेल, पण चिमणपुरांत क्रांति घडवून आणण्याइतका जर तो लोकप्रिय झाला असेल तर त्याच गांवांत तो साधुबुवा म्हणून गणला जावा व त्याचें प्रस्थ माजावें आणि कोणींच त्याला ओळखूं नये हा देखील एखाद्या बालिकेचा आपल्या वृद्ध पित्याशीं लपंडाव चालावा आणि त्या पित्यानें तिला पाहिलें तरी न पाहिल्यासारखें दाखवावें, अशांतलाच प्रकार आहे, आणि कल्पना-बालिकेशीं आमचे ज्ञानवृद्ध ग्रंथकार असले खेळ खेळले तर तें मौजेचें आहे; पण त्यांत विचारान्तीं मनोरमत्व कांहीं वाटत नाहीं. श्यामसुंदर शेवटीं मरावयास टेंकला आहे, आतां मरतो का घटकेंत मरतो अशी स्थिति आली आहे, अशा वेळीं तो कदाचित् वायुच्या झटक्यांत सर्व जातींनीं सहभोजन आतां करावें असें म्हणेल, पण अशा शोकरसपूर्ण प्रसंगीं जेवणाच्या पंक्तीच्या पंक्ती उठतील आणि वाढण्याची आणि जेवण्याची गर्दी उडून राहील हें तर कल्पना-पिशाचिकेच्या स्मशान-नर्तनाप्रमाणें भासतें ! चिमणराव देशपांडे वकील मोठा धोरणी, आपमतलबी दाखविलेला आहे. त्याच्यासारखा शिकलेला व हुशार म्हणून गणलेला वकील अस्पृश्यांशीं जेवायचें का नाहीं हा प्रश्न सभेच्या निकालावर सोंपवील हें क्षणभर गृहीत धरलें तरी सभेंत गेल्यावर, "अस्पृश्यांशीं राजरोस जेवणारा एक तरी ब्राह्मण दाखवा म्हणजे मी आपला पराभव झाला असें मानीन" अशा आशयाचा कबुलीजबाब देईल, हें मानणें जिवावरचें येतें. तात्पर्य, असले हे प्रकार या ग्रंथांत जे इतर गुण आहेत त्यांत जर लपले नसते, तर श्याम-सुंदराच्या चेहऱ्यावर हैबतीनें जलाल अर्क ओतून त्याचें तोंड जसें विद्रुप केलें, तसें या दोषांनीं श्यामसुंदर या ग्रंथाचें केलें असतें.

मौज अशी आहे कीं, हे दोष जितके स्पष्ट व मोठे आहेत, तितके ते एका अर्थानें क्षुल्लक व उपेक्षणीय आहेत. माझ्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, कोल्हट-करांनीं जरा लक्ष दिलें असतें, तर त्यांना हे दोष क्षणार्धांत टाळतां आले असतें; उदाहरणार्थ, बळवंतरावांनीं मुलाला घालवून दिलें नाहीं तर रागारागानें ते कांहीं तरी बोलले व श्यामसुंदर "मी कांहीं तरी पराक्रम करून दाखवीन तेव्हांच वडिलांना तोंड दाखवीन" अशा प्रकारच्या उमेदीनें घरांतून निघून गेला असें दाखविलें असतें, तर बळवंतरावासंबंधींचा अस्वाभाविकता-दोष टळला असता. तसेंच, श्यामसुंदरनें तीन वर्षांत चिमणपूरच्या नरकाचा स्वर्ग करून दाखविला असें

न दाखवितां २० वर्षांत बरीच सुधारणा घडवून आणली असें दाखविलें असतें, तर तें कथानकाला शोभलें नसते असें नाहीं. चिमणरावाला कोल्हटकरांनीं पहिल्यापासूनच 'जेन ऑस्टिन'च्या कॉलिन्सप्रमाणें अर्धवट व वेडसर म्हणून रंगविण्याचें ठरविलें असतें, तर मग त्याचे सभेंतले वेडेचार शोभले असते. चिमणरावाला आधींपासूनच अर्धवटांत काढलें असतें तर आपल्या आवडत्या चिमणीला पहिल्यापासूनच मनाजोगता नवरा मिळाला नाहीं म्हणून वाईट वाटलें असतें; पण पुढें तिला त्या दीड शाहाण्या चिमणरावांनीं जें दुःख दिलें त्याचें तीव्रत्व तरी आधींच्या या तयारीनें कमी झालें असतें; पण चुकलों. नायिकेला जितकें अधिक दुःख तितकें ग्रंथकाराला अधिक सुख, हें मीं विसरलों ! नायक श्यामसुंदर याची प्राणांतिक अवस्था झाली असतां सहभोजनाचे सोहाळे भोगणारे सगळे लोक ग्रंथकार असते तर तें मीं साहजिक मानिलें असतें; पण चिमणपूरच्या साध्याभोळ्या लोकांना असली ही मेजवानी कोल्हटकरांनीं दिली नसती किंवा द्यावयाचीच होती तर ती श्यामसुंदरच्या आत्यंतिक स्थितींत न देतां किंचित् आधीं दिली असती, तर रस-हानि झाली असती अशांतला भाग नाहीं. या सगळ्या गोष्टी, कोल्हटकरांनीं क्षणभर लक्ष दिलें असतें तर, त्यांना सुधारून घेतां आल्या असत्या, किंबहुना त्यांच्या प्रतिभेनें याहून अधिक चांगल्या रीतीनें वरील दोष काढून टाकले असते. पण कादंबऱ्या हातावेगळ्या करण्याची लगीनघाई केल्यामुळें हे दोष राहून गेले, झालं !

कांहीं ठळक पात्रांचीं स्वभाव-चित्रें रेखाटण्यांत देखील अशीच लगीनघाई दिसते बळवंरावासारखा मनुष्य आपल्या पोटच्या पोराला त्याचा अपराध नसतां घालवून देतो याला पुरेसें कारण त्याच्या स्वभावांत किंवा परिस्थितींत जसें सांपडत नाहीं, त्याप्रमाणें मुलगा निघून गेल्यावर त्याचा ते शोध कां करीत नाहींत याचाही उलगडा त्यांच्या स्वभावावरून किंवा परिस्थितीवरून होत नाहीं. श्यामसुंदर इतका निःस्वार्थी व पराक्रमी असेल, असें त्याच्या पूर्व चारित्र्यावरून मुळींच वाटत नाहीं. ग्रंथकार तें सांगतात म्हणूनच तें खरें मानावें लागतें. चिमणीला व श्याम-सुंदरला लहानपणी चारपांच तासांहून अधिक काळ एकत्र ठेविलें असतें, तर ग्रंथकाराचें काय वेंचलें असतें कोणास ठाऊक ? पण त्याच्या या दुष्टपणामुळें त्या उभयतांचा सात्त्विक स्नेहसंबंध जितका खरा वाटावा तितका खरा वाटत नाहीं.

श्यामसुंदरला सोटा बसल्यामुळें आईला तो कांहीं दिवस भेटूं शकला नाहीं हें कोणीही खरें मानील, पण त्याच्यासारखा प्रेमळ मातृभक्त मनुष्य आई आपल्या काळजींत आहे, असें ठाऊक असतां तिला भेटण्यास कां जात नाहीं, याचा उलगडा ग्रंथकर्त्यानें न केल्यामुळें त्याच्या स्वभावाचें चित्र या ठिकाणीं अस्पष्ट उठलें आहे. साधुबुवा होऊन तो गांवगुंडांवर हेर ठेवितो व सर्व प्रकारची इत्थंभूत माहिती मिळवितो हें सर्व श्यामला भूषणावह आहे, पण हें कर्तृत्व त्याला अचानक कसें प्राप्त झालें तें न कळल्यामुळें त्याचें- अंगीं तें चिकट-विल्याप्रमाणें वाटतें. चिमणरावाची व आपली चिमणीच्या लग्नापासून ओळख असती तर त्याच्या स्वभावांत कसाकसा बदल झाला वगैरे गोष्टी आपणांस स्पष्ट-पणें कळल्या असत्या; पण चिमणी मोठी होऊन व्याख्यान देऊं लागली तरी त्याची तोंडओळख देखील आपणांस होत नाहीं! एकंदरींत चिमणीचा स्वभाव खुलून दिसण्याकरितां त्याचा अवतार झालेला दिसतो व चिमणीवर भलते आरोप येऊन त्यांमुळें तिच्यावर जें महत्संकट प्राप्त झालें आणि तिच्या गभीरपणामुळें तर तें प्राणान्तिक कसें झालें, इत्यादि गोष्टी सांगण्याचा जेव्हां ग्रंथकर्त्याला प्रसंग आला, तेव्हां कुठें हा चिमणराव लोकांच्या नजरेस आणला जातो. तोंपर्यंत तो आहे हें एवढें देखील ज्ञान चिमणी विवाहित आहे व विधवा नाहीं एवढ्यावरूनच वाचकांना होतें. सीतेवर लोकापवाद आल्यावर मग रामाची व आपली वाल्मीकीनें ओळख करून द्यावी अशांतलाच हा प्रकार झाला आहे!

या सर्व दोषांचे बाबतींत देखील हें ध्यानांत धरलें पाहिजे, कीं हे दोष कथानकाशीं इतके निगडित किंवा अंगभूत नाहींत कीं ते केव्हांही टाळतां आले नसते. एकच उदाहरण घेऊन हें स्पष्ट करून सांगतां येईल. चिमणरावांची व आपली शेवटीं शेवटीं ओळख करून न देतां त्यांच्या लग्नाच्याच वेळीं थोडीबहुत त्यांची व आपली जानपछान झाली असती, तर कथानकांत किंवा कशांतही कांहीं एक फरक करावा लागला नसता. आधींच्या प्रकरणांत दोन–चार पॅरॅग्राफ घातले असते तर हें काम झालें असतें. पण ग्रंथाकर्त्यांची घाई हें एक कारण व दुसरें कारण असें कीं, नाटकें लिहिण्याची आधीं संवय पडल्या-मुळें नाटकांतल्याप्रमाणें आधीं पुष्कळ गुंतागुंत करून मागाहून ही गुंतागुंत सोडविण्याची व सगळे धागे स्पष्ट करून दाखविण्याची त्यांना संवय लागली असावी. नाटकांत देखील हा थोडासा दोषच असतो, पण त्यांत अकल्पितपणा

साधून लोकांना आश्चर्यचकित करून सोडणें हा एक हेतु असल्यामुळें, व त्यांत थोडक्या अवधींत पुष्कळ गोष्ट उरकून घ्यावयाच्या असल्यामुळें, हा दोष खपून जातो. कादंबरींत असला प्रकार चालत नाहीं. अस्तु.

गुणांकडे आणखी कांहीं वेळ डोळेझांक करून तिसऱ्या एका दोषाचा म्हणजे वाङ्मयात्मक असंयमाचा व अनौचित्याचा थोडा विचार करूं या. कोल्हटकरांना चांगल्या कोट्या करतां येतात, रसभरित वर्णनें करतां येतात, उपरोधिक भाषणें साधतात, या गोष्टी नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं; किंबहुना या गोष्टी कोणताही वाचक इतक्या गृहीत धरून चालतो व त्या त्याच्या इतक्या प्रत्ययासही येतात कीं, त्यांच्याकडे आतां अतिपरिचयामुळें उपेक्षा तरी होते किंवा त्यांत चुकून कोठें दोष सांपडला तर त्याच्याकडे अधिक लक्ष वेधतें व आपलें लक्ष वेधल्यावर लोकांचें लक्ष वेधावेंसें वाटतें. कोट्यांचाच प्रश्न आधीं घेतला तर "चिमणीच्या दातां" ची कोटि याच पुस्तकांत दोनतीनदां आल्यामुळें ती पुढेंपुढें रसहानिकारक होते. श्यामसुंदरचें प्राणोत्क्रमण झाल्यावर त्याच्या आईला बिचारीला वाटतें कीं, याला झोंप लागली असेल; पण असल्या शोकजनक प्रसंगीं दगडू त्या माउलीला म्हणतो, "होय, झोंपच ही. नेहमींच्या झोंपेपेक्षां गाढ आहे इतकेंच !" कोटिबाजपणाचा अतिरेक येथें झाला आहे असें म्हटलें तर तें वावगें होईल काय ? चिमणराव खादी वापरावी म्हणून सभेंत उपदेश करतो आहे, पण स्वतः विलायती कपडे वापरतो. यासंबंधानें उपरोधिकपणें कोणीं टीका केली तर त्यांत गैर असें कांहीं नाहीं, पण "विलायती कपडे इतरांच्या हातीं लागूं नयेत व खादी महाग होऊं नये याच हेतूनें वक्त्यांनीं खादी घेतली नाहीं" हा कोल्हटकरांचा उपरोधगर्भ कोटिबाजपणा बिचाऱ्या साध्याभोळ्या चिमणपूरकरांवर जो ( पान २३९ मध्यें ) लादला गेला आहे, तो अस्वाभाविकच वाटतो. 'चांभाराच्या देवाला खेटराची पूजा' यावर पान १९० मध्यें चांभाराच्या तोंडीं जी कोटि घातलेली आहे ती देखील अशीच अस्वाभाविक आहे. ती कोल्हटकरांना शोभेल, पण चांभाराला शोभत नाहीं असें म्हटलें तर तें यथार्थ आहे. ( पण कोल्हटकरांनीं याचा विपरीत अर्थ करूं नये असें त्यांना 'एकीकडे' सांगणें अवश्य आहे. ) त्यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, कोल्हटकरांना चांगल्या कोट्या व कल्पना इतक्या सुचतात कीं, त्यांना त्या आवरणें कठीण जातें. कागदाचें महत्त्व हल्लींच्या युगांत किती आहे हें पान ६४।६५ मध्यें

जें वर्णन केलें आहे तें 'वर्णन' या दृष्टीनें अत्यंत सुंदर आहे, पण कादंबरीशीं त्याचा संबंध काय? फूल चांगलें असलें म्हणून तें केव्हांही कोठेंही धारण करून कसें चालेल? ते फूल अशा वेळीं अश्रु ढाळील अशांतला भाग नाहीं, किंवा त्याचा सुवास जो यावयाचा तो येणार नाहीं असेंही नाहीं; पण '**भवति योजयितुर्वचनीयता**' असें जें कवीनें म्हणून ठेविलें आहे, त्याची आठवण होणें साहजिकच आहे.

या कादंबरींत खरें संभाषण असें फारसें नाहींच म्हटलें तरी चालेल, हें एक मोठें व्यंगच आहे. कोल्हटकरांना कोटिबाजपणा साधतो, तार्किक युक्तिवादांतील पेंचपकडी व खांचाखोंचा ते चांगल्या जाणतात, पण कादंबऱ्यांत जशा प्रकारचें संभाषण पाहिजे, तसें त्यांना या कादंबरींत फारसें साधलें नाहीं. पहिल्या पहिल्या प्रथम तर ५०–६० पानें संभाषण फारसें दिलेलेंच नाहीं; आणि शेवटीं शेवटीं त्याचा अतिरेक केलेला आहे! या द्वितीयार्धांतलीं संभाषणें म्हणजे तार्किक वादविवाद होत. कादंबरीला उचित असे ते संवादच नव्हेत. याला एक लहानसा प्रत्यन्तर पुरावा म्हणजे कांहीं ठिकाणीं युक्तिवाद लढविणारा मनुष्य कोणी तरी एक असला म्हणजे कोल्हटकरांना चालतो, तो भावभावनांनीं व विचारविकारांनीं युक्त असलेला नामरूपविशिष्ट मनुष्य त्यांना लागत नाहीं. कादंबरींत ज्या ज्या एका व्यक्तीकडे बरीच कामगिरी आहे ती 'मराठा पाहुणा' म्हणून शेवटपर्यन्त बोलते चालते! त्या व्यक्तीला नामरूपादि संस्करण करण्याची कोल्हटकरांना जरूरच भासली नाहीं याचें कारण त्यांच्या डोळ्यांपुढें एखादी मोठ्या हुद्द्यावरची खरीखुरी व्यक्ति नाचत होती व तिचें त्यांना नांव घ्यावेंसें किंवा सुचवावेंसें वाटलें नाहीं, असें असेल कदाचित्, पण कादंबरीच्या दृष्टीनें कांहीं म्हटलें तरी हा दोषच आहे. चिमणराव व त्यांची पत्नी यांच्यामधलीं संभाषणें मात्र खरीं संभाषणें होत. कारण त्यांयोगेंकरून त्या त्या व्यक्तीच्या स्वभावाची अभिव्यक्ति होते किंवा कथानकाचा परिपोष होतो. चटकदारपणाही त्यांत आहे. "श्यामसुंदर आणि तुम्ही यांमध्यें लोकांना न सांगण्यासारखें रहस्यही आहे म्हणायचें" असें जेथें तो आपल्या पत्नीला कुत्सितपणानें म्हणतो किंवा "लहान मुलांच्या प्रमाणें बायकांचा देखील श्यामसुंदर फार आवडता दिसतो" अशा आशयाचें उपरोधिक वाक्य दुष्टपणें तो आपल्या बायकोला जेथें बोलतो, तेथें पत्नीविषयीं संशय आलेल्या पतीचें व सात्त्विक पत्नीचें जसें संभाषण व्हावें तसेंच दाखविलें आहे. त्यांत

उभयतांचे स्वभावविशेष चांगलें दृग्गोचर होऊन कथानकाची प्रगति होते. अशी कांहीं थोडीं संभाषणें सोडलीं तर इतरत्र कादंबरीला उचित असलेलीं संभाषणें विशेष न सांपडतां तर्कप्रधान ऊहापोह व उत्तर-प्रत्युत्तरें हींच आपणांस फार दिसतील, एकदोन ठिकाणीं रसाविर्भावाकरितां दिलेलीं संभाषणेंही कृत्रिम दिसतात. उदाहरणार्थ, श्यामसुंदरचा मित्र दगडू हा जेथें म्हणतो कीं, " श्यामसुंदर नापास होतो आणि मी पास होतों. तेव्हां आजपासून मी परीक्षेलाच बसायचा नाहीं. "—तेथें रसाविर्भावाकरितां केलेला कोल्हटकरांचा प्रयत्न मुळींच लपूं शकत नाहीं. तात्पर्य, इतर दृष्टींनीं कितीही उपयुक्त व सुंदर असे संवाद व ऊहापोह या कादंबरींत असले तरी कादंबरी या दृष्टींनें उचित व रसपरिपोषक असे संवाद थोडेच आहेत असें म्हणणें प्राप्त आहे.

दोषच आधीं पहावयाचे असें आपण ठरविल्यामुळें एक दोन व्याकरणविषयक क्षुल्लक गोष्टी येथेंच पाहूंया.

" सुंदराबाई तापानें भाजणाऱ्या अंगानें बिछान्यावर निपचित पडून राहिली " या वाक्यांतील भाजलेल्या " अंगानें पडली होती " असा प्रयोग रूढ होईल तर मला इष्ट आहे, पण तृतीयेचा इत्थंभूत लक्षणार्थी अशा प्रकारचा उपयोग फारसा रूढ नाहीं. अनवधानामुळें असली गोष्ट होते हें कोणीही सांगेल.

इतर किरकोळ दोषांचा टीकेंत उल्लेख करून आतां गुणाकडे वळूंया. *

---

* ( १ ) श्यामसुंदर मजूर या नात्यानें वावरत असतां चिमणीला मोत्यांचीं कुडीं ओवाळणी म्हणून त्यानें घालणें उचित नव्हतें व तिनें तीं स्वीकारणेंही उचित नव्हतें. स्वीकारावयाचीं तर पतीला ती गोष्ट आपण होऊन कळविणें इष्ट होतें. ( २ ) दगडू श्यामाच्या अगोदर शाळेंत जाऊं लागला होता. ( पा. १६ ), तो हुशार होता, अभ्यासी होता, अर्थात् श्यामच्या आधीं २ वर्षें तो पास झाला पाहिजे होता. तो मागें कां रेंगाळला हें स्पष्ट केलेलें नाहीं. ( ३ ) ब्राह्मण आणि मराठे यांचें सहभोजन वगैरे ज्या बायकांना चालतें त्यांना अंत्यजसहभोजन चालणार नाहीं असें वाटत नाहीं. ज्यांना अस्पृश्यता पाहिजे असते ते जातिभेद मानणारे असतात, त्यांना ब्राह्मण-अब्राह्मण-सहभोजनही अमान्य असतें.

माशी ज्याप्रमाणें दूषित रक्ताचे जागीं जाऊन बसते, त्याप्रमाणें शाळेंतील व कॉलेजांतील अध्यापकांचें लक्ष पुस्तकांतल्या चुकांवर नेमकें जाऊन बसतें. तथापि, त्यांना पुस्तकांतले गुण दिसत नाहींत असें थोडेंच आहे? कोल्हटकरांच्या सारख्या पुस्तकांतले जे दोष वर दाखविले ते गुणांपेक्षां संख्येनें किंवा महत्त्वानें अधिक आहेत म्हणून नव्हे, तर टीकाकारानें जें दिसेल तें यथार्थत्वानें सांगावें एवढ्याच हेतूनें. आतां गुणवर्णन जें करावयाचें तें देखील यथार्थ वाटतें म्हणूनच. कोल्हटकरांची प्रज्ञा आतां परिणत झाली आहे. त्यांना आतां आत्मविश्वास उत्पन्न झाला आहे, व त्यांचें ध्येय तर नेहमींच उच्च असतें, त्यामुळें त्यांची या पुस्तकांतली भाषा काय, विचारसरणी काय, युक्तिवाद काय, कथानक काय, सगळेंच उच्च कोटींतलें आहे. शृंगाररसाशिवाय व युवयुवतींच्या विवाहेच्छेशिवाय चांगली कादंबरी होणारच नाहीं असें जर कोणास वाटत असेल, तर त्यानें ही कादंबरी वाचावी. ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादासंबंधानें समतोलपणाचा ऊहापोह या पुस्तकाहून इतरत्र सांपडणें कठीण. तरुण पिढीपुढें चांगलें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून देशसेवेचा एक सर्वसाध्य व सुपरिणामी मार्ग कोल्हटकारांनीं या पुस्तकांत दाखवून दिला आहे. व्याख्यानांनीं व प्रत्यक्ष उपदेशानें जें कार्य होऊं शकत नाहीं, तें कार्य कादंबरी घडवून आणूं शकते आणि सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनें प्रस्तुत कादंबरीचें महत्व फार आहे, असें कोणीही कबूल करील. श्यामसुंदर व त्याची आहे सुंदराबाई यांची स्वभावचित्रें फारच रमणीय आहेत. श्याम हा बुद्धीमध्यें मंद असला तरी सोबत्यांशीं वागण्यांत फार सरळ व उदार असे. त्यानें चहाड्या कधीं केल्या नाहींत. व एखादें वेळेस मास्तरांकडून एखाद्या खोडीबद्दल मार खाण्याची पाळी आली तर तो स्वतः मार खात असे, लोकांना आपल्याबरोबर गुंतवित नसे; किंबहुना लोकांचे गुन्हे आपल्यावर ओढून घेऊन त्यांना वांचवीत असे. दगडू हा त्याचा वास्तविक नोकर, पण त्याच्याजवळ तो आपलें दप्तर देत नसे. कारण तो त्याचा शाळेंतला सोबती बनला होता, आणि सोबती एकदां म्हटला म्हणजे श्याम त्याला आपल्या कलिजाप्रमाणें

---

( १७२ ) पान पहा. ( ४ ) १८६ पानांत श्यामचें गांठोडें जें गेलें तें साहजिक रीत्या नसून ग्रंथकारांनींच तें मुद्दाम लांबविलें असें वाटतें! ( ५ ) श्याम चिमणपूरलाच कां जातो हें स्पष्ट झालेलें नाहीं. ( ६ ) "सारा समाज एका व्यक्तीप्रमाणें स्मशानांत गोळा झाला होता." यांतील 'एका व्यक्तीप्रमाणें' हें 'as one man' याचें न पचविलेलें असें रूपान्तर आहे.

वागावयाचा. त्याची आई त्याच्यासारखीच प्रेमळ पण अज्ञानामुळें श्याम व दगडू यांची मैत्री तिच्या ध्यानांत येत नसे व ती दगडूला मुलाचें दप्तर घ्यायला लावी. बिचारीचे असले कितीही दोष असले तरी तिच्या अपत्य प्रेमाचा निरंतर वाहणारा अखंड, शुद्ध, सात्त्विक झरा या सगळ्या दोषांना देखील गंगेप्रमाणें पुनीत करून घेण्यास समर्थ आहे. खरोखरच सुंदराबाईसारख्या मातेच्या अपार प्रेमास उपमाच नाहीं. आपल्या अपत्याकरितां या साध्वी काय करणार नाहींत ? सुंदराबाईसारखी जुन्या वळणाची बाई आपल्या मुलाकरितां आपल्या धार्मिक समजुती देखील सोडण्यास तयार होईल असें जें कोल्हटकरांनीं दाखविलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. पत्नीचें प्रेमही चांगलें असतें, पण किती केलें तरी बहुधा तें शबल असतें. चिमणीचेंच प्रेम पहा ना ? ती काय वाईट होती ? चिमणरावासारख्या संशयी, धरसोड करणाऱ्या, तत्त्वनिष्ठा नसलेल्या माणसाबरोबर जन्माची गांठ पडल्यामुळें पत्नीधर्माला स्मरून यथायोग्य रीतीनेंच वागली; पण असल्या पतीविषयीं उच्चतम प्रेम किंवा उच्चतम स्वार्थत्याग तिला देखील अशक्य होता. आई मात्र वेड्याविद्र्या वाईट मुलाकरितां देखील पाहिजे तो त्याग करूं शकेल. पत्नीप्रेम हें मातृप्रेमापेक्षां कमी दर्जाचें नेहमींच असतें असें मात्र मी म्हणत नाहीं,—असें म्हणणें अन्यायाचें होईल. पण सामान्यत्वानें वरील विधान खरें आहे. हें विषयान्तर सोडून प्रस्तुताकडे वळूंया. सुंदराबाईच्या अपत्यप्रेमाचे कोल्हटकरांचें वर्णन फारच सरस आहे. लहानपणीं ती त्याचें कसें कौतुक करी, मोठेपणीं तो निघून गेल्यावर त्याची ती काळजी कशी करी, कालांतरानें तो असन्नामरण स्थितींत भेटला असतां त्याला बरें वाटावें म्हणून ती तो सांगेल तें तें कसें करूं लागली, इत्यादि वर्णन तो तो रस उत्पन्न करण्यास समर्थ व चमत्कारपूर्ण आहेत. मासल्याकरितां लहानपणाचें त्याचे वर्णन घेऊंया. " श्यामच्या पुढें तिला लाक्षणिक किंवा वास्तविक अर्थाच्या कोणत्याही देवाची मातब्बरी वाटेनाशीं झाली. तिच्या हृदयांतील पतीच्या मूर्तीची व देव्हाऱ्यांतील देवतांच्या मूर्तींची तिजकडून वेळेवर पूजा होईनाशीं झाली. मुलाच्या पाजण्या-भरविण्यामुळें बळवंतरावांच्या खाण्यापिण्याची तिजकडून हेळसांड होऊं लागली; व मुलाच्या न्हाण्यामुळें देवांचे पंचामृत-स्नानादि उपचार मागें पडूं लागले. रांगणाऱ्या मुलापुढें लंगडा बाळकृष्ण तिला तुच्छ वाटूं लागला. ती देवपूजेंत असतां मुलगा अंगड्याटोपड्यानिशीं रांगत येऊन तिला शिवला तर ती देवाचा

बोज राखण्याकरितां बाह्यात्कारी त्याला डोळ्यांनीं दटावण्याचा बहाणा करी; पण मनांतून त्याच्या चेष्टेचे कौतुक करीत त्याला मांडीवर घेऊन पाजूं लागे...... शंकराची पूजा चालली असतांना तो बेल व फुलें चारी दिशांस उधळून शिवानें आपल्या श्वशुराच्या यज्ञाचा जसा विध्वंस केला होता, तसा त्याच्या पूजेचा करी. एका हातानें शिवाची संभावना चालली असतां तो दुसऱ्या हातानें विष्णुपूजेचे तुलसीदलादि साहित्य उडवून विष्णुचीही शोभा करी. मारुतीला तर तों आईची नजर चुकवून त्याच्या शेपटासुद्धां गुंडाळून एका बाजूला फेंकींत असे. कृष्ण गवळणींचें दहींदूध चोरून पळवीत असे म्हणतात; पण आमचा धीट श्याम बाळकृष्णाच्याच वाट्यांचे दहीदूध त्याच्या पश्चात् न लांबवितां त्याच्यासमोर पळवी. हें सारें अनन्वित प्रकार सुंदराबाई उघड्या डोळ्यांनीं पाही; इतकेंच नाहीं तर त्यांचें कौतुकही करी." (पान १२–१३)

कोल्हटकरांच्या प्रत्येक कृतींत कांहीं तरी नवीनपणा हा असावयाचा; अर्थात् या कादंबरींतल्या भाषेंत, उपमांत, कथानकांत, मधून मधून नावीन्य चमकतेंच. एखाद्या कादंबरींत संभाषणें नसलीं व लांबच लांब स्वभाव वर्णनें असलीं म्हणजे किती कंटाळा येतो हें कादंबऱ्यांच्या वाचकांना ठाऊक आहे. पण कोल्हटकरांची रसवन्ती अशी सामर्थ्यवान आहे कीं, पहिलीं ५०–६० पानें केवळ वर्णनांनीं जरी भरलेली आहेत, तरी तीं अत्यन्त चित्ताकर्षक झालेलीं आहेत. त्यांतल्या त्यांत श्यामच्या बाल्यासंबंधीं वर्णनें फारच बाहाराचीं आहेत. स्वकपोलकल्पित सुंदर उपमांचे नमुनें म्हणून कांहीं इकडचीं तिकडचीं वाक्यें येथें देण्यास हरकत नाहीं.

"पूर्वपरिचित करुणपर्यवसायि नाटक पाहतांना प्रेक्षकांस त्याचा शेवट अजूनही चांगला होईल, अशी ज्याप्रमाणें शेवटपर्यंत अंधुक आशा वाटत असते, तशी तिलाही वाटत होती." (पा. ७१)

"साडीनें वेष्टिलेलें तिचें चिमुकलें शरीर पानांनीं वेष्टिलेल्या कळीप्रमाणें सुंदर दिसत होतें. (पा. ७९)

"स्वर्गातून अवतरलेल्या निर्मल भागीरथीस पृथ्वीच्या संसर्गानें ज्याप्रमाणें पार्थिव व कलुषित स्वरूप प्राप्त झालें, त्याप्रमाणें महात्मा गांधींचे उदात्त व शुद्ध संकल्प सामान्य जनांच्या आचरणांत उतरतांच त्यांस ग्राम्य व शबल स्वरूप प्राप्त झालें" (पा. १५५)

विरोध हें शस्त्र कोल्हटकरांना फारच उपयोगी पडतें, व ते तें वापर-

तातही उत्तम रीतीनें. गडकऱ्यांबद्दल त्यांना आदर वाटत होता, पण गडकऱ्यांची अनुप्रासप्रियता हीं बाह्य चिन्हेंच तेवढीं घेऊन व त्यांचें निशाण फडकावून ऐटीनें वावरणाऱ्या फांकड्या कवींबद्दल त्यांना फारसा आदर वाटत नाहीं असें दिसतें. गडकऱ्यांच्या अनुप्रासप्रिय, अर्धवट व अंध अनुयायांना आपल्या आवडत्या आचार्यांचे आचार्य जे कोल्हाटकर त्यांचेकडून पा. नं. १९५, २३७, २३८ मध्यें आलेलें शालजोडींतलें बक्षीस पाहून काय वाटेल कोणाला ठाऊक ! ‘ राष्ट्रीय ’ पक्षांतल्या कांहीं लोकांची जी संभावना केली आहे तीही मोठी मार्मिक ( व मर्मभेदकही ! ) आहे.

“ सरकारी शाळांत मुलें न पाठविण्याचा निश्चय निपुत्रिकांकडूनच काय तो पूर्णपणें पार पडला. न्यायमंदिरांवरील बहिष्कार रिणकोंनीं जितका तडीस नेला, तितका धनकोंनीं नेला नाहीं............गुन्हेगार वर्गाकडून फौजदारी न्यामंदिरांवरील बहिष्कार नीटपणें पार पडला नाहीं, पण त्यांत त्या बिचाऱ्यांचा कांहींच अपराध नव्हता ! ” चिमणरावांच्या मिषानेंही राष्ट्रीयपक्षावर कोल्हट-करांनीं जे प्रहार केले आहेत ते अगदींच अन्याय्य नाहींत म्हणून ते वाचकांना सुखकर होतात. पुस्तकी विद्येला फाजील महत्त्व देण्याची आपल्या समाजाची जी प्रवृत्ति आहे तिलाही बळवंतरावांच्या मिषानें कोल्हटकरांनीं चांगलेंच शासन केलें आहे. अशा किती तरी चांगल्या गोष्टी सांगतां येतील; पण प्राजक्तीच्या झाडाखालीं फुलांचा जो दाट सडा पडलेला असतो त्यांतून किंवा मोठ्या फुलबागेंतून फुलें वेंचणारानें वेंचावयाचीं तरी किती आणि कशीं ? मंगळागौर करावयाची असली तर सगळीं फुलें लहान मुली वेंचतात, पण आपला तशांतला कांहीं सध्या हेतु नसल्यामुळें कांहीं फुलांचे नमुने पाहून तेवढ्यावरच संतोष मानणें प्राप्त आहे. ज्या वाचकांना अधिक फुलें पाहिजे असतील, त्यांना आतां बागेचें दार, तेथल्या कांहीं वाटा आणि कांहीं प्रेक्षणीय स्थळें दाखविलीं आहेत, याहून अधिक कार्य या परीक्षणाचें द्वारें साधण्याचा इरादा नाहीं एवढेंच सांगून हें परीक्षण संपवितों.

# गीतेंत कार्याकार्यनिर्णयाची कसोटी आहे काय ?

अध्यक्ष महाराज व बंधुभगिनींनो;

आजचे अध्यक्ष साहित्याचार्य नरसिंह चिंतामण केळकर यांनीं बडोदें येथील आपल्या सुप्रसिद्ध अध्यक्षीय भाषणांत ललित वाङ्मयापासून होणाऱ्या आनंदाची मीमांसा करतांना असें सांगितलें कीं, काव्यादिकांत वर्णिलेल्या राम-सीतादि पात्रांशीं वाचक ' सविकल्प समाधि ' किंवा तादात्म्य पावतो व म्हणून त्याला आनंद होतो. या उपपत्तींतील गुणदोषांचीं मी चर्चा करीत नाहीं; पण प्रस्तुत व्याख्यानास आरंभ करतांना एवढेंच सांगतों कीं, त्यांत दिग्दर्शित केल्याप्रमाणें मी गीता वाचीत असतां अर्जुनाशीं कांहीं वेळ थोडेंबहुत तादात्म्य पावलों व कृष्णानें अर्जुनाला जो उपदेश केला तो मला पटला; आणि मीहि अर्जुनाप्रमाणें " स्थितोऽस्मि गतसंदेहः " असें मनाशीं म्हटलें; परंतु विचारान्तीं असें वाटूं लागलें कीं, आपण जर खरोखरच अर्जुनाच्या ठिकाणीं असतों, तर कृष्णाला आणखी कांहीं प्रश्न विचारले असते. कारण, त्यानें दिलेलीं उत्तरें पूर्णपणें समाधानकारक नाहींत. स्वतःचें अर्जुनाशीं तादात्म्य कल्पिण्यामध्यें जो दोष आहे, त्याबद्दल श्रोते उदारबुद्धीनें क्षमा करतील अशी आशा करून, विवेचनाच्या सोयीसाठीं मी कृष्णाशीं पुनः चर्चा करीत आहें असें कल्पितों; व कृष्णानें गीतेंत दिलेलीं उत्तरें कार्याकार्य ठरविण्यास कशीं अपुरीं आहेत तें दिग्दर्शित करितों.

माझें मन पुनः संशयाकुल झालें आहे व मी पुनः " अहो बत महत्पापं कर्तुं

व्यवसिता वयम्।" इत्यादि वचनांचा पुनरुच्चार करून "न योत्स्ये" (मी युद्ध करूं इच्छित नाहीं) असें आग्रहपूर्वक म्हणत आहे आणि गाण्डीव धनुष्य खालीं ठेवून देत आहे, असा देखावा पाहून कृष्ण थोडेंसें स्मित करील व मला म्हणेल कीं, "अर्जुना, तुला वादाची फार हौस दिसत आहे आणि तूं पुनः 'प्रज्ञावाद' करूं पाहत आहेस, हें युक्त नव्हें." मी म्हणेन, "कृष्णा, वाद मी ज्ञानाकरितां करीत आहें; आणि ज्ञात्यांना प्रश्न विचारणें हा ज्ञानप्राप्तीचा एक मार्ग आहे, हें तूंच सांगितलें आहेस. 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।' इत्यादि श्लोकांत 'परिप्रश्ना'ची महती तूंच गाइली आहेस; आणि 'वादा'बद्दल म्हणशील तर त्यांत वाईट काय आहे? 'वादः प्रवदतामहम्।' असें सांगून वादाचें ईश्वरी स्वरूप तूंच स्वमुखानें वर्णन केलें आहेस. आतां हा वाद खऱ्या जिज्ञासेनें प्रेरित आहे का नाहीं हें तूंच ठरव आणि जिज्ञासाप्रेरित नसेल तर मग दोष दे. तुझ्या विश्वरूपदर्शनानें मी गांगरून गेलों आणि 'करिष्ये वचनं तव।' असें म्हटलें. पण खरें बोलावयाचें (आणि थोडासा परिहास करावयाचा) म्हणजे मला असें म्हटलें पाहिजे कीं, विश्वरूप दाखवून तूं मला घाबरवलेस आणि तुझें म्हणणें कबूल करावयाला लावलेंस. युक्तिवादाचा आश्रय न करतां 'दंडन्याया'-चा (म्हणजे प्राकृतांतील सोटे-शास्त्राचा) किंवा लॅटिनमधील argumentum advaculumचा उपयोग करून मला तूं आपलें म्हणणें कबूल करावयाला लावलेंस. वादशास्त्रांत हें अधर्म्य मानिलें आहे. पण परिहास सोडून देऊन खऱ्या जिज्ञासेनें मी असें विचारतों कीं, भीष्म-द्रोणादिकांना मारून राज्य मिळवावें का पूजनीय गुरुजनांची हिंसा करण्याचें पाप कधींहि न करण्याचा निश्चय करावा, यांतील पहिलाच पक्ष मीं स्वीकारावा हें तूं वारंवार सांगत आहेस खरा; पण पहिलाच पक्ष बलवत्तर आहे हें तूं तर्कदृष्ट्या सिद्ध केलें आहेस, असें विचारान्तीं वाटत नाहीं. कारण, जे जे युक्तिवाद स्वपक्षसिद्ध्यर्थ तूं आणिले आहेस, ते ते माझ्या पक्षालाहि अनुकूल आहेत असें मी दाखवूं शकेन आणि तसें दाखविण्याचा आतां प्रयत्न करतोंच."

"दोन कर्तव्यामध्यें लढा उत्पन्न झाला असतां काय करावें व त्यामध्यें अमुक अधिक श्रेयस्कर हें ठरविण्याची कसोटी काय, असा माझा प्रश्न आहे. 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते' हें तुझें एक उत्तर आहे, ते प्रश्नाची टाळाटाळी करणारें आहे. कारण, शास्त्र हें दोन्ही कर्तव्यांना अनुकूल असतें, किंबहुना शास्त्रानेंच दोनहि कर्तव्यें विहित व अवश्यकरणीय म्हणून सांगितलेली असतात; आणि अशा दोन

विहित व अवश्यकरणीय कर्तव्यांमध्यें लढा उत्पन्न झाला असतां अमुक एक कर्तव्य श्रेष्ठ हें ठरवावयाचें कसें याला शास्त्रांत–गीतेंत तरी–उत्तर नाहीं. क्षत्रियानें युद्ध करावें हें जसें त्याचें कर्तव्य, तसेंच 'आचार्यदेवो भव। मातृदेवो भव। पितृदेवो भव।' इत्यादि शास्त्रवचनानुसार भीष्मादिकांशीं युद्ध न करणें हेंदेखील शास्त्रविहितच कर्म आहे. शास्त्रांत दोनहि प्रकारचीं कर्तव्यें विहित असल्यामुळेंच लढा उत्पन्न झाला; आणि म्हणून तर पेंच पडला. अशा स्थितींत 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते।' हें म्हणणें म्हणजे प्रश्न समजलाच नाहीं, किंवा त्याची टाळाटाळी चालली आहे, असेंच म्हाणावयास नको काय? दुसरें असें कीं शास्त्र किंवा आप्तवाक्य हें प्रमाण मानावयाचें म्हटलें तरी शास्त्राशास्त्रामध्यें विरोध आल्यावर काय प्रमाण मानावयाचें? कपिल मुनि एक सांगतात व कण्वादि मुनि दुसरेंच सांगतात, अशा स्थितींत काय करावयाचें? 'कपिलो यदि सर्वज्ञः कणादो नेति का प्रमा?"

कृष्ण उत्तर देईल कीं, "शास्त्रप्रामाण्य बाजूला ठेविलें तरीहि दुसरींही प्रमाणें मी सांगितलेलीं आहेत, त्यांकडे तूं कां दुर्लक्ष करतोस? उदाहरणार्थ, 'सहजं कुरु कर्म त्वम्।' असें मी तुला सांगितलें आहे, त्यांत 'सहजत्व' ही एक 'स्वधर्म' (किंवा आधुनिक भाषेंत स्वकर्तव्य) ठरविण्याची कसोटी मीं सांगितली आहे. 'स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्।' यांतहि हीच कसोटी सुचविलेली आहे. तूं क्षत्रिय आहेस, अर्थात् न्यायतः तुझें जें राज्य आहे तें मिळविण्याकरितां धर्मयुद्ध करणें हें तुझें 'सहज' किंवा 'स्वभाव-नियत' कर्म आहे. तें तूं केलेंच पाहिजेस."

पण आधुनिक अर्जुन यावर उत्तर देईल कीं, "आचार्य व वडील माणसें पूजनीय मानणें हें देखील 'सहज' व 'स्वभावनियत' कर्म आहे. तें न करणें हें कृष्णाच्या कसोटीप्रमाणेंच पाप होय. भीष्मद्रोणादिकांना पूज्य समजणें हें माझ्यासारख्यांना 'सहज'च आहे. माझ्यासारख्यांचा 'स्वभाव' च असा आहे कीं, त्यांना मारण्यापेक्षां मरण बरें असें मला वाटतें. आधुनिक मानसशास्त्राप्रमाणें पाहिले असतां पूज्यभाव (Reverence) ही एक सहजप्रेरणा आहे. मॅक्डूगलनें ज्या १४ सहजप्रेरणा मानिल्या आहेत, त्यांत (Reverence) ही एक आहे. पूजनीयांबद्दल पूज्यभाव ठेवणें हें कोणीं दुसऱ्यांनीं सांगावयास नको. हें कर्तव्यकर्म आमच्यावर कोणी जुलमानें लादीत नाहीं. हा आमचा 'सहज' व

'स्वभाव-नियत' धर्मच आहे; व हा 'स्वधर्म' आम्हीं कां सोडावा हें अद्यापि आम्हांला चांगलें स्पष्ट होत नाहीं."

कृष्ण म्हणेल कीं, "हा तुझा 'स्वधर्म' च नाहीं; कारण, तूं क्षत्रिय आहेस. 'धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते।' युद्धापासून परावृत्त होणें हें क्षत्रियाला उचित नाहीं. विशेषेंकरून 'धर्म्य' अशा युद्धापासून क्षत्रियानें परावृत्त होऊं नये, हें युद्ध करतांना हा आपला स्वधर्म आहे असें ओळखून तें न कचरतां आणि न घाबरतां करावें. 'स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि।' दुसरें असें कीं, तूं युद्धापासून निवृत्त झालास तर लोक तुला भ्याड म्हणतील व तुझी छीःथूः होईल. 'भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः।' लोकांमध्यें अपकीर्ति झाल्यावर जगण्यांत अर्थ काय? विशेषेंकरून तुझ्यासारख्या मानधन वीरांना अकीर्ति ही मरणाहून अधिक दुःखद होईल. 'संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते।'"

परंतु, हे युक्तिवाददेखील आधुनिक अर्जुनाला पटण्यासारखें नाहींत. तो म्हणेल कीं, "युद्ध न केल्यानें लोक मला भलतींच नांवें ठेवतील हें मला कबूल आहे; पण लोक नांवें ठेवतील म्हणून भलती गोष्ट करावी हें मला पटत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, कांहींहि केलें तरी लोक हे नांवें ठेवणारच! तूं म्हणतोस त्याप्रमाणें मी युद्ध केलें आणि युद्धांत सगळ्यांना मारिलें तरीदेखील लोक म्हणावयाला कमी करावयाचे नाहींत कीं, 'यानें राज्य मिळविण्याकरितां प्रत्यक्ष गुरूंचा आणि पूज्य अशा गुरुजनांचा बिनदिक्कत वध केला!' आणि अर्जुनाला स्वार्थापलीकडे व स्वतःच्या महत्त्वाकांक्षेपलीकडे कांहीं दिसत नव्हतें, असें लोकांनीं म्हटलें तर ही 'अकीर्ति' नाहीं का?' मला तर लोकांनीं भित्रा म्हटलेलें पुरवेल, पण 'गुरुहत्या करणारा' असें म्हटलेलें कधींहि रुचणार नाहीं. कांहीं केलें तरी अकीर्ति होणारच. अशा स्थितींत गुरुहत्त्येचें पाप तरी लागावयाला नको; आणि म्हणूनच हे कृष्णा, मी पुनः पुनः म्हणतों कीं, हें पाप करण्यास मला प्रवृत्त करूं नकोस. मला राज्य नको, त्रैलोक्याचेंहि राज्य नको. जर हें राज्य गुरुहत्त्येसारखें महापाप करूनच मिळणार असेल, तर त्याची माझ्यासारख्यांना कांहीं किंमत नाहीं. मी क्षत्रिय असलों तरी मनुष्य आहें, शिष्य आहें. पूर्वींच्या उपकारांची मला स्मृति आहे आणि गुरुंसंबंधीं व गुरूजनांसंबंधीं माझें कर्तव्य काय, माझा 'स्वधर्म' काय, माझें 'सहज' व 'स्वभाव-नियत' कर्म काय, हें मला समजतें आणि म्हणूनच

मीं जें गाण्डीवधनुष्य टाकलें आहे तें न उचलतां पुनः म्हणतों कीं, मी युद्ध करणार नाहीं. युद्ध केलें तर आम्हां सगळ्यांना पाप लागेल. 'पापमेवाश्रयेदस्मान् हत्वैतानाततायिनः ।'

"कृष्णा, तूं म्हणशील कीं, मला कांहीं तरीं कुबुद्धि सुचलेली आहे. ऐन युद्धाच्या वेळीं हें 'कश्मल' मनांत आलेलें पाहून तुला आश्चर्य वाटेल व तुझें मन व्यथित होईल. तूं म्हणशील कीं, माझा हा निश्चय 'अनार्यजुष्ट,' 'अस्वर्ग्य' आणि 'अकीर्तिकर' आहे. माझ्या मनःस्थितीला तूं 'हृदयदौर्बल्य' म्हणशील, माझ्यावर क्लैब्याचाहि आरोप करशील—

**'क्लैब्यं मास्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥'**

असा पोक्तपणाचा उपदेश पूर्वी तूं केलास, तसाच पुनः करशील; पण माझी शंकानिवृत्ति तुझ्याकडून नाहीं तर मग कोणाकडून करून घेऊं?

**'शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ।'**

शिष्य म्हणून, तुझा प्रिय शिष्य म्हणून, स्वतःचा आग्रह चालवून मी तुला मनापासून असें विचारतों कीं, राज्य मिळविण्याचें सामर्थ्य असतां, उच्चतर ध्येय किंवा 'श्रेय' साधण्याकरितां राज्यावर लाथ मारणें यांत 'हृदय-दौर्बल्य' दिसतें का 'श्रेष्ठ धारिष्ठ' दिसतें? मरण आलेलें पत्करलें, पण गुरुहत्येचें पाप करावयाचें नाहीं, या वृत्तीला प्राकृत लोकांनीं 'क्लैब्य' म्हणावें पाहिजे तर, पण तूंहि तसेंच म्हणावेंस? भीष्मद्रोणादिकांना आपला प्राण गेला तरी मारावयाचें नाहीं, हा माझा निश्चय 'अनार्यजुष्ट', 'अस्वर्ग्य' आणि 'अकीर्तिकर' ठरला तर या शब्दांचा अर्थच बदलला आहे असें म्हटलें पाहिजे! वंद्य व पूज्य गुरुजनांना राज्यलोभानें मारण्यांत जर 'आर्यत्व' असेल तर हें आर्यत्व मला नको आहे. त्यांना न मारल्यामुळें मला जर नरकप्राप्ति व्हावयाची असेल, तर आधुनिक कालांतील मिल्लनामक इंग्लिश तत्त्ववेत्ता एकदां अशाच प्रसंगीं म्हणाला होता, त्याप्रमाणें मीहि म्हणेन कीं, 'To hell I shall go' ('मला नरक पुरवेल'). राज्याचा क्षुद्र लोभ धरून गुरुहत्या करावयाची यांत जर कीर्ति असेल, तर ही 'कीर्ति' मला नको आहे. मला कांहीं असलें अधर्म्य युद्ध करावयाचें नाहीं. तो माझा तरी 'स्वधर्म' नाहीं. तें माझ्यासारख्या आर्याला

शोभत नाहीं. यांत स्वर्गप्राप्ति नाहीं, कीर्ति नाहीं, कांहीं नाहीं; उलट, तें घोर पाप आहे.”

कृष्णाला आधुनिक अर्जुनाचें हें भाषण ऐकून कदाचित् आश्चर्य वाटेल, कदाचित् विषाद वाटेल. बहुधा तो किंचित् हंसेल आणि ('प्रहसन्निव') म्हणेल:- “ आँग्ल-शिक्षित प्रज्ञावाद करणाऱ्या दुर्विदग्ध अर्जुना, मोठमोठें उसने युक्तिवाद लढवून तूं मलाच शिकवूं पाहत आहेस आणि अभिमानानें म्हणत आहेस कीं, ' मी युद्ध करणार नाहीं.' पण मी तुला सांगून ठेवतों कीं, तूं कांहींहि बोललास तरी अखेर तूं युद्ध करणार आहेस, तुला त्याशिवाय राहावयाचेंच नाहीं. तुझी क्षात्रवृत्ति प्रबळ होऊन तुला युद्ध करावयाला लावील. तुझी प्रकृतिच मुळीं तशी आहे. तुझे युक्तिवाद आणि प्रज्ञावाद म्हणजे तोंडाच्या वाफा, तुझ्या मिथ्याहंकाराचा आविर्भाव. तुझी खरी ' प्रकृति, ' तुझा ' स्वभाव-धर्म ' ऐन वेळीं तुला शस्त्र धरण्यास व युद्ध करण्यास लावील.

**' यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥'**

तूं म्हणशील कीं, मी विचारी आहे, ज्ञानवान् आहें, मी निग्रह करीन; परंतु हें बोलणें फोल आहे. जो तो आपल्या प्रकृतिनुसार वागत असतो. त्याला तसें वागावेंच लागतें. ज्ञानाचें आणि निग्रहाचें कांहीं चालत नाहीं.

**' सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।**
**प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ '**

कृष्णाचें हें उत्तर ऐकून आपला काल्पनिक अर्जुन परिहासाच्या स्वरानें कृष्णाला प्रथम म्हणेल कीं, “ सख्या कृष्णा, पूर्वी मी इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः । ' असें म्हणून इन्द्रियांचा निग्रह करणें वायूचा निग्रह करण्यासारखें दुष्कर आहे असें म्हटलें, तेव्हां तूंच मला सांगितलेंस कीं,

**' असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।**
**अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥ '**

त्या वेळेस मनाचा निग्रह करणें शक्य आहे असें तूंच म्हणालास आणि आतां मात्र तूंच मला शिकवीत आहेस कीं, मनाचा निग्रह करणें शक्य नाहीं. परिहासाची क्षमा कर, पण तुझ्या बोलण्यांत बोलणें नसतें ! एकदां म्हणतोस कीं,

मनुष्याचें प्रकृतिपुढें कांहीं चालत नाहीं, त्याला प्रकृतिगुणानुसार वागावेंच लागतें, तो अत्यंत परवश आहे ('कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः।' पण, पुनः तूंच मला अमुक कर आणि तमुक करूं नको, असेंहि सांगायला तयार आहेसच! 'आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः।' असें निक्षून तूंच मला सांगितलेंस व इंद्रियांचें दमन करून मोह दूर सारण्याचा तूंच आदेश केलास; आणि पुनः आतां तूंच मला शिकवीत आहेस कीं, अमुक करणें किंवा न करणें तुझ्या मुळीं हातांतच नाहीं! बरें, परिहास सोडून गंभीरपणें बोलावयाचें म्हणजे माझी अशी शंका आहे कीं, एकदां तूं आत्मा हा 'अकर्ता' म्हणतोस, आणि दुसऱ्या ठिकाणीं विधिनिषेधात्मक उपदेश करितोस, याची संगति कशी लावावयाची? उदाहरणार्थ, सगळीं कर्में म्हणजे प्रकृतीचे खेळ होत, आत्मा हा निर्गुण आहे, अकर्ता आहे, तो कर्मापासून पूर्णपणें अलिप्त आहे, असें तूं पुढील ठिकाणीं सूचित केलें आहेसः—

(१) 'प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः।
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति॥'

(२) 'नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति।'

(३) 'शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते।'

आणखी इतरत्र आत्मा हा निर्गुण, अलिप्त, अकर्ता असें सूचित केलेलें आहे; व मनुष्यानें असें वागावें आणि तसें वागूं नये, असें पुनः वारंवार सूचित केलेलें आहेच. या विसंगतीची एकवाक्यता कशी करावयाची? लो. टिळकांच्या गीतारहस्यांत (पृ. २७५–२७६) पुढें दिल्याप्रमाणें एकवाक्यता केलेली दिसते; परंतु तीहि सदोष वाटते. लो. टिळक म्हणतातः—'परमात्मा अनंत व सर्वव्यापी असून नेहमींच शुद्ध मुक्तावस्थेंत असतो, यापलीकडे त्याचें ज्ञान मनुष्याच्या बुद्धीस होऊं शकत नाहीं. पण या परमात्म्याचा अंश जो जीवात्मा तो मूळांत शुद्ध, मुक्तस्वभाव, निर्गुण व अकर्ता असला, तरी देह व बुद्ध्यादि इंद्रियें यांच्या कोंडींत सांपडला असल्यामुळें तो मनुष्याच्या मनांत जें स्फुरण उत्पन्न करितो त्याचें प्रत्यक्षानुभवरूपी ज्ञान आपणांस होऊं शकतें. मोकळ्या वाफेंत कांहीं जोर नसतांहि ती एकाद्या भांड्यांत कोंडली म्हणजे मग त्याच वाफेचा भांड्यावर ज्याप्रमाणें दाब बसूं लागतो, त्या न्यायानें अनादिपूर्वकर्मार्जित जड देह व इंद्रियें यांनीं परमात्म्याचा अंशभूत जीव (गी. १५.७) कोंडला गेला, म्हणजे या कोंडींतून

त्याची सुटका करून देणारीं (किंवा मोक्षानुकूल) कर्में करण्यास देहेंद्रियांची प्रवृत्ति होऊं लागल्यें; व यालाच व्यावहारिकदृष्ट्या 'आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ति' असें म्हणतात. 'व्यावहारिकदृष्ट्या' म्हणण्याचें कारण असें कीं, शुद्ध मुक्तावस्थेंत किंवा 'तात्विकदृष्टया' आत्मा हा निरिच्छ व अकर्ता असून सर्व कर्तृत्व प्रकृतीचें आहे (गी. १३.२९; वेसू. शांभा. २.३.४०). पण ही प्रकृति आपण होऊनच मोक्षानुकूल कर्में करित्यें असें सांख्यांप्रमाणें वेदान्ती म्हणत नाहींत. कारण तसें मानिलें तर जड प्रकृति आंधळेपणानें अज्ञान्यांसहि मुक्त करूं शकेल असें प्राप्त होतें. आणि मूळांत जो आत्मा अकर्ता तो स्वतंत्ररीत्या म्हणजे निमित्तावांचून आपल्या नैसर्गिक गुणांनींच प्रवर्तक बनतो, असेंहि म्हणतां येत नाहीं. म्हणून आत्मा मूळांत जरी अकर्ता आहे तरी कोंडीच्या निमित्तामुळें तो तितक्यापुरता दर्शनी प्रेरक बनतो, आणि कोणत्याहि निमित्तानें त्याचें ठायीं एकदां हें आगंतुक प्रेरकत्व आलें म्हणजे तें कर्माच्या कायद्याहून भिन्न म्हणजे स्वतंत्रच असतें, अशा शब्दांनीं आत्मस्वातंत्र्याचा हा सिद्धान्त वेदान्तशास्त्रांत सांगावा लागतो. स्वतंत्र म्हणजे निर्निमित्तक नव्हे, आणि आत्मा आपल्या मूळ शुद्धावस्थेंत कर्ताहि असत नाहीं.

"टिळकांचें हें विवरण सुंदर उपमेच्या साह्यानें दिशाभूल करून मुख्य मुद्दा दृष्टिआड करणारें आहे. एखाद्या प्रिय व्यक्तीचें चित्र पाहून क्षणभर त्याची आठवण होईल व मनाला बरेंहि वाटेल; पण त्याच्या संगतीची खरी भूक चित्रानें कांहीं शान्त व्हावयाची नाहीं. त्याप्रमाणें वास्तविक निर्गुण व 'अकर्ता' असलेला आत्मा सगुण व कर्ता कसा होतो हें कोडें वाफेचा दाखला देऊन क्षणभर सुटल्यासारखें भासलें, तरी विचारी मनाचें त्यायोगें खरें समाधान होऊं शकत नाहीं. त्यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, गीतेमध्यें सांख्यांचें तत्त्वज्ञान घेतलें आहे, आणि या तत्त्वज्ञानांत 'पुरुष' व 'प्रकृति' यांचें जें आत्यंतिक द्वैत कल्पिलें आहे, तें स्वीकारून व्यवहाराला आवश्यक असलेलें 'आत्मकर्तृत्व'हि मान्य केलेलें आहे; पण या दोन गोष्टी उपमांची आणि दाखल्यांची कितीहि हातचलाखी केली तरी तर्कदृष्ट्या सुसंगत होणें अशक्य आहे.

"कर्ता शास्त्रार्थवत्त्वात्" या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें आत्मा हा 'कर्ता' मानिला तरच विधि-निषेधात्मक उपदेश मनुष्याला करणें युक्त होईल, आणि आत्म्याचें कर्तृत्व मी मानण्यास तयार आहे. आणि वर दाखविलेली विसंगति

घटकाभर विसरून मी, हे कृष्णा, तुला असें विचारतों कीं, माझ्यापुढें जीं दोन कर्तव्यें आहेत, त्यांपैकीं गुरुजनांची हिंसा करण्याचें कर्तव्य मीं कां स्वीकारावें–म्हणजे कोणती कसोटी लावून युद्ध करण्याचें कर्तव्य अधिक महत्त्वाचें व अधिक श्रेयस्कर मीं समजावें, हें मला समजावून सांग. माझी खात्री होईतोंपर्यंत मी कांहीं युद्ध करणार नाहीं, आणि स्वजनांना मारण्याचें पाप करणार नाहीं, हें निश्चित समज."

कृष्ण या काल्पनिक व हट्टवादी दिसणाऱ्या अर्जुनाला उत्तर देईल कीं, "तूं जी वर विसंगति दाखविलीस ती बरोबर आहे. "लौकिक" दृष्टीनें मी मनुष्याकडे 'कर्तृत्व' दिलेले होतें. तूं पूर्ण ज्ञानी नसल्यामुळें खरी 'पारमार्थिक' दृष्टि तुला समजावयाची नाहीं आणि पटावयाची नाहीं, म्हणून खालच्या भूमिकेवर उतरून मीं तुला उपदेश केला; आणि त्यामुळें 'लौकिक' व पारमार्थिक सत्यांची भेसळ होऊन विसंगति उत्पन्न झाली. पारमार्थिक दृष्टीनें पाहिलें असतां अर्जुना कोणी कोणाला मारीत नाहीं, आणि कोणी मरत नाहीं. अमक्यातमक्यांना मीं मारिलें तर मला पाप लागेल, अशी तुला जी भीति वाटते ती भ्रममूलक आहे. कारण, आत्मा मरत नाहीं आणि कोणाला मारीत नाहीं. मागें तुला मी सांगितलेंच आहे कीं,

**'य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।**
**उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥'**

आत्म्याकडे आत्यन्तिक तत्त्वाच्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे तो खरोखर

**'अच्छेद्योऽयमदाह्योयमक्लेद्योऽशोष्य एव च ।**
**नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥'**

असा आहे. या परमोच्च पारमार्थिक दृष्टीनें पाहण्यास शोक आणि मोहजन्य शोककारण सोडून देऊन मी सांगतों तें कर्तव्य कर. आणखी पुनः हें ध्यानांत धर कीं, कौरवसेनेंतील सर्व योद्धे मीं अगोदरच मारलेले आहेत ('मयैवैते निहताः पूर्वमेव ।'). लौकिक दृष्टीनें मी हें बोलत आहें, पारमार्थिक दृष्टीनें नव्हे; नाहींतर पुनः तूं विसंगति दाखवावयाचास! ज्या गोष्टी व्हावयाच्या म्हणून ठरलेल्याच आहेत, त्या झाल्याशिवाय राहत नाहींत. तूं निमित्तमात्र हो ('निमित्तमात्रम् भव सव्यसाचिन्'). कौरव आपल्या मरणानेंच मेलेलें आहेत, त्यांच्या कर्मानुसार त्यांना बुद्धि झाली व आपल्या कर्मानुसार ते कर्मफलें भोगतील. तुला त्यांच्या

मरणाचें पाप नाहीं आणि पुण्यहि नाहीं. तेव्हां मोह सोड आणि युद्धास तयार हो. 'नैवं पापमवाप्स्यसि।'"

आपण कल्पिलेल्या आधुनिक अर्जुनाचें या युक्तिवादानें समाधान होण्यासारखें नाहीं. तो म्हणेल कीं, "कौरव हे आपल्या मरणानेंच अगोदर मेलेले असतील तर निमित्तमात्र होण्याचें लौकिकदृष्ट्या तरी, लागणारें पाप मी कशाला पत्करूं? बरें, पारमार्थिक उच्चतम भूमिकेवर जाऊन बोलावयाचें तर, हे कृष्णा तूं म्हणतोस तें मला समजलें आहे असें मी घटकाभर समजतों, आणि विचारतों कीं, कोणी मरत नाहीं आणि मारीत नाहीं हें जर खरें असेल, तर कौरव मला युद्धांत मारतील ही भीतीहि खोटी; आणि याच न्यायानें युद्धांतील जय-अपजय कीर्तिअकीर्ति, राज्यप्राप्ति-राज्यनाश वगैरे सगळ्या गोष्टीहि भ्रममूलकच ठरतील. अशा स्थितींत अमुक एक कर्तव्यकर्म हें दुसऱ्या कर्तव्यकर्मापेक्षां श्रेष्ठ कोणत्या कसोटीवरून ठरवावयाचें, किंबहुना अमुक श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ असें म्हणण्यांत अर्थ तरी काय? तात्पर्य, युद्ध करणें हें मला प्रशस्त वाटत नाहीं.

"आतांपर्यंत तूं जे जे युक्तिवाद लढविले आहेस, ते ते मला कां अमान्य आहेत हें तुला मी सांगितलेंच आहे. यापुढें जाऊन मी असें म्हणतों कीं, युद्ध न करणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे; आणि तें तूं पूर्वी सांगितलेल्या वचनांवरून मी सिद्ध करून देईन असें वाटतें. क्षमा हा गुण मोठा आहे, त्याचप्रमाणें 'अतिमानिता' हा मोठा दोष आहे, असें तूं मला सांगितलेलें आठवतें, तूं मला असें सांगितलें, नाहींस कां कीं,

**'तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता।**
**भवन्ति संपदं दैवीमभिजातस्य भारत॥'**

युद्धामध्यें मीं अनेक वीरांना मारिलें व शत्रूवर विजय मिळविला म्हणजे माझें 'विजय' हें नांव सार्थ होईल आणि मला मोठी कीर्ति मिळेल. परन्तु 'असौ मया हतः शत्रुः हनिष्ये चापरानपि।' अशा प्रकारचा अभिमान हें असुरी अभिमानाचें लक्षण आहे, असें तूंच सांगितलें आहेस ना? त्याचप्रमाणें

**'देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्।**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते॥'**

या वचनामध्यें 'अहिंसा' व 'देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं' यांची महती तूं

गाईली आहेस ना ? तेव्हां युद्ध करणें हें मला अनुचित वाटलें तर त्यांत माझा दोष आहे का ?"

आपल्या काल्पनिक अर्जुनाचा हा आपाततः दुर्विदग्धपणाचा हटवाद भासणारा युक्तिवाद ऐकून कृष्ण आपलें युक्तिवादात्मक शेवटलें ब्रह्मास्त्र काढून म्हणेल कीं, " अर्जुना, तुला पाप लागण्याची भीति वाटत आहे हें तुझ्या सौजन्याला व थोरपणाला अनुरूपच आहे. परंतु, एखादें कठोर व निर्दय भासणारें कर्म ईश्वरार्पण करून, अहंकार सोडून, फलाशा व आसक्ति न बाळगतां केलें, तर मनुष्याला पाप लागत नाहीं, हें ध्यानांत धर. जगांतील कर्में बंधनकारक होतात ती फलाशा धरल्यामुळें किंवा अहंकारबुद्धि धरल्यामुळें. परंतु तुला मीं युद्ध करण्यास जो प्रवृत्त करीत आहें, तो तुला विशिष्ट फलाची आशा दाखवून नव्हे किंवा तुझ्या अहंकारबुद्धीस चेतवून नव्हे, तर तुला तत्त्वदृष्टि सांगून व आध्यात्मिकदृष्ट्या तुला उच्च भूमिकेवर नेऊन सांगत आहे. शास्त्राची किंवा कीर्तीची लालूच मी तुला दाखवीत नाहीं, लोकसंग्रहाचे महत्त्व मागें तुला सांगितलें आहे, त्याचा पुनरुच्चार करीत नाहीं, तर आध्यात्मिकदृष्ट्या सर्वांत अधिक श्रेयस्कर मार्ग कोणता तो मी सांगत आहें; आणि तुझ्या निमित्तानें कोणत्याहि मनुष्याला माझा असा संदेश आहे:—

**( १ ) ' तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर । '**

**( २ ) ' कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥ '**

**( ३ ) ' मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।**
**निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥'**

मनुष्यानें मीं यंव केलें त्यंव केलें, असा अभिमान बाळगूं नये. कारण कोणतीहि गोष्ट करतांना सृष्टींतील अनेक पदार्थांची, व्यक्तींचीं व परिस्थितीची आपणांस अनुकूलता लागत असते. कोणताहि पराक्रम एकाकी माणसाच्या प्रयत्नानें होत नसतो आणि त्याचें श्रेय आपणांकडे घेणें हें वृथाभिमानाचें लक्षण असतें. त्याचप्रमाणें तुला मी सांगत आहें तें युद्ध काय, दुसरी एखादी लहान गोष्ट काय, किंवा मोठी काय, ती करतांना फलाशा बाळगूं नये आसक्ति तर मुळींच ठेवूं नये. कारण, मनांत योजिलेलें कार्य सफल होणें न होण सर्वस्वी आपल्या हातीं नसतें. प्रयत्न करणें मात्र मनुष्याच्या हातीं असतें. फलासंबंधीं आसक्ति धरल्यास

दैवयोगें अपयश आल्यास दुःख होतें, उत्साहभंग होतो, तेजोवध होतो, आणि नैराश्यवृत्ति उत्पन्न होऊन शक्य असलेला पराक्रमहि मनुष्याच्या हातून होत नाहीं; व तो अखेर कर्तव्यच्युत होण्याच्या पापाला धनी होतो. म्हणून आपलें जें प्राप्त व प्रवाहपतित कर्तव्यकर्म असेल तें निरहंकार व अनासक्तवृत्तीनें ब्रह्मार्पण करावें. म्हणजे मग त्यापासून अनुषंगिक फळ म्हणून लागणाऱ्या पापाचा आपणांला दोष लागत नाहीं. सज्जनहत्तेचा दोष तुला केव्हां चिकटला असता? तें तुझें कर्तव्य-कर्म नसतें तर, किंवा तें तूं स्वार्थमूलक क्षुद्रबुद्धीनें कर्तव्यकर्म मानिलें असतेंस तर, किंवा त्यापासून मिळणाऱ्या राज्याचा किंवा कीर्तीचा, किंवा दुसऱ्या एखाद्या लाभाचा लोभ धरला असतास तर. परंतु सर्व कर्में 'मदपण' म्हणजे ईश्वरार्पण करून सध्याच्या परिस्थितींत अपरिहार्य असलेलें कर्तव्यकर्म तूं केलेंस, तर त्यांत तुला पाप लागणार नाहीं."

आपला काल्पनिक अर्जुन कांहीं कमी नाहीं. तो कृष्णाचें वरील युक्तिवादात्मक ब्रह्मास्त्र त्याच्यावरच उलटविण्याचा प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहीं. कारण, त्यांत थोडासा दोष आहेच. तो म्हणेल कीं, "कृष्णा, तुझें विवेचन सगळें ठीक आहे; पण युद्ध करणें हेंच माझें 'प्राप्त व प्रवाहपतित' कर्तव्यकर्म कशावरून? 'गुरुपूजन' हेंहि 'प्राप्त व प्रवाहपतित' कर्तव्यकर्म नाहीं का? आणि हें कर्तव्यकर्म तूं म्हणतोस त्याप्रमाणें मी फलाशा सोडून निर्मम व निरहंकार बुद्धीनें, कांहींएक आसक्ति मनांत न बाळगतां, कोणत्याहि क्षुद्र हेतूचा मनाला स्पर्श होऊं न देतां केलें, तर त्यांत तूं म्हणतोस त्याप्रमाणें पाप लागणार नाहीं. मी मरणाच्या भीतीनें पलायन केलें तर मला दोष लागेल. पण तूं म्हणतोस तशा तऱ्हेनें उच्चतम हेतु मनांत धरून युद्धापासून जर मी परावृत्त झालों, तर तें उचित कां ठरूं नये, अशी माझी शंका आहे; आणि या शंकेचें निवारण तूं करावेंस अशी माझी प्रार्थना आहे.

"माझ्यापुढें तूं एवढी गीता गाईलीस, पण माझें समाधान होत नाहीं, असें पाहून प्राकृतांतली एखादी म्हण तुला आठवेल आणि माझ्यासारख्यापुढें गीता गाण्याचें परिश्रम उगाच घेतले असें तुला वाटेल. पण मला वाटतें मीं माझ्या शंकांनीं–कुशंकांनीं म्हण पाहिजे तर–नारायणरूपी तुला कांहीं वेळ थोडेसें अडविलें आहे, आणि अडलेल्या या नारायणाला माझ्या दुराग्रहापुढें हात टेकण्याची पाळी आली तर तेंहि साहजिकच होईल! पण तुला मी गुरु व सखा म्हणून मानीत

आलों आहे. आणि परिहासाची भाषा सोडून तुला एक गोष्ट सांगावीशी वाटते कीं, गीतेंतील तुझें सारें तत्त्वज्ञान ऐकून माझें आपलें असें मत झालें आहे कीं, त्यांत कार्याकार्य ठरविण्याची कसोटी नाहीं. गीतेमध्यें एक उच्चतम तत्त्व आहे; आणि तें हें कीं, दोन कर्तव्यामध्यें लढा उत्पन्न झाला असतां कोणतें तरी एक कर्तव्य बाजूला सारण्यानें जें पाप लागतें तें कशा रीतीनें वागलें असतां लागणार नाहीं, हें गीतेंत सांगितलें आहे. फलाशा सोडून वगैरे तूं जें सांगितलें आहेस, तशा रीतीनें वागलें असतां एका कर्तव्याच्या नादीं लागून दूसरें कर्तव्य सोडण्याचें पाप लागण्याचा जो संभव असतो तो नाहींसा होतो. 'सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः।' या न्यायानें कर्तव्य हें बहुधा सदोष राहणारच; कारण, तें करावयाचें म्हणजे इतर कर्तव्यें बाजूला पडतात. पण तूं जो 'कर्मयोग' म्हण, किंवा 'अनासक्तियोग' म्हण, सांगितला आहेस, तो या अपरिहार्य दोषापासून मुक्त करण्याला फार उत्तम मार्ग आहे, अशी माझी खात्री झाली आहे. बाकी अमुक कर्तव्य दुसऱ्या अमुक कर्तव्यापेक्षां अधिक श्रेयस्कर कां, या माझ्या मूलभूत शंकेचें समाधान मात्र तुझ्या सांगण्यांत अद्यापि आलेलें नाहीं, हेंहि प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे.

'खरें पाहिलें असतां, पूर्वींच्या युगांत तूं जें अर्जुनाला सांगितलेंस तें म्हणजे पापनिर्मुक्तीचा हा मार्ग. 'नैवं पापमवाप्स्यसि।' हें तुझें गीतेंतलें पालुपद आहे. 'अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्।' येथून गीतेचा आरंभ आहे. मला पाप लागणार या भीतीनें मी भारतीय युद्धाच्या वेळीं गांगरून गेलों आणि 'गांडीवं स्रसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते।' असें बोललों. उपक्रम, उपसंहार, अभ्यास, अर्थवाद व उपपत्ति या दृष्टीनें पाहतां दोहोंपैकीं एक कर्तव्य सोडण्यामुळें पाप लागेल तर यावर उपाय काय, हा गीतेचा मुख्य प्रश्न दिसतो. आजचा माझा प्रश्न निराळा आहे. तूं पूर्वयुगीं सांगितलेंस त्याप्रमाणें निर्मम व निरहंकार वृत्तीनें, आसक्ति न बाळगतां, (कर्मसंन्यास न करतां), फल-संन्यास करून मी वागलों तर पाप लागणार नाहीं, हें मात्र मान्य आहे. पण त्या प्रसंगीं मी गुरुपूजन व गुरुसंतोषण हें कर्तव्य समजून अशाच उच्चतम वृत्तीनें वागलों असतों तरीहि मला पाप लागलें नसतें. युद्ध करणें हेंच अधिक श्रेयस्कर, हें कोणती कसोटी लावून ठरविलें हा आजचा प्रश्न आहे. युद्ध केलें असतां पाप कसें लागत नाहीं, हें त्या वेळेस तूं मला सांगितलेंस आणि तें मला त्यावेळीं पटलें आणि

आजहि पटतें. तुझा माझा वाद आहे तो आजच्या प्रश्नासंबंधानें आहे, म्हणजे कार्याकार्य ठरविण्याची कसोटी गीतेंत तूं सांगितली आहेस किंवा नाहीं यासंबंधानें आहे. इतका वेळ वाद करून मीं तुझी खात्री करून देण्याचा प्रयत्न केला तो कितपत सफल झाला आहे कोणास ठाऊक? पण मला आपलें असें अजूनहि वाटतें कीं, तूं जे जे युक्तिवाद लढविले आहेस, ते ते तुझ्यावर उलटवितां येतील. वादांत तुला जिंकण्याचा अभिमान आहे म्हणून मी बोलत नाहीं, तर मित्राशीं व गुरूशीं प्रांजलपणानें बोलावें असें वाटतें म्हणून मी बोलत आहे. 'तस्माच्छास्त्रं' प्रमाणं ते।' असें तूं उपदेशिलेंस तें कसें सदोष आहे हें मीं सांगितलें. क्षत्रियानें युद्ध न करणें हें 'अनार्यजुष्ट, अस्वर्ग्य, अकीर्तिकर' आहे, हा युक्तिवादही तुझ्यावर उलटवितां येईल असें मी दाखविलें. किंबहुना तुझे सर्वच युक्तिवाद कसे असमाधानकारक आहेत हें मीं भीडमुर्वत न ठेवतां तुला सांगितलें.

"आतां तूं म्हणशील कीं, 'सर्वभूतहिते रतः' या पदांत 'Good of Humanity'–मानवजातीचें कल्याण (सुख नव्हे), ही कसोटी सुचविलेली नाहीं का? होय आहे; पण ती अत्यन्त अप्रत्यक्ष रीतीनें,

"पण आपला वाद फार लांबला. पुढें एखाद्या वेळेस आपण बोलूं. शेवटीं, कृष्णा, तुझ्याशीं संभाषणांत अतिप्रसंग केल्याबद्दल पूर्वी जशी क्षमा मागितली होती तशी मागतों आणि आज तरी तुझी रजा घेतों.

**'सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति।**
**अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥**
**यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु।**
**एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम्॥"**

---

## “ बंधनांच्या पलीकडे ” ( परीक्षण )

आपला समाज बिघडला आहे व त्यांत सुधारणा केली पाहिजे याबद्दल कोणाहि विचारी मनुष्यास संशय नाहीं. पण कोणती सुधारणा कोणी, केव्हां व कशी करावयाची याबद्दल मात्र बराच मतभेद आहे. या मतामतांच्या गलबल्याचा शान्तपणें व सर्व दृष्टीनीं विचार झाला पाहिजे. पण प्रस्तुत लेखांत “ बंधनांच्या पलीकडे ” जाऊं पाहाणाऱ्या क्रान्ति घडवून आणूं पाहाणाऱ्या एका लेखकाच्या पुस्तकाचें परीक्षण करून अनुषंगानें स्वतःचीं मतें दिग्दर्शित करण्याचें योजिलें आहे.

रा. रा. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे, एम्. ए., एल्‌एल्. बी., यांनीं ‘ बंधनांच्या पलीकडे ’ या नांवाची कादंबरी लिहून तींतील नायकाच्या द्वारें स्वतःचींच मतें सुचविलीं आहेत असें केवळ या पुस्तकावरूनच अनुमान करावयाचें असल्यास म्हणतां येईल; परंतु पुस्तकावरून पुस्तक लिहिणाऱ्याच्या मतांचें अनुमान करणें कित्येक वेळां धोक्याचें असतें हें मी जाणून आहें. कादंबरीचा नायक ‘ प्रभाकर ’ व नायिका ‘ मैना ’ यांच्या तोंडीं घातलेलीं मतें हीं त्यांचीं आहेत, लेखकाचीं नव्हेत; त्यांचे वर्तनक्रम हे त्यांचे वर्तनक्रम आहेत, लेखकाचे नव्हेत—हा युक्तिवाद मला मान्य आहे; पण लेखक या मतांविषयीं व वर्तनक्रमाविषयीं जें लिहितो व ज्या तऱ्हेनें लिहितो त्यावरून लेखकासंबंधानेंही अनुमान करणें शक्य आहे. हें अनुमान चुकीचें असल्यास वाङ्मयात्मक कलेच्या दृष्टीनें त्याचें लेखन सदोष आहे असें म्हणावें लागेल. शेक्सपिअर हा आयॅगो, ऑथेलो, हॅम्लेट इत्यादिकांचीं स्वभावचित्रें काढतो, पण

तो स्वतः या पात्रांहून भिन्न आहे असें त्या नाटकांवरून आपणांस कळतें. स्वभावचित्रें उत्तम काढतां येण्याकरितां त्याचें पात्रांशीं एका अर्थी तादात्म्य जरीं झालें असलें, तरी दुसऱ्या दृष्टीनें पात्रांहून भिन्न असें आपलें एक वैशिष्ट्य आहे असें उत्तम लेखकाच्या कृतीवरूनच आपणांस दिसतें. प्रस्तुत कादंबरींत नायक-नायिकांच्या व लेखकाच्या मतांमध्यें भिन्नत्व आहे असें मानण्याला कांहीं कारण दिसत नाहीं. तथापि, सोईचा व बिनधोक्याचा मार्ग म्हणून आपण पुस्तकांतील मतें हीं नायक-नायिकांचींच मतें आहेत असें गृहीत धरून यांचा विचार करूं या. हें करण्यापूर्वी त्यांची व वाचकांची थोडीशी ओळख करून दिलेली बरी.

पण ही ओळख कित्येक वाचकांना इष्ट वाटणार नाहीं. निदान नायिका 'मैना' हिची तर ओळख अनिष्ट वाटण्याचा पुष्कळ संभव आहे. कारण, ती मुंबईतील एका वेश्येची मुलगी आहे; पण ती तरुण आहे, सुंदर आहे, सुशील आहे. तेव्हां केवळ वाङ्मयात्मक प्रेक्षक या नात्यानें तिच्याकडे पाहाण्याचें टाळण्यांत अर्थ नाहीं. तिचें गाणेंबजावणें ऐकण्याचें टाळण्यांत तर अगदींच अर्थ नाहीं! निदान नायक 'प्रभाकर' याला तर तिच्या बंगलीच्या बाहेरच उभें राहून तें गाणें ऐकण्याचें कांहींच वाटलें नाहीं. इतकेंच नव्हें, तर त्यानें तें ऐकल्याबरोबर "कांहीं एक विचार न करतां तडक तो भराभर जिना चढून वर गेला." त्याला पाहिल्यावर "प्रथम त्या तरुण स्त्रीला जरा दचकल्यासारखें झालें; पण दृष्टि लवली नाहीं. दृष्टींत दृष्टि मिळून गेली! तिचे विस्तीर्ण पाणीदार डोळे म्हणजे चिमकुलीं तेजोवलयें होतीं. देहाचे सारे बंध तोडून प्राण त्या तेजोवलयांत विलीन होत आहेत असें प्रभाकराला वाटलें." लगेच दोघांचें संभाषण सुरू झालें. मैना नांवाची एक वेश्येची मुलगी जी प्रसिद्ध आहे ती हीच, हें त्याला कळून आलें; पण ती त्याला 'देवता' वाटली! तिलाही साक्ष पटून प्रभाकर हा "प्रीतीचा पुरुषोत्तम" भेटला!

झालें. दोघांच्या गांठीभेटी होऊं लागल्या. तिला घेऊन तो वाळकेश्वरावर वगैरे फिरण्यास जाऊं लागला. एकान्तांत बोलणें-चालणें पहिल्या भेटीपासूनच होतें. तेव्हां त्यांत आतां सांगण्यासारखें कांहींच राहिलें नाहीं; पण प्रथम तिच्या हातांचें सिनेमांतील देखाव्यांतल्याप्रमाणें चुंबन घेण्यास आरंभ होऊन, पुढें पुढें ओष्ठमीलनहि होऊं लागलें हें सांगितलें पाहिजे; पण यांत त्या उभयतांना कांहीं पाप वाटत नव्हतें. 'स्वतंत्र व स्वैर वर्तन' हें त्यांचें ध्येय

होतें. तीं कृत्रिम बंधनांच्या पलीकडे असलेल्या शुद्ध व उच्च पावित्र्याच्या वातावरणांत विहार करीत होतीं. रूढि, धर्मशास्त्र, आप्तवाक्य यांच्या कृत्रिम बंधनांना तीं विटलेलीं होतीं. लोकमताची त्यांना पर्वा नव्हती. वेदान्तानें किंवा पाश्चात्य तत्त्वज्ञानानें जे प्रश्न सोडविले नव्हते, ते मैनेच्या डोळ्यांकडे पाहून प्रभाकराला सुटल्यासारखे वाटत. त्या डोळ्यांकडे पाहिलें म्हणजे 'अनंतत्व' साकार होऊन आलें आहे असें त्याला वाटे. तिच्या हृदयाच्या निर्मल भावांत त्याला " चैतन्यमय सत्याचं वसतिस्थान " दिसे. तिलाही प्रभाकर म्हणजे 'शेले' या इंग्रजी कवीच्या व्यक्तिस्वातंत्र्य, समता, इत्यादि दिव्य तत्त्वांचा हिंदुस्थानांतला नवा अवतारच वाटत होता. इतरांशीं ती बोलत देखील नसे,--सगळें जग तिला अरण्यासारखें वाटे; पण प्रभाकराच्या संगतींत तिला दिव्य सुख होत असे. इतर सगळे पुरुष तिला परकी वाटत, पण प्रभाकर तिला अगदीं जवळचा, घरचा, ' आपला ' वाटे. त्याला ती ' अरे जा रे ' म्हणे, इतका तो तिला आपला वाटूं लागला होता !

पण त्यांच्या विवाहाला एक दोन अडचणी होत्या. एक अशी कीं, मैनाच कांहीं दिवस विवाह करण्याला तयार नव्हती; कारण तिनें एक महत्त्वाचें गुह्य त्याला सांगितलेलें नव्हतें. हें गुह्य म्हणजे तिचें शरीर एका विषयान्धानें एकदा दूषित केले होतें; पण बळजबरीच्या कौमार्यभंगाची हकीगत तिनें जिवाचा निर्धार करून पत्रद्वारें प्रभाकरला अखेर कळविली व तो असल्या गोष्टीला भलतें महत्त्व देणारा नसल्यामुळें ही अडचण बाबासाहेब व लक्ष्मीबाई यांच्या, म्हणजे प्रभाकराच्या आईबापांच्या नापसंतीची. त्यांतल्या त्यांत आईला हा विवाह पसंत नव्हता, ही अधिक मोठी अडचण. कारण आईचें मन मोडणें प्रभाकराला जड गेलें. बाबासाहेबांना त्यानें भलें मोठें पत्र लिहून व त्यांच्याशीं वादविवाद करून आपल्या प्रीतीची महती त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला, व हा प्रयत्न यशस्वी झाला नाहीं, तेव्हां त्यांच्या तोंडावर स्पष्टपणें असें सांगितलें कीं, ' तुमचं माझ्यावर खरं प्रेमच नाहीं !'

" तुमचं आंतडं खरोखर माझ्याकरितांच तुटलं असतं तर तुम्हीं माझ्याकरितां वाटेल त्या सुखाचा त्याग केला असतां." तो बाबासाहेबांना बिनदिक्कत म्हणाला. " पण तुमचं आंतडं माझ्याकरितां तुटत नाहीं, म्हणूनच तुमच्यांत व माझ्यांत एवढं अंतर पडलं आहे. तुमचं आंतडं माझ्याकरितांच केवळ तुटलं असतं तर तुम्हांला माझं सारं कळलं असतं व हा निरर्थक वाद घालण्याचा प्रसंगच आला

नसता. एकमेकांविषयीं खरा जिव्हाळा असला म्हणजे एकाचं मन दूसऱ्यास कांहीं न बोलतांच कळतं. तुम्हांला माझं मन कळलं असतं तर मैनेसारखी देवता मला मिळाली म्हणून मला जसा आनंद वाटतो, तसाच तुम्हांलाही वाटला असता. तुम्हांला वाईट वाटतं, दुःख होतं, तें माझ्याकरितां नव्हे; तर समाजाकरितां, लोकांकरितां. मीं असं चमत्कारिक लग्न केलं तर लोक काय म्हणतील, समाज काय म्हणेल, आपली लोकांत किती नाचक्की होईल, चारचौघांत तोंड काढणं किती कठीण होऊन जाईल, आपलं तोंड काळं होईल, आपल्या नांवास, कुळास कायमचा कलंक लागेल, हें लोकनिंदेचं भयच तुम्हांला माझ्यापासून दूर लोटीत आहे," इत्यादि इत्यादि. प्रभाकर ज्या प्रीतीच्या योगानें इतका बेहोष झाला होता, त्या प्रीतीचें वर्णन त्याच्या शब्दांतच केलेलें बरें.

"प्रीति म्हणजे काय हें शब्दांत (शब्दांनीं ?) सांगणं अतिशय कठीण आहे. मला त्याचं तुटक तुटक वर्णन देतां येईल. अंतःकरणांत असंख्य आशा-इच्छा उचंबळत असतात. जगांतल्या परस्परविरोधी तत्त्वज्ञानांच्या कोलाहलांत खरं काय अन् खोटं काय, चांगलं काय अन् वाईट काय, क्षणिक काय अन् चिरंतन काय, कशाचाच पत्ता लागत नाहीं; पण आंत उचंबळणाऱ्या आशा-इच्छांच्या मुळाशीं कांहीं तरी उदात्त हेतु असला पाहिजे असं आपलं मनास वाटत असतं. या असंख्य आशा-इच्छांच्या अंतिम कारणांचा उमज झाला तरच मनुष्यास पूर्णता येणं शक्य आहे असंही वाटत असतं. पण या वाटण्यास बाह्य जगांत कुठंच आधार न सांपडल्यामुळें मन उद्विग्न होतं, खिन्न होतं, उदास उदास वाटूं लागतं. आंत उफाळणाऱ्या मनोभावनांस व्यक्तता द्यावी तर कुणास कांहीं कळत नाहीं; त्यामुळें अधिकच निराश वाटूं लागतं. हृदयाच्या या विलक्षण स्थितींत हृदयाशीं समरस होणारं हृदय मिळालं कीं समाधान वाटूं लागतं. हृदयास हृदयाचा आधार सांपडतो. प्रीतीला सुरवात होते. आंत उच्छृंखलपणें उचंबळणाऱ्या आशा इच्छांतलं संगीत समरसतेमुळें कळूं लागतं. आशा-इच्छांच्या अंतिम कारणावर अंधुक प्रकाश पडतो. उमज येतो. विश्वाकडे पाहाण्याची दृष्टि येते. आत्मविश्वास वाटतो. पूर्णतेची आस बळावते, प्रीतीचं अगदीं निराळंच असं विश्व निर्माण होतं. आंत प्रीतिभाव सळसळूं लागतो." इ. इ.

' प्रभाकराची ही अशा प्रकारची प्रेमविषयक कल्पना बाबासाहेबांना पटली नाहीं व त्याला मग अर्थात् घरदार सोडावें लागलें. दुसरा असा एक परिणाम

झाला कीं, त्याची ' शांति ' नांवाची एक १५-१६ वर्षांची मॅट्रिक झालेली बहीण होती. तिच्या डोक्यांत असल्या कल्पना शिरूं नयेत म्हणून तिला अर्धवट बंदिवासांत ठेवण्यांत आलें. तिचें मन ' अरुण ' नांवाच्या प्रभाकराच्या एका जीवश्चकंठश्च मित्रावर बसलेले होतें व ही गोष्ट प्रभाकराला माहित होती. त्यानें घरीं जाऊन व थोडीशी कायदेबाजी करून तिची बंदीवासांतून मुक्तता केली. मुंबईला परत आल्यावर अर्थात् मैना-प्रभाकरांचा विवाहविधि झाला व सर्वत्र आनंदीआनंद झाला. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, त्याची आई लक्ष्मीबाई ही आपल्या मुलाला घरांतून घालवून दिल्यामुळें झुरणीस लागली व अखेर मृत्यु पावली. बाबासाहेबांना संसाराचा वीट आला व हृदयाला शांति मिळावी म्हणून ते वेदांताचा अभ्यास करूं लागले; परंतु जीविताचें कोडें सुटेना. यात्रा वगैरे करून व साधुसंतांची गांठ घेऊन तरी हें कोडें सुटतें का म्हणून पाहूं लागले असतां अखेर त्यांना दिव्य प्रकाशाचा व आनंदाचा लाभ झाला, व प्रभाकराच्या मुंबईच्या घरीं येऊन त्यांनी सांगतलें कीं, 'प्रभा, तुझंच बरोबर आहे, मी चुकलों! तुझी मैना देवता आहे. या पापी समाजाला देवतेची किंमत कशी कळणार? सत्याच्या व व्यक्तिस्वातंत्र्याच्या विस्तृत पायावर समाजांची उभारणी झाल्याशिवाय मैनेसारख्या देवतेचं निर्मल तत्त्व समाजास पटणं शक्य नाहीं. तुझ्या मैनेनं मला शाश्वत सुखाचा मूलमंत्र सांगितला. चैतन्यमय सत्याचं स्वरूप दाखविलं.

" चैतन्यमय सत्याचं वसतिस्थान हृदयाच्या निर्मल भावांत, **बंधनांच्या पलीकडे**, आहे. "

बाबासाहेबांनीं प्रभाकराच्या विवाहाला मान्यता दिली हें योग्यच केलें व आपण प्रेक्षकलोकही आपआपल्या वयोमानाप्रमाणें वधूवरांना आशीर्वाद देऊं या किंवा त्यांचें अभिनन्दन करूं या. पण आनन्दाच्या भरांत मैना-प्रभाकरांचें पहिलें पहिलें वर्तन योग्य होतें, हें मानण्याची किंवा भासवण्याची चूक न करण्याबद्दल सावधगिरी ठेविली पाहिजे. अपवादात्मक व्यक्ति सोडून द्या. पण कोणीही सामान्य माणसानें प्रभाकराप्रमाणें विचार न करतां माड्या चढून जाण्याचें धाडस करूं नये; तरुणीशीं एकान्त करूं नये; शुद्ध प्रेमाच्या भ्रमानें हस्तचुंबनादि व्यवहारांत पडूं नये. तसेंच, कोणत्याही तरुणीनें असल्या प्रकारांना उत्तेजन देऊं नये. हृदयांत पापविचार नसेल, व एकांतांतील प्रत्येक भेटींत पापाचरण

होतेंच असें नाहीं. परंतु मनुष्याचें मन चंचल आहे, असल्या बाबतींत इन्द्रिय आवरणें अत्यन्त कठीण असतें, मोठ मोठे विद्वान् व सच्छील साधुपुरुष फसले आहेत, या गोष्टी ध्यानांत धरणें आवश्यक आहे. स्त्रिया या एरवीं फार चांगल्या असतात, मनोहर असतात, कोमल असतात, सच्छील असतात, पुरुषांना मोह घालण्याची त्यांची इच्छा नसते; पण त्यांच्याशीं एकान्त केला असतां पुरुष वेडे होतात–मी मी म्हणविणारे वेडे होतात–तेव्हां शहाण्या माणसानें या फंदांत न पडलेलेंच बरें. पुरुषही वाईट नसतात, त्यांच्या मनांत पापविचार असतो असें नाहीं, पण काय होतें कोणास ठाऊक, स्त्रियांशीं एकान्त केला असतां ते भलतेंच कांहीं तरी करून जातात, जगाचा अनुभव अनेक लोकांनीं अनेक गोष्टी सांगून अनेकदां नमूद करून ठेविला आहे. मैना ही वेश्येची मुलगी होती तरी ती चांगली होती ही आनंदाची गोष्ट आहे; पण वेश्यांच्या सगळया मुली अशाच चांगल्या असतील असा भ्रम करून घेऊन त्यांच्याशीं प्रभाकराप्रमाणें सलगी करूं लागण्यांत अर्थ नाहीं. प्रभाकराला स्वतःच्या हृदयाला याची साक्ष पुरेशी वाटली व सुदैवानें त्याला मैनेच्या रूपानें एक देवताच आढळली; पण सामान्य माणसानें केवळ आपल्या साक्षीवर भरंवसा ठेवून वागण्याचे धाडस करूं नये. स्थितप्रज्ञांचें हृदय हें कार्याकार्याचें उत्तमोत्तम प्रमाण आहे, पण आपण कांहीं स्थितप्रज्ञ नाहीं हें सामान्य माणसांनें ध्यानांत धरावें.

विवाहकालीं प्रभाकराचें अभिनंदन करतांना त्याला मी कां दोष देतों याबद्दल आणखी थोडासा खुलासा केला पाहिजे. त्यानें जातिभेदाला व लोकमताला झुगारून वेश्येच्या कन्येशीं विवाह केला एवढेंच पाहिलें, तर त्यानें फार चांगली गोष्ट केली असें मी म्हणेन. जातिभेद जितक्या लवकर नष्ट होईल तितका चांगला असें माझें मत आहे. तसेंच आजापणज्यांच्या किंवा आईबापांच्या चुकीबद्दल किंवा पापांबद्दल मुलांमुलींना शासन करण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें म्हणणारा मी आहे; पण वेश्येच्या मुली वाईटच निघतील असा जरी नियम नसला, तरी त्यांच्या गृहशिक्षणांत एकंदर परिस्थितीकडे पाहातां त्या चांगल्या निघणें कठीण हें मी कसें विसरूं? माझ्या मुलाचें प्रभाकराप्रमाणें एखाद्या मैनेशीं लग्न झालें, तर त्याला मी मरेपर्यंत हरकत करीत राहीन असें नाहीं; पण कुलीन मुलीशीं बोलण्याचालण्याची मी जितक्या आनंदानें त्याला परवानगी देईन, तेवढ्या आनंदानें वेश्येच्या कन्येशीं बोलण्याचालण्याची परवानगी मला देतां येणार नाहीं. कॉलेजमध्यें वर्गात किंवा

इतरत्र अगदीं साहजिकपणें ओळख झाली व साहजिक क्रमानें प्रेम उत्पन्न झालं तर धोक्याची सूचना देऊन व केवळ हृदयाच्या साक्षीवरच भिस्त न ठेवण्याची खबरदारी बाळगण्यास सांगून मी स्वतः चौकशी करीन व त्या मुलींशीं बोलेनचालेन व मग परवानगी द्यावयाची किंवा नाहीं हें ठरवीन. सामान्य परिस्थितींत देणारच नाहीं, अगदीं अपवादात्मक परिस्थितींतच देईन.

प्रभाकराप्रमाणें तो कदाचित् मला उच्च प्रेमाबद्दल व्याख्यान झोडील, पण तें मी शांतपणें ऐकून घेऊन सांगेन कीं, ' तुझ्या वयांत ही तुझी भाषा चांगली आहे. तिच्यांत सत्यांशही आहे, पण थोडा आहे. स्त्री-पुरुषांमध्यें कामरहित प्रेम असणें कठीण. प्रेमांत कामाचा अंश पुष्कळ असतो. दुसरा अंशही असतो; तो नसता तर आपण पशुच गणलों असतों. पण त्या अंशाचें गूढगहन ( Mystic ) वर्णन करण्यांत अर्थ नाहीं. तरुण पुरुषाला आपल्या आवडत्या तरुणीच्या सान्निध्यांत आनंद होतो–सात्त्विक आनंद होतो–तात्त्विक गूढ प्रश्नाचा जाच कमी होतो, ' आशा–इच्छा ' प्रबल होतात, आशावादित्व वाढतें, मनाला अनिर्वचनीय प्रसन्नता येते, या गोष्टी खऱ्या आहेत. पण " आशा--इच्छांतलं संगीत समरसतेमुळें कळूं लागतं," असें म्हणण्यांत सत्याचा भाग फारच कमी आहे. ' आशा-इच्छांच्या मुळाशीं कांहीं तरी उदात्त हेतु असला पाहिजे,' असें आपलें उगाच मनाला वाटेल; पण हें नुसतें वाटणें झालें. जगाचें कोडें प्रेमानें उलगडतें किंवा उलगडूं लागतें हें म्हणणें अलंकारिक अर्थानेंच खरें आहे. जगाच्या गूढांवर प्रेमामुळें ' अंधुक प्रकाश ' पडतो असें प्रभाकर म्हणतो; पण जगाचें कोडें पुष्कळ वेळां प्रेमानें सुटत नाहीं, तर त्याचा विसर पडतो किंवा तें कोडें सुटल्याचा भ्रम होतों. प्रेमळ जोडप्याला एकमेकांच्या संगतींत अनिर्वचनीय आनन्द होतो. हा आनन्द शुद्ध व पवित्र असतो. या आनंदाच्या भरांत तत्त्वज्ञानाचे रुक्ष व कठोर प्रश्न मागें दडतात किंवा सुटल्यासारखा क्षणिक भास होतो, हें अगदीं खरें आहे. प्रेमामुळें आशावादित्व वाढतें 'विश्वाकडे पाहाण्याची एक दृष्टि येते' हेंही खरें आहे. पण केवळ ब्रह्मजिज्ञासेला किंवा केवळ कर्मोत्साहाला जे प्रश्न सुटले नाहींत ते केवळ प्रेमपिपासेला कायमचे सुटतील ही आशा प्रेमाच्या अन्धभक्तांनाच शोभेल. हे प्रश्न कधीं काळीं सुटावयाचे असतील तर ते ब्रह्मजिज्ञासा, प्रेमपिपासा व कर्मोत्साह या त्रयींचा एकमेकांवर आघात–प्रत्याघात होऊन व एकमेकांचें एकमेकांना साहाय्य होऊन हळूहळू सुटतील.

प्रेमस्तोत्रें गातांना 'प्रेमामुळें अनंताचा साक्षात्कार होतो, जगांचें संगीत ऐकूं येऊं लागतें, विश्वाशीं समरसता प्राप्त होते,' इत्यादि प्रकारची भाषा ढोंगीपणाचीच नेहमीं असे. असें मी म्हणत नाहीं. ती खरी मनापासून उच्चारलेली असते. वर्डस्वर्थ, शेले वगैरे कवींना किंवा अनेक देशांतल्या व युगांतल्या साधुसंतांना विश्वाशीं समरसत्व पावण्याचे अनुभव आलेले आहेत हें वुइल्यम् जेम्स यांच्या *Varieties of Religigous Experince* या पुस्तकांत व इतरत्रही नमूद करून ठेविलेलें आहे. त्याप्रमाणेंच प्रेमी स्त्रीपुरुषांनाही असे अनुभव येतात हें मला मान्य आहे. माझ्यासारख्या सामान्य गद्यात्मक माणसाला देखील समुद्राचे वगैरे सुंदर देखावे पाहून, बालबालिका पाहून किंवा इतर प्रसंगीं मन प्रसन्न असतां वरील प्रकारचा क्षणिक अनुभव येतो, मग कवींची वगैरे गोष्ट बोलावयासच नको. पण, हे अनुभव क्षणिक असतात व त्यांची मूल्यमीमांसा करतांना अनेक गहन प्रश्न उत्पन्न होतात व ते सुटत नाहींत, अर्थात् त्यांवरच तत्त्वज्ञानाची किंवा संसाराची भिस्त ठेवून चालणें युक्त नव्हे.

शिवाय, 'प्रेम प्रेम' म्हणून आपण म्हणतों तें नेहमींच उच्च व शुद्ध असतें असें नाहीं. निष्काम प्रेम ( Platonic love) प्लेटोच्या संवादांत किंवा काव्यनाटकांत ठीक आहे; पण व्यवहारांत निष्काम प्रेम सांपडणें कठीण. सामान्यतः युवयुवतींच्या प्रेमाच्या मुळाशीं ज्ञात किंवा अज्ञात असें कामात्मक आकर्षण ( Sexual attraction ) असतें. Freud वगैरे मानसशास्त्रज्ञांचीं ( Psycho-analysts चीं ) मतें अतिशयोक्तिपूर्ण म्हणून सोडून द्या पाहिजे तर, पण सामान्यतः वरील सिद्धान्त खरा आहे. कामात्मक आकर्षणाच्या जोडीला बौद्धिक व नैतिक आकर्षणेंहि असतात, आणि ती असतात म्हणूनच माणसांत माणुसकी आहे; पण तें आकर्षक नसतें असें नाहीं. या आकर्षणाचें प्रमाण अधिक असल्यास ते इतर आकर्षणाचें सोंग घेईल व आपलें स्वरूप झांकील–इतकें तें कलाकुशल व स्वार्थपरायण आहे ! दमयन्ती मिळवावयाची असें ठरल्यावर इंद्रानें नलाचें जसें सोंग घेतलें, तसेंच काम हा देखील हरतऱ्हेचीं सोंगें घेऊन आपली वासना सफल करूं पाहातो ! अर्थात् प्रेमाचे दास होण्यापूर्वी माणसानें पुष्कळच विचार केला पाहिजे व आपली आत्मवंचना तर होत नाहीं ना याबद्दल सावध राहिलें पाहिजे.

वरील सर्व गोष्टींचा पूर्ण व बरेच दिवस विचार करून एखाद्याला जर वाटलें

कीं, अमुक एका स्त्रीच्या संगतींत आपणाला उच्चतम आनन्द होणार आहे, ती आपल्या तद्वृत्तींचें पोषण करील, सत्कर्मांना उत्तेजन देईल, पराक्रम करण्यास स्फुरण आणील, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपला संसार सत्काव्याप्रमाणें रमणीय करील; तर मग तिच्या जातीकडे वगैरे न पाहातां त्यानें तिच्याशीं विवाह करावा असें मी म्हणेन व त्याचें अभिनंदन करीन. निष्काम प्रेमाच्या–Platonic love च्या नादीं लागून वर्षानुवर्षें एकत्र पण अविवाहित राहण्याच्या फंदांत मनुष्यानें पडूं नये. असलें प्रेम अशक्य नाहीं हें मी म्हणूं शकेन; पण हें कठीण आहे, हें कोणालाही कळण्यासारखें आहे.

प्रभाकर रूढींना, धर्मशास्त्राला, लोकमताला, आर्य–संस्कृतीला, ' ठराविकाला ' धाब्यावर बसवितो, इतकें नव्हें तर शिव्या देतो; पण हा केवळ चिडखोरपणा आहे. तो देखील शांतपणें बोलूं लागल्यावर कबूल करतो कीं, ' समाजाविरुद्ध किंवा समाजांतील सर्व संस्थांविरुद्ध माझं बंड नाहीं ' पण हा शांतपणा फार वेळ टिकत नाहीं. ' आर्यसंस्कृति ' ला वेळींअवेळीं, उघड किंवा तीवरून, टोल्ले देण्यांत किंवा चिमटे घेण्यांत त्याला मोठा आनंद होतो असें दिसतें. पण आर्यसंस्कृतीनें बिचारीनें काय कोणाचें घोडें मारलें आहे ? आपली आई आपल्या इतकी शिकलेली नसते, तिला आपले विचार कळत नाहींत, ती एखाद्या वेळेस आपल्या विरुद्धही जाते, म्हणून काय तिची चेष्टा करावयाची ? किंवा तिला निंद्य ठरवावयाचें ? तिनें आपलें रक्षण केलें, पोषण केलें, शिक्षण दिलें, ( पुस्तकी नव्हे तर त्याहून उच्च दर्जाचें शिक्षण दिलें ) म्हणून तर आपणाला तिच्याहून अधिक ज्ञान झालें व तिला चार गोष्टी सांगण्याची आपणाला योग्यता आली, हें केव्हांही आपण ध्यानांत धरलें पाहिजे. प्रभाकराचें त्याच्या आईवर–लक्ष्मीबाईवर–प्रेम होतें आणि घर सोडतांना त्याला आईबद्दल फार वाईट वाटलें. ' आर्यसंस्कृती 'बद्दल प्रभाकराची अशी वृत्ति कां बरें नसावी ? आर्यसंस्कृतीनें त्याच्या आशा--आकांक्षांना विरोध केला म्हणून ? लक्ष्मीबाईनींही असाच विरोध नव्हता का केला ? बरें, तसेंच जर पाहिलें तर लक्ष्मीबाईनीं अखेर जसा प्रभाकराला आशीर्वाद दिला व त्याच्या आवडीच्या मुलीशीं त्याचा संसार सुखानें व चिरकाल व्हावा असें चिन्तून प्राण सोडला, त्याप्रमाणेंच आर्यसंस्कृति ही देखील नवीन नवीन सुधारणांना प्रथम प्रथम जरी विरोध करीत असली, तरी तिच्या पोटांत माया आहे, तिचें आपल्या समाजावर प्रेम आहे, ती विरोध करते तो देखील आपल्या

कल्याणाकरितांच करते, व आपण तिचें न ऐकल्यामुळें तिला जरी दुःख झालें तरी हृदयांतल्या हृदयांत पाहिलें असतां ती आपल्या विरुद्ध नाहीं व ती ज्या वेळेस ‘ काल ’ वश होऊन प्राण सोडील त्या वेळेस ती आशीर्वाद देऊनच प्राण सोडील हें आपण ध्यानांत धरलें पाहिजे. रूढि, धर्मशास्त्र, आप्तवाक्य, लोकमत यासंबंधानेंही प्रभाकर अपशब्द वापरतो; पण तारुण्याचा हा प्रभाव आहे. अज्ञानाचा किंवा दुःशीलाचा नव्हे. एवढें म्हणून व कालान्तरानें तो सुधारेलच अशी मनांत खूणगांठ बांधून स्वस्थ बसावें, हेंच उचित !

(जातां जातां त्याला हळूंच एक गोष्ट सांगितली पाहिजे. सगळ्या ‘ ठराविकां ’च्या conventions च्या ) विरुद्ध आरडाओरड व बंडाळी करून शेवटीं लढाई करून तूं आपल्या प्रेमाचा ‘ ठराविक ’च शेवट केलास ! अस्तु )

रा. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे यांच्या पुस्तकांतील मूलभूत कल्पनेचें परीक्षण करतांना मासिकांतील स्थलमर्यादांच्या बंधनांपलीकडे जाण्याचा मोह होतो, पण तो आवरून इतर दृष्टींनी त्याचें परीक्षण करण्यास लागूंया. या कादंबरीचें कथानक साधें आहे व प्रेमप्रसंगाचें वर्णन करतांना नैतिक बंधनांच्या पलीकडे ग्रंथकार गेलेले नाहींत. हस्तचुंबनादि प्रकारांचें वर्णन आहे तें यूरोपिअन स्त्रीपुरुषांचीं सिनेमांतील वगैरे चित्रें पाहून अन्ध अनुकरणानें केलेलें आहे; पण त्यांत अश्लीलपणा नाहीं. नायक प्रभाकर हा उल्लू आहे असें वाटेल. मैना ही अविचारी आहे असेंही वाटेल, पण वेश्येच्या कन्येशीं होणाऱ्या हरएक प्रसंगाचेंही वर्णन वाचतांना घाणेरड्या वातावरणांत आपण आलों आहों असें वाटत नाहीं, किंबहुना उच्च शुद्ध वातावरणांत आहों असें वाटतें. त्या उभयतांचें वर्तन आपणांस पसंत नसेल, पण ग्रंथकाराचें वर्णन आक्षेपार्ह नाहीं. नाहीं म्हणावयाला पाश्चात्त्यांच्या अंध अनुकरणाचा थोडासा दोष आहे. आपल्याइकडे प्रियाराधनाचा वगैरे प्रकार फारसा नाहीं व कादंबरींत वर्णन केलेले प्रसंग फारसे स्वाभाविक नाहींत. नवऱ्याला ‘ अरे जारे ’ असें मैना म्हणते हेंही चमत्कारिक वाटतें. प्रभाकराला त्यांत कांहीं वाटत नाहीं, इतकेंच नव्हे तर ‘ अरे जारे ’ असेंच तिनें म्हणावें असा तो आग्रह धरतो. नवऱ्यानें बायकोला ‘ अग ’ म्हणून एकेरी हांक मारलेली मला चालते, पण बायकोनें नवऱ्याला ‘ अरे ’ म्हटलेलें मला ऐकवत नाहीं, हा माझ्या पुरुषपक्षपातित्वाचा दोष आहे असें कांहीं लोक म्हणतील. स्त्रीपुरुषांना समान हक्क असावेत या तत्त्वाच्या मी विरुद्ध आहे

असेंही कांहीं म्हणतील. म्हणोत बिचारे! खरी गोष्ट अशी आहे कीं, हा केवळ संवईचा भाग आहे. पत्नीनें पतीला ' अरे ' म्हटल्यानें त्याचा कांहीं अपमान होत नाहीं किंवा कोणची हत्या होत नाहीं हें मी जाणून आहे. त्याप्रमाणें कांहीं चांगल्या सुशिक्षित सच्छील स्त्रिया आपल्या पतीला ' अरे गणू ', ' अरे विनू ' अशा रीतीनें संबोधितांना मीं ऐकलें आहे. सामाजिक बंधनांच्या पलीकडे त्या गेल्या असतील, असें म्हणावें तर गरीब बिचाऱ्या हिंदूंच्या चाली-रीतींचें बंधन तोडण्यापुरतीच त्यांची बंडखोरी दिसून येते, युरोपिअन etiquette च्या बाबतींत मात्र त्यांची बंडखोरी थंडावते हें जरा चमत्कारिकच खरें. पण हा प्रश्न विशेष महत्त्वाचा नसल्यामुळें येथेंच सोडूं या.

प्रभाकराच्या आईचें व मैनेच्या आईचेंही चित्र मनोहर आहे. मैनेची आई वेश्या कशी झाली, तिनें मैनेचा विवाह करण्याच्या बाबतींत स्वार्थत्याग कसा केला, याचें वर्णन फार चांगलें आहे. पण अखेर मात्र ती मैनेला क्लोरोफॉर्म देऊन एका कामान्धाच्या मनोविकाराला तिचा बळी देते हें मात्र अस्वाभाविक वाटतें.

एकंदरींत तो सर्व प्रकारच किळसवाणा असल्यामुळें त्याचा फार विचार न करितां प्रभाकराच्या आईच्या उदात्त स्वभावाचा विचार करूं या. ती खरोखर आर्य-स्त्री होती. ' आर्य स्त्रियां 'ची ग्रंथकार चेष्टा करतो ( मीही कधीं कधीं उगाच चेष्टा करतों ), पण आर्यस्त्रियांचें नांव ऐकल्यावर लाज वाटण्याचें मला तरी खरोखर कारण दिसत नाहीं. त्यांचा भोळसटपणा, त्यांची अन्धश्रद्धा, त्यांचा फाजील नम्रपणा, त्यांचें अज्ञान, ' पति हाच देव ' हें मानण्याची फाजील प्रवृत्ति, इत्यादि दोष काढून टाकले पाहिजेत. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर ते जातीलही. पण अज्ञानजन्य का असेना, रूढिमूलक का असेना, त्यांचें जें ध्येय आहे त्याला त्या चिटकून राहातात व त्याकरितां पाहिजे तो स्वार्थत्याग करतात हा सद्गुण काय कमी योग्यतेचा आहे? आर्य स्त्रियांची चेष्टा करणाऱ्या किती पुरुषांमध्यें हा सद्गुण सांपडेल? आपल्या स्त्रियांचें अज्ञान दूर करा, त्यांचीं ध्येयें नवीन युगाला अनुरूप अशीं करा, तुम्हांला ज्या कांहीं सुधारणा करावयाच्या असतील त्या करा, पण त्यांची ध्येयनिष्ठा जी आहे ती कायम ठेवा. तिच्याबद्दल त्यांना व आपणांस जो अभिमान वाटतो तो वाटेनासा होईल असें कांहीं एक करूं नका. रा. देशपांडे यांनीं आर्य-स्त्रियांची जातां जातां अनेक ठिकाणीं कुचेष्टा केली आहे, पण लक्ष्मीबाईचें चित्र इतकें उत्तम काढलें गेलें

आहे कीं, तें अगदीं जिवंत वाटतें. अशा स्त्रियांचे उसासे आणि त्यांच्या डोळ्यांतले अश्रबिन्दु ज्यानें पाहिलें तो लोकांच्या कुचेष्टेला कशाला भीक घालतो आहे ?

बाबासाहेबांचें चित्र तेवढें चांगलें नाहीं. प्रभाकराला विरोध करणारे त्याचे वडील अगदीं पापी, निन्द्य होते असें न दाखवितां ते बऱ्यापैकीं होते हें दाखविण्यांत रा. देशपांडे यांनीं कला कौशल्य दाखविलें आहे. पण ते याहून अधिक विचारी, सरळ व समंजस दाखविले असते तर चित्रनीतीच्याच नव्हे तर कलाविलासाच्या दृष्टीनें अधिक मनोहर झालें असतें. शेवटीं तरी ते प्रभाकराचे व मैनेचें अभिनन्दन करतात हें त्यांतल्यात्यांत बरें केलें.

भाषा या दृष्टीनें कादंबरी मध्यमच आहे. कांहीं ठिकाणीं भाषा चांगली आहे, पण एकंदरींत कृतिमतेची छटाच पुष्कळ दिसते. अतिशयोक्तिही मधून मधून आढळते. प्रभाकराचें लांबलचक पत्र लिहितांना किंवा त्याचे संवाद लिहितांना कलाविषयक संयम बाजूला राहून आपलें भाषाप्रभुत्व व विलक्षण मतें प्रतिपादण्याचें धैर्य दाखविण्याच्या उत्सुकतेचेंच ग्रंथकाराच्या मनावर अधिक प्राबल्य झालेलें असतें. पण एकंदरींत लेखक सामर्थ्यवान् आहे व त्याच्यामध्यें उत्तम कादंबरी निर्माण करण्याची पात्रता आहे असाच ग्रह प्रस्तुत कादंबरी वाचून होतो एवढें सांगून ग्रंथाची व ग्रंथकाराची रजा घेतों.

## अल्फ्रेड ॲडलर

अल्फ्रेड ॲडलर मूळचा व्हिएन्नाचा. त्याचा जन्म १८७० मध्यें झाला. बाप हा व्यापारी पेशाचा, पण मुलानें व्हिएन्ना येथें शिक्षण घेऊन वैद्यकशास्त्रांत बरीच पारंगतता मिळविली. हळूहळू त्याच्यावर फ्रॉइडच्या तत्त्वांचा पगडा बसून त्याच्या पहिल्या दोन प्रमुख शिष्यांमध्यें त्याचें नांव घेण्यांत येऊं लागलें. व्हिएन्ना येथें त्यानें एक 'मनोगाहनमंडळ' ( Psycho-analytic Society ) स्थापन केलें व या संस्थेचा तो अध्यक्ष झाला. तथापि कांहीं वर्षांच्या विचाराअन्तीं व अनुभवाअन्ती त्याला आपल्या गुरूचीं तत्त्वें पटेनाशीं झालीं आणि तो आपले मतभेद व्याख्यानाच्या व लेखनाच्या द्वारें व्यक्तही करूं लागला. खरा तत्त्वजिज्ञासु हा **'न दि सत्यात्परो धर्मः'** असें मानणारा असतो. ग्रीस देशांतील अरिस्टॉट्ल याला आपल्या गुरुची म्हणजे प्लेटोचीं मतें पसंत पडेनाशीं झालीं तेव्हां तो ज्याप्रमाणें 'गुरुवर्य प्लेटो मला प्रिय आहेत, पण सत्यधर्म हा प्रियतर आहे' ( 'Plato is dear to us but trnth is dearer') असें म्हणाला, त्याप्रमाणेंच ॲड्लरलाही म्हणावें लागले. त्यानें व्हिएन्ना येथील मनोगाहनमंडळांत एक निबंध वाचला आणि त्यांत आपलें मत-भेद स्पष्टपणें व निर्भीडपणें मांडले. त्याचा परिणाम असा झाला कीं, या संस्थेच्या अध्यक्षपदाचा त्याग करून त्याला निराळी संस्था काढावी लागली. या संस्थेची भरभराट होऊं लागून त्याची कीर्ति अमेरिकेपर्यंत पोचली आणि कांहीं वर्षांपूर्वीं त्याला तेथील एका विद्यापीठामध्यें प्राध्यापक म्हणून काम करण्यास बोलावणें आलें. त्यानें तें स्वीकारलें व मरेपर्यंत त्याच पदावर तो अधिष्ठित होता. मधून

मधून तो इंग्लंडमध्यें व्याख्यानें देत असें व व्याख्यान झाल्यानंतर प्रश्न विचारण्यास सांगून त्यांचीं उत्तरें शान्तपणें व न चिडतां देत असे. परिचित लोकांशीं त्याचें वर्तन सरळ व स्निग्धतेनें भरलेलें असे. मागें म्हटल्याप्रमाणें तो २८ मे ला शास्त्रजिज्ञासूंना चटका लावून दिवंगत झाला.

फ्रॉइडच्या पूर्वींही नेणिवेंतील ( Unconscious मधील ) प्रेरणाशक्तीचें अस्तित्व तत्त्ववेत्त्यांच्या ध्यानांत आलें होतें. मेस्मर-विद्या (Mesmerism) मोहनिद्राविद्या [Hypnotism] 'शोपेनहौअरचा अबोध अहंभाववाद,' वगैरेमध्यें बोधरहित [Unconscious] मनोव्यापाराचें अस्तित्व व महत्त्व मानलेलें आहे. फ्रॉइडनें त्यावर विशेष भर दिला आणि त्यांतल्या त्यांत कामविकाराच्या गूड व बोधरहित [Unconscious) मनोव्यापारांमुळें पुष्कळसें मनोविकार व शरीरविकार उत्पन्न होतात. तसेंच धर्म, काव्यें, कादंबऱ्या वगैरेंचें मूळ ( ऋषींच्या कुळाप्रमाणें ) फारसें शोधूं नये, कारण तेथें अनपेक्षितरीत्या अप्रिय अशा कामप्रेरणात्मक गोष्टी सांपडतील. अशा प्रकारचीं तत्त्वें त्यानें प्रतिपादिलीं म्हणून त्याच्यावर मोठा गहजब उडाला. पण त्याचा आणि जनतेचा फायदा असा झाला कीं, यामुळें त्याच्या तत्त्वाकडे लक्ष वेधलें गेलें आणि त्यांचा ऊहापोह होऊं लागला. वास्तविक फ्रॉईडनें बोधरहित कामव्यापाराबरोबर बोधरहित अहंभावव्यापार ( Ichtriebe, ege instincts ) मानला आहे. सर्वत्र व सर्वदा कामव्यापाराचेच नेणिवेंत किंवा जाणिवेंत खेळ चाललेले असतात असें तो म्हणत नाहीं. पण लोकांनीं आपली तशी गैरसमजूत करून घेतली, आणि त्याला कारण एवढेंच कीं, फ्रॉईडनें कामवासनेवर इतर वासनांपेक्षां विशेष भर दिला होता. आपल्या बोलण्यांतला व लिहिण्यांतला 'गोत्र-स्खलिता'दि चुका यांच्या बुडाशीं दाबलेल्या-दडपलेल्या-कामवासना कित्येक वेळां असतात; आपल्या स्वप्नांच्या द्वारें आपण सुप्त व गुप्त विषयवासनांची तुप्ति करून घेत असतो, तरुण-तरुणींना घेऱ्या ( Fits ) वगैरे येतात, त्याचें कारण म्हणजे कामविकारांची दडपादडपी; मातेचें पुत्रविषयक वात्सल्य म्हणजे कित्येक वेळां प्रच्छन्न कामप्रेम ( Oedipus complex ), तसेंच पित्याचें दुहितृविषयक वात्सल्य म्हणजेही प्रच्छन्न कामप्रेम ( Electra Complex ), इत्यादि गोष्टींचा फ्रॉइडच्या लेखांत वारंवार उल्लेख आल्यामुळें, ( त्यानें मागाहून कितीदां जरी

कंठशोष करून सांगितलें कीं, मी **सर्वत्र** व **सर्वदा** असा प्रकार असतो असें म्हणत नाहीं, तरी देखील ) फ्रॉइड हा कामवादी आहे असें लोकमत झालें. त्याचा दोष अगदींच नाहीं असें नाहीं, कारण प्रथम सार्वत्रिक भासेल असें धक्का देणारें विधान करावयाचें आणि मग त्याला अपवाद पुष्कळ आहेत असें सांगावयाचें, या पद्धतीमुळें गैरसमजाला जागा राहते. असो.

त्याचा एक पट्टशिष्य ॲडलर याला कामप्रेरणेपेक्षां अहंभावावर विशेष भर द्यावासा वाटला आणि अखेर गुरुपीठांतून बाहेर निघून निराळें पीठ त्यानें स्थापन केलें. हा एकच मतभेद आहे असें नव्हे. नेणीव आणि जाणीव यांमध्यें अत्यन्त भिन्नता आहे असें नव्हें, तर त्यांमधील भेद सापेक्ष आहे, जाणीवेमध्यें नेणिवेचा अंश असतो व नेणिवेमध्यें जाणिवेचा भाग असतो, असें ॲडलरचें म्हणणें; पण मुख्य भेद असा कीं, मानसशास्त्र हें जीवशास्त्राला जोडून जीवमात्रामध्यें जी अहंविकासाची अखंड व दुर्दम्य प्रेरणा आहे, तीच मानवजातीमध्यें प्रभावी आहे व कामवासना वगैरे या मूलभूत प्रेरणेचे अंकुर आहेत, असें ॲडलरनें प्रतिपादन केलें. कामवासनामूलक जे विकार दिसतात, तेही ' अहंवैशिष्ट्य '–स्थापनेचे विकृत प्रकार आहेत. फ्रॉइडनें प्रतिपादलेला पुत्रसंभोग-गंड ( Oedipus Camplex ) हा देखील स्वत्व–स्थापनेचा ( Will–to–Power चा ) एक सांकेतिक ( symbolic ) प्रकार असू शकेल. बरेचसे मानसिक व शारीरिक विकार हे सुप्त व गुप्त कामवासनेमुळें नव्हे, तर ' अहंवैशिष्ठ्या'ला ' न्यूनगंडा ' मुळें ( Inferiority Complex मुळें ) बाध येतो म्हणून उत्पन्न होतात, अशा प्रकारची मीमांसा करून फ्रॉइडनें ज्या गोष्टींना प्रधानत्व दिलें, त्याला ॲडलरनें गौणत्व दिलें आणि ज्यांना फ्रॉइडनें गौणत्व दिलें त्यांना यानें प्रधानपद दिलें, असा या दोघांमधील फरक आहे. युंग ( Jung ) या मनोगाहनी तत्त्ववेत्त्यानें सामुदायिक नेणीव ( The Collective Unconscious ) मानली, त्याचप्रमाणें माणसांमध्यें कांहीं अंतर्मुख किंवा अंतर्वृत्त ( Introvert ) आणि कांहीं बहिर्मुख किंवा बहिर्वृत्त ( Extravert ) असा भेद नजरेला आणून देऊन वरील मीमांसेंत भर घातली. इतरांनीं भीति, जिज्ञासा, लोभ वगैरे सहज प्रेरणा देखील दाबल्या–दडपल्या–जाऊं शकतात व त्या नेणिवेंतून आपला प्रभाव गाजवितात, हें नजरेला आणून देऊन फ्रॉइडच्या मनोगाहन मीमांसेला मूरडी घातल्या. आपणांस सध्या ॲडलरच्या

कार्याकडे लक्ष द्यावयाचें असल्यामुळें तें एक दोन परिच्छेदांमध्यें थोडक्यांत खालीं दिग्दर्शित केलें आहे.

ॲडलरनें आपल्या पंथाला ‘ व्यक्तिविशिष्ट मानसशास्त्र ’ ( Individual Psychology ) असें नांव दिलें आहे. त्याचें असें म्हणणें कीं, व्यक्तिमात्राचें विशिष्ट साध्य असतें तें त्याच्या जाणिवेमध्यें स्पष्ट व निश्चित स्वरूपांत जरी नसलें, तरी तें प्रभावी असतेंच असतें. हें साध्य सिद्ध होणें कठीण असतें, कारण व्यक्तिमात्रांत बहुधा कांहीं ना कांहीं तरी न्यून म्हणा, व्यंग म्हणा, उणीव ( Inferiority ) म्हणा, असते. या न्यूनाची, व्यंगाची किंवा उणिवेची भरपाई ( Compensation ) करण्याचा प्रयत्न प्रत्येक व्यक्ति करीत असते आणि सरळ मार्गाचे प्रयत्न केल्यास आपल्या व्यंगाची जाणीव त्या व्यक्तीच्या उन्नतीला उपकारक होते; पण कित्येक वेळां या व्यंगाचें पूरण किंवा त्याची भरपाई ( Compensation ) करतांना लपवा-छपवी, सारवा-सारव, बेफिकिरीचा आविर्भाव, किंबहुना त्या न्यून-व्यंगाचें अस्तित्व जणूं कांहीं आपल्यामध्यें नाहीं; इतकेंच नव्हे, तर तद्विरुद्ध गुण आपल्यामध्यें उत्कटत्यानें आहे असें दिमाखानें दाखविण्याची प्रवृत्ति, इत्यादि प्रकार मनोविकृतीमुळें दृष्टोत्पत्तीस येतात. विकृति उत्पन्न करणाऱ्या न्यूनाच्या-व्यंगाच्या-जाणिवेला किंवा तद्विषयक जाणीव सुप्त किंवा गर्भित असलेल्या नेणिवेला “ न्यून-गंड ” ( Inferiority Complex ) असें ॲडलरने म्हटलें आहे.

“ अधिक तें सरतें व न्यून तें पुरतें करून घ्यावें ” असें आपण विनयानें लोकांना म्हणतोच असें नाहीं, तर प्रत्येक व्यक्ति स्वतःही त्याच उद्योगांत असते. उदाहरणार्थ, डेमॉस्थेनिस हा प्रथम तोतरा होता, पण पुढें त्यानें हर प्रयत्न करून आपलें न्यून काढून टाकलें; इतकेंच नव्हे, तर तो पुढें सुप्रसिद्ध वक्ता म्हणून गाजला. सॅन्डो हा लहानपणीं अशक्त होता, पण त्यानें नाउमेद न होतां आपलें शरीरबल प्रयत्नपूर्वक इतकें वाढविलें कीं, आधुनिक बलभीम म्हणून तो प्रसिद्धीस आला. कांहीं स्त्रिया रूपांत सामान्य असतात, पण त्या व्यवस्थित पोषाख वगैरे करून म्हणा, किंवा सुस्वभावी वगैरे बनून आपली उणीव भरून काढतात व प्रेम नि आदर संपादन करतात. हा झाला सरळ मार्ग.

परंतु कित्येक वेळां मनुष्य सरळ मार्गाचा अवलंब न करतां दिसण्यांत सोपा असा एखादा वाममार्ग स्वीकारतो. उदाहरणार्थ, कांहीं स्त्रियांना

पुरुषांच्या अपेक्षेनें आपलें अबलात्व, किंवा आपलें भीरुत्व ध्यानांत आल्यावर त्या पुरुषी 'अरेरावी'वर झोड उठवूं लागतात आणि 'पुरुषी' समाजव्यवस्थेवर भलतीच टीका करूं लागतात; किंवा त्यांपैकीं कांहीं दुसऱ्या आपल्यामध्यें 'अबला'त्व-मुळीं नाहींच, आपण मुळींच भित्र्या नाहीं, असें उसनें धैर्य आणून, किंवा उसना 'पुरुषीपणा स्वीकारून लोकांना भासवूं पाहतात. स्त्रियांच्यावर होणाऱ्या सामाजिक अन्यायांविरुद्ध चळवळ करणाऱ्या सर्वच स्त्रियांबद्दल, किंवा पुरुषी पोषाख व वागणूक स्वीकारणाऱ्या सर्व स्त्रियांच्याबद्दल ही उपपत्ति लागू पडेल असें नाहीं. पण कांहींच्या बाबतींत ही उपपत्ति लागूं पडते यांत शंका नाहीं. मुलीला पाह्यला गेलं असतां ती एखादें वेळेस ऐटींत येऊन बसते व बेफिकीरपणें कांहीं तरी बोलूं लागते, त्यावेळीं त्या मनांत खरोखर गोंधळलेल्या व भ्यालेल्या असतात असें कांहींच्या बाबतींत तरी म्हणतां येईल.

हिंदूंचीं युरोपिअनांविरुद्ध किंवा मुसलमानांविरुद्ध वेळीं अवेळीं होणारीं चिडखोरपणाचीं भाषणें, तसेंच ब्राह्मणेतरांची ब्राह्मणांविरुद्ध चालणारी चळवळ, यांच्या बुडाशीं ( नेहमींच नव्हे तर ) कित्येक वेळां पोटांतला न्यूनगंड ( Inferiority Complex ) असतो. शाळेंतल्या कांहीं मुलां-मुलींची एखाद्या शिक्षकाच्या पक्षपातित्वाबद्दलची ओरड, त्याचप्रमाणें कांहीं शिक्षकांची मुलां-मुलींच्या अलीकडील, 'बेशिस्त' वर्तनाबद्दलचीही ओरड, यांचें मूळ ॲडलरच्या पद्धतीनें पाहूं गेलें असतां, त्या विद्यार्थ्यांच्या किंवा शिक्षकांच्या सुप्त न्यूनगंडांमध्यें कित्येक वेळां दिसून येईल. आपल्याबद्दल प्रेम किंवा आदर नाहीं, आपल्यामध्यें या भावना उत्पन्न करण्याची पात्रता नाहीं, हें मनांतल्या मनांत कांहीं माणसें ओळखून असतात आणि मग ती आपलें न्यून लोकांजवळ तर नाहींच, स्वतःजवळही मान्य न करतां दुसऱ्यावरती टेपर ठेवतात, व अशा रीतीनें आत्माभिमान कायम ठेवतात हेंही अनेक वेळां दिसून येतेंच ! निवडणुकींत पडल्यानंतर विरुद्ध पक्षानें लुच्चेगिरी केली असें मानणें, आपल्या काव्याची किंवा पुस्तकाची चहा झाली नाहीं म्हणजे लोकांत सदाभिरुचीच नाहीं असें समजणें, आपल्यांत लोकप्रिय होईल अशी वक्तृत्वकला नसली म्हणजे कांहीं तरी कोट्या करून लोकांना हंसविणें हें आम्हांला पसंत नाहीं, अशी आपली समजूत करून घेणें, गणितादि विषयांत गम्य नसलें म्हणजे असले 'रुक्ष' विषय अभ्यासणें म्हणजे कालापव्यय करणें असें स्वतःला भासविणें, अशा प्रकारांत

गुप्त व सुप्त न्यूनगंडानें, त्या त्या माणसाला चकविलें असतें आणि कोणीकडून तरी न्यूनाची भरपाई करून आत्माभिमान रक्षण करून घेण्याची अन्तरात्म्यानें व्यवस्था केली असते. असें सर्वत्र नसलें तरी कांहीं ठिकाणीं खरें असतें यांत शंका नाहीं.

आपलें न्यून किंवा आपलें व्यंग दुसऱ्यापासूनच नव्हे तर स्वतःपासूनही मनुष्य लपवूं पाहतो हें ध्यानांत धरलें पाहिजे. आणि असें करतांना तो अनेक युक्त्यांचा आणि हिकमतींचा उपयोग करून घेतो. उदाहरणार्थ, कित्येक वेळां तो आजारी पडतो आणि एरव्हीं आपल्याकडे लोकांचें लक्ष जें गेलेलें नसतें तें ओढून घेतों. त्याचप्रमाणें लोकांच्या सहानुभूतीची सुप्त इच्छा एरव्हीं तृप्त होत नाहीं असें लक्षांत आल्यावरही तो आजारी पडतो. त्याला घेऱ्या येऊं लागतात किंवा झोप येईनाशीं होते.

किंवा असेंच दुसरें कांहीं तरी होऊन तो लोकांच्या सहानुभूतीची आपली भूक शान्त करून घेतो. तरूण मुलींना घेऱ्या येतात, त्यांच्या बुडाशीं सुप्त कामवासना कित्येक वेळां असतें असें फ्रॉइड म्हणतों व तें खरेंही आहे; पण ॲडलकर हें कबूल करून त्यापैकीं कांहीं व्यक्तींच्या बाबतींत ( कामवासना नव्हे, तर– ) सहानुभूतीची अपेक्षा, लोकांचें लक्ष वेधून घेण्याची इच्छा, आपलें घरांतलें मानाचें स्थान कायम ठेवण्याची अपेक्षा, इत्यादि सुप्त वासनांमुळें त्या घेऱ्या येतात, असें म्हणेल.

ॲडलरचें हें मनोगाहनतत्व व्यक्तीनें ध्यानांत धरल्यास पुष्कळ हितकारक होईल. व्यक्तिमात्रानें आत्मनिरिक्षण करावें आणि आपलें न्यून ओळखून तें न्यून मुळीं नाहीं अशी आत्मवंचना करून न घेतां ‘ हें न्यून तर आहे, तें दूर करण्याचा खरा उपाय शोधूं या ’ असा विचार करावा. खरा प्रकार डॉक्टरांपासून लपवूं नये हें तर खरेंच. तथापि, हें एक वेळ चालेल, पण स्वतःपासूनच मनुष्य आपला रोग लपवूं लागला तर त्यापासून फार हानि आहे. स्वतःचें व्यंग किंवा स्वतःचा दोष ध्यानांत आला म्हणजे निम्में काम होतें. तें व्यंग किंवा तो दोष दूर होण्यासारखा असेल तर तसा प्रयत्न करावा; नसेल, तर स्वतःची फसवणूक करून भलताच आव आणावयाचा किंवा भलत्याच मार्गानें स्वतःचा अभिमान किंवा मोठेंपणा, किंवा वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करावयाचा, यानें कोणताही कार्यभाग साधत नाहीं.

शिक्षणशास्त्रांतही ॲडलरच्या तत्त्वाचें विशेष महत्त्व आहे. मुलांना शिक्षण देतांना त्यांचा कल कोणीकडे आहे, त्यांच्या उणिवा काय आहेत, त्यांचा अंतरात्मा काय साध्य करण्याकरतां धडपडतो आहे, इकडे आईबापांनीं व शिक्षक–शिक्षकिणींनीं लक्ष द्यावें. तसेंच, मुलगे व मुली खोड्या, हट्ट, उद्धटपणा, मग्रुरी वगैरे करूं लागल्यास किंवा त्यांना घेऱ्या वगैरे येऊं लागल्यास, या दोषाच्या मुळाशीं खरें काय आहे, कोणती उणीव तो लपवूं पहात आहे, किंवा कोणत्या उणीवेची तो भरपाई करून घेऊं पहात आहे, याचा पालकांनी व शिक्षकांनीं बारकाईनें शोध घ्यावा व तदनुसार योग्य ती व्यवस्था करावी.

समाजशास्त्रज्ञांनीं देखील हें तत्त्व ध्यानांत धरल्यास पुष्कळ समाजसुधारणा होऊं शकेल. समाजांतलि अंतःस्थ भांडाभांडी, मारामाऱ्या वगैरे उगीचच्या उगीच अकारण होत नाहींत. वर्गांना, जातींना वगैरे पूर्ण विकास करून घेण्यास संधि मिळत नाहीं, त्यांच्या स्वाभिमानास धक्का बसत असतो, आपण कोणी तरी आहोंत, अशी दुर्दम्य भावना मानवमात्रांत असते. तिच्या तृप्तीला पुरेसा वाव मिळत नाहीं, हीं तत्त्वें लक्षांत घेऊन होतां होईल तों सर्व व्यक्तींच्या आत्मविकासास पूर्ण वाव मिळेल, कोणत्याही वर्गाला किंवा जातीला जन्मतात किंवा अनिवार्य हीनतेचा छाप मारला जाणार नाहीं, अशी समाजरचना करण्याचा राजनीतिज्ञांनीं प्रयत्न केल्यास समाजांतील कांहीं कलहबीजें तरी नष्ट होतील, यांत शंका नाहीं.

## नीति आणि राजनीति

‘ नीति ’ हा शब्द संस्कृतांत ‘ राजनीति ’ या अर्थानें बहुधा योजिलेला असतो. तथापि, ‘कार्य’ कोणतें, ‘अकार्य’ कोणतें, कर्तव्य कसें ठरवावें, इत्यादि प्रश्नांचा ऊहापोह करणारें जें शास्त्र, त्याला मराठींत ‘ नीति-शास्त्र ’ म्हणण्याचा प्रघात आहे. नीतीचा आणि राजनीतीचा संबंध निकट आहे; लोकांच्या व राज्यकर्त्यांच्या नीतिविषयक कल्पना, व व्यवहारांत दिसून येणारें त्यांचें वर्तन यांना अनुरूपच त्यांच्या राजनीतिविषयक कल्पना व त्यांचें तद्विषयक वर्तन असतें. जो मनुष्य रोजच्या व्यवहारांत आपल्या शेजाऱ्याला बिनदिक्कत फसवितो, त्याला राजकारणांत दुसऱ्या राष्ट्राला फसविण्याचें कांहीं वाटणार नाहीं. व्यक्तिविषयक नीतीवर राजनीति जशी अवलंबून असते, तशीच राजनीतीवर व्यक्तिनीतिही अवलंबून असते, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. ‘ यथा राजा, तथा प्रजा ’ या म्हणण्यांत बराच सत्यांश आहे. राजा ज्याप्रमाणें प्रजेला शिक्षण देईल, त्याप्रमाणें प्रजेचें ज्ञान असणार, व त्याप्रमाणेंच वर्तनही असणार. आईबापांचें जसें वर्तन व शिक्षण, तसेंच मुलांचें. याच न्यायानें नागरिकांना जें शिक्षण मिळतें, ज्या विचारांचें बाळकडू त्यांना शाळांच्या व इतर संस्थांच्या द्वारें पाजलें जातें, त्यावर त्यांची नीतिमत्ता बऱ्याच अंशानें अवलंबून असते. ॲरिस्टॉट्ल हा आपल्या राजकारणावरील ग्रंथांत म्हणतो कीं, मनुष्याची नीतिमत्ता त्याच्या [ १ ] मूळ स्वभावावर म्हणजे प्रकृतीवर [ २ ] संवईवर व [ ३ ] बुद्धिविकारावर अवलंबून असते. पैकीं मूळ स्वभाव इहजन्मीं तरी बदलणें शक्य नाहीं. त्याचें फार तर संवईनें व विचारानें नियमन करतां येईल. संवई कोणत्या लागाव्यात किंवा लागूं नयेत, तसेंच बुध्दिविकास किती व कोणत्या दिशेनें व्हावा, हें राजकीय संस्थांच्या अधीन कांहीं अंशानें असतेंच असतें. दुसरी अशी एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, नीतिमत्ता ही परिस्थितीवर बरीच अवलंबून असते.

दारिद्य किंवा दास्य आलें असतां देखील आपलें 'सत्त्व न सोडणारा हरिश्चंद्रासारखा श्रेष्ठ पुरुष केव्हांही व कुठेंही विरळाच असणार. प्रतिकूल परिस्थितींत उच्च नीतितत्त्वें वर्तनांत आणणें हें काम सोपें नाहीं. साधारण माणसांची अशी स्थिति असते कीं, त्यांच्या नीतिकुंभाला परिस्थितिरूपी कुंभारीण जो आकार देईल तोच आकार तो स्वीकारतो. राष्ट्रांत बरेच दिवस जिकडे तिकडे लूटालूट खून व बेबंदपादशाही असतांना दुसऱ्याचें धन बिनधास्तपणें लाटण्याची संधि आल्यावर साधारण मनुष्य तें खुशाल लाटून बसेल व आपल्या कृत्याबद्दल त्याला विशेष वाईटहि वाटणार नाहीं. 'इतर लोक तर दरोडे घालतात व खून देखील करतात. त्यांच्या मानानें माझें कृत्य कांहींच नाहीं' असेंच उलटे तो म्हणेल, ज्या राष्ट्रांत कोणत्याहि मनुष्याला प्रामाणिकपणें वागल्यास आपल्या योग्यतेप्रमाणें काम मिळणें कठीण पडत नाहीं, त्या राष्ट्रांतले स्वाभिमानी नागरिक आपल्या वरिष्ठांशीं पुढें पुढें करणार नाहींत व त्यांनीं केलेले अपमान पुष्पांजलीप्रमाणें समजून स्वस्थ बसणार नाहींत. पण ज्या देशांतील लोकांना स्वदेशांतही मान नाहीं, मग इतर देशांत कोठला; ज्या देशांत मोठमोठे उद्योगधंदे, कारखाने, व्यापार-उदीम वगैरे कांहीं नसल्यामुळें 'नोकरी' रूपी नवरी वरण्यास लोक एका पायावर तयार असतात, व तिनें घातलेल्या रुपेरी बिडीचा खणखण ध्वनि ऐकून जे लोक आपणांस धन्य मानतात; ज्या देशांत एक नोकरी गेली असतां दुसरी मिळणें दुरापास्त असतें, त्या देशांतील लोकांची स्वाभिमानाची कल्पना अन्य व उच्चतर स्थितींत असलेल्या राष्ट्रांतील लोकांच्या कल्पनेहून भिन्न असणें अगदीं साहजिकच आहे. नीतिमत्तेच्या वृक्षाचा विकास राजकीय वातावरणाला अनुसरून कमी अधिक परिपूर्ण, उच्च व उज्वल स्वरूप पावत असतो. ग्रीस देश दास्यांत असतांना ग्रीक लोकांमध्यें क्षुद्र वृत्तीच्या दासजनांचे सर्व दोष भरून राहिलें होते, असें मेकॉलेनें म्हटलें आहे. इंग्लंडसारख्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या वातावरणांत वाढलेल्या माणसांची नीतिमत्ता आणि लहानपणापासून जनानखान्यांत कोंडून राहिलेल्या एखाद्या गुलामाची नीतिमत्ता यांमध्यें जमीनअस्मानाचें अन्तर न पडेल तरच नवल. नीतिशास्त्र हें नीतिविषयक ध्येय ठरवितें. पण या ध्येयाचा परिपोष होईल, आणि तें लोकांच्या हृदयांत वास करीत राहील, इतकेंच नव्हे तर वर्तनांतहीं बऱ्याच अंशानें दृग्गोचर होईल अशा रीतीची व्यवस्था सांगणें हें राजनीतिशास्त्राचें काम आहे.

हाच अभिप्राय मनांत आणून ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्यानें आपल्या नीतिशास्त्रावरील सुप्रसिद्ध ग्रंथांत, ' मी या ग्रंथांत ज्या नीतितत्त्वाचें विवरण केलें आहे, तें ग्रीक संस्कृतीस अनुसरून आहे. त्यांचें संगोपन विशिष्ट राज्यपद्धतीच्या व शिक्षणपद्धतीच्या द्वारेंच होण्यासारखें आहे, असें म्हणून, नंतर मग या विशिष्ट पद्धतींचा उहापोह करण्याकरितां राजनीतिशास्त्रावरील आपल्या ग्रंथास त्यानें प्रारंभ केला आहे.

नीतीचा व राजनीतीचा अशा प्रकारचा निकट संबंध आहे. नीतिविषयक कल्पनांवर राजकारणांतील धोरणें बरींच अवलंबून असतात; उलटपक्षीं, राज्यपद्धतीमुळें नीतिविषयक कल्पनामध्येंहि फरक उत्पन्न होऊं शकतो. नीति व राजनीति या परस्परांना पोषक व दूषकहि होऊं शकतात. त्यांचें हें परस्परालंबित्व हा जिव्हाळ्याचा अथवा जिवलग संबंध–हें तादात्म्य, मनांत आणलें असतां दोन्ही अर्थांचा बोध करणारा संस्कृतांतील नीतिशब्द फारच सूचक व मार्मिक आहे, असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

राज्यव्यवस्था व शिक्षणपद्धति यांचा आणि नीतिविषयक कल्पनांचा व आचारांचा संबंध कसा निकट आहे, हें स्पार्टा देशाच्या उदाहरणावरून नीट कळून येईल. लायकर्गस या स्पार्टन स्मृतिकारानें जो मार्ग त्या देशाकरितां आंखून ठेविला तो अंमलांत आल्यावर [ १ ] अशक्त मुलाला ठार मारून टाकणें, [ २ ] चोरी करणें, [ ३ ] परस्त्रीशीं संबंध ठेवणें इत्यादि गोष्टींविषयींचीं सामान्य बंधनें त्या देशांत शिथिल झालीं. परंतु लढाईत शत्रूला पाठ दाखविणें, पैशाचा लोभ धरणें, इत्यादिकांची निंद्यताहि त्याच मानानें अधिक वाढली. परदेशगमनाविरुद्ध बंधनें आपल्या प्राचीन स्मृतिकारांनीं जीं घालून ठेवलीं त्यांतील बीज तरी हेंच कीं, परकी संस्कृतीच्या वातावरणांत फार दिवस राहिल्यानें स्वकीय संस्कृतीनें मनांत बिंबविलेल्या नीतितत्त्वांचा रंग पालटतो. सामान्य मनुष्यानें परकी संस्कृतिला दुरूनच नमस्कार केलेला बरा. अलीकडील उदाहरण घ्यावयाचें म्हणजे जर्मनीचें घ्यावें. जर्मनीच्या कैसराला किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांना ज्या प्रकारची लोकांत नीतिमत्ता पाहिजे होती, त्याप्रमाणें तेथें शिक्षणव्यवस्था करण्यांत आली, व पुस्तकांच्याद्वारें व्यक्तींच्या व संस्थांच्या उदाहरणांच्या द्वारें, या नीतिमत्तेला पोषण देण्यांत आल्यानें त्या ' नीतिमत्तेला ' त्यांना इष्ट असें स्वरूप प्राप्त झालें. आतां उलटपक्षीं नीतिविषयक कल्पनांचा राजकारणावर कसा परिणाम होतो याविषयींचीं पुराणांतील व इतिहासांतील उदाहरणें फार बोधप्रद आहेत. पाण्डवांनीं राज्य सोडलें–कां, तर वडील भावानें द्यूत

खेळतांना राज्याचा पण लावला होता व दिलेलें वचन मोडणें पाप वाटत होतें. हरिश्चंद्रानें तर स्वप्नांत दिलेलें स्मरून आपलें राज्य एका ऋषीच्या स्वाधीन केलें! पुराणांतील हीं उदाहरणें एका बाजूला ठेवून इतिहासाकडे वळलें असतां असें दिसून येतें कीं, धनत्याग देखील करून स्वदेशाची उन्नति करूं पहाणारे जसे प्रत्येक देशांत कांहीं नरश्रेष्ठ निघाले, तसे दुसऱ्या देशावर स्वारी करून जबरदस्तीनें लूट घेऊन जाणारेहि त्याच देशांत व त्याच काळीं निघाले आहेत. म्हणजे याचा अर्थ असा कीं, बहुतेक राष्ट्रांतील नीतिमत्ता स्वदेशांत सत्य व न्याय यांना मान देते, पण देशाबाहेर 'बळी तो कान पिळी' हाच 'न्याय' योग्य ठरविते!

नीति व राजनीति यांचा हा संबंध ध्यानांत ठेवला म्हणजे स्वराज्याची मागणी करणारे जे आपण, त्यांपैकीं बहुतेकांचें कोठें चुकतें व आपल्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावणाऱ्या वर्गाचें कोठें चुकतें, हें समजून येईल. पर्जन्यकाल आल्यावर हिरवें गवत जसें उगवतें, तसें स्वराज्य कांहीं आपोआप देशांत उगवत किंवा फुलत नाहीं. तें उच्चतम नीतिमत्तेवर, श्रेष्ठ धारिष्टावर, फलाविषयीं अनपेक्ष असलेल्या आत्मत्यागावर–सर्वस्व–त्यागावर–अवलंबून आहे हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. पण आम्हांस यावच्चंद्रदिवाकरौ स्वराज्याला अपात्र ठरविणारांनीं व **आशा कालवतीं कुर्यात्** या न्यायानें चालणाऱ्या धूर्त लोकांनींही हें मनांत आणावें कीं, स्वराज्यप्राप्तीशिवाय आमची नीतिमत्ता पूर्ण विकास पावणें शक्य नाहीं. झाडाखालीं झाड चांगलें वाढत नाहीं. आपल्या देशांतील सुप्रसिद्ध शोधक डॉक्टर जगदीशचंद्र बोस यांनीं प्रयोगांनीं असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, ज्या झाडांची सुखसोईच्या मंडपांत (Hot-house) खाण्यापिण्याची वगैरे अतिशय बरदास्त ठेवून आयतोब्यासारखें ठेवण्यांत येतें, तीं झाडें जीवनकलहांत निरुपयोगी ठरतात; उलटपक्षीं ज्या झाडांना खुली हवा देण्यांत येऊन ज्यानें त्यानें आपली सोय आपण लावून घ्यावी अशा रीतीनें वागविण्यांत येतें, तीं झाडें मजबूत व सामर्थ्यवान् होतात. हाच न्याय राष्ट्रासंबंधानें सर्वतोपरी खरा नसला, तरी त्यापासून बराच बोध घेण्यासारखा आहे. राष्ट्राला प्रत्येक बाबतींत दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय लागली कीं, तें कमजोर होणारच. त्यानें आपल्या पायांवर उभें रहावें, अशी इच्छा असल्यास त्याला खुली हवा द्यावी व त्याचे हातपाय खुले करावेत. नीति आधीं सुधारा, मग राजनीतिपद्धति आपोआप सुधारेल, हें तत्त्व तर खरेंच आहे. पण परावलंबित्वाच्या सार्वत्रिक दाट छायेंत आमच्या नीतिमत्तेला चांगलीच पालवी फुटणार नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे!

## मी आणि नवमतवाद

'नवमतवाद' हा शब्द अनेक लोक अनेक अर्थी वापरतात, म्हणून त्याचें लक्षण करणें व अर्थात् त्यावर टीका करणेंहि सगळ्यांनाच कठिण होऊं लागलें, म्हणून 'नवा मनू'च्या संपादकांना मीं सूचना केली कीं, महाराष्ट्रांतील विचारी लोकांकडून यावर लेख मागवून तो (किंवा ती)-कोणत्या अर्थानें नवमतवादी आहे आणि कोणत्या अर्थानें नाहीं हें स्पष्ट करून घ्यावें म्हणजे कालान्तरानें 'नवमतवाद' याचा अर्थ निश्चित होईल, निदान कोण कोणत्या अर्थानें नवमतवादी आहे व नाहीं हें स्पष्ट होईल. या सूचनेला अनुसरून मीं कोणत्या अर्थानें कितपत नवमतवादी आहे हें मीं आपल्या लेखांत निःसंदिग्धपणें सांगितलें. 'नवमतवाद' याचा अर्थ इतर लोक काय समजतात हें सांगण्यांचा हेतु नव्हता. मी आगरकरी पंथांतला विवेकवादी (Rationalist) आहें आणि अशा माणसाला नवमतवादी म्हणावयाचें असल्यास मी तसा आहें, नसल्यास नाहीं. हें या लेखांत स्पष्ट केलें आहे.

इतकेंच नव्हें, तर दोन प्रमुख वादग्रस्त सामाजिक व राजकीय प्रश्नांसंबंधीं आगरकरी पंथांतल्या विवेकवादी मनुष्याचें कसें धोरण असेल हेंहि उदाहरणादाखल सांगितलें आहे.

नवमतवादासंबंधीं नाना मतांचा गलबला आहे असें रामशास्त्री म्हणतात; व या शब्दाची व्याख्या व व्याप्ति ठरविणें आवश्यक आहे असें ते लोकांना सांगतात. नवमतवादासंबंधींचें मीं आपलें स्वतःचें धोरण सांगितलें असतां त्यावर टीका करतांना स्वतःचें मत व धोरण गुलदस्तांत घेऊन नाना मतांच्या

गलबल्यांत ते भर घालीत आहेत, का या गलबल्यांतून मार्ग काढण्यास मदत करीत आहेत ते आधुनिक 'रामशास्त्री' यांनींच ठरवावें !

( २ ) कांहीं 'विश्वकुटुंबवादी' अथवा नवमतवादी लोक खाजगी मालमत्ता अजिबात नष्ट करावी असें जें म्हणतात, त्याविरुद्ध मीं आपलें मत उपरिनिर्दिष्ट लेखांत व्यक्त केलें आहे. यावर टीका करतांना रामशास्त्री म्हणतात; "वामनरावजींना आर्थिक विषमता चालते; पण व्यक्तिस्वातंत्र्यनाश मात्र बिलकुल चालत नाहीं." मला आर्थिक विषमता नको आहे हें मीं आपल्या लेखांत स्पष्टपणें म्हटलें असतां ती मला चालेल असें मी म्हटलें आहे, असें भासवणें याला काय म्हणावयाचें ? तसेंच, व्यक्तिस्वातंत्र्यनाश मला बिलकूल चालत नाहीं असें मीं कोठें म्हटलें आहे ? समाजहिताकरितां व्यक्तिस्वातंत्र्य कांहीं बाबतींत विशिष्ट मर्यादेपर्यंत नियमित होतें व व्हावें असें मीं मानतों; पण कांहीं नवमतवाद्यांना जी 'मजूरशाही' प्रिय व पूज्य आहे तींत वाजवीपेक्षां फाजील व्यक्तिस्वातंत्र्यनाश होईल अशी मला भीति वाटते, एवढेंच माझें म्हणणें होतें. भांडवलशाहीपेक्षां मजूरशाहीमध्यें अधिक व्यक्तिस्वातंत्र्य असेल असें जर कोणी सिद्ध करून देईल, तर मी त्या मताचा अनुयायी बनेन. माझें समाधान होईपर्यंत मला माझी भीति व्यक्त करणें क्रमप्राप्तच आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, सध्यांच्या भांडवलशाहींतील आर्थिक विषमता मुळींच कमी करूं नये. उलट माझें मत असें आहे कीं, जबर 'मयत-कर' (Death duties) ठेवून व इतर मार्गांनीं ही विषमता कमी करावी.

( ३ ) तपशिलांत न शिरतां तत्त्वदृष्ट्याच जर विचार केला तर 'मजूर-शाही'मध्यें व्यक्तिस्वातंत्र्य सध्यांपेक्षां कमी असेल असें मानण्यास आधार आहे. कांहीं नवमतवाद्यांना 'वर्ग-कलह' कांहीं अवधीपर्यंत तरी उत्पन्न करून ( किंवा वृद्धिंगत करून ) त्यांची ध्येयात्मक 'विश्वकुटुंबव्यवस्था' नांदूं लागावी. एतदर्थ जबरदस्तीनें 'मजूरशाही' स्थापावी असें वाटतें. ही विश्वकुटुंबव्यवस्था नांदूं लागे पर्यंत तों तरी बहुसंख्याक ( किंवा स्वाभिमान जागृत झालेल्या व आत्मबलाचा प्रत्यय आलेल्या सामर्थ्यवान् अल्पसंख्याक ) मजुरांच्या हातांत सत्ता जावी अशी त्यांची इच्छा दिसते. या मजूरशाहींत 'लेनिन'सारखा एखादा पुढारी मिळाला तर ठीक; नाहीं तर अनवस्थाप्रसंग येण्याचाच संभव अधिक. कारण

आतांपर्यंतचे मजूर समाजहित ओळखण्यास व ते साधण्यास पात्र आहेत असें वाटत नाहीं व पुढील ४०-५० वर्षांत ते होतील अशी आशाहि वाटत नाहीं.

(४) कांहीं आक्षेपक येथें विचारतील : तत्त्वदृष्ट्या जर पहावयाचें तर ध्येयात्मक मजूरशाही कां विचारांत घेत नाहीं ? ध्येयात्मक मजूरशाहींत कोणी कोणावर जुलूम करीत नाहीं, सगळे लोक आपआपलें काम मनापासून करीत आहेत, सगळेजण समाजहिताकरितां स्वार्थाचा त्याग करीत आहेत, वगैरे वगैरे प्रकारचें रम्य चित्र काढतां येईल, व ती व्यवस्था कोणालाहि मान्य व पूज्य वाटणारच; पण यावर उत्तर असें:—(अ) कोणती तरी ध्येयात्मक 'शाही'च विचाराकरितां घ्यावयाची तर ध्येयात्मक भांडवलशाहीचें असेंच उत्तम चित्र रंगवितां येणार नाहीं कां ? (आ) भांडवलशाहीचें आद्य तत्त्व व्यक्तिस्वातंत्र्य आहे; मजूरशाहीचें तसें नाहीं. मजूरशाहींतहि व्यक्तिस्वातंत्र्य असूं शकेल, पण हीं केवळ शक्यता आहे. भांडवलशाहीचें तें आद्य तत्त्व आहे. अर्थात व्यक्तिस्वातंत्र्य असण्याचा संभव मजूरशाहीपेक्षां भांडवलशाहीत अधिक आहे असें केवळ तात्त्विक व व्यवहारनिरपेक्ष अनुमान (Presumption) निघतें. (इ) बरें, व्यवहाराकडे पहावयाचें म्हणजे सध्यांच्या रशिआकडे नजर जाते. तेथें व्यक्तिस्वातंत्र्य अधिक आहे काय ? एकच उदाहरण घ्यावयाचें म्हणजे वाङ्मय व कला हीं विशिष्ट प्रकाराचींच असावींत अशा प्रकारची जबरदस्ती कांहीं काळपर्यंत तरी तेथें होतीच ना ? ही जबरदस्ती पुढें शिथिल झाली ही गोष्ट वेगळी; पण पुढें ती जन्माला येणार नाहीं, हें कोणी सांगावें ? भांडवलशाहींतहि जुलूम-जबरदस्ती पुष्कळच आहे, हें भारतीयांना सांगायला नकोच. येथें रामराज्य आहे आणि रशियांत रावणशाही आहे असें सुचवायचे नाहीं. **खरा प्रश्न व्यक्तिस्वातंत्र्याच्या सापेक्ष संभवाचा आहे.** हा सापेक्ष संभव मजूरशाहींत अधिक आहे असें दाखविल्यास ती शाही• स्वीकारण्यास हरकत नाहीं. माझ्या मतें भांडवलशाहीचें हल्लींचें स्तोम पुष्कळ कमी केल्यास, मजूरशाहीच्या शेवटल्या टोंकापर्यंत न जातांहि सध्यांची स्थिति सुधारून व्यक्तिस्वातंत्र्याचा सापेक्ष संभव वाढविणें शक्य आहे.

(५) विवाहसंस्थेंत सुधारणा पुष्कळ केल्या पाहिजेत : प्रौढविवाह, प्रेम विवाह, मिश्र विवाह, यांत कांहीं गर्हणीय नाहीं. ( भिन्न धर्मीय-विवाहहि अपवादात्मक प्रसंगीं गर्हणीय नाहींत. ), पण विवाह संस्थेचे पावित्र्य संभाळले पाहिजे,

अशा प्रकारचीं माझीं मतें मीं अनेकदां बोलून दाखविलीं आहेत व त्या भाषणांचे कांहीं पत्रांत रिपोर्टहि आले आहेत. 'नवा मनू'मध्येंहि हींच मतें मीं दिग्दर्शित केलीं होतीं व आपल्या समाजांतील विवाहसंबंधीं चालीरीतींत, मनांत, वृत्तींत व धोरणांत पुष्कळ बदल व्हावा असें मानणारा म्हणून मला नवमतवादी म्हणावयाचें असल्यास म्हणावें; तसेंच विवाहसंस्थेचें पावित्र्य मानणारा म्हणून 'जीर्णमत-वादी' असें मला म्हणावयाचें असल्यास तसें मला म्हणावें, असें मी सूचित केलें होतें. प्रो. र. धों. कर्वे यांनीं 'नवा मनू' मध्यें एतद्विषयक माझे मुद्दे 'साधार खोडले' आहेत असें रामशास्त्री म्हणतात. प्रो. र. धों. कर्वे यांचीं मतें 'रामशास्त्री' यांना मान्य आहेतच, असें यावरून निश्चित अनुमान निघत नाहीं. त्यांनीं बुरख्यांतूनच कां होईना एतद्विषयक नवमतवादा-बद्दलचीं त्यांचीं मतें स्पष्ट केल्यास या वादाची 'व्याप्ति व व्याख्या' त्यांना जी पाहिजे आहे ती सुलभ होण्याचा संभव आहे. प्रो. र. धों. कर्वे यांच्या टीकेला आजच उत्तर देण्याची घाई करण्याचें कारण नाहीं असें वाटत असल्या-मुळें तें देत नाहीं; पण त्यांचें उत्तर जितकें सडेतोड आहे, तितकेंच तें विचारार्ह आहे व विवाहविषयक आत्यंतिक मतेंहि औचित्यभंग न करितां प्रदर्शित करतां येतात हें त्यांवरून दिसून येतें, एवढें मात्र आनंदानें नमूद करून ठेवतों.

## फ्रायड आणि कामवासना

"मनुष्यमात्रांत-विशेषेंकरून तरुणतरुणींत-कामवासना असतात, त्या दाबल्यादडपल्या असतां शारीरिक आणि मानसिक दोष उत्पन्न होतात, तेव्हां कामवासनेची तृप्ति करून घेण्यास अडचणी उत्पन्न करणारी समाजघटना वाईट. फ्रायड्च्या मानसशास्त्राच्या दृष्टीनें पाहतां नीतिनियम हे जाचक आणि घातुक आहेत," इत्यादि प्रकारच्या कल्पना-कुकल्पना-आजकाल कांहीं लोकांच्या मनांत अस्पष्टपणें घोळत असतात, आणि त्यांचें प्रतिबिंब वाङ्मयांत पडत असते. म्हणून याविषयासंबंधीं फ्रायड् वगैरे मनोगाहनशास्त्रज्ञांची ( Psycho-analysts ची ) खरी भूमिका काय आहे हें या लहानशा लेखांत थोडक्यांत सांगण्याचें योजिलें आहे.

पहिल्या प्रथमच हें सांगून टाकलें पाहिजे कीं, फ्रायड् हा नीति-नियमांचें उल्लंघन करावें हें सांगत नाहीं. कांहीं शारीरिक किंवा मानसिक रोग कसे उत्पन्न होतात हें तो सांगतो; त्यांचें निवारण नीति-नियमांना बाजूस सारून करावें किंवा नाहीं, हें सांगणें मानसशास्त्रज्ञ या नात्यानें तो आपल्या क्षेत्राबाहेरचें आहे असें समजतो.

इतकेंच नव्हे तर, तो जे उपाय मानसशास्त्रज्ञ या नात्यानें सुचवितो ते नीति-नियमांना धरून आहेत आणि पोषक आहेत.

याहूनहि पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, नीतिनियम झुगारून देणें हा मानसिक रोगनिवारण्याचा मार्ग नव्हे. उलट तो ( केवळ नीतिशास्त्राच्याच नव्हे तर ) मासनशास्त्राच्या दृष्टीनें चुकीचा आणि घातुक ठरेल.

*    *    *    *

### सुखलालसा व औचित्यविचार

सुसंस्कृत समाजांतील माणसांमध्यें तीं माणसेंच असल्यामुळें, कामवासना असते आणि ती फार प्रबळ असते; इतकेंच नव्हे तर, ती नाना तऱ्हेचीं सोंगें घेऊन आपणाला भुलवीत-नाचवीत असते, इत्यादि गोष्टी फ्रॉयड्नें जोरानें प्रतिपादिल्या खऱ्या; पण त्याला सुशिक्षित समाजांत ध्येयें, धर्म, नीति, औचित्याविचार, वगैरेंचेंहि अस्तित्व मान्य आहे. मनुष्यमात्राला सुख तर पाहिजेच आहे; पण औचित्यविचारहि त्याच्यामध्यें असतो; म्हणून मन गोंधळांत पडतें, असें फ्रायड म्हणतो. मानवी मनांत सुखलालसा ( Principle of Pleasure ) आणि औचित्य-विचार ( Principle of Reality ) यांमध्यें पुष्कळ वेळां लढा उत्पन्न होतो; लढा उत्पन्न झाला म्हणजे कित्येक वेळां आपण अनुचित अशा लालसेला दाबून टाकतों. पण ही बेटी अशी वस्ताद असते कीं, किती दडपली तरी ती मरत नाहीं,—कोंपऱ्यांत दडून राहते आणि तेथून आपणांला नकळत आपल्या विचारांना आणि भावनांना मोह घालून आपला कार्यभाग उरकून घेते. नीतिदृष्ट्या किंवा औचित्यदृष्ट्या विशिष्ट कामवासनेला आपल्या मनांत थारा द्यावयाचा नाहीं असें एखाद्यानें किंवा एखादीनें ठरविलें, तरी ती वासना नेणिवेच्या गुहेंत ( in the unconscious ) लपून बसेल आणि अज्ञातवासांत असली तरी तेथून हरतऱ्हेचीं सूत्रें हलवून, विचार-विकारांत फंदफितुरी करील; आणि नानातऱ्हेचीं सोंगें घेऊन, स्वतः नामानिराळी राहून, आपली तृप्ति करून घेईल. स्वप्नें आणि मनोराज्यें यांतील मनाचा स्वैर वाटणारा विहार पुष्कळ वेळां नेणिवेंत लपलेल्या कामवासनेचा बहुरूपी नाच असतो. ( 'ब्रॅन्डीच्या बाटलीं'तील बगारामाच्या स्वप्न-प्रसंगांत या मानसशास्त्रीय तत्त्वाचा रा. अत्रे यांनीं चांगला आविष्कार केला आहे. ) नेणिवेतलीं कामवासना कित्येक वेळां धार्मिकतेचीं सोंवळीं वस्त्रें परिधान करील; व्रतवैकल्यांत आनंद मानील; पूजेंत-अर्चेंत वेळ दवडील; प्रार्थनेंत-जपजाप्यांत, मंत्रघोषांत तन्मय होईल; ईश्वरकथेचें श्रवण, कीर्तन, मनन; इतकेंच नव्हे तर, आत्मनिवेदन म्हणजे आत्मार्पण हें जीवितार्चे ध्येय मानील, परंतु हें सर्व सोंग असतें. आणि मौज अशी कीं, हें सोंग इतकें बेमालूम असते आणि नटनटी सोंगाशीं इतक्या तादात्म्य पावतात कीं, हें सोंग आहे हें त्यांचें त्यांना देखील ध्यानांत येत नाहीं ! नेणिवेंत दडलेली कामवासना क्वचितप्रसंगीं विविध कलानिर्मितीच्या किंवा कलाजन्य आनंदोप-

भोगाच्या द्वारें आपली तृप्ति करून घेते. कविनिर्मित नायकनायिकांचे विविध विलास वर्णन करण्यांत किंवा ते नाटक, बोलपट इत्यादिकांच्या द्वारें पाहण्यांत आनंद होतो, त्याच्या मुळाशीं कित्येक प्रसंगीं तरी सुप्त-गुप्त कामवासना असते यांत शंका नाहीं. सिनेमांच्या चालकांना हें तत्त्व माहीत असतें. म्हणून ते प्रेक्षकांना विशिष्ट प्रकारचा नयनानंद आणि श्रवणानंद देण्याची व्यवस्था करीत असतात हें सर्वश्रुतच आहे.

*            *            *            *

कामवासना दाबून दडपून टाकली असतां शारीरिक आणि मानसिक विकृति उत्पन्न होत असतात हें फ्रायड्नें अनेक उदाहरणें देऊन सिद्ध केलें आहे. घेऱ्याफिट्स-येणें, विशिष्ट प्रकारच्या रंगाबद्दल, वस्तूबद्दल, व्यक्तीबद्दल, कृतीबद्दल वगैरे भलताच विद्वेष उत्पन्न होणें, भलतेच कायमचे ग्रह उत्पन्न होणें, हरतऱ्हेचीं वेडें लागणें, वगैरेच्या मुळाशीं कांहीं तरी कामविषयक विलक्षण अनुभव किंवा आकांक्षा असतात, असें पुष्कळ उदाहरणांवरून दिसून आलें आहे.

*            *            *            *

चुकीचें अनुमान

वरील विधानांवरून असें चुकीचें अनुमान उतावीळपणानें काढण्यांत येतें कीं, काम-वासना तृप्त करण्याच्या आड येणारी समाजरचना, विवाह-पद्धति, नीतिनियम हीं रोगांना कारणीभूत होत असल्यामुळें त्यांचें निर्मूलन करणें प्राप्त आहे; परंतु हें अनुमान अर्थात् तर्कशुद्ध नाहीं.

( १ ) रोगांच्या मुळाशीं कामवासना नेहमींच असते असें नाहीं. स्वाभिमानाला किंवा अधिकारलालसेला बसलेला धक्का, भीति, मनाला असह्य होणारे विलक्षण अनुभव ( उदाहरणार्थ, रणांगणांत दिसलेले छिन्नविच्छिन्न अवयव, बॉम्ब्स वगैरेच्यामुळें होणारे अपघात ), इत्यादि कांहीं विकृतीच्या, मनोगंडांच्या मुळाशीं असतात. येथून तेथून सर्व रोगांचें पाप कामवासनेच्या माथीं मारण्यांत अर्थ नाहीं.

( २ ) दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट अशी ध्यानांत धरली पाहिजे कीं, कामवासनेला वाव मिळाला नाहीं म्हणून रोग झाला आहे असें गृहीत धरलें तरी तिची तृप्ति हा खरा उपाय ठरत नाहीं. कारण काममासना कां दावली गेली होती ? तर ध्येयदृष्टि होती म्हणून औचित्यविचारांना वगैरे दडपावें लागतें.

त्यांची गळचेपी केली असतां रोग होणार नाहीं कशावरून ? किंबहुना होण्याचाच पुष्कळ संभव.

पेंचांतून सुटण्याचे मार्ग

मग या पेंचांतून किंवा कोंडींतून सुटण्याला मार्गच नाहींत का ? आहेत, बऱ्याच ठिकाणीं उपयोगी पडण्यासारखे मार्ग आहेत. (१) एक मार्ग असा कीं, मानसिक रोगाचें कारण शोधून काढण्यानेंच निम्मे रोग बऱ्हंशीं बरें होतात ! मानसिक रोगाचें खरें कारण भलत्याच प्रकारची कामेच्छा असली तर ती मनुष्य लोकांपासूनच लपवितों असें नाहीं, तर स्वतःपासूनहि लपवूं पाहतो; इतकेंच नाहीं, तर लपविण्यामध्यें कित्येक वेळां यशहि मिळवितो,—म्हणजे ती कामेच्छा 'नेणिवेंत' जाऊन दडून बसते. ही दबा धरून बसलेली, स्वतःच्याहि नजरेंतून निसटलेली कामेच्छा, रोगाला कारणीभूत होत असते. अनीतीचे अनु-चित, अमंगळ विचार त्या रोग्याला असह्य होतात, त्यांना थारा देणें योग्य नव्हे, असें त्याला वाटत असतें; म्हणून तर तो त्यांना दाबतो, तुडवितो; पण ते तर लपून बसतात. अशा ठिकाणीं लपून बसतात कीं, ज्याचें त्यालाहि ते ध्यानांत येत नाहींत. लपून छपून बसलेल्या गुप्त शत्रूंना त्यांच्या गुहेंतून बाहेर काढलें म्हणजे ते अर्धमेले होतात. माळ्यावरील काळोखांत आणि अडगळींत मरून पडलेला उंदीर शोधून बाहेर प्रकाशांत आणि उन्हांत फेंकून दिला, म्हणजे त्यापासून उत्पन्न होणारी घाण नाहीशीं होते, नुसत्या उदबत्या लावून, धूप जाळून किंवा अत्तरें लावून ती घाण कायमची नाहींशी व्हावयाची नाही. मोरी-तली घाण उजेडांत आणली म्हणजे काम होतें, नुसतें फेनाईल टाकून चाला-वयाचें नाहीं. त्याप्रमाणेंच मनोगुहेंत लपलेल्या घाणेरड्या विचारांचें आहे.

आतां मनांतली ही घाण उजेडांत आणावयाची कशी ? रोग्यालाच जर तिचा पत्ता नाहीं, तर लोकांना कसा पत्ता लागणार ? पेंच बिकट दिसतो खरा; पण फ्रायूडनें मार्ग सांगितले आहेत. त्यांचें विस्तारानें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हें. केवळ दिग्दर्शन करतों. 'अनुचित विचारांना जाणतेपणीं मनुष्य थारा देत नाहीं, म्हणून ते नेणिवेंत लपतात. त्यांना स्वप्नांत देखील आपण थारा देत नाहीं असें मनुष्य म्हणतो खरा; पण कित्येक वेळां स्वप्नांमध्यें या अनुचित विचारांचा थांगपत्ता लागूं शकतो.' मनुष्य निजला असतां त्याचें विवेकी मन भलत्या विचारांना मनांत फिरकूं देत नाहीं; पण निद्रितावस्थेंत विवेकी मनाचा

पहारा ठिला पडतो, आणि त्याला चकवून अनुचित वासना या आपला नंगा-नाच क्षणभर घालूं शकतात. रोग्यांच्या स्वप्नांची मीमांसा केली असतां रोग-मूलांचा एखादा धागादोरा हातीं लागूं शकतो.

दुसरा मार्ग असा कीं रोग्याला, न थांबतां, न अडखळतां, न विचार करतां मनांत जें येईल तें बोलण्यास सांगितलें असतां, लपलेले-छपलेले विचार बाहेर डोकावण्याचा संभव असतो. हे डोकावूं लागले म्हणजे विचारी, विवेकी मन उच्चारण्यास आढेवेढे घेतें; पण असे आढेवेढे घेऊं लागले म्हणजे चिकित्स-काला समजतें कीं, या ठिकाणीं कांहीं तरी पाणी मुरत असलें पाहिजे. अशा रितीनें एखाद्या धाग्याचा पत्ता लागतो. किंवा चिकित्सकानें एखादा शब्द उच्चा-रावयाचा आणि लगेच क्षणार्धाचाहि विलंब न लावतां, जो विचार मनांत येईल तो रोग्यानें उच्चारावयाचा, अशा रीतीनें प्रयोग केल्यास जेथें रोगी अडखळतो किंवा अधिक वेळ घेतो तेथें कांहींतरी रोगबीज आहे असें अनुमान करतां येतें. तात्पर्य स्वप्न-मीमांसा, अप्रतिबंध विचारांची साहचर्य-मीमांसा ( Free Association ), चिकित्सक-नियमित विचार-साहचर्य मीमांसा, ( Con-trolled Association ), या मार्गांनी रोगबीज सांपडलें आणि तें रोग्याच्या नजरेला आणून दिलें म्हणजे तो रोग बरा होण्याच्या मार्गालाच लागतो. कारण रोग झालेला असतो तो अनुचित विचारांमुळें नव्हे, तर ते दडपून टाक-ल्यामुळें. प्रकाशांत आणि उन्हांत आणून सोडले, म्हणजे क्षयादि रोगांचे जंतु जसे अपाय करूं शकत नाहींत, त्याप्रमाणेंच या विचारांचें होतें, अशा प्रकारच्या मनोव्यापाराला ' Abreaction ' म्हणतात. गुप्तसुप्त रोगबीजाचें ज्ञान झालें असतां तें ज्ञानच रोगनाशाला कारणीभूत होतें !

Talking cure ( संभाषण-चिकित्सा ) म्हणून प्रसिद्ध आहे. तींतील बीज हेंच आहे. आत्मवंचनेनें रोग होतो; आत्मज्ञानानें रोगनाश होतो. ' **ज्ञानान्मोक्षः** ' हें वेदान्ततत्त्व वेदान्तांत निराळ्या अर्थानें समजावयाचें आहे. पण आताच्या या संदर्भांतहि ' ज्ञानान्मोक्षः ' हें तत्त्व बरेंच खरें ठरलें आहे. रोमन कॅथॉलिक लोकांत धर्मोपदेशकाजवळ पापें कबूल करण्याची ( Confession ची ) पद्धति आहे आणि या पद्धतीमुळें पापी मनुष्याला पापक्षालन झाल्यासारखे वाटतें, यांतीलहि मर्म हेंच आहे. ' पश्चात्तापेन शुध्यति ' असें आपण म्हणतो. या वचनांत थोडासा फरक करून " पश्चात् ज्ञानेन शुध्यति " असें म्हटलें असतां वरील विवेचनाचें सार ध्यानांत येईल.

* * * *

उदात्तीकरण

मानसिक विकृतीच्या निवारणाचा तिसरा मार्ग म्हणजे अतृप्त अशा वासनांना दडपून, चेंगरून, ठार मारून टाकण्याचा प्रयत्न न करतां, ' दुधाची तहान ताकावर भागविणें ' या न्यायानें, छायात्मक स्वरुपांत कां होईना; पण शुद्ध रितीनें थोडीबहुत तृप्ति करणें हा होय. याला ' Sublimation,' म्हणजे ' उदात्तीकरण ' किंवा ' शोधन ' म्हणतात. मुलांबाळांची इच्छा स्त्रियांना साहजिक असते, ती तृप्त करून घेण्याकरितां अनीतीचें आचरण न करतां दुसऱ्याची मुलें आपलीं समजून त्यांचा सांभाळ केल्यानें, त्यांचें लालन केल्यानें, त्यांचें कोडकौतुक केल्यानें, 'अपत्यवात्सल्य' या सहज-प्रेरणेची शुद्ध आणि समाजोपयोगी स्वरुपांत थोडीबहुत तरी तृप्ति होऊं शकते. कामवासनेची देखील तृप्ति प्रणय-काव्यें लिहिणें, प्रेम-गीतांतील रसांचा आस्वाद घेण्यांत किंवा त्यांची चिकित्सा करण्यांत रममाण होणें, स्त्री-दाक्षिण्य दाखविणें, राधा-कृष्णादि स्वरूपांत धार्मिक कथा-कथन करणें, कथा-श्रवण करणें, गोपी-गीतें म्हणणें, रासक्रीडा करणें, नाटकें लिहिणें-पाहणें, अबलोन्नतिकारक समाजसेवा करणें, वगैरे स्वरुपांत ' दुग्ध-तक्र ' न्यायानें थोडीबहुत करून घेतां येते, आणि हीं स्वरुपें निरुपद्रवी, शुद्ध आणि कित्येक वेळां समाजोपयोगी असूं शकतात. म्हणून या पद्धतीला नांवें ठेवण्याचें कारण नाहीं, किंबहुना ती इष्टच आहे.

तात्पर्य, कामवासनेला सध्याच्या समाजघटनेमुळें आणि नीतिनियमनांमुळें अनिर्बंध वाव मिळत नाहीं म्हणून ही घटना आणि नियमनेंच झुगारून द्यावींत, याला फ्रायडच्या मानसशास्त्रांत आधार नाहीं. उलट, हीं नियमनें टाकून दिल्यास, हीं टाकून दिल्यामुळेंच पुनः विकृति होण्याचा संभव असतो असें फ्रायडचें म्हणणें आहे. ( याचा अर्थ असा मात्र कोणी समजूं नये कीं, गणगोत्र पाहणें, जातिभेद मानणें, हुंडा घेणें, वगैरे जी विवाहविषयक कृत्रिम बंधनें आहेत, तीं आहेत तशीच ठेवावीत. एखाद्याला जीं नीतिबंधनें उचित वाटत असतील, तीं कामवासनेला आड येतात आणि विकृति उत्पन्न करूं शकतात म्हणून त्यानें हीं नीतिनियमनें दाबून, चिरडून टाकण्याचा प्रयत्न करणें इष्ट आहे किंवा नाहीं, एवढ्याच प्रश्नाचा विचार केलेला आहे, एवढें वाचकांनीं ध्यानांत धरावें. )

## देव करवितो कां मनुष्य करतो ?

एखादे नदीचे घांटावर किंवा झऱ्याजवळ असतांना तारामय भव्य आकाश पाहून किती अनिर्वचनीय विचार व प्रश्न उद्भवतात ! हा तारागण अधांत्री कसा राहतो ! अशा साध्या प्रश्नापासून तों 'हा तारागण केव्हां, कोणीं व कां केला' इत्यादि गहन प्रश्न मनांत आल्यावर मन गांगरून जाऊन एक प्रकारचा 'उदासीन आनंद' किंवा 'आनंदी औदासीन्य' चेहेऱ्यावर दिसूं लागतें व कालांतरानें घरीं परत आल्यावर त्या उदासीन आनंदाला किंवा मनोहर औदासीन्याला आपण मुकतों. घरांत पाऊल ठेविल्यावर 'जग कोणी व कां केलें' हा प्रश्न विलयास जाऊन त्याचे ऐवजीं 'मुलाला कोणी व कां मारिलें' असा प्रश्न विचारिला जातों. 'जग केव्हां व कसें उत्पन्न केलें' ह्या प्रश्नाऐवजीं 'जेवावयास केव्हां येऊं व मुकटा कोठें आहे' असे प्रश्न येतात. अशी वस्तुस्थिति असणें म्हणजे गर्हणीय आहे. किंवा त्यांत कोणाचा दोष आहे असें सांगण्याचा हेतु नाहीं. मनांतील भाव एवढाच कीं, स्थित्यंतरानुरूप, स्थानानुरूप किंवा कालानुरूप हास्यास्पदरीत्या प्रश्न कसे बदलतात हें लोकांचे निदर्शनास आणावें. मनुष्य नेहमीं तत्त्वज्ञानी किंवा तत्त्वजिज्ञासु रहात नाहीं. ह्यांत त्याचा मोठा दोष नाहीं व ह्याच्यांत फारसें वावगेंही नाहीं; कारण तत्त्वज्ञानांत शिरल्यावर कोणत्याही प्रश्नाचा उलगडा लवकर होतच नाहीं. किंबहुना आयुष्य जरी संपत आलें, तरीसुद्धां आपल्या सर्व तात्त्विक शंकांचें समाधान होईल असें नाहीं. एका शंकेचें समाधान होत आहे, तोंच दुसरी शंका तयार. एका टेंकडीवर चढून जावें, तों त्याच्या पलीकडे दुसरा डोंगर. एका दरींतून बाहेर जावें, तोंच दुसरी दरी लागते.

तर तात्त्विकरीत्या शंकांचें समाधान झाल्यावर कार्यास आरम्भ करी, असें म्हणणें म्हणजे नदीचें पाणी आटल्यावर पलीकडे जाईन असें म्हणण्यासारखें आहे. कारण, नदीचें पाणी कधीं पूर्ण आटावयाचें नाहीं व या गृहस्थाला पलीकडे जाण्याची पाळीच यावयाची नाहीं.

या भवजलांतून तरून जावयाचें असल्यास कांठावर अरण्यांत विचार करीत बसण्यानें कार्यभाग होत नाहीं; तर भवजलांत शिरून यथाशक्ति, यथामति पलीकडे पोहून तरून जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. वाटेंत हात दुखल्यास किंवा चांगलें पोहतां येत नसल्यास कदाचित् कार्यसिद्धि होणार नाहीं; परंतु, कांठावर विचार करीत स्वस्थ बसल्यानें तर मुळींच होणार नाहीं. या दृष्टीनें पाहिलें असतां तात्त्विक विचारापेक्षां–ज्ञानयोगापेक्षां–व्यावहारिक कर्माचीच–कर्मयोगाचीच–जास्त महती आहे असें दिसून येईल.

**नियतं कुरु कर्म त्वं, कर्म ज्यायो ह्यकर्मण: ।**

असें भगवंतांनीं सांगितलें आहे तें अगदीं खरें आहे. परंतु तात्त्विक विचारांकडे, ज्ञानयोगाकडे अगदींच दुर्लक्ष व्हावें हें उचित नव्हे. म्हणून तत्त्व-जिज्ञासूंपुढें पुढील विचार ठेवण्याचा विचार केला आहे. ह्या विवेचनापासून व्यवहारांत फारसा फायदा होईल असें नाहीं. पैसे मिळवावयाच्याच हेतूनें जगांत रहावयाचें असल्यास असल्या विवेचनापासून फायदा नाहीं. म्हटलेंच आहे कीं:—

**बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते**
**पिपासितैः काव्यरसो न पीयते ।**
**न छंदसा केनचिदुध्दृतं कुलम्**
**हिरण्यमेवार्जय निष्फला गुणाः ॥**

तरी पण लोकशिक्षणाचे सर्व वाचक इतके अरसिक नाहींत अशी खात्री असल्यामुळें तात्त्विक विचाराविषयीं लिहिण्याकडे मन गेलें आहे.

पूर्वी म्हटल्याप्रमाणें एखादे रात्रीं चांदण्यांत उभे असतांना जे मनांत प्रश्न व विचार उद्भवतील त्यांचें वर्णन करणें कठीण.

हा चन्द्र हंसत-हंसत ढगांमधून जो लपंडाव खेळत आहे तो काय म्हणून? ही ताऱ्यांची जंगी सभा रोज रोज कां भरत असते ? हा वारा कधीं लहान मुलाप्रमाणें सौम्य व आनंददायक, तर कधीं हलकट माणसाप्रमाणें उच्छृंखल

व भयंकर कां असतो ? अथवा हा चंद्र तारांगण व हा वारा हे स्वतः कांहीं करीत नसून आदिशक्ति जो ईश्वर तोच त्यांच्याकडून कार्यें घडवून आणीत आहे ? वारा सोसाट्याचा व थंड सुटल्यास त्याच्यांत कांहीं दोष नसून आदिशक्ति ज्याप्रमाणें वाऱ्याचें परमाणु हालवितें, त्याप्रमाणेंच ते हालत असतात. चंद्र ढगांप्रमाणें खेळत नसून भौतिक शास्त्रांच्या नियमानुसार ढग उत्पन्न होऊन त्याच्या आड ते येत असतात. तारे सभासद नसून प्रचंड तेजोमय गोळे ज्योतिःशास्त्रांतील नियमानुसार अगणित अन्तरावर फिरत आहेत. म्हणजे चन्द्राला, ताऱ्यांना, वाऱ्याला जीव नाहीं म्हणावयाचा ! हा सर्व प्रचंड कारभार ईश्वर ( किंवा ईश्वर म्हणावयाचें नसल्यास) आदिशक्ति शास्त्रनियमानुसार चालवीत आहे. चन्द्रकिरणानें विरही माणसास ताप झाल्यास तो चन्द्राचा दोष नाहीं व दक्षिणवातानें त्यालाच सुख दिल्यास वाऱ्याची स्तुति करण्याचें कारण नाहीं. जगांत सर्व गोष्टी आदिशक्ति, आदितत्त्व, नियमानुसार चालवीत आहे; लहान बियांपासून मोठें वृक्ष होणें काय किंवा मोठालें वृक्ष चपल विद्युल्लतेनें जाळून खाक करून टाकणें काय, दोन्ही प्रकार सृष्टिशास्त्रांतील नियमानुसार आदितत्त्वापासून होत आहेत. त्यांत कोणास वंदावयाला नको व कोणास निंदावयाला नको. हे सृष्टिनियम विद्वान् लोकांस कळतात. अज्ञान लोकांस हे न कळल्यामुळें ते ढगांना, चंद्राला, सूर्याला देव समजून त्यांची आपापल्यापरीनें स्तुति करितात. वस्तुतः यच्चयावत् गोष्टी सृष्टिनियमानुसार चालल्या आहे असें शहाणा मनुष्य जाणून असतो.

असें जर आहे, तर मनुष्य हाही सृष्टिनियमांच्याच आधीन आहे काय ? ‘ होय ’ असे कांहीं लोक म्हणतात. सूर्याचा ताप झाला असतां मनुष्याचें शरीर तापतें; अग्नीजवळ गेलें असतां अवयव लांकडाप्रमाणें जळतात; शरीर झाडाप्रमाणें वाढतें व क्षय पावतें. प्रत्येक गोष्टींत मनुष्याचें शरीर इतर सर्व वस्तूंप्रमाणेंच आहे. ज्याप्रमाणें हवा, ज्याप्रमाणें पाणी, ज्याप्रमाणें खाणें; त्याप्रमाणें मनुष्याचें शरीर गोरें किंवा काळें, सशक्त किंवा अशक्त असतें.

मनुष्याचे विचारही अशाच प्रकारें बनतात. लहानपणापासून नास्तिक मंडळींत उठणें-बसणें असल्यास, वाचन व शिक्षण तसल्याच प्रकारचें असल्यास, मनुष्य नास्तिक बनतो. परिस्थिति निराळी असल्यास मनुष्य निराळा बनतो. ज्याप्रमाणें मनुष्याचें कुल, संगति, वाचन, शिक्षण त्याप्रमाणेंच मनुष्याची बुद्धि व विचार असतात. कुल तसें शील. जसें पेरावें तसें उगवतें. काल्यांचें बीं पेरल्यास

कार्ले येईल. आंबे लाविल्यास आंबे येतील. त्यांत त्या काल्यांचा दोष नाहीं किंवा त्या आंब्याची मोठी बढाई नको. मुलाला शिक्षक चांगला मिळाल्यास, शाळा चांगली असल्यास, संगति चांगली असल्यास तो मुलगा चांगला निघेल यांत नवल काय व त्यांत **त्याचा** असा गुण कोणता ? सर्व परिस्थितीवर अवलंबून आहे. तसेंच आईबाप अनीतिमान्, घरची गरीबी, कुसंगति इत्यादि प्रकारची परिस्थिति मिळाल्यावर मुलगा वाईट निघाल्यास त्यांत त्याचा काय दोष ?

त्याचा नसेल तर कोणाचा ? देवाचा, दैवाचा, का परिस्थितीचा ? कां ह्यापैकीं कोणाचा दोष नसून सर्व दोष त्या मनुष्याचाच आहे ? मनुष्य स्वतः होऊनच पाप करितो व मागाहून देवाला, दैवाला, किंवा परिस्थितीला दोष देतो. मग खरा दोष कोणाचा ? का कोणाचाच नाहीं ?

ज्याप्रमाणें सूर्य, चंद्र, वृक्ष, वायु सृष्टिनियमानुसार प्रकृतिगुणानें चालत आहेत व आपले नियमित काम करीत आहेत, त्याचप्रमाणें मनुष्यही प्रकृतिगुणांनींच प्रेरित होत्साता सर्व कर्मे करीत असतो काय ? का प्रकृतीच्या विरुद्ध कांहीं कर्मे करूं शकतो ? ज्ञानी मनुष्याला आत्मनिग्रहानें प्रकृतीचें नियमन करतां येईल असें सकृद्दर्शनीं वाटतें. पण ज्ञानी मनुष्यसुद्धां प्रकृतीच्या, स्वभावाच्या विरुद्ध जाऊं शकत नाहीं, असें कांहीं विचारी लोकांचें म्हणणें आहे.

**सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि**
**प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥**

—गीता ३-३३.

ज्ञानी मनुष्यालासुद्धां जर स्वभावाविरुद्ध जातां येत नाहीं, त्याचा मनोनिग्रह देखील जर प्रकृतिनियमनास असमर्थ आहे, तर साधारण लोकांची काय कथा ? मनुष्य जें पापपुण्य करतों तें स्वतःच्या जोरावर करीत नसून स्वतःच्या प्रकृतीनें प्रेरित अथवा नियमित होऊन करतों. आईबापांचा स्वभाव, त्यांची वर्तणूक, बालमित्र, शिक्षण, शरीरप्रकृति, घरची स्थिति इत्यादि प्रकारच्या परिस्थित्यनुरूप, प्रकृत्यनुरूप मनुष्याचीं सर्व कर्में जर असतात, तर मग 'मी उपकार केला' 'तूं चोरी केलीस' '**त्यानें** पापाचरण केलें' असें म्हणणें किती अभिमानाचें अथवा वेडेपणाचें आहे !

**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।**
**अहंकारविमूढात्मा कर्ताहमिति मन्यते ॥**

—गीता ३-२७.

'मीं कर्ता आहें' हें मानणें वेडेपणाचें आहे, तर पापपुण्याचा मालक कोण? कां पापपुण्य हा भेद मायामूलक आहे? एक, कर्तृत्व माझ्याकडे ठेवा नाहीं तर पापपुण्याचा बोजा ईश्वरावर किंवा दैवावर लादा. मी कर्ता नसेन तर मला पापही नाहीं व पुण्यही नाहीं. अर्थात् मला दोष देणें किंवा माझी स्तुति करणें दोन्हीही अस्थानींच होत. हाच अर्थ मार्टिनोच्या पुढील वाक्याचा आहे. 'Either free-will is a fact or moral judgment a delusion.' *Types of ethical theory*. VOL. H. P. 41.

या प्रश्नासंबंधानें एकदोन गोष्टीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. बहुधा मनुष्य **पापाची** जबाबदारी अंगावर घेत नाहीं, एखादी वाईट गोष्ट हातून घडली म्हणजे मनुष्य 'माझा उपाय नव्हता, परिस्थितिच विलक्षण होती' अशा प्रकारची भाषा वापरतो; परन्तु हातून चांगलें कृत्य झाल्यास, 'मीं असें केलें, मीं तसें केलें' असें म्हणूं लागतो. मनुष्याला पापाची जबाबदारी नको आहे; पण पुण्याबद्दल स्तुति पाहिजे असते. तसेंच, मनुष्य व्याधिग्रस्त, दुःखपीडित असतांना दैववादी बनतो व आनंदांत असतांना व एखाद्या गोष्टींत जय मिळविला असतांना तो आपल्या सत्कृत्याची बढाई मारूं लागतो व लोकांवर टीका करूं लागतो, व त्यांची निंदा करतो.

हें कसें जरी असलें, तरी तात्त्विकदृष्टया या प्रश्नाचा विचार करणें अवश्य आहे. जगांतील इतर सर्व गोष्टी जर कार्यकारणभावानें बद्ध आहेत तर मनुष्याचें कर्मही त्या नियमाला अपवाद असेल काय? लहान गोष्टींपासून ते थोर गोष्टींपर्यन्त जेवढें कारण, व जसें कारण असेल तेवढेंच व तसेंच कार्य होतें. माझ्या हातांतील लेखणी काय, किंवा स्टेशनवरील रेल्वेएंजिन काय, दोन्हीही विवक्षित कारणांची कार्यें होत. वाफ नसली म्हणजे एंजिन बंद, वाफ वाढविली म्हणजे एंजिनची गति वाढते. कमी केली म्हणजे गति कमी. त्याचप्रमाणें मनुष्याच्या मनोविकारांवर मनुष्याचीं कर्में अवलंबून आहेत. पाणी पिण्याची फार इच्छा झाली म्हणजे तो फार पाणी पितो, फार तहान नसल्यास घोटभरच पितो व मुळींच तहान नसल्यास पीत नाहीं. ज्याला दारूचें व्यसन, तो कांहीं तरी करून दारू पिणारच. तेथें त्याचा इलाज नाहीं. मनोविकारांवर–आवडीवर–सर्व अवलंबून आहे. विद्वान् मनुष्याला वाचनाची आवड असते म्हणून तो वाचीत राहतो व उनाड मुलाला खेळण्याची हौस

असल्यामुळें तो खेळतो. वाचनाची आवड वाचण्यास लावते; खेळण्याची हौस खेळावयास लावते. जसें कारण असतें तसें कार्य होतें. जसें औषध तसा गुण, त्याचप्रमाणें जसा मनोविकार, जी आवड, जी इच्छा प्रबळ असेल, त्याचप्रमाणें कर्म होतें; यांत कर्त्याचा दोष नाहीं अथवा 'कर्ता' हा तो मनुष्य नसून तो प्रबळ मनोविकारच होय. मनुष्याच्या हृदयामध्यें पुष्कळ विकारांचे, विचारांचे, आवडीचें युद्ध चालून शेवटीं जो मनोविकार किंवा विचार किंवा आवड सर्वांत प्रबल ठरेल त्याचप्रमाणें कर्मे होतात. खरी सत्ता मनोविकारांचे हातात आहे. त्यांच्यामध्यें कदाचित् एकमेकांमध्यें युद्ध होईल; परंतु शेवटीं ज्या मनोविकाराचें प्राबल्य होईल त्याच्या तंत्रानें आपल्या सर्व कृति चाललेल्या असतात. हें युद्ध मनुष्य नुसता प्रेक्षकाप्रमाणें पहात असतो. त्याच्या हातांत कांहीं नाहीं. लढाईंत शिरावें किंवा न शिरावें हें मनुष्याच्या प्रकृतीवर अवलंबून आहे. क्षत्रियवृत्ति प्रबल असल्यास ती लढाईंत ओढील, नसल्यास त्याची थोडीबहुत इच्छा असली तथापि त्याचें रणांगणांत पाऊल पडणार नाहीं. अर्जुनाच्या मनांत लढाई न करण्याचें जरासें आलें खरें, पण तो वीर व क्षत्रिय असल्यामुळें लढाई भरांत आली असतां त्याच्यानें तटस्थ बसविलें नसतें; भगवान् कृष्ण त्याला म्हणतातः—

**यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे, ।**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥**

—गीता १८-५९.

बा अर्जुना, अहंकारानें मी युद्ध करणार नाहीं असें तूं म्हणत आहेस, पण हा खोटा अभिमान आहे. तुझा 'स्वभाव' तुझें क्षत्रियत्व, तुला लढाईंत ढकलिल्याशिवाय राहणार नाहीं. तुझ्या मनांत जरी नसलें तरी सुद्धां तुझी प्राक्तन-कर्में तुला न जुमानतां तुला लढाईंत ओढतील.

**स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।**
**कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥**

—गीता १८-६०

ही विचारसरणी सर्वथा बरोबर असल्यास भयप्रद आहे. अर्जुनासारख्याला जर 'स्वभावा' विरुद्ध जातां येत नव्हतें, तर आपली काय अवस्था? 'स्वकर्म' जिकडे नेईल तिकडे जावयाचें व तटस्थ बसावयाचें एवढेंच आपलें काम व हीच आपली कर्तबगारी काय? नदीच्या भयंकर पुरांत सांपडलेल्या लांकडाप्रमाणेंच,

कर्मांचा प्रवाह जिकडे जसे नेईल व जसें नाचवील तिकडे आपण जावयाचें व तसेंच जावयाचें काय? असेंच जर असेल, तर **माझे** हातांत कांहीं तरी आहे काय? **स्वाभिमान** जर 'मोह' आहे, 'मिथ्या' आहे तर 'खरें' असें काय? व मीं दैवाच्या, कर्मांच्या विरुद्ध लढावयाचें नाहीं काय? माझी या भवजलांतून मुक्ति नशीबावर, स्वकर्मांचे प्रवाहावर अवलंबून असेल, तर 'स्वावलंबना'नें स्वतःच्या निश्चयानें व स्वतःच्या जोरावर भवजल तरून जाण्याचा निश्चय मोहमूलक असेल तर **जगण्यापेक्षां मरणें बरें** असेंच म्हणून स्वस्थ बसणें बरें! *

(१) पण, इतकें निराश होण्याचें कारण नाहीं; कारण वरील विचारसरणी एकदेशीय आहे. 'पाणी पिण्याची इच्छा पाणी प्यावयास लावते,' 'वाचनाची आवड वाचावयास लावते' अशा प्रकारानें आपण जें लिहिलें तें वस्तुतः चुकीचें आहे. 'पाणी पिण्याची इच्छा' किंवा 'वाचण्याची आवड' ही कांहीं आपल्या तशा बायकोप्रमाणें एखादी जबरदस्त स्त्री नव्हे कीं, ती आपल्यास पाहिजे तसें बोटावर नाचवील. इच्छा किंवा आवड, ही स्त्री नव्हे किंवा भांगेप्रमाणें अथवा दारूप्रमाणें वस्तुही नव्हे. 'दारू मनुष्याला मोह उत्पन्न करते' हें म्हणणें बरोबर आहे. याचा अर्थ असा कीं, दारूच्या सेवनानें मनुष्याला अंमल येतो; पण 'दारूची इच्छा' ही काय दारूसारखी मूर्त वस्तू आहे? मग त्या इच्छेचा अंमल कसा चालतो? खरोखर म्हटलें असतां असली भाषाच चुकीची होय. 'दारूची इच्छा' ही कांहीं कैकेयीसारखी स्त्री नव्हे, किंवा दारूसारखी वस्तु नव्हे, कीं तिचा अंमल आपल्यावर चालावा. ज्या वेळेस **मीं** दारू पिण्याची इच्छा करितों, त्या वेळेसच **मीं** दारू पितों. 'दारूची इच्छा' हें कारण नसून खरा कर्ता **मीं** आहे; **मीं** इच्छा करितों, माझी इच्छा

---

* मन चंचल आहे म्हणून तें कधींही स्थिर होणार नाहीं काय? मन दुर्निग्रह आहे, म्हणून तें अशक्य निग्रह समजावयाचें काय? नाहीं. मनोविकारांचें प्राबल्य पाहून निराश झालेल्या अर्जुनास भगवान् श्रीकृष्ण म्हणतातः—

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्।
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते॥

मन वायूप्रमाणें दुर्निग्रह असेल, पण भक्त्युत्साहपूर्वक प्रयत्न केल्यास त्याचा निग्रह खास करतां येईल. आत्मोन्नति करून घेणें आपल्या हातांत नसल्यास जगावयाचें तरी कशाला?

करावयास लावते ही भाषा मानसिक वस्तुस्थितीस अनुसरून नाहीं. खरा खरा सात्विक मनुष्य **मीं** पाप केलें असें कबूल करितों. कामक्रोधादि रिपूंनीं मला पाप करावयास लाविलें ही भाषा दरबारी थाटाची आहे. परंतु जेथें मनुष्याला मनांतलें खरें खरें बोलावयाचें आहे, ज्या वेळेस मनाला खरी तळमळ लागलेली असते, त्या वेळेस मनुष्य दरबारी भाषा विसरून 'मी' 'तूं' 'तुम्ही' अशीच भाषा वापरतो. 'करण्यांत येईल' 'करण्यांत आलें' ही भाषा कायदेशीर, दरबारी, लपवालपवीची, खोटी आहे. स्वतःशीं एकांतीं विचार करतांना, किंवा एखाद्या जिवलग मित्राशीं हितगुजाचें भाषण करतांना, असली भाषा येत नाहीं. देवाची क्षमा मागतांना, 'देवा, तूं माझ्याकरवी कामक्रोधादि मनोविकारांचे मदतीनें जीं पापें करविलींस, त्याबद्दल तूंच मजला चांगली बुद्धि देऊन माझ्याकडून क्षमा मागवून घेत आहेस' ही भाषा कधीं कोणीं वापरली आहे काय? 'नाहीं' हें उघड आहे. असें का! तर अशा वेळीं आपण मनांतील खरे विचार बोलत असतों. लोकांना फसवावयाचें नसतें किंवा तत्त्वज्ञानाच्या एखाद्या तत्त्वानें आपलें मन व आपली विचारशक्ति त्या वेळेस दूषित झालेली नसते. कार्यकारणभावाचें भौतिक गोष्टींत साम्राज्य पाहून आध्यात्मिक बाबतींतही कार्यकारणभाव हाच नियम व हेंच तत्त्व लागूं पडतें, असा आपण स्वतःशींच निश्चय कायम केलेला नसतो. जिकडे तिकडे एकच नियम व तत्त्व लागू आहे अशा प्रकारची दिखाऊ व पोकळ तत्त्वाकरितां खऱ्या खऱ्या मानसिक गोष्टींचीं प्रेमाच्या भाषेची, तेजस्वी भाषेची, नीतीच्या भाषेची ओढाताण करून त्या भाषेस निरर्थक करून सोडणें, ही विटंबना द्रौपदीचे विटंबनेप्रमाणेच गर्हणीय होय. जगांमध्यें सगळीकडे एकच नियम—व तो कार्यकारणभावाचा–हें गृहीत धरून मानसिक, नैतिक, धार्मिक भाषेची व विचारसरणीची शब्दच्छलानें वाट लावणें सोपें आहे; पण बरोबर नाहीं' **मीं** जर कर्ता नाहीं, मनोविकारांतील युद्धांत मी जर नुसता प्रेक्षक आहे, तर माझी नीति चांगली किंवा वाईट असें म्हणून माझी स्तुति किंवा निंदा करणें शक्य आहे काय? जर नाहीं, तर आपली स्वाभाविक नीतिविषयक भाषा व आपलें विचार यांचें काय करावयाचें? कां त्यांची 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' या होमांत आहुति द्यावयाची! 'मी, तूं, तुम्ही' हे जर कर्ते नव्हेत, कर्ता करविता जर ईश्वर आहे, तर पश्चात्तापदग्ध होऊन ईश्वराची क्षमा मागणारे हे सर्व **ठाण्याच्या** वेड्यांच्या इस्पितळांतच पाठविण्यास योग्य!

(२) मनुष्यावर पापपुण्याची जबाबदारी नसून ती ईश्वरावर आहे असें प्रतिपादणाराचें दुसरें असें एक म्हणणें आहे कीं, ईश्वर जर सर्वज्ञ आणि सर्व शक्तिमान् आहे, तर आपल्यास स्वातंत्र्य कोठलें? मीं आतां काय करीन हें जर

ईश्वराला पूर्वीपासूनच ठाऊक आहे, त्याप्रमाणेंच जर खचीत घडून येणार आहे, तर मी कोणत्या मार्गानें जावयाचे हें पूर्वीच ठरलेलें आहे त्यांत मला बदल करतां यावयाचा नाहीं. ईश्वराचें सर्वज्ञत्व जर खरें आहे तर मीं काय करणार आहे हें आधींच ठरलेलें आहे. माझी कृति जर ठरलेली दिसते तर अर्थातच माझे स्वातंत्र्य कोठें राहिलें ? परमेश्वराचें सर्वज्ञत्व व माझें स्वातंत्र्य हीं परस्परविरुद्ध दिसतात.

या विचारसरणींमध्यें सूज्ञ वाचकांना बरेच दोष दिसतील. मी काय करणार हें खात्रीपूर्वक ईश्वरास ठाऊक आहे, म्हणून ईश्वरच माझीं कृत्यें करतों असें कसें म्हणतां येईल? मी अमुक करावें किंवा न करावें हें सर्व माझ्यावर अवलंबून असतें. त्यांत कोणीही माझ्यावर जबरी करूं शकत नाहीं. मी आळस करतों त्या वेळेस ईश्वर येऊन मला हातानें दावून निजवितो काय ? किंवा मी ज्या वेळेस अपशब्द बोलतों, त्या वेळेस ईश्वर मला फोनोग्राफप्रमाणें बोलावयास लावतो काय? नाहीं. तर हें सर्व **मीच** करतों. आळस करणें किंवा न करणें, अपशब्द बोलणें किंवा न बोलणें, हें माझ्यावर सर्व प्रकारें अवलंबून आहे. मीं कांहीं यंत्र नाहीं, माझ्यामध्यें प्राण आहेत, बुद्धि आहे, सदसद्विवेकबुद्धि आहे आणि मी एखादें वेळेस सदसद्विवेकबुद्धिचें म्हणणें ऐकतों किंवा एखादें वेळेस ऐकत नाहीं. ऐकेन किंवा न ऐकेन हें जरी ईश्वराला अगोदरच माहीत असलें तरी त्याच्या ज्ञानाचा माझ्यावर काय परिणाम होणार ?

सध्यां माझ्या शेजारीं चाललेल्या वर्गांत चूक केलेल्या मुलांस शिक्षक मारतील हें मजला जरी माहीत आहे तरी त्या मुलाला मीं मारतों असें होतें काय ? माझ्या अटकळीचा आणि शिक्षकानें मारण्याचा कांहीं तरी संबंध आहे काय? किंवा मार बसल्यावर मुलगा रडूं लागेल हें जरी मला अगोदर ठाऊक असलें तरी त्या मुलाला माझ्या अटकळीनें रडावयास लाविलें हें कोणी म्हणेल काय? एकंदरींत एवढेंच सिद्ध करावयाचें कीं, माझीं पापकृत्यें व ईश्वराचें ज्ञान यांत कार्यकारणभाव मुळींच नाहीं. सर्व दोष किंवा पाप याचा मालक मीच आहें. ही जबाबदारी ईश्वरावर टाकतां यावयाचीं नाहीं. आणि पापी मनुष्यास खरी उपरती झाली म्हणजे तो स्वतःच कबूल करतों कीं, सर्व पाप आपलें आहे. कांहीं तत्त्ववेत्ते मात्र पापी मनुष्याला काय वाटत असतें त्याची साक्ष न घेतां आपल्या तत्त्वाच्याच दृष्टीनें विचार करितात म्हणून विचारांमध्यें पुष्कळ घोटाळे उत्पन्न होतात. असो.

मनुष्य करतो कां देव करवितो, या बिकट प्रश्नाचा अनेक दृष्टीनें विचार झाल्यास या प्रश्नाचें सयुक्तिक उत्तर मिळण्याचा संभव आहे. मासिकांतील एका लेखांत सर्व दृष्टीनें विचार करणें शक्य नाहीं. म्हणून सध्यां एकदोनच विचार सादर केले आहेत. प्रसंगानुसार आणखी कांहीं विचार वाचकांपुढें ठेवण्याचा विचार आहे.

# मुलांची हंसरी सृष्टि

माझ्यापासून फार अपेक्षा करूं नका. मी रागिणी लिहिली वगैरे माझी ओळख करून देण्यांत येते. परंतु माझें व्याख्यान ऐकल्यावर म्हणतील, "आजचें व्याख्यान कांहीं नीट जमलें नाहीं." असें होतें. मुलावरून जनकाची परीक्षा करूं नये. विक्रमोर्वशीयं हें कालिदासाचें नाटक आहे. त्यांत उर्वशी ही नारायण ऋषिपासून जन्मली असें विधान केलें आहे, यावर कसा विश्वास ठेवावा असा श्लोक आहे. उर्वशीच्या सौंदर्यावरून तिला प्रत्यक्ष वसंतऋतूनें, मदनानें जन्म दिला असेल असें वाटतें. उर्वशीवरून तिचा बाप कोणी वेदाभ्यास जड नारायण ऋषि असेल, असें कोणी सांगितलें तरी खरें वाटत नाहीं. त्याप्रमाणें हेंच का रागिणीकर्ते असें व्याख्यान ऐकून कदाचित् खरें नाहीं वाटणार. म्हणून फार अपेक्षा नका करूं. मीं येथें आलों. येथें येण्यांत माझाहि एक स्वार्थ आहे. मुलांत आल्यानें उत्साह व आनंद मिळतो. बाहेरच्या जगांत वावरतांना, सर्व परिस्थिति पाहून एकप्रकारची निराशा वाटते. परन्तु तुमच्यांत आलें म्हणजे नैराश्याला रजा मिळते. मुलांत खेळण्याची संधि मिळाली म्हणजे मोठा आनंद असतो. मी तुमची कवाईत पाहिली. तुमचा गणवेष पाहिला, खूप आनंद झाला. मुलें एकत्र खेळत आहेत. सुंदर पोषाख करीत आहेत. हंसत आहेत, नाचत आहेत. मग निराशेचें काय कारण ?

माझ्या वेळची शाळा आठवली म्हणजे तुम्ही किती भाग्यवंत आहांत असें मनांत येतें. आज विशाल क्रीडांगणें, शिक्षणाचीं अनेक साधनें, निरनिराळया शिक्षणपद्धती. आज तुम्हांस मार नसेल मिळत. आमच्या वेळेस पाळी चुकली कीं

छडीचा खुराक असे. मीं मानेवर खडा ठेवून लिहायला शिकलों आहे. मानेवरचा खडा पडला कीं, छडी बसायची. घोडीवर चढवून मिरच्यांची धुरीहि म्हणे देत. मला वर्गांतील पेटींत कोंडून ठेवलें होतें !

ते शिक्षेचे प्रकार आज गेले. आणि शाळागृहेंहि किती सुंदर, हवाशीर. तळेगांवच्या समर्थविद्यालयांत मी शिकवीत असे. तेथें त्या पत्र्यांच्या झोंपड्या पावसांत गळायच्या. तुम्हीं किती सुखी. आणि ही ड्रिल, बॉयस्काऊट वगैरे प्रकार. मीं ड्रिल शिकलों असतों तर पोषाखांत अधिक व्यवस्थित राहिलों असतों. वाटतें पुन्हां लहान व्हावें, बॉयस्काऊट व्हावें. तुमच्याकडे पाहून खरोखरच आनंद होतो.

परंतु, तुमची स्थिति अशी असली तरी तुमचा भविष्यकाळ आमच्यापेक्षां कठीण आहे. माझ्या वेळेस बी. ए. वगैरे झाला कीं, हटकून नोकरी मिळायचीच. विष्णुशास्त्री बी. ए. च्या वर्गांत असतांनाच त्यांना फर्स्ट असिस्टंट म्हणून मागणी आली. मास्तर किंवा रेव्हिन्यु खात्यांत नोकरी मिळणें कठीण नसे; परन्तु आज ती स्थिति नाहीं. आज किती तरी बेकार बी. ए. पडले आहेत. म्हणून तुमचें भविष्य कठीण वाटतें. तो उज्वल दिसत नाहीं. परन्तु तो उज्वल आहे. दिसण्यांत उज्वल नसला तरी तो उज्वल आहे हें विसरूं नका.

कॉलेजमध्यें मुलें गेलीं म्हणजे ही बेकारी समोर दिसून त्यांच्यानें अभ्यास करवत नाहीं, अभ्यासांत लक्ष लागत नाहीं, कोण देणार नोकरी, कां शिकावें ? असें मनांत येतें. तुम्हीं निरनिराळे विचार करूं लागतां. सामाजिक, राजकीय विचारही तुमच्या मनांत येतात.

अशा या परिस्थितीसंबंधीं मीं दोन शब्द आतां सांगणार आहे. मला उपदेश करायचा नाहीं. उपदेशावर माझा विश्वास नाहीं. जे मूर्ख असतात. त्यांना उपदेशाचा काय उपयोग ? आणि जे शहाणें आहेत त्यांना जरूरच नसते. पुष्कळ वक्ते मुलांना उपदेश देऊं लागतात. "मुलांनों, शील बनवा, चारित्र्यवान् व्हा, वेळेचा सदुपयोग करा," वगैरे सांगतात. परन्तु, वक्त्यांनीं वेळेचा सदुपयोग कितपत केलेला असतो ? जगांत सारे उपदेश करित असतात. इंग्रजींत एक उखाणा आहें. "जी वस्तु सारेजण देऊं इच्छितात, परन्तु घेऊं कोणी इच्छित नाहीं, तर ती कोणती ?" उत्तर "उपदेश." मुलेंसुद्धां एकमेकांस उपदेश करितात ! परोपदेशे पांडित्यं. उपदेशाप्रमाणें वागतो कोण ? मोठमोठे ऋषि, तत्त्वज्ञानी, व्यवहारविद् लोक हे

जगाला किती तरी सांगत आहेत. लायब्ऱ्या भरलेल्या आहेत. परन्तु पुस्तकें वाचून कोणी कांहीं कृति करतो का ? उपदेशाचें आपण ग्रहण केलें असतें तर समाज फार निराळा दिसला असता. म्हणून उपदेश करण्याची मला इच्छा नाहीं, अधिकारहि नाहीं. परन्तु बरेवाईट अनुभव थोडे सांगतों.

ज्ञानासाठीं वाचावें लागतें. मीं पुष्कळ वाचलें व कांहीं लिहिलें. कांहीं लिहिणें मान्यहि झालें आहे. परन्तु मीं कसें वाचीत असें ? विद्यार्थीदशेंत पांगारकर, शंकरराव लवाटे, करंदीकर वगैरे थोर शिक्षक मला लाभले होते. लो. टिळकांच्या व्याख्यानांस वगैरे आम्ही जावयाचे. शिक्षक जीं पुस्तकें वाचायला सांगत तीं मीं हातांत घेत असें. परंतु आवडलें नाहीं तर दूर ठेवीत असें. शिक्षक आपल्या आवडीप्रमाणें सांगतात. मुलांची आवड तीच असते असें नाहीं. कोणतीं पुस्तकें वाचावीं वगैरे आपण विचारावें. आवडतील तीं वाचावीं. जें आवडतें तें समजतें. एखादें पुस्तक वाचण्यांत आपण तन्मय झालों असलों, तर आईनें ५।६ हांका मारल्या तरी आपण जात नाहीं. तो विद्यार्थी चांगला, जो एकदम हांक मारतांच चहा प्यायला जात नाहीं. हातांत पुस्तक आहे किंवा गणित सोडवित आहे. त्यापुढें चहा त्याला फिका वाटतो. याचा अर्थ आईनें हांक मारतांच जायचें नाहीं, असा नाहीं हो. नाहींतर आईला सांगाल वामनरावांनीं ५ हांकाशिवाय जायचें नाहीं सांगितलें. सांगण्याचा हेतु असा कीं, जें आवडलें त्यांत आनंद असतो. त्यांत लक्ष लागतें. तें पुस्तक संपल्याशिवाय, तो प्रश्न सोडविल्याशिवाय चैन पडतां कमा नये. अशी बेचैन वृत्ती होणाऱ्याला ज्ञान मिळतें. त्याची प्रगति होते.

ज्ञानासाठीं दुसरें साधन म्हणजे प्रश्न विचारले पाहिजेत. मीं विद्यार्थी असतांना फार प्रश्न विचारित असें. मीं उत्तरेंहि देत असें. उत्तरें चुकतात, मुलें हंसतात, परन्तु आपलें अज्ञानहि कळून येतें. उत्तरें चुकायचीच. कधीं कधीं मी असे प्रश्न विचारीत असें कीं, मास्तर हंसत. माझ्या शंकांचीं उत्तरें देणें त्यांना बरें वाटत नसे; मग "गुरोस्तु मौन व्याख्यानं" असें व्हायचें. पुष्कळ मुलें प्रश्न विचारायला लाजतात. मुलींचें तर विचारूंच नका लाजून कसें होणार ? विचारावें. कारण आजचेंच समजलें नाहीं, तर उद्यांचें कसें समजणार ? मग १५ दिवसांनीं आपण म्हणतों, "हें नाहीं समजत." मास्तर म्हणतात, "पूर्वीच कां नाहीं विचारलेंस ? १५ दिवस झाले. आतां का पहिल्यापासून समजाऊन देऊं ? बस खालीं." आपण मग शिक्षकावर रागावतों. त्याच्यावर रागावण्यांत काय अर्थ ? मीं कॉलेजमध्यें

होतों. प्रो. बेन यांना गंभीरपणें प्रश्न विचारला. ते हंसले व निघून गेले. मागून माझा प्रश्न वेडेपणाचा होता असे मला कळलें. प्रो. सेल्बी फारच कर्तव्यपरायण. प्रश्न विचारून त्यांना मी भंडवायचा. ते घरीं गेल्यावर माझे सर्व प्रश्न लिहून काढीत व त्यांचीं उत्तरें लिहून मला देत. मला लाज वाटे, आपण यांना किती त्रास देतों! परन्तु त्यांचा आनंद होता तो. खऱ्या शिक्षकास प्रश्नांचा कंटाळा नाहीं येत. प्रश्न विचारावें, उत्तरें द्यावीं. त्यांतून आपलें अज्ञान प्रकट होईल म्हणून भिऊं नये. अज्ञान घालवण्यासाठीं तर शाळेंत जायचें. अज्ञान लपवल्यानें ते लपत नाहीं. खरूज असेल तर ती लपवून काय फायदा ? ती धू, डॉक्टरला दाखव, आणि शिक्षकाला काय तुझें अज्ञान माहित नसतें ? त्याच्यापासून काय लपवणार ? वर्षभर तुला तो बघतो आहे. कोण पास वा कोण नापास होईल, सारें त्यांना माहित असतें. प्रश्न विचारा. मुलांनीं प्रश्न विचारले तर मला शिकविण्यास उत्साह येतो. शिकविणें म्हणजे व्याख्यानबाजी नव्हे. वाटतें कीं, आपलीहि आतां परीक्षा आहे. मुलांच्या प्रश्नांना उत्तरें देतां आलीं म्हणजे आनंद वाटतो. मुलांचे प्रश्न ऐकून मुलांच्या मनांतील कल्पना कळतात. त्यांतील चुकीच्या दूर करायच्या, तो एक आनंद आहे. भुकेलेल्यास अन्न द्यावें. जागृत जिज्ञासेला ज्ञान द्यावें. मुलांनीं प्रश्न विचारूनच ज्ञान मिळवायचें असतें. आईला हें विचार तें विचार असें करून तीं ज्ञान मिळवितात. आई शेवटीं रागावते. म्हणते पुरे रे. परन्तु आईला उत्तर देतां येत नसलें म्हणजे ती रागावते. मुलें विचारतात, "चांदोबा कां पडत नाहीं ?" याचें उत्तर मींसुद्धां नीट देऊं शकणार नाहीं. त्याला गुरुत्वाकर्षण कसें समजावून देऊं ? मला आधीं विचार करावा लागेल. सारांश, प्रश्न विचारीत जा. मास्तर जर म्हणाले, "तुला कांहीं कळत नाहीं." तर सांगा, "कळत नाहीं म्हणून तर शाळेंत आलों. कळतें तर येथें येण्याची जरूर काय ?" भगवान् श्रीकृष्णांनीं सुद्धां ज्ञान मिळविण्यासाठीं "परिप्रश्नेन सेवया" असे मार्ग सांगितलें. अर्जुनानें प्रश्न विचारून पिच्छा पुरवला त्याचा. परन्तु कृष्ण रागावला नाहीं. "प्रज्ञावादांश्च भाषसे" अशी आरंभीं जरा गंमत केलीन्; परंतु पुढें सर्व शंका उत्कृष्टपणें त्यानें दूर केल्या.

आतां तुमच्या समोरच्या बिकट भविष्यासंबंधीं सांगतों. जुनी व नवी पिढी यांच्यांत विसंगति आहे. जुन्या कल्पना व नवीन यांच्यांत विरोध येतो. सामाजिक, राजकीय अशा अनेक प्रश्नांत तुमचे व वडिल मंडळीचें मतभेद होतात. तुमचीं मतें मोडा असें नाहीं मीं म्हणत. तुम्ही तुमच्याच डोळ्यांनीं पहा. तुमच्याच कानांनीं

ऐका. आपल्या बुद्धीनें प्रत्येकानें चालावें; परंतु मोठीं माणसें, वडील माणसे काय म्हणतात तें ऐकावें. आज वडील मंडळींचें कोणीच ऐकत नाहीं. म्हणतात यांची बुद्धि बुरणुसली ! साठी बुद्धि नाठी, असें करूं नये. ऐकायला काय जातें ? शेवटीं कृति करायची वेळ येईल, तेव्हां स्वतःच्या बुद्धीप्रमाणें वागावें. आज तुम्हीं सर्वांचें ऐकून घ्यावयाचें. नाना मतें ऐकावीं. विरुद्ध पक्षाचें तर आधीं ऐकावें. आज एकदम कृति करूं लागूं नको. ज्यावेळेस जीवनाची सर्व जबाबदारी स्वतःवर घेशील त्यावेळेस स्वतःच्या विचाराप्रमाणें वाग.

मीं जेव्हां थोडें राजकारण करीत होतों, तेव्हां टाइम्स आधीं वाचित असें. एक आयरिश पुढारी म्हणत असें, " आमचें धोरण ठरलेलें आहे. सरकारच्या विरुद्ध आमचें धोरण. " तसें आमचें मत इंग्रज सरकारच्या विरुद्ध, टाइम्सच्या विरुद्ध, असें आम्ही म्हणत असूं. परन्तु टाइम्स् काय म्हणतो; आपल्या काय चूका दाखवितो, त्यांना उत्तरें देतां येतील कीं नाहीं, हें मीं पहात असें.

एका इंग्रज लेखकानें म्हटलें आहे, " He does not Know England who only England Knows "—जो फक्त इंग्लंड जाणतो, त्याला इंग्लंड समजलें नाहीं. इंग्लंड समजायला हवें असेल तर आधीं जग समजून घे. इतर देश कसे आहेत, तेथें व्यापार, राज्यशासन, शिक्षण कसें आहे, चालीरीती, संस्कृति कशी आहे तें बघ. त्यांची स्वतःच्या देशाशीं तुलना कर. इतर देशांत तुझ्या देशाबद्दल काय म्हटलें जातें तेंहि ऐक. अशा रीतीनें तुझें ज्ञान अधिक यथार्थ होईल. सारांश, विरुद्ध बाजूंचीं मतें ऐकावीं. त्यांच्या सभांस मुद्दाम जावें, नाना ग्रंथ वाचावे आणि आपलीं मतें हळुंहळूं निश्चित करावीं. आज तुम्हीं वागतां त्यांचीं फळें तुमच्या वडिलांस भोगावीं लागतात. त्यांना तुमच्या कृतींवर पांघरूण घालावें लागतें. तुमचा सांभाळ करावा लागतो. पालकांना आज दुःख होतें. तुम्हीं बी. ए., एम्. ए. व्हा. स्वतःवर जबाबदारी घ्या. जे कराल, त्याचे बरे वाईट परिणाम स्वतः भोगण्यास सिद्ध व्हा. आणि मग वागा स्वतःला योग्य वाटेल तसें !

आजकाल दुसऱ्याचें ऐकूनच घेत नाहींत. मी विद्यार्थ्यांच्या सभेस अध्यक्ष होतों. एका विद्यार्थ्यास बोलायचें होतें; परंतु त्याला बोलूंच देत ना. तो जर अश्लील बोलूं लागला, कंटाळवाणें चऱ्हाट वळूं लागला, तर हुट्हुट् करून बसवा खालीं; परंतु त्याला बोलूंच द्यावयाचें नाहीं हें काय ?

तुम्हीं का सर्वज्ञ झालांत? कितीसे तुमचे अनुभव, कितीसें ज्ञान, तुमच्यापैकीं पुष्कळ खानदेशच्या बाहेरसुद्धां गेले नसतील. मी तिकडे महिलाविद्यालयांत आहे. एक मुलगी जी. ए. झाली; परन्तु ती मागील वर्षापर्यंत आगगाडींत बसलीसुद्धां नव्हती. कुरुंदवाडची होती ती. मोटारनें पुण्यास येई, जाई. तिनें मुंबई पाहिली नव्हती. मुंबई पाहिली नाहीं, पुणें पाहिलें नाहीं; दिल्ली कलकत्ता तर दूरच राहिलीं. कसलें ज्ञान नि कसला अनुभव! अधीर नका होऊं. जगांत किती घडामोडी, गुंतागुंती नि नाना व्यवहार. उगीच पोकळ विधानें ठोकून का काम होतें? १९०८ मधील गोष्ट आहे. एक दहा-बारा वर्षांचा मुलगा मजकडे आला व म्हणाला, "बॉंब तयार केल्याशिवाय कांहीं नाहीं.कधीं होणार तुमची तयारी? शस्त्रास्त्राशिवाय कोणाला मिळालें का स्वराज्य? केव्हां तरी आरंभ केलाच पाहिजे. मग आजच कां करूं नये." मी म्हटलें, "तूं लहान आहेस. थांब. अनेक मोठे कार्यकर्ते काय म्हणतात तें ऐक. घाई नको करूं."

घाईनें पश्चात्ताप करण्याची पाळी येते. आज कांहीं कराल. तुमच्या घरांतील इतरांस त्रास होतो. आज तुम्ही शिकत असतां. आईबापांस दुःख व्हावें हें मला मान्य नाहीं. मोठे व्हा, जबाबदारी अंगावर घ्या, मग वागा स्वतंत्रपणें! मग कम्युनिस्ट व्हा, कॉंग्रेससभासद व्हा किंवा नोकरी करा. नोकरी केलीत, उद्योग करून पैसे मिळवलेंत, सुखोपभोग घेतलात तरी वाईट नाहीं. आपण श्रम करून मिळवावें, आपण श्रम करून भोगावें. मात्र श्रम न करतां केवळ बापाच्या पैशावर चैन मारणें मला पसंत नाहीं.

सारांश, आज एकदम मनांत येईल तसें वागूं नका. पुढें विरोध येणारच आहेत. आईबापाशीं भांडावें लागेल; पण त्यावेळेस आपलीं मतें निश्चित असतील. जीवनांत ज्यांच्याबद्दल आपणांस प्रेम व आदर वाटतो त्यांच्याशीं झगड्याची वेळ येतें. मोठा उद्वेगजनक प्रकार असतो हा. अर्जुनाला भीष्मावर, गुरुद्रोणावर बाण सोडावे लागतात! काय हा प्रसंग! खरी ट्रॅजिडी—शोकान्त प्रकार आहे हा. ज्या पुढाऱ्यांबद्दल, नेत्याबद्दल आपल्यास अलोट आदर व प्रेम, त्यांच्याविरुद्ध जावें लागतें. बाप हिंदुमहासभावाला, तर मुलगा कॉंग्रेसवाला. बाप कॉंग्रेसवाला, तर मुलगा कम्युनिस्ट. असें हें प्रकार होतात; परंतु या प्रकारांनीं भिऊन जायचें नाहीं. मग कसें वागायचें; परन्तु आजच नका गर्दी करूं. मीहि माझ्या वडिलांच्या विरुद्ध वागलों. सरकारी नोकरी धरली नाहीं; परन्तु जबाबदारी अंगावर घेऊन मग वागलों, तसें पुढें वागणें अपरिहार्य होतें.

आज मला मुली प्रेमानें म्हणतात, " ते तुमचे दिवस गेले. तुम्हीं शिकविलेंत तें सारें फुकट. अशानें जगाचे प्रश्न सुटणार नाहींत. नवीन उपाय पाहिजेत. " मला त्या म्हणण्याचा राग नाहीं येत, उलट आनंद व अभिमान वाटतो. " तुम्हीं निर्भयपणें मला हें सांगतां. शिकवलेंत तें फुकट असें म्हणतां. यानेंच माझें शिकवणें कृतार्थ झालें."

तुम्हांला मी तीनचार गोष्टी सांगितल्या. आवडेल तें वाचा. सर्वांचें ऐका. विरुद्धपक्षाचें आधीं ऐका. विद्यार्थी आहांत तोंपर्यंत प्रत्यक्ष कार्यांत पडूं नका. पालकास त्यामुळें त्रास होतो. पुढें मोठें झालेंत, जबाबदारी अंगावर आली, म्हणजे मग वडिलांस दुःख झालें तरी तुमच्या मताप्रमाणें वागा. त्यांना म्हणा, मला पराक्रम करायचा आहे. मला माझें कर्तृत्व दाखवायचें आहे. माझा कोंडमारा मीं कसा करूं." परन्तु आज नको.

विद्यार्थ्यांस मी अनुभवाच्या या गोष्टी सांगितल्या, शिक्षकांस काय सांगूं? आज समाजांत मान नाहीं, आदर नाहीं, एक दगड मारला तर १० आंबे पडतात; त्याप्रमाणें १ प्रोफेसर काढला तर १०० त्यासाठीं येतात. परन्तु शिक्षकांस मला सांगायचें आहे कीं, समाजांत मान असो नसो; आपण तरी स्वतःला मान द्यावा. "मला पगार कमी असला म्हणून मी तुच्छ नाहीं. मीं उत्तम कार्य करीत आहें " असें आपण म्हटलें पाहिजे. मान वर करून, छाती पुढें करून आपण चाललें पाहिजे. श्रीमंताकडे जायचें असलें तर ऐटींत सरळ जावें. आपणच जर स्वतःला कमी लेखलें, तर जग कां कमी लेखणार नाहीं? असली नम्रता व विनय नको. आजच्या काळीं तीं उपयोगी नाहींत. आज आपली मान आपण वर ठेवली पाहिजे. पगार अधिक मिळावा म्हणून मागणी करावी. असेल तर मिळेल; परन्तु कमी पगार म्हणून आपणांस कमी समजूं नये. हें पवित्र कार्य आहे, उदात्त आहे, मग पगार अधिक कशाला—असें मी म्हणणार नाहीं. पवित्र काम आहे म्हणूनच अधिक पगार द्या, उगीच थापा नका मारूं! संस्थेजवळ पैसे नसतील तर देऊं नका; परन्तु खोटा उपदेश नका करूं.

असो. मला एकंदरींत खूप आनंद झाला. लायक शिक्षक, उत्साही मुलें, सुंदर क्रीडांगण, सारें पाहून उत्साह वाटला. तुम्हीं माझें व्याख्यान शांतपणें ऐकलेंत, चुक्‌चुक् शुक्‌शुक् केलें नाहीं. यावरून तुम्ही सद्गुणीहि आहांत असें मी अनुमान

काढतों. मी आगगाडींतून येत असतां हिरवी हिरवी सृष्टि पाहून मन कसें प्रफुल्लित झालें होतें. तशी मुलांची नवीन उत्साही ही सृष्टि, हंसणारी खेळणारी पाहून खूप आनंद झाला. मुलें पाहून आनंद होतो. शाळेचा ३१ वा हा वाढ दिवस. १०१ वा आपण पाहणार नाहीं. परंतु १०१ वाच काय १००१ वा वाढदिवस येवो अशी मीं आशा करतों. इंग्लंडमध्यें ऑक्सफर्ड, केंब्रिज, कशी शतकानुशतकें परंपरा चालते. हा हॅरोचा विद्यार्थि, हा ईटनचा असें सांगतात. एकेका संस्थेची परंपरा असते, वैशिष्ट्य असतें. वेलिंग्टननें वाटर्लूची लढाई ईटनशाळेच्या क्रीडांगणांवर जिंकली असें नेहमीं म्हणतात. तसें आपल्याकडे झालें पाहिजे. मुलांना पाहून त्यांच्या वर्तनावरून हा अमक्या संस्थेंतील असें म्हटलें गेलें पाहिजे. ही हिंगणेछाप विद्यार्थिनी, हा अमळनेरच्या हायस्कूलचा विद्यार्थी असें उमटून आलें पाहिजे. अशी परंपरा निर्माण झाली पाहिजे. तुमच्या शाळेंतून असे पुढारी निघोत. सच्छील, सरळ असे कार्यकर्ते अमळनेरच्या हायस्कूलांतून निघतात असें झालें पाहिजे. तुमची शाळा त्या ईटन, हॅरो वगैरे इंग्लंडमधील शाळांप्रमाणें उत्कृष्ट नागरिक देणारी होवो, अशी मी इच्छा करतों. ”

## कला व नीति

"मी कांहीं नवीन सांगणार आहे असें नाहीं. त्याच गोष्टी परन्तु प्रत्येकजण निरनिराळ्या रीतीनें सांगतो. आजचा जो विषय आहे, त्यावर मला तिकडे शिकवतांना १५।१५ व्याख्यानें द्यावीं लागतात. एका व्याख्यानांत मी येथें या विषयाचा नीट प्रपंच करूं शकणार नाहीं. कांहीं थोडेसे मुद्दे घेऊन दिग्दर्शन करतां येईल. महाराष्ट्रांत प्रो. फडके यांनीं या वादाला चालना दिली. प्रो. फडके माझे मित्र आहेत. पुण्यास आले, तर मला भेटल्याशिवाय ते जात नाहींत. मीं त्यांच्यावर टीका करतो. परन्तु त्यांच्याबद्दल मला आदरहि आहे. व्यक्तिविषयक टीका मी बहुधा करीत नसतों. फडके यांची कला; त्यांचें कौशल्य याबद्दल मला आदर आहे. कला व नीतिसंबंधीं प्रो. फडके यांचीं जीं मतें आहेत, तीं ९० टक्के मला पसंत आहेत. फडके असें नाहीं म्हणत कीं, कलेनें अनीतिच शिकवावी. कलावंतानें कलेच्या द्वारा विचार दिले तर त्याला ते नांवें नाहीं ठेवणार. त्यांनीं स्वतःच कलेच्या द्वारा नीतिबोध केला आहे. दौलत, जादुगार या कादंबऱ्यांत का नीति नाहीं? दौलत कादंबरींत खरी दौलत पैसा नसून प्रेम, सच्छील वृत्ति खरी दौलत असें सांगितलें आहे. उत्तम कलावंतास साजेल, हृदयांत भिडेल असा उपदेश धरूं नका असें ते म्हणत नाहींत. त्यांचें म्हणणें एवढेंच कीं, उपदेश केलाच पाहिजे अशी कलावानावर सक्ति नका करूं; ससेमिरा नका लावूं; किंवा केळकरांच्या भाषेंत म्हणावयाचें झालें, तर नीतीचा गुप्त पोलिस कलावंताच्या पाठीमागें नका ठेवूं. नीतीचा सासुरवास कलेला नको. कलावंतास स्वैर विहार करूं दे.

असा नियम आहे कीं, एकानें एका बाजूस फार ताणलें तर दुसऱ्या दुसरा बाजूस फार ताणता. फडके यांनीं तेंच केलें. प्रतिमासाधनेंत त्यांनीं अशींच विधानें केलीं आहेत. “ कला म्हणजे नीतीचे व्यासपीठ नव्हे. ललित लेखनांत तत्त्व प्रवेशास मनाई नाहीं. परन्तु, नीतीनें पायरी सांभाळली पाहिजे.” या विधानांत नीतीनें आपल्या पायरीनें रहावें; कुरघोडी करूं नये; असें फडके म्हणतात. परन्तु पुढें पहा “मोलकरणीस घरांत वावरण्यास परवानगी दिली म्हणून, ती जर मालकिणीच्या मंचकावर जाऊन बसेल तर तिच्या त्या कृत्याचें कौतुक करणें अजबच ठरेल.” म्हणजे या विधानांत नीतीला एकदम मोलकरीण बनविण्यांत आलें आहे.

फडके अशी भूमिका कां घेतात ? जेव्हां कोणी म्हणूं लागतात; आग्रहानें सांगूं लागतात; कीं कलेनें बोध केलाच पाहिजे, जींत बोधामृत नाहीं ती ललितकला कसली, तेव्हां मग फडक्यांसारखें दुसऱ्या टोंकाला जाऊन बोलतात. फडक्यांना आत्यंतिक रीतीनें बोलण्याची लकब आहे. अशा लिहिण्यामुळें लोक विचार करावयास लागतात. आत्यंतिक भाषा वापरणें एवढीच फडक्यांची चूक आहे.

आतां आपण आणखी जरा खोल पाहूं; तात्त्विक परिक्षण करूं. वाङ्मय कां निर्माण होतें ? फडके असें म्हणतात कीं, जगांत सर्वत्र दुःख आहे. या दुःखापासून क्षणभर तरी विरंगुळा मिळावा म्हणून वाङ्मय जन्माला येतें. वाङ्मय सभोंतालच्या सृष्टीचा विसर पाडतें. मोठे दुःखी आहेत, छोटे दुःखी आहेत. मुलांना नीट कपडे मिळत नाहीं म्हणून तीं दुःखी; मुलींची नीट लग्नें होत नाहीं म्हणून कोणी दुःखी; कोणी घरांत बायको हें आण तें आण सांगते, जवळ तर पैसे नाहींत म्हणून दुःखी; महात्माजी म्हणतात, “अरे, सत्य अहिंसेनें वागा, असें काय वागतां परन्तु जनता वागत नाहीं म्हणून ते दुःखी. असें विराट् दुःख आहे ही सत्यकथा आहे. मग क्षणभर आपण सुखाचा आभास करूं या. सत्य सत्य आपण ओरडलों तरी सत्य कोणाला हवें आहे का ? आपणांस आरसा पाहण्याची छाती होत नाहीं. कोणी आपल्या हृदयासमोर आरसा धरील का ? आपलें जीवन आपणांस पहावत नाहीं. आणि या सर्वांचा विसरपडण्यासाठीं मनुष्य ललित कृतींकडे वळतो. तो जरी सुखाचा भ्रम असला तरी हरकत नाहीं. दूध नाहीं तर ताक या न्यायानें मनुष्य क्षणभर या काल्पनिक सुखभावनेंत रमतो.

फडक्यांची ही जी उपपत्ति आहे, ती सपशेल चुकीची आहे. बरीचशी चुकीची आहे. मनुष्य दुःख व काळजी विसरण्याकरितां सिनेमाला वगैरे जातों हें थोडें खरें आहे. परन्तु केवळ एवढ्याचसाठीं तो जात नाहीं. दुःखाचाहि विसर पडतो, परन्तु दुसरें हेतु सिनेमा पाहण्यांत असतात. अत्रे यांची ही गोष्ट आहे, पाहूं या कशी आहे ? फोटोग्राफी पाहूंया, असें अनेक हेतु मनांत असतात. कांहीं जिज्ञासाच नसेल तर मनुष्याला तो सिनेमा पाहून आनंद वाटणार नाहीं. एखादा मारवाडी वाचील का मासिकाचा अंक ? एखादी लघुकथा ? त्याला त्यांत जिज्ञासा नाहीं. कांहीं गोष्टी समजून घेण्याची, जाणण्याची इच्छा असते म्हणून आपण ललितकृति पाहतों.

आणि खरें म्हटलें तर जगांत दुःख फार आहे हीच चुकीची कल्पना आहे. जगांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे. आपणा सर्वांस जगावेंसें वाटतें. एक हात तुटला, पाय तुटला, तरी मरावेंसें वाटत नाहीं. कांहीं हांतून होत नसलें, तरी नुसत्या जगण्यांतहि सुख आहे. मरावयास कोणी तयार नसतो. एखादा आत्महत्या करतो. त्याला सुखापेक्षां दुःख अधिक असतें. परन्तु आत्महत्या करणारे अपवाद म्हणून असतात. तो नियम नाहीं. जगांत सुख जास्त आहे, दुःख कमी आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे सुखाच्या पाठीमागें लागल्यानें तें सुख मिळत नाहीं. पोटांत भूक असेल तरच खाण्यानें सूख होईल. परंतु केवळ खाण्याच्या सुखासाठीं खाण्यानें सुख होणार नाहीं. सुखाच्या नादीं लागूं तर सुख गमावूं. हा मानसशास्त्राचा सिद्धांत आहे. मला कुतूहलच नसेल, तर कादंबरी वाचून कसें सुख मिळणार ? पाणी पिण्याची इच्छा नसेल तर केवळ पाणी पिण्यानें सुख कसें होणार ? आपण सुख व्हावें म्हणून गॅदरिंगचा दिवस ठरवतों; परंतु सुख होत नाहीं. उलट सहज आपण बसतों, बोलतो, रंग चढतो, सुख मिळतें. उद्यां ८ वाजतां सुखासाठीं बैठक ठरवलीत तर का सुख होईल ? मीं व्याख्यानांत कोटी करावयाची असें ठरवून आलों तर ती कोटी नीट जमणार नाहीं. अशा योजलेल्या कोट्या आनंद देत नाहींत. त्या परिणामकारक होत नाहींत. केवळ लिहिण्याच्या सुखासाठीं लिहिणें यांत अर्थ नाहीं.

आपण कां लिहितों ? कांहीं तरी प्रश्न असतात. आपण समाजांत चमत्कृति पाहतों. आपण ज्याच्यावर प्रेम करतों, त्याच्यावरच रागावतों; हा चमत्कार आहे.

ज्या मुली मला होतकरू वाटतात; त्यांच्यावर मीं अधिक रागावतों. प्रेम वाटतें म्हणूनच रागानें बोलतों. ही जी चमत्कृति, तिच्यावर लहानसा लेख, लहानशी लघुकथा लिहतां येईल.

न्यूटनची गोष्ट सांगतात ना. न्यूटनची आवडती मांजरी होती. न्यूटन दारें लावून खोलींत बसे. मांजरीला जाण्यायेण्यासाठीं भिंतीखालीं त्यानें एक भोंक पाडलें. परन्तु मांजरींचीं पिलेंहि होतीं. त्यांना जाण्यासाठीं निराळें आणखी भोंक त्यानें पाडलें, परन्तु एवढा गणिती-न्यूटन, त्याच्या लक्षांत आलें नाहीं कीं, ज्या बिळांतून मांजरी जाईल त्यांतून पिलेंहि सहज जातील येतील ! ही चमत्कृति आहे. ही गोष्ट आपणास सांगावीशीं वाटतें. आपण ती नेहमीं ऐकतों. मी सहज ओघांत सांगितली.

ज्यांना काव्याची आस्था नाहीं, ते पुस्तक हातांतहि धरीत नाहींत. भूक असेल तर भाकरी हातांत धरूं. केवळ खाण्याच्या आनंदासाठीं नाहीं धरणार. त्याप्रमाणें कांहीं जिज्ञासा असेल, हौस असेल तर ग्रंथ हातीं धरूं. मीं तरुणपणीं वर्डस्वर्थ फार वाचीत असे. सृष्टींत सर्वत्र ईश्वर आहे. तो फुलांतून बोलत आहे, वेलींतून नाचत आहे, वगैरे भाव त्यावेळेस मला आवडत. परन्तु आज वर्डस्वर्थ हातांत धरावासा वाटत नाहीं. हरिभाऊंच्या कादंबऱ्या तरुणपणीं आवडत, पण आज नाहीं वाचवत. तुम्हीं, 'रागिणी रागिणी', म्हणतां. परन्तु त्यांतील हिमालयाचें वर्णन वाचून मला आज हसूंच येतें. न पहातांच हिमालयाचें वर्णन केलें. कारण, त्या काळांत कादंबरी म्हटली म्हणजे आरंभीं सृष्टीचें वर्णन हवें. तो सहस्ररश्मि येत आहे किंवा तो चंद्रमा वर विलसत आहे, वगैरे ठरलेलें असे. एरव्हीं कादंबरी-कार कोण म्हणणार !

जगांत दुःखापेक्षां सुख अधिक आहे. आणि केवळ सुख सुख म्हणून सुख मिळत नाहीं. या दोन गोष्टी आपण पाहिल्या. तिसरी गोष्ट म्हणजे वाङ्मय. हें केवळ जीवनाचा विसर पाडण्यासाठीं नाहीं. Literature is an escape from life into life असें हें खरें वाक्य आहे. परन्तु पुष्कळ वेळां सर्व वाक्य कोणी वाचीत नाहीं. जीवनाचा विसर म्हणजेच वाङ्मय. एवढेंच वाक्य उच्चारूं लागले. परन्तु एवढेंच नाहीं तर या जीवनाचा विसर पाडून दुसऱ्या एका जीवनांत घेऊन जाणें, म्हणजे वाङ्मय. उच्चतर जीवनांत प्रवेश करावयाचा, हें अफूचें विसरणें नव्हे; ही गुंगी नव्हे; विसर

पाडावयाचा परन्तु दुसऱ्या उदात्त जीवनाची स्मृतिकरून द्यावयाची, त्या उदात्त जीवनाच्या कल्पनेनें आपणांस आनंद होतो.

फडके म्हणतात, वाङ्मयांत जो आनंद वाटतो तो पुनःप्रत्ययामुळें होतो. यांत थोडें सत्य आहे. क्रिकेटचें वर्णन वाचलें, विटीदांडूच्या खेळाचें वर्णन वाचलें, तीं भांडणें वाचलीं, म्हणजे आपणांस आपले प्रसंग आठवतात व मजा वाटते. परन्तु ही पुनःप्रत्ययाची उपपत्ति सर्वत्र लागूं पडणार नाहीं. मी 'गड आला पण सिंह गेला' कादंबरी वाचतों. त्यांत मला कोणता पुनःप्रत्यय ? तानाजीच्या पराक्रमाचा का व मला अनुभव आहे ? परन्तु तानाजीचें तें यज्ञमय, निर्भय जीवन वाचून मला उच्चतर जीवनाचा आनंद मिळतो, मी क्षुद्र जीवनांतून वर जातों. म्हणून वाङ्मय म्हणजे केवळ विसर नव्हे. क्षुद्र जीवनाचा विसर व उच्च जीवनाचाच अनुभव—असें हें वाङ्मय असतें.

फडके कधीं कधीं म्हणत असतात वाङ्मय म्हणजे विलास आहे, क्रीडा आहे. तेथें कसलीं बंधनें आणतां ? परन्तु क्रीडेंतहि कांहीं मर्यादा असते. मी विद्यार्थिनींबरोबर टेनिस् खेळतों. त्या मला हुलकावणी दाखवतात, फसवतात. गंमत आहे ती; क्रीडा आहे; पॉइंट मिळवायचा असतो; परन्तु क्रीडेंतहि कांहीं मर्यादा आहे. क्रिकेट खेळतांना बोलरनें फास्ट चेंडू टाकावा, जोरानें टाकावा; परन्तु तो जर मुद्दाम अंगावर मारूं लागला तर ? मग आपण म्हणतों

This is no fair cricket,

हा खरा क्रिकेट नव्हे.

बॅटस्मननें बॅट विकेटकीपरला मुद्दाम मारली तर ? मग ती का क्रीडा राहिली ? म्हणजे शेवटी क्रीडेंतही नीति, अनीति येते. क्रीडेचा शब्दशः अर्थ नका घेऊं, तात्पर्यार्थ घ्या. क्षणभर मौज करणें ठीक असते. दोन वक्ते होते. एक म्हणाला, " मी असा महामूर्ख गाढव पाहिला नाहीं. " दुसरा म्हणाला, " मी समोर असतांना तरी असें म्हणूं नका ! " अशी कोटी करतात. ही क्रीडा आहे. मी समर्थ विद्यालयांत डिरेक्ट पद्धतीनें शिकवीत होतों. मी विचारलें, " पगडी कोठें आहे ? " मुलें म्हणालीं, " डोक्यावर." मी विचारलें, " डोक्यांत काय आहे ? " कोणी उत्तर देई ना. मीं रागावलों. तेव्हां एकजण म्हणाला " बटाटे " त्यांना मेंदूला इंग्रजी शब्द गेलेला नव्हता. तीं काय उत्तर देणार ? त्या मुलाच्या म्हणण्यांत का खरा अर्थ होता ? क्षणभर गंमत झाली; परंतु ती मर्यादा ओलांडून गंमत गेली तर ? मग मौजेची मस्करी व मस्करीची मारा-

मारी. मी तेव्हां पगडी घालीत असे. एकदां गायकवाड वाड्यांतील सभेंत दंगल झाली, पगडी पडली, तेव्हांपासून मी ती सोडली आहे.

सारांश, वाङ्मय म्हणजे केवळ विलास, किंवा क्रीडा नाहीं. व्हिक्टर ह्यूगोची "लॉ मिझरेबल" ही कादंबरी का क्रीडा आहे ! हरिभाऊंच्या कादंबऱ्या का क्रीडा आहेत ? उच्चतम जीवनाचा तेथें अनुभव येतो. उत्कृष्ट वाङ्मय लिहिल्यावर थकल्यासारखें होतें. माझा हा अनुभव आहे. लेखक जणूं आपल्या रक्तानें लिहितो, त्यांत जीवन ओततो. ती क्रीडा नसते.

फडक्यांना सुद्धां या गोष्टी मान्य आहेत. त्यांचें हृदय हळूंच प्रकट होत असतें. ते म्हणतात, 'सत्यदर्शन व सौंदर्यविलास हे कलेचे हेतु आहेत.' सौंदर्यविलासाच्या पाठीमागें हें सत्यदर्शन फडक्यांनीं कां लावलें ? या दोन्ही गोष्टी ते एक का समजतात ? सत्यदर्शन व सौंदर्यविलास दोन अगदीं निराळ्या गोष्टी आहेत. तेव्हां हा जो हळूच सत्यदर्शन शब्द, फडके यांनीं सौंदर्यविलासाला जोडला, त्यानें त्यांचें सर्व इतर म्हणणें ढांसळून पडत आहे.

प्रतिभासाधनांत ही गोष्ट अन्यत्र त्यानीं लिहिली आहे. १७ व्या पानावर ते लिहितात, "मनुष्याला अनंतत्वाची ओळख करून देणें, दिव्य जीवनाशीं ओळख करून देणें हें कलेचें काम आहे. त्या दिव्य व अनंत जीवनाशीं मिळाल्यावर जो आनंद होतो तो अवर्णनीय आहे.' अशा अर्थाचें हें लिहिणें फडक्यांचेंच आहे का असा संशय येईल. परन्तु त्यांचेंच आहे. फडके कधीं अतिशयोक्तीनें आत्यंतिक बाजू घेऊन लिहितात. परन्तु सत्य शेवटीं त्यांच्या लेखणींतूनहि बाहेर पडतेंच.

कलेसाठीं कला वरवर पटते. पोतदार एकदां म्हणाले, "शाळेंत कां जातोस ? शाळेंत जाण्यासाठीं. शिकतोस कां ? शिकण्यासाठीं. तशी कला कां ? कलेसाठीं." परन्तु दुसऱ्या गोष्टीं विसरून चालत नाहीं. कलेनें कलेकडे पहावें. पण ती नीतिचा खून करूं लागली तर ? शिक्षक वर्गांत तन्मय झाला आहे, मुलांच्या टिवल्याबावल्याकडे तो लक्ष देत नाहीं. परन्तु एकादा मुलगा घेरी येऊन पडला तरी, त्यानें शिक्षणांतच तन्मय रहावें काय ? कांहीं मर्यादा शेवटीं आहेत. प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. परन्तु त्याचें स्वातंत्र्य दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड येतां कामा नये. कलेनें आपल्या प्रांतांत रहावें. परन्तु नीतिच्या राज्यांत येऊन ती बंड करूं पाहील तर तिला विरोध होईल. नीतीनें कलेंत लुडबुड करूं नये व कलेनें नीतींत ढवळाढवळ करूं नये.

खरें पाहिलें तर रसिकता, ज्ञान, व नीति या गोष्टी अलग नाहींत. आपण व्यवहारासाठीं हे भाग अलग कल्पिले तर तसे केवळ अलग नाहींत. तिन्ही भाग गुंतलेले आहेत. माझा डोळा एक अलग भाग आहे. परन्तु डोळा बिघडला तर डोकें दुखूं लागतें. लिव्हर बिघडलें तर सर्व शरीरावर परिणाम होतो. दिसायला भाग अलग पण एकावरचा आघात दुसऱ्यावरहि होतो.

आत्मा अविभाज्य आहे. अखंड आहे. ही अखंडतेची कल्पना जीवनांत फार आवश्यक असते. आपले प्रत्येकाचे संसार पृथक् आहेत. परन्तु सर्वांचा मिळून एक विराट् संसार आहे. आपण सर्वांच्या सामुदायिक अखंड संसाराची आठवण ठेवली नाहीं, केवळ अलग संसारांतच रमलों, म्हणून तर आज दास्यांत आहोंत.

"कला, ज्ञान व नीति हीं अलग मानून अखंडहि माना. तरच नीट मेळ राहील. कलेची नीति ही मोलकरीण नाहीं. त्या बहिणी–बहिणी आहेत. कोणी क्षुद्र नाहीं, श्रेष्ठ नाहीं. त्यांची एकवाक्यता आहे."

शेवटीं एक मुद्दा सांगतों. केवळ सुख सुख म्हणून सुख मिळत नाहीं. त्याप्रमाणें कलेंतील आनंद होतो तो विरोधामुळें होतो. झगड्यांतून आनंद होतो. कांहींतरी आकांक्षा, कर्तृत्व, प्रेरणा यांतून सुख मिळतें. हा झगडा जेवढ्या उच्च भूमिकेवरून होईल तितका अधिक आनंद. मुंबईला मी गेलों. ही ट्रॅम घेऊं का तीं ? असा मनांत झगडा उभा राहिला. त्यावर कोणी गोष्ट लिहिली. क्षणभर मौज वाटेल. ट्रॅमसंबंधींचा हा समरप्रसंग तात्पुरत्या करमणुकीचा. उदात्त, अक्षय आनंद त्यापासून मिळणार नाहीं. परंतु एखाद्याची आई व त्याची बायको यांचें भांडण होतें. बायको नवीन काळांतील. आई जुन्या काळांतलि. दोघींबद्दल त्याला आपलेपणा वाटतो. त्यानें कोणाची बाजू घ्यावी, कोणास टाकावें ? हा झगडा अधिक उदात्त आहे. आणि प्रभु रामचंद्रांचा झगडा ? सीता सर्वस्वी निरपराध आहे अशी रामाची खात्री. परन्तु प्रजाजनांचें मत निराळें ! केवढा झगडा ! झगडा जितका महत्त्वाचा, तितकी ती कलाकृति अधिक चिरंजीव व थोर होते.

जीवनांतील हे प्रश्न कला परिणामकारक रीतीनें मांडते. कलात्मक रीतीनें सजावट करते. माझ्या व्याख्यानांत जोर, अस्खलित वाक्प्रवाह, सुंदर अभिनय सारें असून कांहीं चांगले मुद्दे नसतील तर तें बाकीचें काय कामाचें ? त्या प्रमाणें नुसते मुद्देच मांडले, तरी ते नीरस ठरतील. कला व सत्य यांचा समन्वय पाहिजे. कलेनें सत्याला सजवायचें आहे !"

## स्त्रियांच्या हक्कासंबंधीं प्रश्न

'स्त्रियांच्या हक्कासंबंधीं प्रश्न' या विषयावर मी आज तुम्हांला चार शब्द सांगणार आहे; पण या विषयाला सुरुवात करण्यापूर्वीं मला कांहीं गैरसमज दूर केले पाहिजेत.

एक गैरसमज असा आहे कीं, पुरुष हे स्त्रियांच्या उन्नतीच्या आड येतात. आजकाल अशी भाषा वारंवार ऐकूं येते; पण खरें पाहिलें तर स्त्रियांच्या उन्नतीच्या आड पुरुष येत नसून स्त्रियाच येतात. याबाबतींत पुरुषांनीं मुद्दाम जाणूनबुजून अडथळे केले, असें मला वाटत नाहीं. स्त्रिया मागासल्या त्याची कारणें निराळीं आहेत. एक साधा प्रश्न पुनर्विवाहाचा घेऊं* पुनर्विवाह स्त्रियांनीं करावा या गोष्टीच्या आड पुरुष येतात हें म्हणणें खोटें आहे. येथें पुनर्विवाहोत्तेजक मंडळ आहे. या मंडळाकडे पुनर्विवाहासाठीं तयार असल्याबद्दल पुरुषाचे पुष्कळसे अर्ज आले आहेत. तेव्हां पुरुष पुनर्विवाहाविरुद्ध आहेत असें म्हणतां येणार नाहीं. आम्हीं कांहीं पुरुष कदाचित् हंसूं, चेष्टाहि करूं, पण अशी कुचेष्टा आम्हीं विधवेच्या समक्ष कधींहि करीत नाहीं, आम्हांला तसें करवत नाहीं. पण जुन्या बायका मात्र अशा स्त्रीला घालून पाडून बोलतील, तिला बोचतील, आणि स्त्रिया भितात, त्या या बोलण्याला बोचण्याला ! पुरुष तुमच्या आड येतात असें मला वाटत नाहीं. इंग्रजींत एक म्हण आहे-'A man gets what he earns' आपल्या उन्नतीच्या

---

* राष्ट्रसेवादलाच्या स्त्री शाखेच्या बौद्धिक शिक्षण वर्गातर्फे पुणें येथें झालेलें व्याख्यान.

आड आपणच येत असतो. स्त्रियांची पात्रता वाढली तर त्यांच्या उन्नतीच्या आड कोणीहि येऊं शकणार नाहीं. आज तुम्हांला ज्या रीतीनें वागविण्यांत येतें, त्याचें कारण तुम्हींच आहांत. माझ्या कादंबऱ्यांच्या आणि लेखांच्या द्वारें मीं जीं माझीं याबाबतींत मतें मांडलीं आहेत, त्यांवरून तुम्हांला दिसून येईल कीं, मीं याबाबतींत फार पुढें गेलों आहे. तुम्हींसुद्धां माझ्याइतक्या पुढें गेलां नसाल. असें असलें तथापि मलाहि असें वाटतें कीं, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क दिले नाहींत तें योग्य आहे. उदाहरण घ्या; आज पुरुषाच्या मागें त्याच्या पत्नीला त्याच्या इस्टेटीचा वारसा मिळत नाहीं. माझ्या मतें ही गोष्ट फार चांगली आहे. समजा एखाद्या सद्‌गृहस्थानें आपल्या बायकोच्या नांवें एक तीन हजारांचा विमा उतरला. तो गृहस्थ मेल्यानंतर त्याच्या बायकोला जर ती रक्कम मिळाली तर ती निरक्षर, भोळसर, अडाणी असते कोणीहि तिचा मामा, काका येतो आणि तो रक्कम गिळंकृत करून बसतो आणि तिला देशोधडीला लावतो. असें होऊं नये म्हणूनच कायदे करणाऱ्यांनीं तिच्या मुलाला ती इस्टेट मिळावी असा कायदा करून ठेवला. जो कायदा करतो त्याला शून्यांतली स्त्री डोळ्यापुढें ठेऊन भागत नाहीं; प्रत्यक्ष परिस्थिति लक्षांत घ्यावी लागते. तुम्हांला हक्क मिळूं नयेत, स्वातंत्र्य मिळूं नये असें माझें म्हणणें नाहीं. आज तुम्ही सुशिक्षित होत चालला आहांत, अर्थात् तुम्हांला हक्कांची जाणीव होणें स्वाभाविक आहे; पण ज्यावेळीं हे कायदे केले, त्यावेळची परिस्थिति कशी होती, व अजूनहि आहे, हें पहा. बायका निरक्षर, अडाणी होत्या. म्हणून म्हातारपणींसुद्धां त्यांचें पुत्रांनीं रक्षण करावें असें शास्त्रकारांनीं म्हटलें आहे-' रक्षन्ति स्थविरे पुत्राः ' हें त्यावेळीं अज्ञान स्थितींत बरोबर होतें. म्हणून अशा तऱ्हेची व्यवस्था करण्यांत पुरुषांनीं तुमच्याविरुद्ध कारस्थान रचलें, तुम्हांला दाबून ठेवण्यासाठीं-गुलाम करण्यासाठीं या सर्व गोष्टी केल्या असें तुम्हीं समजूं नका. पुरुषांचा स्त्रियांशीं संबंध काय शत्रू म्हणून येतो ? आई, बहिण, मुलगी, पत्नी या नात्यानेंच त्यांचा संबंध येतो ना ? धर्मशास्त्रें त्या त्या काळच्या शहाण्या माणसांनीं रचलीं आहेत; आपल्या आईचें, मुलीचें, बहिणीचें किंवा पत्नीचें अनहित व्हावें, असें त्यांना वाटेल का ? आपल्या आईला, बहिणीला, मुलीला किंवा, पत्नीला गुलाम करावयाचें ही भाषा आहे काय मला कळत नाहीं ! पूर्वीं केशवपनाची चाल होती; त्या वेळच्या विशिष्ट रूढीप्रमाणें आई, बाप,

भाऊ केशवपनाचा विधवा मुलीला आग्रह करीत; त्यांना काय आपल्या मुलीनें कुरूप व्हावें अशी इच्छा असे? पण त्यावेळची तशी कल्पना-समज होता म्हणून अनिच्छेनें ते तिला भाग पाडीत. आज ही रूढी समाजांतून नाहींशी होत चालली आहे. आज केशवपन करायला लावतांना त्यांना काय आनंद होईल? त्याचप्रमाणें पूर्वी बालविवाहाची चाल होती; मुलीचा विवाह लवकर करून टाकण्यासाठीं आईच पाठीस लागे, तें काय आपली नवऱ्याची गुलाम व्हावी, तिचें अनहित व्हावें म्हणून? ती काय त्यांना नकोशी होती म्हणून? इतकीं उदाहरणें मीं दिलीं त्यांचा तात्पर्यार्थ असा कीं, या गोष्टी एकदां पुरुषांनींच केल्या असें नाहीं, स्त्रियाहि त्यांना अनुकूल होत्या; कारण त्या काळीं त्या गोष्टी इष्ट अशा वाटत होत्या. आणि तुम्ही पहा कीं, स्त्रियांची स्थिति सुधारण्यासाठीं कोणी प्रयत्न केला असेल, तर तो पुरुषांनींच केला आहे. आगरकर घ्या, आमचे महर्षि कर्वे घ्या. त्यांनीं ह्यासाठीं लेख लिहिले, प्रचार केला, हाल आणि कष्ट सहन केले. लग्न म्हणजे बंदिवास असें जर स्त्रियांना वाटत असतें, तर त्या शोकशाळेंत गेल्या असत्या त्यांनीं लग्नाचे सोहळे आणि समारंभ केले नसते. म्हणून माझें तुम्हांला सांगणें आहे कीं, तुम्ही हा गैरसमज मनांतून काढून टाका.

दुसरी गोष्ट मला सांगावयाची ती अशी कीं, कांहीं कांहीं बाबतींत पुरुषांच्या व स्त्रियांच्या बाबतींतील कल्पना बदलल्या पाहिजेत. आपल्या समाजांत स्त्रियांना बांधल्यासारखें होतें, त्यांना स्वातंत्र्य मिळत नाहीं, त्यांत थोडी सुधारणा झाली पाहिजे. मी 'थोडी' म्हणतो, अधिक म्हणत नाहीं, हें लक्षांत ठेवा. प्रो. फडके यांनीं 'उद्धार' या नांवाची एक कादंबरी लिहिली आहे. तिच्यांत एका स्त्रीला पुरुषानें आपल्यावर जबरदस्ती केली असा भ्रम उत्पन्न होतो, तिला आपल्या पोटांत गर्भ वाढतो आहे असें वाटूं लागतें, आणि ती बेचैन होते; तिला जीवन असह्य होतें. जगाला तोंड दाखवायला तिला लाज वाटते. ती स्त्री चांगली सुशिक्षित असते आणि आर्थिक दृष्टीनेंहि स्वावलंबी असते; पण तरीहि तिची स्थिति अनुकंपनीय होते. आतां पहा, समजा त्या स्त्रीवर कोणी खरीच जबरदस्ती केली असली तर त्यांत त्या स्त्रीचा काय दोष आहे? तिनें स्वतः काय पाप केलें आहे? ही अशी पापाची कल्पना जोंपर्यंत तुम्हां स्त्रियांमध्यें आहे तोंपर्यंत तुम्हांला स्वतंत्रपणें वावरतां येणार नाहीं. तुमच्याजवळ पैसा कितीहि

असो, तुम्ही अगदीं जहागिरदार असा. त्या जहागिरदारणीला सांगा कीं, अगदीं अपरात्रीं तूं एकटी सिनेमाला जा. ती जाणार नाहीं; तिला धीर होणार नाहीं. तिची आई असेल तर तीच ' जाऊं नको ' म्हणेल; बाप असेल तर ' खुशाल जा' म्हणेल; शरीरानें दुबळी असते हें एक त्याचें कारण असलें तरी त्यापेक्षांहि कोणी तिच्यावर जबरदस्ती केली तर तिची बेअब्रू होईल, तिला मग तोंड काढायला जागा राहणार नाहीं, तिच्या जन्माचें मातेरें होईल हीच भावना याच्या बुडाशीं आहे. काय यांत त्या बिचारीचा स्वतःचा दोष असतो ? मला जर कोणी रस्त्यांत मारलें तर मला तसें सांगायला मुळींच लाज वाटणार नाहीं. पण स्त्रियांवर कोणी अत्याचार केला तर, तें सांगण्याला सुद्धां त्यांना धैर्य होत नाहीं. १८९७ सालीं पुण्याला प्लेग झाला, त्यावेळीं सरकारनें सोल्जरांकडून लोकांचें सामान बाहेर काढवून घरें धुवविलीं. त्यावेळीं सोल्जरांनीं पुष्कळ स्त्रियांवर अत्याचार केले म्हणतात. त्यावेळीं गोखले विलायतेंत होते; त्यांना येथील एका सद्‌गृहस्थानें ही गोष्ट कळविली; गोखल्यांनीं एका सभेंत संतापानें ही गोष्ट लोकांच्यासमोर सांगितली; गोखले विलायतेहून स्वदेशीं आले; ते बोटींतून उतरतात तोंच त्यांचेवर सरकारनें नोटिस बजावून विलायतेंत केलेल्या विधानाबद्दल जाब विचारला. गोखल्यांनीं ज्या गृहस्थाकडून ही बातमी आली होती, त्यांना पुरावा विचारला. त्यांना पुरावा मिळेना. लोक म्हणूं लागले, ' झाली गोष्ट ती झाली, पण आमच्या बायकांना कोर्टांत जाऊन अशी गोष्ट सांगायला नको;' आणि पुराव्याच्या अभावीं गोखल्यांना माफी मागावी लागली. म्हणून जोंपर्यंत ही भावना कायम आहे, तोंपर्यंत तुम्हांला पुरुषांत मिसळणें शक्य नाहीं. तिच्या स्वातंत्र्यामुळें समजा, यदाकदाचित् कोणी एखाद्या हलकट मनुष्यानें तिच्याशीं अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला तर त्यामुळें ती स्त्री बारगळली, ती भ्रष्ट झाली, अशी कल्पना तुम्हीं करूं नये, उलट त्या मनुष्याचाच तुम्ही धिक्कार करण्याकरितां त्या स्त्रीची बाजू घेतली पाहिजे.

त्यासाठीं शरीरबल थोडेंसें वाढविलें पाहिजे, आणि त्याबरोबर मनोबलहि खूप वाढविले पाहिजे; तुम्हीं निर्भय झालें पाहिजे. मन शुद्ध–पवित्र असलें, खंबीरपणा असला तर तुम्हांला कोणी कांहीं करूं शकणार नाहीं. अशी स्थिति पुष्कळ स्त्रियांची झाली म्हणजे पुरुष तरी कशाला म्हणतील कीं, स्त्रियांना स्वातंत्र्य नको ?

तिसरी गोष्ट तुम्हीं आपली पात्रता वाढविली पाहिजे. जसें स्वराज्य मागून मिळत नाहीं, पात्रता वाढवावी लागते, तसेंच स्त्रियांनीं पात्रता वाढविली कीं, त्यांना पुरुषांबरोबरींचे हक्क सहज मिळतील. एखाद्या मनुष्यांत त्याची पात्रता नसतांना त्याला उगाच मोठेपणा दिला, तर मोठेपणा देणाऱ्यालाहि त्यापासून आनंद होत नाहीं व घेणाऱ्यालाहि आनंद होत नाहीं. अलिकडे बायकांना फार मोठेपणा देण्याची एक पद्धत पडली आहे. ' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ' , त्या गृहलक्ष्मी, गृहदेवता आहेत इत्यादि इत्यादि. अहो, कसल्या गृहदेवता ! सारा आडमुठेपणा आहे. अडाणी बायका, त्यांना का डोक्यावर घेऊन नाचायचें ? असा मोठेपणा किती दिवस टिकेल ? म्हणून तुम्ही स्वतःची पात्रता वाढवून खराच मोठेपणा मिळविला पाहिजे. ' तुम्ही ' या शब्दावर माझा जोर आहे. पुरुषांनीं तुम्हांला पात्रता मिळवून देण्याचा प्रयत्न करून भागणार नाहीं. स्त्रियांनींच हें कार्य करावयाचें आहे. स्त्रियांसाठीं पुष्कळशा संस्था पुरुषांनीं चालविलेल्या आहेत, स्त्रियांनीं चालविलेल्या नाहींत असें नाहीं; पण त्या फार थोड्या आहेत. ज्ञान मिळविण्यासाठीं जर स्त्रियांनीं प्रयत्न केला, तर त्यांची योग्यता आपोआपच वाढेल, त्यांना मान मिळेल. सरोजिनी नायडू, ॲनी बेझंट यांचें उदाहरण पहा. त्या आपल्या योग्यतेनें चढल्या आहेत. तुमचे हक्क तुम्हांला पाहिजे असतील, तर योग्यता मिळविल्याशिवाय ते कसे मिळणार ! गांधी आहेत ते हिंदीच आहेत; पण व्हॉइसरॉय त्यांना वचकतो, आम्हांला कुठें वचकतो सांगा ! आतां कायद्यांनीं तुम्हांला जे अधिकार पाहिजेत; ज्या सुधारणा पाहिजेत; त्या मिळवून घ्या. त्यानें फायदा होणार नाहीं असें नाहीं. घटस्फोटाचा कायदा तुम्हीं करून घ्या, आर्थिक स्वातंत्र्य मिळवा, पण तेवढ्यानें तुमचा सारा प्रश्न सुटेल असें मात्र नाहीं, हें सांगून ठेवतों. आरडाओरड करायला हे मार्ग ठीक आहेत. आपली दाद लावून घेण्यासाठीं आरडाओरड केली पाहिजे, योग्यता असून नुसतें भागत नाहीं, पटवून दाखवावी लागते. त्यासाठीं सभा करावयाच्या, चळवळ करायची, या गोष्टी केल्या पाहिजेत; पण या वरवरच्या गोष्टी आहेत हें लक्षांत ठेवा.

आणखी एक गोष्ट. स्त्रियांसंबंधींच्या मोठ्यामोठ्या अपेक्षा तुम्हीं सोडून दिल्या पाहिजेत. ही गोष्ट मी पुरुषांना सांगायची झाली तर असें सांगेन कीं, स्त्रियांचें संसारांतील कार्य व योग्यता त्यांनीं संभाळून असलें पाहिजे. स्त्रियांना

जेवढा मान दिला पाहिजे तितका पुरुष देत नाहींत, असा मान आम्हीं पुरुष देऊं लागलों तर हक्काची भाषाच निघणार नाहीं. स्त्रियांना मान देण्यासारखी स्त्रियांची कामगिरीच आहे. तीन किंवा चार बालकांचें-जीं बालकें पुढें देशाच्या उपयोगी पडतात, समाजाच्या उपयोगीं पडतात-अशांचे संगोपन करणें हें काय लहानसान काम आहे ? ही केवढी स्त्रियांची जगाला मदत आहे, ही केवढी त्यांची सेवा आहे ! या कामाची महति ओळखून जर स्त्रियांना आपण योग्य स्थान व योग्य मान दिला तर स्त्रियांनाहि पुरुषांशीं झगडावें लागणार नाहीं. असें झालें तर, स्वेच्छेनें स्त्रिया समाजकार्यांतील आपली योग्य कामगिरी उचलतील.

मी 'रागिणी' नांवाची एक कादंबरी लिहिली आहे, त्या कादंबरींत मी हेंच सांगितलें आहे कीं, प्रेमाशिवाय-'हक्का' ची भाषा बोलून कोणताही प्रश्न सुटणार नाहीं. इंग्रजींत एक उखाणा आहे : 'अशी कोणती वस्तु आहे कीं जिचा उच्चार केला असता ती नष्ट होते ? या उखाण्याचें उत्तर आहे : स्तब्धता.' तीच गोष्ट हक्कासंबंधीं. स्त्रिया 'हक्क, हक्क' म्हणून जोपर्यंत उच्चार करतील, तोंपर्यंत हक्काचा प्रश्न सुटणार नाहीं. ज्या दिवशीं तुम्ही आम्हांला जीं कामें सहज करतां येतात आणि करावींशीं वाटतात असें म्हणून, तीं कामें सहज करूं लागाल त्या दिवशीं हा प्रश्न खरोखरच सुटलेला दिसेल.

तुम्ही कायदे करा, लोकांचें लक्ष वेधण्यासाठीं कायदे करा पाहिजे तर, पण तेवढ्यानें तुम्हांला जे हक्क पाहिजेत ते मिळणार नाहींत."

## पक्षभेद आणि पक्षद्वेष *

" भगिनींनो मी आज ' पक्षभेद आणि पक्षद्वेष ' हा विषय चर्चेकरितां घेतला आहे. हा विषय प्रथम वीसवर्षांपूर्वी माझ्या मनांत आला. त्यावेळीं जहाल व मवाळ असे महाराष्ट्रांत एकमेकांचे विरोधी पक्ष होते, जसे आज कॅांग्रेसपक्षीय आणि भोपटकरपक्षीय आहेत तसे. त्यावेळीं केसरी व ज्ञानप्रकाश यांचा उभा दावा असे. माझी ओळख दोन्ही पक्षांत होती. मी ' मराठा ' ऑफिसांत नोकरी करीत होतों. एम्. ए. होतांच ' समर्थ विद्यालयांत ' गेलों. ' विश्ववृत्त ' मासिकाच्या अनुषंगानें मला तीन वर्षें सरकारचा पाहुणचार मिळाला. तेव्हां, मी ' मराठा ' कचेरींत असतां मला वाटत असे, कीं दोन्ही पक्षाचीं हीं मंडळी इतकीं चांगलीं, स्वार्थत्यागी असून त्यांच्यांत भांडण कां असावें ? हे असे भांडतात कां, याबद्दल मी टिळकांना एकदां प्रश्न केला. त्यांनीं उत्तर दिलें, तें कांहीं अंशीं मला सत्य वाटलें. ते म्हणाले, " तुम्ही, वामनराव, बाहेर बाहेर राहतां, तत्त्वज्ञानाची भूमिका घेऊन, तटस्थ राहून, निरीक्षक म्हणून पहातां, त्यामुळें तुम्हांला वाटतें कीं हे उगीच भांडतात. पण उत्साहानें ' आपण एक काम करणार ' असा निर्धार करून तुम्ही काम करूं लागा आणि तुम्हांला विरोधी पक्षाकडून अडथळे येऊं द्या, मग तुमची शांत वृत्ति रहाते कां पाहूं ! ' त्यावेळी मी गप्प बसलों. थोडेंसें खरें आहे त्यांचें म्हणणें. आतां आम्ही कृष्णाची भूमिका घेऊन वेदांती होऊन सांगूं कीं, ' तुम्ही कां भांडतां, एकमेकांवर आरोप कां करतां ?'

---

* राष्ट्रसेवादलाच्या स्त्री शाखेच्या बौद्धिक शिक्षण-वर्गाकरितां, पुणें येथें झालेलें व्याख्यान.

पण जरी मला हें थोडें खरें वाटलें तरी हें पूर्ण सत्य नव्हे. मी विचार करूं लागलों तेव्हां भांडण न करणें, मतभेद असूनहि शांत राहाणें, ही गोष्ट अशक्य नाहीं असें मला वाटूं लागलें. ही गोष्ट कठीण असेल पण अशक्य खास नाहीं. मग अशी प्रवृत्ति कां होते ? हा विचार करून या प्रवृत्तीचें कारण काढून टाकलें तर भांडणें कमी होतील. जगामध्यें पक्षभेद असायचेच, प्रत्येकाची मतें भिन्न असायचींच, पण म्हणून त्यांच्यांत द्वेष नसावा.

चांगल्या चांगल्या लोकांत जेव्हां मी भांडणें पहातों, तेव्हां मला फार वाईट वाटतें. आपल्याला माहीत असेल कीं, कांहीं काव्यें शोकांत असतात; त्यासंबंधीं प्रसिद्ध तत्त्ववेत्ता हेगेल यानें म्हटलें आहे कीं......

रामानें रावणाला मारलें, त्यांत हत्त्या आहे खरी, पण त्यांत आनंद आहे, कारण त्यांत दुष्टतेचें शासन आहे. परमेश्वर दुष्टांचा संहार करण्यासाठीं अवतार घेतो, असें गीतेंत सांगितलें आहे, म्हणून संहारांत किंवा हत्त्येंत–ती जर दुष्टांच्या शासनासाठीं आणि जगाच्या कल्याणासाठीं असेल तर–दोष नाहीं. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं ‘कृष्णार्जुन युद्ध’ नांवाचें एक नाटक लिहिलें आहे. कृष्ण आणि अर्जुन दोघेहि थोर, म्हणून त्यांच्यांत युद्ध होणें हें खरोखर शोकाचें कारण आहे. भारतीय युद्धांत भीष्मार्जुनांचेंहि मोठें युद्ध झालें, पण त्यांत भीष्म युद्धकालीं शत्रु असला तरी युद्धाच्या प्रारंभीं अर्जुन त्यांना प्रणाम करीत असे; त्यांच्यामध्यें द्वेष नव्हता. भांडण्यास कारण असेल तर भांडलेंच पाहिजे, पण त्यांत असूया असावी, कुत्सित बुद्धि असावी असें बिलकुल नाहीं. याचसंबंधीं मी आज विवेचन करणार आहे.

ज्या दोन पक्षांच्या परस्परांना विरोध असतो, ते दोन्ही सत्पक्ष असले तरी त्या प्रत्येकाची विशिष्ट दृष्टि असते, त्यामुळें त्यांना सर्व गोष्टी निराळ्या दिसूं लागतात. राजकारणांत काय, समाजकार्यांत काय, असे दोन पक्ष नेहमीं असतात कीं, ज्यापैकीं एक म्हणत असतो कीं, ‘आजची परिस्थिति पाहून, बलाबल पाहून, काय करावयाचें तें करा !’ आणि दुसरा म्हणतो कीं, ‘आजच्या परिस्थितिकडे पाहण्याचें कारण नाहीं, पाहून चालणार नाहीं. आम्हांला वर्षांनीं अमुक तऱ्हेचा समाज निर्माण करायचा आहे, त्यासाठीं आजच्यापासून प्रयत्नाला सुरुवात केली पाहिजे, पांचशें वर्षांनीं निर्माण करायचा म्हणून आज बोलूंच नका म्हणून सांगून भागेल कसें ? आज आम्हांला उपदेश

करण्याचा अधिकार आहे. तुम्ही खुशाल आज आम्हांला वाईट म्हणा!' हेंहि म्हणणें खरें दिसतें; कारण परिस्थिती पालटायची असेल, समाजाला-लोकांना चार पावलें पुढें न्यावयाचे असेल तर आहे त्याजागेंत घुटमळून कसें भागणार? बरें, पहिल्या पक्षाचेंहि म्हणणें बरोबर आहे. ज्या गोष्टी आज बोलल्या असतां समजणारहि नाहींत. त्या बोलून नसता त्रास उत्पन्न करून घ्यायचा आणि अड-थळे उत्पन्न करून घ्यायचे, यांत फायदा काय? अशा तऱ्हेचे मतभेद सर्व संस्थांत पक्षांत, चळवळींत दिसतात. कारण त्या चळवळींल्या ध्येयवाद्यांना पुढचा काळ दिसत असतो आणि तो काळ जितका जवळ येईल, तितका आणण्याचा त्यांचा साहजिक प्रयत्न असतो.

सध्यांच सरकारनें पूर्वींच्या घटनेंत बदल करून नवी घटना देऊं केली आहे. ती कांहीं अंशीं समजा वाईट आहे, पण जेथें सरकार लोकमताला मान देऊन घटना बदलेल असें आम्हांला वाटत नव्हतें, तेथें सरकार आतां ती बदलण्यास तयार झालें आणि नवी घटना देऊं लागलें आहे, तर आतां ती घटना फेटाळण्या-चीच भाषा सुरूं झाली आहे. याबाबतींत कांहीं म्हणतात, पुढें काय येईल काय नाहीं हें सांगतां येत नाहीं; राजकारणांत म्हणतात दहा वर्षांच्या पुढें काय होणार हें पाहूं नये. घटना फेटाळणें वगैरे गोष्टी कानांला योग्य वाटतात पण, मी खरें सांगतों, ही गोष्ट घडेल असें आम्हांला स्वप्नांतहि वाटत नाहीं. अहो एक काळ असा होता कीं, 'स्वराज्य' शब्द उच्चारणें मोठें पाप होऊन बसलें होतें. पण पुढें ............' स्वराज्य शब्द उच्चारण्यांत पाप नाहीं ' असा निकाल दिला त्याबद्दल आम्हीं त्यावेळीं आर्टिकल्स लिहिलीं. मोर्ले-मिंटो सुधारणा मिळाल्या, त्या मिळतील अशी आमची अपेक्षा नव्हती; आमच्या अपेक्षेच्या बाहेर सुधारणा मिळाल्या असें आम्हांला वाटलें. आतां त्या सुधारणांहून कितीतरी पटीनें अधिक या नव्या घटनेनें मिळावयाचें आहे. घटना एकंदरीनें वाईट असूं दे, पण त्या घटनेनें प्रांतिक स्वायत्तता मिळाली आहे, ती मिळेल असें मला स्वप्नांतसुद्धां वाटलें नव्हतें. तुमच्यासारख्या बायका राजकारणांत पडतात हें त्यावेळीं कोणाच्या कल्पनेंतसुद्धां येत नव्हतें. पण आतां त्या गोष्टी प्रत्यक्ष घडूं लागल्या आहेत. म्हणून दोन्ही पक्षांचेंहि म्हणणें खरें आहे. मी ज्यावेळीं एका पक्षाचा विचार करूं लागतों, त्यावेळीं मी दुसऱ्यांवर, ' ते स्वार्थी आहेत ' वगैरे आरोप करूं लागतो; तर दुसऱ्या बाजूनें, ' हे कूपमंडूक आहेत ' वगैरे आरोप केले जातात. मला

असें म्हणायचें नाहीं कीं, तुम्हीं हा पक्ष स्वीकारा किंवा तो पक्ष स्वीकारा, मला एवढेंच सांगायचें आहे कीं, तुम्ही कोणताहि पक्ष घेतलात तरी दुसऱ्याचा द्वेष करूं नका. मी स्वतः अस्पृश्यता मानणारा नाहीं. मी 'मराठा' ऑफिसांत असतांना परवां जसें........पेठेंत झुणका–भाकर–भोजन झालें तसें, एकदां सहभोजन झालें, त्या भोजनाला मीं गेलों होतों हें आमच्या ऑफिसमधल्या लोकांना आवडलें नाहीं; त्यांची मनोवृत्ति निराळी होती. पण म्हणून सनातन्यांचा द्वेष करण्याचा मला अधिकार नाहीं; त्यांच्या परिस्थितीची आत्मीय भावनेनें आपण जाणीव करून घेतली पाहिजे. आज अस्पृश्य म्हणतात, रोटी व्यवहार करूं या, पण त्याबरोबर पुढें बेटी व्यवहार येईल अशी सनातन्यांना भीति वाटते. एखाद्या मुलीच्या मनांत आलें कीं, अस्पृश्यांनीं लग्न करावें त्याला व्यक्तिशः माझा विरोध नाहीं. पण सनातनी या बाबतींत दूरदर्शी असतात. ते म्हणतात, बाबांनों, रोटीव्यवहार करतां करतां बेटीव्यवहार सुरूं होईल आणि त्याबरोबर मग कितीतरी गोष्टी येतील. thin end of the wedge आहे. त्यांना तसें प्रामाणिकपणें वाटतें. त्यांच्या दृष्टीनें तो धर्म आहे. परवांच्या कायदेभंगाच्याच चळवळींतील गोष्ट घ्या. सरकारला कर न भरतां, मीठ करून तें वापरायचें यासाठीं जिकडे तिकडे मिठाचा कायदेभंग सुरूं झाला. समुद्राच्या पाण्याचें मीठ सत्याग्रही बनवूं लागले, म्हणून सरकारनें दडपण्यास सुरवात केली. खाऱ्या पाण्याचा एक गडू तुम्ही आणला तर त्याच्यांत सरकारचें नुकसान काय होणार आहे ? पण ते जाणत होते कीं, हा नुसता आरंभ आहे, पुढें सर्व प्रकारचा कायदेभंग यांच्या पाठोपाठ येणार, आणि म्हणून पुढच्या कायदेभंगाच्या भीतीनें त्यांनीं गडू आणण्यासुद्धां प्रतिबंध केला.

जगांत सगळ्यांना सारखें ज्ञान नाहीं. ज्याचें जसें ज्ञान त्याप्रमाणें त्याचें धोरण असतें विजापुरकर आम्हांला एकदां सांगत होते. कोल्हापुरला कांहीं अडाणी, रानटी लोकांनीं बंड केलें. अर्थात् या बंडवाल्यांना पकडून त्यांच्यावर सरकारनें खटला भरला. या खटल्यांत असेसरांमध्यें प्रोफेसर मोडक एक असेसर होतें. त्यांनीं थट्टेनें सांगितलें कीं, ' यांना दुसरी कसली शिक्षा देऊं नका, यांना भूगोल शिकवा कारण हें लोक ज्या डोंगरांत राहात होतें, तेवढेंच त्यांचें जग होतें, त्यांना केव्हां तरी पोलिस दिसायचे आणि त्यांच्याजवळ दिसली तेवढीं हत्यारें असें त्यांना वाटलें म्हणून त्यांनीं बंड केलें, त्यांना खरी कल्पना नाहीं. कीं, ब्रिटिशसत्ता

म्हणजे आहे काय ? म्हणून त्यांना शिक्षा काय करायची, त्यांच्यावर दयाच केली पाहिजे, त्यांना ज्ञान दिलें पाहिजे, म्हणजे ते असा मूर्खपणा करणार नाहींत. अशा लोकांना जर कम्युनिस्ट सांगतात त्याप्रमाणें जगाचे प्रवाह अमुक दिशेनें चालले आहेत, आणि तुम्ही हें काय करतां वगैरे सांगूं लागला तर त्या बिचाऱ्यांना जग काय आणि जगाचे प्रवाह काय-हें काय माहीत असणार ? म्हणून ते आपल्या मार्गानें जाऊं लागले तर त्यांचा द्वेष काय म्हणून करावा ? आगरकर सुधारक होते, त्यांची बायको तुळशीला पाणी घालीत असे. एकदां आगरकरांना त्यांच्या एका विद्यार्थ्यानें विचारलें, 'हें तुम्हांला चालतें कसें ?' तेव्हां आगरकर म्हणाले, 'माझीं' मतें हीं 'माझीं' आहेत आणि तिचीं मतें ही 'तिचीं' आहेत, तोंपर्यंत तिच्या मनाप्रमाणें वागण्यास तिला स्वातंत्र्य नको का ? तिला तसें वागूं दिलें नाहींतर जुलूम होईल.' हीच त्यांची वृत्ति होती. आगरकर जरी सुधारक होते तरी त्यांनीं आपल्या बायकोच्या निष्ठेचें आणि धर्मशीलतेचें कौतुक केलें. अशी वृत्ति दुसऱ्या पक्षा संबंधीं असली पाहिजे. जगाचा इतिहास पाहिला तर, अकलेचा मक्ता कोणा एकाला दिलेला नाहीं असें आढळून येईल. असें असल्यामुळें आपापल्या ज्ञानाप्रमाणें, वकूबाप्रमाणें जो तो काम करीत असतो. त्याला तसें करूं द्यावें. राष्ट्राच्या प्रगतीचा प्रश्न इतका गुंतागुंतीचा आहे कीं, तो एकट्यादुकट्याला सोडविणें अशक्य आहे—मग तो गांधी असो कीं महागांधी असो. जर ईश्वर असेल तर फक्त त्यालाच हें शक्य आहे. प्रत्येकाच्या म्हणण्यांत सत्याचा अंश असतो. लॉइड जॉर्ज यांनीं गेल्या महायुद्धावर एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं पुस्तकाच्या शेवटीं एक वाक्य लिहिलें आहे कीं आम्हांला गेल्या युद्धांत जो जय मिळाला तो आमचा सत्यपक्ष होता म्हणून मिळाला असें नव्हें; आम्हांला युद्धाच्या दृष्टीनें कांहीं अनुकूल परिस्थिति होती म्हणन जय मिळाला. जय मिळायचा असेल तर सत्यपक्ष असून भागत नाहीं कांहीं परिस्थिति मिळवावी लागते. हीहि गोष्ट खरी आहे.

तुमचा कोणताहि पक्ष असेल त्याला तुम्ही चिकटून रहावें, उत्साह धरावा, पण त्या पक्षाच्या विरुद्ध असलेल्या लोकांचा द्वेष करणें यांत कांहीं अर्थ नाहीं. सत्य महान् आहे, प्रत्येकाला त्याचा कांहीं विशिष्ट भाग दिसत असतो. जानव्याला जशा अनेक गांठीं असतात तशा राजकारणांत अनेकानेक गांठीं आहेत. शेवटीं एक गोष्ट सांगून मीं माझें भाषण संपविणार आहे.

मोरिया नांवाचा एक फ्रेंच नाटककार आहे, त्यानें He would be a gentelman ' नांवाचें एक छोटें नाटक लिहिलें आहे. त्यांत त्यानें दाखविलें आहे कीं, एका श्रीमान् गृहस्थाला समाजांत मोठा म्हणून वावरायचें असतें त्यासाठीं तो वर्तमानपत्रांत जाहिरात देतों कीं मी वाटेल तेवढे पैसे खर्च करण्यास तयार आहे, मोठेपणाला आवश्यक असणाऱ्या गोष्टीं मला कोणी शिकवाव्या. ही जाहिरात वाचून त्याच्या दारापुढें हजारो लोकांची गर्दी जमते. त्यांत प्रथम त्याच्यापुढें एक गवई येतो व तो सांगूं लागतो कीं मी गवई आहे; सूरबद्ध आणि तालबद्ध असें गायन कसें गावें हें मी तुम्हाला शिकवीन, त्यायोगें तुम्ही मोठे हाल, कारण...... ( Harmony ) हेंच जीवनाचें मोठें सूत्र आहे, त्या गृहस्थानें त्याला लावून दिल्यानंतर एक नर्तक प्रवेश करतो व तो सांगतो कीं, मीं तुम्हांला योग्य रितीनें पावलें टाकायला शिकवीन ज्यायोगें तुमचें वांकडे पाऊल ( False step ) पडावयाचें नाहीं. त्यालाहि बाहेर घालविल्यावर वाङ्मय भक्त येतात आणि ते सांगतात कीं, जीवनांत ज्याला औचित्याचें महत्त्व समजलें तो मोठा माणूस ( Gentelman ) होतो, म्हणून औचित्य शास्त्र आम्हीं आपल्याला शिकवूं. शेवटीं एक सोल्जर येतो आणि तो या साऱ्याना बाहेर आणि त्या गृहस्थाला सांगतो कीं, मलाच नेमा आणि मला नेमलें नाहीं तर तुम्हाला माझ्या मोठेपणाचा प्रसाद दाखवीन. असो. नाटककारानें या प्रहमोठेपणाची निरनिराळीं अंगे दाखवीत आहेत. पण तीं एक एक अंगे आहेत, त्यांतल्या एकानें म्हणजे नुसत्या संगीतानें किंवा वांकडे पाऊल न टाकल्यानें का Gentelman होतां येते ?

आज देशांत नानातऱ्हेचे प्रश्न देशाच्या उन्नतीच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत. कॉंग्रेसनें राजकारणाचा प्रश्न सोडविला म्हणजे सर्व प्रश्न सुटले असें मुळींच नाहीं. उलट, मी म्हणालों स्वराज्य मिळालें म्हणजे अधिकच त्रास होणार आहे. तो त्रास सोसण्यांत आम्हाला दुप्पट आनंद वाटेल. ही गोष्ट निराळी, आणि म्हणून स्वराज्य मिळालें पाहिजे पण मला सांगावयाचे हें आहे कीं स्वराज्य मिळालें म्हणजे सगळें झालें नाहीं. पुढें आपल्यावर आणखी अधिक जबाबदाऱ्या येणार आहेत. आणि म्हणून त्यासाठीं अनेकाच्या अनेक प्रयत्नांनीं जरूर आहे. जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणें त्यांतील भाग उचलीत आहे, म्हणून त्याचा द्वेष करूं नये.

## पुढारी-कुबांत वामनराव

हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांमध्यें कुणाचें कुणाशीं पटत नाहीं, नेहमीं उगाच भांडत असतात, त्यांचे अनुयायी एकमेकांच्या सभा मोडतात, दंगे करतात आणि ( एखादें वेळेस अत्र्यांसारख्या व्यक्तीला पाहुणा म्हणून बोलावून मारपीट करतात) याची कारणमीमांसा काय; यांत दोष पुढाऱ्यांचा कीं अनुयायांचा, का दोघांचा; पुढाऱ्यांचा असल्यास कोणाकोणाचा का सगळ्यांचाच; इत्यादि प्रश्नांची आम्हां मित्रमंडळींत नुकतीच चर्चा चालली होती. या गोष्टी अशाच चालायच्या, असें कांहींचें म्हणणें होतें. हिंदुस्थानला आणि विशेषें करून महाराष्ट्राला आणि बृहन्महाराष्ट्राला हा दैवी म्हणा किंवा स्वभाव सिद्ध म्हणा शापच आहे असें त्यांचें म्हणणें. माझें म्हणणें असें कीं, यांतून कांहीं तरी मार्ग निघेल, तशी प्रबळ इच्छा असेल आणि तसेंच कसून प्रयत्न झाले, तरच अर्थात् माझ्याशीं सहमत असलेले, पण वादाच्या मौजेकरितां मला विरोध करणारे माझे एक विनोदी मित्र म्हणाले, ‘ स्वप्नसृष्टींत तुम्हांला मार्ग सांपडेल, सत्यसृष्टींत कांहीं नाहीं.’ मी म्हटलं सत्यसृष्टींत कां सांपडेना, सांपडला म्हणजे झालं स्वप्नावरून रोगनिदान आणि रोगचिकित्सा करतां येते, रोगाचीं सुप्त-गुप्त कारणें कित्येक वेळां ओळखतां येतात, हें फ्रॉइड् वगैरेंनीं सिद्ध केलेंच आहे. तेव्हां स्वप्नसृष्टींत सांपडलेला मार्ग असला म्हणून तो कांहीं टाकाऊ ठरत नाहीं ! माझ्या उत्तरावर प्रतिउत्तर न देतां मंडळी हंसूं लागली आणि मीहि मग सगळ्या गोष्टी हंसण्यावारी नेऊन घरीं येऊन झोंपलों.

*　　*　　*　　*

झोंपून मला वाटतं फार वेळ झाला नसेल, इतक्यांत माझे विनोदी मित्र नाना मला उठवायला आले आणि चूळ भरून कोट–टोपी चढवा, आपल्याला स्वराज्य–क्लबांत जायचं आहे ना, विमान आणलें आहे, असें म्हणून मला घाई-घाईनें त्यांनीं अंथरुणांतून ओढून काढून १०–१५ मिनिटांत विमानांत बसविलेंहि!

'फार वेगांत चाललं आहे हें विमान' असें मी नानांना म्हटलें, तेव्हां ते म्हणाले, 'आधींच उशीर झाला होता म्हणून हें मानस–विमान भाड्यानें घेतलं.'

'आणि खर्च कोण देणार आणि भाडं काय ठरविलं आहे?'

'लक्ष' म्हणून उत्तर आल्यावर मी स्तंभितच झालों आणि घेरी येऊन खालींच पडायचा, पण "मी देईन तें, नाहीं तर लोकांकडून मागून घेऊं." असें नाना म्हणाले, तेव्हां धीर आला आणि क्षणभर स्वस्थ बसलों. 'आपलीं हीं वर्षं कशीं गेलीं कांहीं समजलीं नाहींत"—मी म्हटलें. तेव्हां नाना म्हणाले, "समजलीं नाहींत म्हणे! मारामाऱ्या, खून, युद्धें झालीं, तरी म्हणे कशीं वर्षं गेलीं हें समजलं नाहीं? आपण जगलों आणि आपल्या वेळचे लहान-मोठे पुढारी जगले हीच त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट."

"बाकी आपण कसें जगलों हाच मला प्रश्न पडला आहे!"

"त्याची अशी मजा झाली," नाना म्हणाले, "कीं अनुयायांच्या मारा-माऱ्यांत पुढारी सांपडत नाहीं, त्यांची कातडी शाबूत राहते असं मी पाहिलं आणि या नव्या जमान्यांत जगायचं असलं तर पुढारी बनलं पाहिजे असं मनाशीं मी निश्चित ठरवलं आणि पुढारी बनलों नि काय? अरे, हिन्दूंची व्याख्या न. चिं. केळकरांनीं केली नव्हती का कीं, 'जो स्वतःला हिन्दू म्हणवतो तो पुढारी हें तत्त्व मी ओळखलं आणि पुढारी बनलों नि काय? आणि साताऱ्च्या नापित महाराजांना जसं त्यांच्या एका भक्तानें ब्रह्मवेत्ता सद्गुरु बनवलं तसं तुलाहि मी पुढारी बनवलं."

'तूं काय म्हणत आहेस हें मला कांहीं समजत नाहीं,' असं म्हणत आहें तों तें मानस–विमान जमिनीवर उतरलेंच आणि आमच्या स्वाऱ्या एका क्लबाच्या भव्य इमारतीपुढील पटांगणांत उतरल्या. पटांगण ओलांडून क्लबाच्या इमार-तींत शिरणार, इतक्यांत एका शिपायानें आम्हांला अडवलें आणि पुढाऱ्यां-शिवाय आंत कोणाला प्रवेश नाहीं म्हणून सांगितलं. तेव्हां आमचे नाना म्हणाले, "मी इंगुदीग्रामाचा पुढारी आहें. आणि हे माझे मित्र सुप्रसिद्ध एरंडपुरीचे पुढारी आहेत."

शिपायानें सलाम केला आणि नम्रतेनें म्हणाला, " साहेब, आम्ही हुकमाचे बंदे. जो पुढारी आहे मीं, असं म्हणेल त्याला पुढारी समजायचं आणि आंत सोडायचं इतरांना नाहीं; असा आम्हांला हुकूम आहे, म्हणून जरा हटकलं, माफ करा. "

आतां गेल्यावर नानांना मीं विचारलं, ' अरे मला एरंडपुरीचा पुढारी बनवलंस, ही एरंडपुरी श्रीखंड-पुरीजवळचीच ना ? "

नानांनीं हंसत उत्तर दिलं कीं, ' अरे बाबा, स्वराज्य जसं मागून मिळत नाहीं तर स्वतः मिळवावें लागतं; तसंच पुढारीपण आपण स्वतः मिळवावं लागतं. नाहीं तर माझ्या सारख्या भक्तांनीं तें द्यावं लागतं हळूच नानांनीं अर्थपूरणार्थ हंसून म्हटलं, आणि ' चला आतां हा पुढारी क्लब बारकाईनें पाहून घेऊं या, पुनः संधि मिळावयाची नाहीं. बावळ्या बघ्यां-सारखं चालूं नकोस. पुढाऱ्याची ऐट आण ' असंहि त्यांनीं बजावलं. तेव्हां उसना रुबाब आणून आम्ही हातांतली काठी ऐटींत फिरवीत, सिगारेटचा धूर सोडीत, क्लबांत बिनदिक्कत हिंडूं लागलों ! फिरतां फिरतां एका टेनिस-कोर्टाजवळ आलों. तेथें पाहतों तों आश्चर्यातलं मोठं आश्चर्य ! जिना आणि सावरकर एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला अण्णासाहेब भोपटकर आणि भाई रॉय, असे उत्साहानें चेंडू इकडून तिकडे, तिकडून एकडे मारीत आहेत आणि मारे एकमेकांना Well Played ' ' वाहवा ! काय व्हॉली आहे !, ' ' Sorry partner, माझी चूक आहे ! ' इत्यादि उद्‌गारांची देवघेव करीत आहेत असं दृश्य आम्हांला दिसलं ! सावरकर आणि कायदे अजम जीना एका बाजूला ! आणि एकमेकांना उत्तेजन देत आहेत, एकमेकांना सांवरून घेत आहेत, एकमेकांना आक्रमण ( Poaching ) करून देत आहे, आणि एकमेकांजवळ आपली चूक कबूल करीत आहेत ! काय हा देखावा ! आणि सावरकर भोपटकरांवर निकराचा हल्ला चढव-आहेत आणि हूल दाखवून फसवीत आहेत, हा काय चमत्कार ! आम्हीं दोघे थक्कच होऊन गेलों. नानांनीं चिमटा घेऊन आश्चर्य वगैरे फारसं दाखवायचं नाहीं असं खुणेनें सुचवलं नसतं तर मी हतबुद्धच झालों असतों, आणि बावटाळासारखा डोळे विस्फारित करून पाहात उभा राहिलों असतों. [ बाकी, सावरकर जेव्हां Volley बद्दल 'वर-टोला' मधून मधून म्हणत, किंवा ' Service ' बद्दल 'सेवा' म्हणत, तेव्हां हसूं दाबायचं ठरविलं होतं तरी मंदस्मित चेहऱ्यावर उमटलं

असलंच पाहिजे.] जीना मधून मधून गुजराथी बोलत होते, सावरकर मधून मधून उर्दू बोलत होते, भोपटकरहि चुकून (आणि चुका करीत) एखादे वेळेस उर्दू बोलत होते. इंग्रजीवर बहिष्कार नव्हता; पण उद्‌गारापुरतेंच इंग्रजी ऐकूं येत होतें. हें दृश्य थोडेसें पाहून झाल्यावर आम्ही दुसरीकडे काय चमत्कार आहेत तें पाहण्याकरितां एका बाजूला वळलों. जरा पुढें गेल्यावर त्या क्लबाचें ऑफिस लागलें.

तेथील प्रमुख कारकुनानें आम्हाला बसण्यास खुर्च्या दिल्या, तेव्हां नाना म्हणूं लागले कीं, 'आम्हाला या क्लबाचे सभासद व्हायचं आहे, नियम वगैरे देतां काय? आम्ही इंगुदीग्रामाचे आणि एरंडपुरीचे पुढारी...'

कशाला खोटं बोलतां उगाच? तुमचं विमान सुटलं त्याच वेळेस आमच्या हेरखात्यानें तुमची सगळी हकीकत टेलिफोननें आम्हाला कळवली आहे. आतां हें नव हिंदुस्थान आहे, पूर्वीचा काळ आतां राहिला नाहीं. तुम्हांला या क्लबाची माहिती पाहिजे आहे हें आम्हाला ठाऊक आहे. तर मींच तुम्हाला इथली सगळी व्यवस्था दाखवतों आणि नियम वगैरे सांगतों. चला माझ्याबरोबर; हिंडता हिंडतां सगळं कांहीं सांगतों.

"इथला पहिला नियम असा आहे कीं, प्रत्येक सभासद-पुढाऱ्यानें ज्या गांवीं तो असेल, त्या गांवांतल्या या क्लबाच्या शाखेला भेट दिलीच पाहिजे. आणि वर्षांतून निदान १२ दिवस आपल्या राजकीय (किंवा सामाजिक किंवा धार्मिक वगैरे) प्रतिपक्षाच्या पुढाऱ्याला भिडू म्हणून घेऊन टेनिस, बॅड्मिंटन, पिंगपाँग यांसारखे खेळ किंवा निदान पत्ते तरी खेळलेच पाहिजेत. अशा प्रकारच्या खेळांमुळें आणि नंतरच्या गप्पांमुळें किरकोळ गैरसमज दूर होतात अशी इथली समजूत आहे. तुम्हांला मौज पाह्यची असली तर तिकडच्या बाजूला खाडिलकर, केळकर, फडके, अत्रे, माटे, वरेरकर वगैरे मंडळी बॅडमिंटन खेळतांना दिसतील आणि आतां त्यांच्यामधलं वैमनस्य कांहींस नष्ट झालं आहे, असं दिसून येईल. वैमनस्य आणखी कमी करण्याच्या उद्देशानें येथला असा दुसरा नियम आहे कीं, प्रत्येक पुढाऱ्यानें वर्षांतून निदान चार व्याख्यानें प्रतिपक्षांच्या अनुयायांसमोर देऊन त्यांच्याकडून प्रत्येक व्याख्यानांत पांचदां तरी टाळ्या मिळवल्या पाहिजेत. या नियमाचा हेतु पुष्कळसा साध्य झालेला आहे. सावरकरांना, जिनांना, डॉ. मुंजांना, डॉ. खऱ्यांना वगैरे हा

नियम फार जाचक वाटला; पण ब्रह्मस्मृतींतले हे नियम वज्रलेखासारखे आहेत [ आणि ते असावेत म्हणून त्यांनींच ठरवलं होतं ]......"

" म्हणजे हें काय आहे हें आम्हांला नाहीं समजलं." नाना आणि मीं दोघांनीं एकदम म्हटलं.

" त्याचं असं झालं " तो प्रमुख कारकून म्हणाला, " हिंदुस्थानांतल्या यादवी-मुळें कांहीं वर्षं नर्मदा, सिंधु, कावेरी, गंगा, यमुना वगैरे सगळ्या नद्या-नाले वगैरे रक्तानं लाल होऊन गेल्या. सह्याद्रि, विंध्य वगैरे पर्वतांवर या यादवींत मेलेल्या माणसांच्या मुंडक्यांचीं शिखरं दिसूं लागलीं. पुष्कळशा दऱ्या प्रेतांनीं इतक्या भरून गेल्या कीं, डोंगर पठारांचा तेथें भास होऊं लागला. जाळपोळ; लुटालूट; वगैरेमुळें शेतांवरून नांगर फिरला नाहीं, बाजारांत धान्य आलं नाहीं आणि घरांत चूल पेटली नाहीं, तेव्हां शेषशायी भगवानानें कलंकी अवतार धारण करण्याची वेळ आली असं मनांत ओळखलं आणि मंत्रविद्येनं क्षणार्धात आर्यावर्तात अवतीर्ण होऊन सर्व पुढाऱ्यांवर विवेकास्त्र सोडले आणि सगळयांना एका सभेंत आणून बसविलें. ' तुम्हांला सुराज्य, स्वराज्य, स्वाराज्य, वैराज्य, पुनः पाहिजे असल्यास मी तुमच्या विचाराकरितां नवीन एक ब्रह्मस्मृति तयार केली आहे, ती योग्य वाटेल तो फेरबदल करून यापुढें सुखानें नांदा. ' असा आदेश देऊन भगवान् विष्णु अंतर्धान पावलें. मग सर्वांनीं विचारविनिमय करून शंभर पुढाऱ्यांची एक 'शतावरा' परिषद नवभारत घटनेकरितां ठरविली. त्यांनीं दहा जणांची एक दशावरा समिति तपशीलवार नियमनिश्चितीकरितां नेमली. यांनीं पुनः नियम-ग्रथनाकरतां त्र्यवरा उपसमिति नेमून पांचसहा **वज्रनियमांची** एक लहानशी ब्रह्मस्मृति ग्रथित केली आणि तीच पुढं सर्वांनीं मान्य करण्याचं कारण असें कीं, त्या वज्रनियमांतील मर्म सगळ्यांना अनुभवानें पटलें."

" पटण्यासारखं त्यांत काय आहे ? " नानांनीं विचारलं, तेव्हां तो प्रमुख कारकून म्हणाला, " अहो, असें पहा. विरुद्ध पक्षाच्या सभेंत पांचदां टाळ्या मिळण्याचा हा दुसरा नियमच कां केला हें तुम्हाला मीं सांगतों. आपल्याच पक्षाच्या लोकांत टाळ्या मिळवणें सोपं असतं. वासरांत लंगडी गाय शहाणी किंवा बायकांत पुरुष मोठा बलवान्, त्याचप्रमाणें आपल्या पक्षांतल्या सामान्य लोकांत थोडेसं विद्वत्त्व, बरीचशी चर्पटपंजरी, आणि

मधून मधून प्रतिपक्षीयांची टिंगल, या आधारावर आणि स्वार्थत्यागाच्या थोड्याश्या पुण्याईवर आपलं वजन पाडणं आणि मोठेपणा मिळवणं सोपं असतं. पण प्रतिपक्षीयांच्या मेळाव्यांत जाऊन तेथें आपली छाप पाडून तेथें वाहवा मिळवावयाची म्हटली म्हणजे स्वार्थत्यागाची मोठी पुण्याई लागतेच; पण केवळ तेवढ्यानेंच भागत नाहीं. माहिती भरपूर लागते, तत्त्वांचें मर्मज्ञान लागतं, युक्तिवाद-सामर्थ्य लागतं; अशा सभांत शाब्दिक विजय मिळवून देणाऱ्या कोट्या फारशा उपयोगी पडत नाहींत, तर युक्तिवादांत सत्य, सरळपणा, स्पष्टपणा आणि बिनतोडपणा हे गुण आवश्यक लागतात. नव-भारत-घटनेंत ज्यांच्या भाषणांत हे गुण दिसतील असेच पुढारी निर्माण व्हावेत अशी योजना केलेली आहे. आणि भगवान् विष्णूनें विवेकास्त्र सोडलं असल्यामुळें सगळ्या पुढाऱ्यांना हा नियम एकदम मान्य झाला. ”

“ मान्य झाला असेल, पण याप्रमाणं वागणं साधतं का सगळ्यांना ? ” मीं विचारलं, तेव्हां तो प्रमुख कारकून म्हणाला, “ थोडंबहुत साधतं. सावरकर-भोपटकरांना तें नाहीं चांगलं जमत; पण सर्व्हंट्स आफ् इंडिआचें श्रीनिवास शास्त्री हे हटकून प्रतिपक्षीयांच्या सभेंत जाऊन भाषणानें वाहवा मिळवितात. गांधींना, जिनांना, जयकरांना, केळकरांना जोराच्या टाळ्या मिळत नाहींत; पण ते या परीक्षेंत चांगले पास होतात. ना. म. जोशी यांचं भाषण प्रतिपक्षीयांना आवडलं नाहीं तरीं बरंच पटतं, म्हणून त्यांना आम्ही पास झाले असं समजतों. ”

“ आणि बाकीच्यांचं काय होतं ? ” नानांनीं विचारलं.

“ ते देखील टाळ्या मिळवतात, पण निराळ्या अर्थानें. कांहींच भाषण बंद पडावं म्हणून टाळ्या पडतात, कांहींच लांबलचक कंटाळवाणं भाषण एकदांचं संपलं म्हणून टाळ्या पडतात. आणि अशा रीतीनें ते देखील टाळ्या मिळवून या परीक्षेंत उत्तीर्ण होतात. कृष्णराव मराठे वगैरे लोक या जातीचे आहेत. अत्र्यां-सारखे पुढारी युक्तिवादाला लागू नसलेले मुद्दे काढून कांहीं तरी विनोद करून प्रतिपक्षीयांकडूनहि टाळ्या मिळवतात. माटे भाषेच्या जोरावर टाळ्या मिळवतात. फडके प्रतिपक्षाला तार्किक पकडींत खुबीनें अडकवितात आणि कडू गोळी गिळायला लावतात. त्यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, प्रतिपक्षीयांच्या सभेंत जाऊन बोलायला लावणं यालाच आम्हीं खरं महत्त्व देतों आणि पांचदां टाळ्या मिळवणं हें केवळ अर्थवादात्मक समजून सगळ्यांना पास म्हणून समजण्यांत येतं.”

* * *

बोलत बोलत आतां आम्हीं त्या क्लबाच्या एका टोंकाला आलों होतों. तेथें कांहीं शीख आणि मुसलमान कॅरम खेळत बसले होते. शीख आणि मुसलमान असे भिडू, शीख आणि मुसलमान अशा दुसऱ्या जोडीबरोबर खेळत होते आणि ते इतके रंगले होते कीं, आमच्या येण्याची त्यांना दखलगिरीच जणूं नव्हती. इतक्यांत येथील ऐका खोलींतून हसहसाट ऐकूं आला. "हें काय ?" म्हणून आम्ही विचारलं तेव्हां आमचा वाटाड्या म्हणाला, " आमच्या क्लबाचा असा नियम आहे कीं, पुढारी म्हणवणाऱ्या प्रत्येक माणसानें विनोदबुद्धि पैदा केलीच पाहिजे."

" विनोदबुद्धि मुळचीच असावी लागते, ती पैदा कशी करतां येणार " मी विचारलं.

" त्याचं असं आहे कीं, विनोदबुद्धि विनोदबुद्धि म्हणजे तरी काय ? एखाद्या गोष्टीकडे परिचिताहून निराळ्या दृष्टीनें किंवा वृत्तीनं पाहून या दोन देखाव्यांतील विसंगति प्रत्ययाला येणं आणि चमत्कार वाटणं. नुसता चमत्कार वाटून भागत नाहीं, तर त्या चमत्कृतीमुळें आपल्या दृष्टींतील किंवा वृत्तींतील वैगुण्य ध्यानांत आलं पाहिजे आणि एक प्रकारची उच्चतर आणि व्यापकतर दृष्टि मिळाल्या-मुळें मन आनंदित झालं पाहिजे. कांहीं पुढाऱ्यांमध्यें ही विनोदबुद्धि स्वभाविक असते; पण बहुतेकांमध्यें तशी नसते. ती उत्पन्न कशी करावी असा आमच्यांतल्या तज्ज्ञांना प्रश्न पडला होता, आणि ते मोठ्या पेचांत सांपडले होते. पहिल्या प्रथम त्यांनीं प्रत्येक पुढारी म्हणणाऱ्यानें वर्षातून अमुक व्यंगचित्रें सुचविलीं पाहिजेतच असा नियम केला, आणि हीं व्यंगचित्रें स्वतःच्या पक्षाच्या विरुद्ध अशींच असलीं पाहिजेत असा दंडक केला. गांधींना देखील हा नियम लागूं होतो, पण ते पहिल्या वर्गांत पास होतात. यंदाच्या परीक्षेंत त्यांनीं हें व्यंगचित्र सुचवलं होतं : महात्मा गांधी चरखा फिरवीत बसले आहेत, जवळ शेळी आहे आणि समोर पुष्कळसे शंख आहेत, असा देखावा. एकजण गांधींना विचारतो आहे : ' महात्माजी, हे इतके शंख कशाला ? ' महात्माजी उत्तर देतात, ' या शंखांमुळेंच मला पुढारीपण मिळालं आणि माझा आंतला आवाज दशदिशांमध्यें दुमदुमूं लागला ! ' बाकीच्या बऱ्याच पुढाऱ्यांना स्वतःची अशी चेष्टा करून घेतां येत नव्हती, तेव्हां विनोदबुद्धि कशी निर्माण करावी असा क्लबाच्या तज्ज्ञ

महर्षींना पेंच पडला. याच सुमाराला विश्वेशचंद्र रॉय या बंगाली संशोधकानें हृदयदर्शी आरशाचा शोध लावला. या आरशांत माणसाला स्वतःच्या हृदयांत काय सुप्त-गुप्त, प्रकट-अप्रकट प्रकार चालले आहेत हें स्पष्ट दिसतं. सावरकरांना आणि भाई रॉय यांना हृदयदर्शी आरसा दाखवला, तेव्हां आपल्या हृदयांत एकीकडे शेळ्या आणि गोगलगाई आहेत, आणि दुसरीकडे हडेलहप्पी ऑफिसराच्या वेषांत आपण ऐटींत बसलेलों आहोंत असें दृश्य दिसलें, तेव्हां ते तर बेशुद्धच पडले! चांगला एक महिना दीडमहिना लागला सावध व्हायला, पण महात्मा गांधींनींच त्यांच्यावर मानसोपचार करून त्यांना हळुहळू सावध केलं आणि त्यांच्या कानांत सांगितलं, ‘अरे तुमच्या हृदयांत शेळी दिसली म्हणून वाईट वाटून कां घेतां? मी जेव्हां हा हृदयदर्शी आरसा पाहिला, तेव्हां मला माझ्या हृदयांत एका बाजूला वाघ पिंचऱ्यांत ठेवलेला दिसला; तेव्हां मी तर हतबुद्धच झालों आणि एक आठवडाभर मौन स्वीकारलें, पण पुनः एकदां तो आरसा पाहिला तेव्हां वाघाच्या दुसऱ्या बाजूला येशू ख्राइस्ट आणि भगवान् बुद्ध योगासन घालून बसलेले आहेत आणि मला ते समाजसेवेचं व्रत देत आहेत असा देखावा दिसला. तेव्हां मला थोडं समाधान वाटलं. तुम्ही पुनः एकदां आरसा पाहा, माझ्याकरितां पाहा.’ सावरकर आणि भाई रॉय यांनीं धीर करून पुनः तो आरसा पाहिला, तेव्हां त्यांना शिवाजी, टिळक, मॅझिनीं, गॅरिबाल्डी, लेनिन वगैरे लोक एका कोंपऱ्यांत आपलें कौतुक करताहेत असा देखावा दिसला. तेव्हां त्या दोघांना इतका अपरंपार आनंद झाला कीं, ते आपण आजारी पडलों होतों हें विसरून हातांत हात घालून नाचूं लागले! या आरशामुळें त्यांच्यामध्यें आतां थोडीशी विनोदबुद्धि आलेली आहे आणि गांधींच्या शेळीची ते आतां फारशी कुचेष्टा करीत नाहींत; आणि केलीच तर गांधींच्या समक्ष केवळ मौज म्हणून करतात! गांधींनीं स्वतः आपलं एक चित्र बाईच्या वेषांत काढलं होतं. ती व्रतस्थ बाई वटवृक्षाभोंवतीं सूत गुंडाळीत आहे आणि वटवृक्षावर आरूढ असलेल्या देश-देवाची पूजा करीत आहे असं चित्रांत दाखवलं होतं. त्या वृक्षाच्या आजूबाजूला टवाळ पोरं, कांहीं साहेब, आणि कांहीं मुसलमान या बाईकडे बोट दाखवून कौतुकानें पाहात किंवा हेटाळणी करीत हंसत आहेत, असं त्या चित्रांत गांधींनीं स्वतः दाखवून आपल्या चळवळीबद्दल कांहीं लोकांना काय वाटत आहे याची जाणीव आपणाला आहे असं त्यांनीं दाखवलं होतं. आणि ही

कुचेष्टा, हेटाळणी वगैरे आपण पूर्ण पचवली आहे हें आपल्या व्यंगचित्रावरून दाखवलं होतं! विनोदबुद्धीची चांचणी-परीक्षा कायदे अजम जिनांची घेतली होती. तेव्हां त्यांना हा प्रश्न घालण्यांत आला होता: 'मुसलमानांनीं पाकिस्तान मागण्यांत जी घोडचूक केलेली हिन्दूना वाटते, ती तुम्हीं स्वतःविरुद्ध व्यंगचित्र काढून दाखवा.' जिनांनीं पुढें दिल्याप्रमाणें चित्र उत्तरादाखल काढलें: 'हिन्दमाता आजारी असून अंथरुणावर पडलेली आहे आणि जिना हातांत सुरा घेऊन लडिवाळपणें तिला म्हणत आहेत; 'आई तूं माझी का माझ्या भावांची, याबद्दल भावांशीं तंटा करीत बसण्यापेक्षां तुझे तुकडे कांहीं मी घेतों आणि बाकीचे भावांना देऊन टाकतों! चालेल ना तुला?' सावरकरांना असाच प्रश्न टाकला होता. पण त्यांना उत्तर देतां येईना ते आपले, 'हिन्दूंचे हिन्दुस्थान,' 'मुस्लिमांचें कबरस्थान' असं पुटपुटत होते. शेवटीं उत्तर लिहिण्याचें सोडून देऊन बाहेर आले तों जिना त्यांना भेटले आणि नुकतेच ते दोघे बॅडमिंटन खेळून आले असल्यामुळें जिनांना त्यांनीं दोस्त म्हणून सलाम केला! लगेच जिना थट्टेनें म्हणाले, 'हिन्दु गुलाम मुस्लिमको सलाम' सावरकरांना विनोदी प्रत्युत्तर कांहीं सुचलं नाहीं म्हणून ते नुसतेच हंसले आणि विनोदबुद्धि आपली वाढविलीच पाहिजे असा निश्चय करून त्या मार्गाला लागले. अद्यापि त्यांना फारसं यश मात्र आलेलं दिसत नाहीं.

* * * *

हृदयदर्शी आरसा कांहीं गांवठी कॉंग्रेस-पुढाऱ्यांना दाखवला-तेव्हां त्यांची फारच गाळण उडाली. त्यांच्यापैकी कांहींनीं दाढी वाढवली होती आणि ब्रह्मचर्यव्रत स्वीकारून कोणी सरस्वतीची भक्ति चालवली होती, तर कोणी देशसेवेचे व्रत घेऊन चरका--भक्ति चालवली होती. त्यांच्या हृदयांत त्या आरशानें जेव्हां अप्सरांचा नाच चालवलेला दाखवला, तेव्हां त्यांनीं तो आरसा फेंकून दिला. पण थोड्या दिवसांत अशाच कांहीं ब्रह्मचर्यव्रतस्थ देश-सेविकांची आणि त्यांची गांठ पडली. या देशसेविकांनींहि तो आरसा फेंकून दिलेला होता. एकमेकांनीं या विलक्षण आरशाची गोष्ट एकमेकांना सांगितली आणि हे आरसे म्हणजे शुद्ध थोतांड आहे, अशी टीका केली. या टीकेच्या निमित्तानें त्यांच्या गांठीभेटी होत गेल्या आणि मग कालांतरानें त्यांतले बरेच स्त्रीपुरुष विवाहबद्ध होऊन आतां देशसेवा अविकृत मनानें करीत आहेत. डॉक्टर आंबेडकरांना हा आरसा दाखवला, पण त्यांना तो हृदयावर कसा ठेवावा आणि त्यांत कसं पाहावं हेंच मुळीं समजेना आणि सांगून उमजेना. तेव्हां

महर्षिसंघानें त्यांना एका खोलींत कोंडून ठेवलें आणि सांगितलें कीं, 'तूं स्वतःला हसडून तीन शिव्या मनापासून देशील तेव्हां तुझी सुटका होईल, नाहीं तर जन्मभर तुला येथें डांबून ठेवूं.' एक महिन्याच्या आंत डॉ. आंबेडकरांनीं स्वतःला तीन शिव्या हसडून दिल्या, अगदीं मनापासून दिल्या, तेव्हां त्यांची सुटका झाली.

"कोणत्या शिव्या, सांगूं शकाल का?" नानांनीं विचारलें, तेव्हां वाटाड्या हंसून म्हणाला, "तुम्हांला कांहीं गुपितं मीं सांगितली, पण सगळीं सांगतां येणार नाहीं."

"बरं कम्युनिस्ट पुढाऱ्यांना हा आरसा दिला होता का?" मीं विचारलं.

"दिला होता तर. त्यांनीं लावून पाहिल्यावर हृदयांतल्या एका कोंपऱ्यांत प्रकाश दिसला, तेथें मार्क्सची मूर्ति अधिष्ठित होती दुसरीकडे अंधुक अंधुक कांहीं त्यांना दिसलें. पण स्पष्ट कांहीं दिसेना. तेव्हां हृदयांत अद्यापि बराच अंधार आहे असा त्यांनीं तात्पर्यार्थ काढला आणि पुष्कळसं वाचन-मनन केलें. मग त्यानंतर त्यांनीं पुनः आरसा लावून पाहिला तेव्हां 'उत्साही' 'धडाडी' 'त्याग' इत्यादि अक्षरें रंगीबेरंगी स्वरूपांत एकमेकांत सुंदर रीतीनें गुंफलेली दिसलीं आणि दुसऱ्या एका कोपऱ्यांत 'जरा अधिक विचार करा' अशी लाल भडक अक्षरें एका पाटीवर दिसली. या अनुभवामुळें ते विवेकी झाले; पण विनोदबुद्धि उत्पन्न होईना. तेव्हां यांच्यामध्यें विनोदबुद्धि कशी उत्पन्न करावयाची हा एक इथल्या चालकांना प्रश्नच पडला आहे. कांहीं गोरक्षण सभावाले, कांहीं खादीधारी कॉंग्रेस-मन, कांहीं लाठीधारी राष्ट्रसेवासंघवाले, कांहीं वर्तमानपत्रांचें व संपादक, उपसंपादक यांच्यामध्येंहि विनोदबुद्धि उत्पन्न करण्याच्या बाबतींत हार खावी लागत आहे; पण आम्हां निराश होत नाहीं.

आमच्या लहानशा ब्रह्मस्मृतींतला आणखी एकच नियम सांगतों. खरा पुढारी म्हटला म्हणजे

'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां'

असं त्याला खरं खरं म्हणतां आलं पाहिजे. तेव्हां मरणाचा साक्षात्कार पुढारी म्हणविणाऱ्यांना कसा व्हावा असा येथल्या चालकांना प्रश्न पडला. राष्ट्र-सेवा-संघांतल्या एका गांवठी पुढाऱ्यानें अन्यांना केलेल्या मारपिटीचें उदाहरण देऊन, 'असा साक्षात्कार यावा' असं खाजगी संभाषणांत सुचवलं. परंतु चालकवर्ग इतक्या हलक्या वृत्तीचा नाहीं. शेवटीं पुष्कळ खल होऊन असं ठरलं कीं, क्लबाच्या प्रत्येक सभासदानें दोन वर्षांतून एकदां '**मीं मेलों म्हणजे**' या विषयावर

एक निबंध लिहिला पाहिजे. स्वतःच्या मरणानें समाजाचं अतोनात नुकसान होणार आहे असा ध्वनि प्रथम प्रथम या निबधांतून निघतो, आणि तो निघाला म्हणजे, 'हें कच्चं मडकं आहे' असं इथें समजण्यांत येतं. त्याचं कोणी कांहीं नुकसान करीत नाहींत, पण दोनतीन महिने त्याला एका खोलींत कोंडून ठेवतात. बाहेर आल्यावर जग कांहीं आपल्या अभावामुळें ओसाड पडलं नव्हतं, कांहीं कामांत थोडसं वैगुण्य आलं होतं, पण कांहीं बाबतींत सुधारणाहि पुष्कळ झाली होती हें त्याच्या निदर्शनास येतं, आणि असे पुष्कळ अनुभव आले म्हणजे मग स्वतःच मरण तो आनंदानें आपल्या डोळ्यांनीं पाहूं शकतो व पाहूं लागतो. यांच्यांतूनच महर्षिमंडळ निवडलं जातं. आतां यापुढं महर्षिमंडळाची निवडणूक आहे. त्यांत पंडित मालवीय, गांधी, श्रीनिवासशास्त्री केळकर, अण्णासाहेब कर्वे वगैरे मंडळी निवडली जातील असा अंदाज आहे. बरं आतां मी जातों, ऑफिसचं काम आहे."

"जरा पांच मिनिटं थांबा आमच्याकरितां. जवाहरलाल नेहरू, हक्क, सरोजिनी नायडू, राजगोपालाचारी, वगैरे किती तरी लोकांबद्दल कांहींच नाहीं सांगितलंत? ते अर्थात् या क्लबाचे सभासद असलेच पाहिजेत."

"म्हणजे काय, आहेतच ते. त्यांच्याबद्दल खरं म्हणजे मला कांहीं माहिती नाहीं. आणि......"

"हृदयदर्शी आरसा त्यांनींहि लावला होता का?" मीं विचारलं.

"तुम्हाला लावायचा आहे का? थांबा आणतों मीं. स्वतःचं हृदय पाहून फारच मजा वाटेल तुम्हाला."

"अहो, नको नको," नानांनीं आणि मी एकदम म्हटलं.

"कां?" वाटाड्यानें रागीट आणि उपरोधिक स्वरांत विचारलं.

"लोकांच्या हृदयाबद्दल एवढी जिज्ञासा तुम्हांला आहे, मग स्वतःच्या हृदयाला हा आरसा लावायला कां डरतां?"

'माझी काय छाती नाय.' मी विनोद करण्याचा प्रयत्न करून कृत्रिम रीतीनें हंसून म्हटलें.

"आतां तुम्ही माझ्या ताब्यांत आहांत. तुम्हांला तो आरसा पाहिलाच पाहिजे." असं म्हणून तो लेकाचा कारकुंडा खरोखरच आरसा आणावयाला गेला. आम्ही दोघे घामाघूम झालों आणि—आणि रडूं—ओरडूं लागणार इतक्यांत—

"काळ, सकाळ, लोकशक्ति, ज्ञानप्रकाश, प्रभात" हे वर्तमानपत्र विकणाऱ्या नेहमींच्या पोऱ्याचे शब्द कानांवर आदळले आणि मीं जागा झालों.

# मराठी वाङ्मय

## व

# ‘ वाङ्मयीन महात्मता ’

मराठी वाङ्मयासंबंधानें नेहमीं अशी एक तक्रार करण्यांत येते कीं, तें ‘परपुष्ट ’ आहे. मर्ढेकरांची तक्रार अशी आहे कीं, तें ‘ इतकें परपुष्ट आहे कीं तें पूर्णपणें परपुष्ट नाहीं’. त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, तें “ एकांगीपणानें परपुष्ट आहे, एका विशिष्ट परभाषीय वाङ्मयावरच तें पुष्ट आहे. ” हा आरोप खरा आहे. इतका कीं, हें लिहिणारा जो मीं, त्याच्या संबंधानेंहि तो दुर्दैवानें पूर्णपणें लागूं पडणारा आहे. मर्ढेकरांचा इंग्रजीप्रमाणेंच फ्रेंच व इटॅलिअन भाषेशीं परिचय आहे; पण अशीं माणसें महाराष्ट्रांत फार थोडीं. महाराष्ट्राला पूर्ण स्वराज्य मिळालें आहे अशी कल्पना केली, तर त्या स्वराज्यामध्यें मराठी, संस्कृत, एखादी हिंदी भाषा; याप्रमाणेंच इंग्लिश, फ्रेंच, इटॅलियन, रशिअन, जर्मन वगैरे भाषांचाहि येथें अभ्यास केला जावा अशी माझी इच्छा आहे. प्रत्येकानें या भाषांचा अभ्यास केला पाहिजे असें नाहीं, तर अनेक जण आपापल्या आवडीप्रमाणें व सोईप्रमाणें या भाषांतील कांहींचा तरी परिचय करून घेतील आणि अशा रीतीनें महाराष्ट्रीय वाङ्मय–सागराला सगळ्या नद्या येऊन मिळतील, अशी मला आशा आहे. यामुळें ‘ संस्कृति–संकर ’ होईल अशी कांहीं जणांना भीति वाटेल; पण ‘ संकर ’ हा नेहमींच अनिष्ट असतो असें नाहीं. वनस्पतिशास्त्राकडे पाहिलें असतां कांहीं कलमें उत्तम फुलें–फळें

देतात, प्राणिशास्त्राकडे पाहतांहि कांहीं मिश्रजातीय घोडे, बकरीं वगैरे अधिक उपयुक्त दिसतात. हें कसेंहि असलें तरी वाङ्मयाच्या क्षेत्रांत तरी अनेक भाषांतील ज्ञानभांडार मननपूर्वक आत्मसात करण्यानें कांहीं तोटा होणार नाहीं. उलट, आपलें असें 'पर-पुष्ट' वाङ्मय अधिक पुष्ट व पोषक, तेजस्वी व तेजोवर्धक, बलवान् व बलवर्धक होईल आणि मराठी वाङ्मयाची सर्वांगीण अभिवृद्धि, रुचिरता, उन्नति आणि नव-नवोन्मेषशीलता यांमध्यें उत्तम भर पडेल, याबद्दल मला तरी शंका नाहीं.

मराठी वाङ्मयांत व्यापकपणा नाहीं, या आक्षेपासंबंधानें मर्ढेकरांचें मत जें आहे तें (माझ्या पद्धतीनें बोलायचें म्हणजे) खरेंहि आहे आणि खोटेंहि आहे. आपले विचार व भावना यांत तोच-तोचपणा, चर्वित-चर्वितपणा, 'आवर्त-पणा' आहे. त्यांत खोली नाहीं, तीव्रता नाहीं, आवेग नाहीं, महान् आशय नाहीं, 'महात्मता' नाहीं, या दृष्टीनें आक्षेप साधार आहे; पण वाङ्मयांतील व्यापकपणाचा असा जर कोणी अर्थ करीत असेल कीं, वाङ्मयांत भौगोलिक सर्व प्रदेशांचें व त्यांतील लोकांचें, तसेंच सामाजिक सर्व थरांचें व त्यांतील सर्व प्रकारच्या जीवनाचें, प्रतिबिंब किंवा चित्रण आलें पाहिजे, तर या आक्षेपांत विशेष अर्थ नाहीं असें मर्ढेकरांचें म्हणणें आहे आणि तें बरोबर आहे. वाङ्मयांत जी अनुभव-व्यापकता इष्ट असते, ती अंतर्निष्ठ व्यापकता असते. ती स्वाभाविकपणा आलेल्या अनुभवांमुळें उत्पन्न झालेल्या विचारांचा आणि भाव--भावनांवर अधिष्ठित असते,—निरनिराळ्या प्रदेशांत किंवा जनसमूहांत अनुभव मिळविण्याकरितां मुद्दाम हिंडून प्राप्त झालेली नसते. कृत्रिम आणि स्वाभाविक अशा अनुभव-व्यापकतेमधील भेद मर्ढेकरांनीं एक उदाहरण देऊन सुंदरपणें दाखविला आहे. "अनुभव वेंचण्याकरितां पृथ्वीपर्यटन करावयास निघालेल्या प्रवासी-ब्रुवांच्यांत आणि पोटाकरितां वणवण करीत ज्याला दुपारची वेळ कशी जाईल याच्या सदैव चिन्तनांत आपोआप पृथ्वी पालथी घालावी लागते अशा फकिरांत जो फरक असतो, तोच फरक या दोहोंत आहे. एक अनुभव वेंचण्याकरितां फिरतो, तर दुसरा फिरण्यांत अनुभव वेंचतो. पहिल्याच्या परडींत रंग कदाचित् असेल, पण गंध खास नसतो; दुसऱ्याचा परडींत रंग आणि गंध यांचें जीवन्त मीलन असतें."

मराठी वाङ्मयांत आत्मनिष्ठा [ sincerity ] विशेष नाहीं, 'बौद्धिक व हार्दिक निःसीम तादात्म्य' नाहीं असें मर्ढेकर म्हणतात, आणि याबद्दल अनंत

काणेकर यांच्या ' आला खुशींत् समिंदर, त्याला नाहीं धिर, होडीला बघतो धरूं ' असा आरंभ झालेल्या ' कोळ्याचें गाणें ' या पदाचें उदाहरण घेऊन आपलें म्हणणें विशद करून सांगतात. वाङ्मयांतील स्वानुभूति, आत्मप्रतीति, म्हणजे sincerity, [ जिलाच मर्ढेकर आत्मनिष्ठा म्हणतात ] ही काय चीज आहे, याविषयीं मर्ढेकरांचें आणि माझें विशिष्ट बाबतींपुरतेंच मतैक्य आहे. मत-भेद कोठें कितपत आहे हें एकदम इथेंच सांगण्यापेक्षां वाङ्मयांतील स्वानुभूतीच्या आविष्कारासंबंधीं माझीं जीं मतें आहेत, तीं सांगण्याचा प्रयत्न करतों, म्हणजे ओघाओघानें आणि अप्रत्यक्षपणें मतैक्य आणि मतभेद दिग्दर्शित होतीलच.

काव्यनिर्मितीबद्दल प्रचलित असलेल्या एका चुकीच्या कल्पनेपासून विवेचनाला आरंभ करतों. काव्यादिकांची निर्मिति करतांना कलावन्त बेभान झालेला असतो असें म्हणतात. काव्यें म्हणजे कवीचे त्या त्या विषयाशीं तन्मय झालेल्या स्थितींतले ' सहजोद्गार ' असतात, असेंहि म्हणतात. कवीच्या भावना प्रज्ज्वलित, कंपित, प्रक्षुब्ध झाल्या असतां, त्या त्या भावनांचा काव्यरूपानें साहजिक आविष्कार होतो असेंहि म्हणण्यांत येतें, आणि—

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।**
**यत्क्रौंच-मिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥**

—या वाल्मीकीच्या स्वाभाविक ' छंदोमयी वाणी 'चें उदाहरणहि नेहमीं देण्यांत येतें. पण वाल्मीकीसंबंधीची एतद्विषयक गोष्ट जर खरी धरली तर प्रस्तुत श्लोक ही ' कला-कृति ' आहे असें मी तरी म्हणणार नाहीं. झाडावरचें फूल सुंदर असलें म्हणजे झाड कांहीं कलावंत होत नाहीं. निसर्गातले सूर्यास्त-सूर्योदयाच्या वेळचे देखावे रमणीय असले तर निसर्गाला क्षणिक अर्थानें कलावन्त म्हणावें पाहिजे तर, पण परमार्थतः निसर्गाला कोणी कलावन्त म्हणत नाहीं. लहान मुलाचे बोबडे बोल काव्यगर्भ वाटतील किंवा असतीलहि कदाचित्; पण त्यालाहि कोणी वाङ्मयीन कलावन्त म्हणणार नाहीं. याच न्यायानें वाल्मीकीच्या मुखांतून वरील उद्गार जर भावनेच्या भरांत निघून गेले असतील आणि त्याचा शोक ' श्लोकत्व ' पावला असेल, तर या श्लोकाच्या निर्मितींत कला नाहीं असें मी म्हणेन. प्रिय-पतीच्या दर्शनानें किंवा भाषणानें लज्जान्वित किंवा स्मितमुखी झालेली युवति सुंदर दिसेल, आणि एखाद्या चित्रकार-कलावन्ताला चित्रार्पणीय वाटेल; पण ती कांहीं कलावन्त नाहीं. पण एखादी नटी रंग-लेपन व चूर्ण-सिंचन यांच्या सहा-

ग्यानें व विशिष्ट अभिनयाच्या द्वारें चित्रार्पणीय विलोभनियता उत्पन्न करील, तर ती कलावन्त आहे. पाण्याचें दुर्भिक्ष आहे अशा गांवांतील असंस्कृत बायका विहिरीवर भांडूं लागल्या म्हणजे त्यांच्या भावना 'प्रक्षुब्ध' होतात, त्यांना 'स्फूर्ति' येते, त्यांच्या शिव्या 'सहजोद्गारा'च्या स्वरूपाच्या असतात, त्यांत आवेग असतो, 'स्वानुभवा'चे ते बोल असतात, त्यांत 'आत्मनिष्ठा' [ sincerity ] असते; पण त्यांच्या त्या कलहात्मक वाङ्मयाला कलात्मक वाङ्मयाची पदवी देतां येईल असें वाटत नाहीं. लग्नकार्यांत खरोखरच भांडणाऱ्या विहिणींना कवयित्री कोणी म्हणत नाहीं; पण खोलींत बसून हंसत हंसत या भांडणावर कविता रचाणारे गडकरी हे कवि ठरतात.

कलावन्ताच्या प्रतिभेची स्वाभाविकता, ही प्रतिक्षिप्त क्रिया [ Reflex action ] किंवा सहज-प्रेरणा [ Instincts ] यांमधील स्वाभाविकतेसारखी नाहीं हें तर सांगावयास नकोच; पण ती प्राथमिक स्वरूपाच्या अनुभवांतील स्वाभाविकतेसारखीहि नाहीं हें वरील उदाहरणांवरून दिसून येईल. कलाकृतींत प्राथमिक स्वरूपांतल्या स्वानुभवांवर कांहीं बुद्धिपुरःसर संस्कार व्हावे लागतात, निदान त्या स्वानुभवाकडे विशिष्ट दृष्टीनें पाहिलेलें असतें, असें मला म्हणावयाचें आहे. कलाकृतींतील स्वानुभव प्राथमिक नसून रूपान्तरित, स्मरणोज्जीवित, छायात्मक, मननात्मक असतो आणि या अर्थानें तो सहजस्फूर्त नसून संस्कार-जन्य असतो.

कला ही स्वाभाविक दिसावी तशी पण नसावी, असें मीं म्हटलें आणि Art consists in concealing art या उक्तीची आठवण करून दिली म्हणजे माझें म्हणणें बरेच लोक मान्य करतील. पण कांहीं लोक मला असें विचारतील कीं, नामदार गोखल्यांसारख्या एखाद्या वक्त्यानें तात्कालिक स्फूर्तीनें आणि मनापासून प्रतिपक्षाला सुंदर उत्तर दिलें तर हें सुंदर भाषण तुम्हीं कला-त्मक भाषणांत घालणार कीं नाहीं? तसेंच, एखाद्या पतीनें पत्नीला जसें सुचेल तसें, अगदीं मनापासून, भावनायुक्त अंतःकरणानें एखादें काव्यात्मक सुंदर पत्र लिहिलें आणि तें कोणाच्या तरी हातीं येऊन तें छापलें गेलें, तर काव्यात्मक उत्तम वाङ्मयाचा नमुना म्हणून तुम्हीं त्याची गणना करणार कीं नाहीं? असें एखादें पत्र आतां आठवत नाहीं, पण अन्य-रसात्मक अशीं कांहीं पत्रें आठवतात. उदाहरणार्थ, 'श्यामकान्ताचीं पत्रें'. हीं श्यामकान्त सरदेसाई ह्यानें पुढेंमागें

छापलीं जावींत म्हणून लिहिलेलीं नाहींत; तीं कलात्मक व्हावींत असा त्याचा प्रयत्नहि नसावा; त्या त्या काळच्या भावना व विचारमालिका त्यांत मन मोकळें करून त्यानें व्यक्त केलेल्या आहेत. कलाकृति म्हणून न लिहिलेल्या, पण सहजगत्या कलात्मक झालेल्या या पत्रांची गणना तुम्ही उत्तम वाङ्मयकृतींत करणार कीं नाहीं ? तात्कालिक स्फूर्तीनें केलेली मार्मिक किंवा मर्मभेदक कोटि कलाकृति या सदरांत येते किंवा नाहीं ? उदाहरणार्थ, ‘ मी मूर्खाशीं बोलत नसतों ’ असें गडकऱ्यांना एकानें म्हटल्याबरोबर ‘ पण मी मूर्खाशीं बोलतों ’ असें जें लगेच उत्तर दिलें त्यांत त्यांचें कलाकौशल्य दिसतें किंवा नाहीं ?

याचें सरळ उत्तर असें आहे कीं, तात्कालिक भावनेच्या भरांत केलेल्या भाषणांत किंवा लिहिलेल्या पत्रांत किंवा सुचलेल्या कोटींत सौंदर्यदृष्टीच्या मननाचा ‘ अन्यन्ताभाव ’ कल्पिला आणि तीं सुंदर आहेत असें गृहीत धरलें तर तीं सुंदर झालेलीं आहेत, केलेली नाहींत, असें मी म्हणेन. फुलें जशीं सौदर्ययुक्त असतात, किंवा बागेंतील कारंज्यांतून उडणारें तुषार सूर्यप्रकाशांत जसें सुंदर दिसतात; पण या फुलांना व तुषारांना कलाकृति म्हणून कोणी म्हणणार नाहीं. त्याप्रमाणेंच वरीलप्रकारचीं भाषणें, पत्रें किंवा कोट्या कलाकृति नव्हेत, पण खरी गोष्ट अशी आहे कीं, असल्या प्रसंगीं ‘ तात्कालिक स्फूर्ति ’ जी आपण म्हणतों तींत मननाचा ‘अत्यन्ताभाव’ नसतो. गडकऱ्यांनीं ‘लगेच’ उत्तर दिलें असें आपण म्हणतों, पण लगेच याचा अर्थ गणिती दृष्टीनें ‘तत्क्षणींच’ असा अर्थ करावयाचा नसून अत्यंत अल्प कालावधीनंतर असा करावयाचा असतो आणि या अल्प-कालावधींत आपण जें उत्तर देत आहोंत त्याचा विचार व त्या विचाराबरोबर उत्पन्न होणारा कलात्मक आल्हाद यांचा त्यांनीं आस्वाद घेतलेला असतो. उत्तम वक्त्यांनीं त्या त्या विषयांचा अगोदर पुष्कळच विचार केलेला असतो, इतकेंच नव्हे तर, भाषण करतांना देखील त्यांच्या तोंडून जे वेंचक शब्द बाहेर पडतात, ते पुष्कळ वेळां वेंचून बाहेर पडलेले असतात. निदान भाषण करण्याचे अगोदर तद्विषयक सामान्य विचार झालेला असतोच. या विचारांना अल्पतम काळ लागतो एवढेंच. श्यामकांतानें लिहिलेल्या किंवा पति-पत्नींनी लिहिलेल्या किंवा प्रेमिकांनीं लिहिलेल्या खाजगी पत्रांत कलाकृति निर्माण करण्याचा बुद्धिपुरस्पर प्रयत्न नसतो असें आपण म्हणतों; पण हें सापेक्ष दृष्टीनेंच

खरें आहे. या पत्र-लेखकांचे मन पत्र लिहिण्याच्या अगोदर विचारांनीं व भावनांनीं व्याप्त झालेलें असतेंच हें तर उघडच आहे; पण यापुढें जाऊन मी असें म्हणूं इच्छितों कीं, पत्र लिहितांना देखील विशिष्ट शब्दयोजनेबद्दल त्यांचा अल्पतम विचार असतोच आणि अमुक शब्द उचित नसला तर तो ते लिहित नाहींत, आणि उचित वाटला तर औचित्यदर्शनानें त्यानें आनंदहि होत असतो.

आक्षेपावरील हें माझें उत्तर कदाचित् दुराग्रहाचे वाटेल आणि कदाचित् असेलहि; पण याहून बलवत्तर, सुलभतेनें मान्य होणारें, आणि अधिक शास्त्र-शुद्ध उत्तर असें आहे. सायकलवर बसण्याचें मीं एकदां बुद्धिपुरस्पर ठरविलें आणि सायकलवर आरूढ झालों म्हणजे मग पुढील क्रिया बव्हंशी प्रतिक्षेपात्मक असल्या तरी माझें सायकलवर बसणें बुद्धिःपुरस्पर म्हटलें जातें. पोहण्याचें ठरवून मीं पाण्यांत एकदां उडी घेतली म्हणजे मग हातापायांची हालचाल बुद्धिःपुरस्पर नसली तरी माझें पोहणें बुद्धिपुरःसर गणलें जातें. वर आपण ज्या वक्त्यांचा, पत्रलेखकांचा वगैरे विचार करीत होतो त्यांच्या बाबतींत देखील हाच न्याय लागू केला पाहिजे असें माझें म्हणणें आहे. आणि हाच न्याय लागूं म्हणजे 'लगेच,' 'तत्क्षणींच', 'तात्कालिक स्फूर्ति,' 'भावनेच्या भरांत' वगैरे शब्दप्रयोग सापेक्ष व लौकिक भाषेंतले आहेत, कांटेकोर तर्कशुद्ध शास्त्रीय परिभाषेंतले नव्हेत हें ध्यानांत येईल.

I do but sing because I must
And pipe as the linnets do.

असें टेनीस कवि जें म्हणतो किंवा—' बोलविता धनि वेगळाची '

**न कळे कोठुनि होते लतिकेच्या ठायिं पुष्प-परिपूर्ति ।**
**न कळे केव्हां कैशी होते कविच्या मनाप्रती स्फूर्ति ॥**
**न कळे कोठुनि येती द्विजराज नवे वसंत-कालीं ते ।**
**न कळे कोठुनि येति धांवत नव शब्द भेटण्या कवितें ॥**

असें रेव्हरंड टिळक जें म्हणतात तें सर्व लौकिक अर्थानें खरें मानावयाचें असतें; ती शास्त्रीय परिभाषा नव्हे, हें न सांगतां देखील पुष्कळांना अगोदरच पटलेलें असेल, पण कांहीं लोकांना 'स्फूर्ति,' 'सहजोद्गार' वगैरे शब्दांनीं भारलेलें असतें असें मला आढळून आल्यामुळें वरील प्रपंच करावा लागला.

कलाकृति करण्याच्या वेळीं कलावन्ताच्या मनांत जी भावना घोळत असते ती प्राथमिक स्वरूपाची खरीखुरी नसते, तर ती स्मरणोज्जीवित मननात्मक असते याचें थोडेंसें निराळ्या दृष्टीनें अधिक विवरण केलें पाहिजे. संसारांतले प्राथमिक विचार व भावना या कृतिप्रवण असतात. कर्म सुकर व सुफल करण्याकरतांच बुद्धि दिलेली आहे, ज्ञानाकरितां नाहीं, असें अलीकडचे कांहीं तत्त्ववेत्ते म्हणतात. तें पूर्णांशांनीं नसलें तरी बऱ्हंशीं खरें आहे. सांसारिक विचार व भावना या बाबतींत तर तें पुष्कळच खरें आहे. आतां कोणी म्हणेल कीं, ज्या ज्या वेळीं भावना उत्पन्न होते, त्या त्या वेळीं ती कर्माच्या रूपानें फलित होते, असा अनुभव नाहीं. उत्तर असें आहे कीं कर्मरूपानें फलित होण्याकडे भावनेची प्रवृत्ति असते, ती कर्म-प्रवण असते, असें म्हटलें आहे. रसिकाची कलात्मक भावना जी असते ती कलाकृति पाहाण्यांतच रममाण होते. कलाकृतीचा आस्वाद हेंच तिचें आद्यन्तीं फल. कलावन्तांची भावना देखील कलाकृति निर्माण करण्यांत व निर्माण झाल्यावर तिचें मननात्मक सुख उपभोगण्यांत रममाण होत असते. उपनिषदांत स्थितप्रज्ञ ब्रह्मवेत्ता हा आध्यात्मिकदृष्ट्या **'आत्म-क्रीडः आत्मरतिः'** असतो असें वर्णिलेलें आहे. कलावन्त हा रसास्वाददृष्ट्या 'आत्म-क्रीडा आत्मरतिः' असतो. लौकिक किंवा व्यावहारिक आनंद, बहुधा केवळ इंद्रियतृप्तिपर असतात किंवा ते दुसऱ्या कोणत्या तरी इष्टसिद्धीच्या अपेक्षेनें उत्पन्न झालेले असतात; म्हणजे ते या अर्थानें साधन-स्वरूप, सोपाधिक असतात. उदाहरणार्थ, साखर खाण्याचें सुख रसनातृप्तिपर आहे. पैसे मिळाल्याचें सुख पुढें मागें इष्ट पदार्थ या योगें साध्य होऊं शकतील या जाणिवेवर अवलंबून आहे. वर ' बहुधा ' म्हटलें आहे याचें कारण कांहीं लौकिक आनंदहि कलात्मक आनंदाजवळजवळ येतात, याची मला जाणीव आहे. उदाहरणार्थ, पोहण्याचा आनंद, टेनिस खेळण्याचा आनंद, वगैरे कलात्मक आनंदाप्रमाणें एखाद्या लौकिक इष्टगोष्टीला साधनीभूत असतात म्हणून ते प्रिय असतात, असें नव्हे. पोहण्याचा आनंद अन्य-इष्ट-साक्षेप नाहीं तर तो स्वतःसिद्ध आहे. कलात्मक रसास्वाद हा ' अलौकिक ' म्हणतात, 'ब्रह्मास्वाद-सहोदर' म्हणतात, याचें एक कारण असें कीं, ब्रह्मास्वादाप्रमाणेंच तो अनन्यसापेक्ष निरुपाधिक स्वतःसिद्ध असतो.

[ सत्यज्ञानहि असेंच पुष्कळ वेळां अनन्यसापेक्ष स्वतःसिद्ध असतें. एखाद्या संशोधकाला एखादें सत्य कळलें म्हणजे त्याला जो आनंद होतो, तो त्या शोधापासून

धनप्राप्ति, कीर्ति, युद्धकलेंत पुढेंमागें त्याचा होणारा उपयोग, उद्योगधंद्यांत त्यापासून कदाचित् होणारा फायदा, इत्यादि गोष्टींवर अवलंबून नसतो. खऱ्या संशोधकाच्या किंवा जिज्ञासूच्या बाबतींत तरी हें खरें आहे. कोणत्याहि ज्ञानाचा पुढेंमागें कर्म-मार्गांत उपयोग होण्यासारखा असला तरी ज्ञानानंद हा नेहमींच प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें लौकिक उपयुक्तता-सापेक्ष असतो हें म्हणणें मला मान्य नाहीं. तत्त्वज्ञानांतील Pragmatism, Instrumentalism मला मान्य नाहींत, पण त्या वादांत न शिरतां येथें एवढें म्हणतां येईल कीं, ज्या मानानें ज्ञानजन्य आनंद अन्यसापेक्ष नसतो, त्या मानानें तो कलात्मक आनंदाजवळजवळ येतो. म्हणजे शुद्ध ज्ञानानंद आणि शुद्ध कलानंद हे दोन्हीहि अनन्यसापेक्ष, निरुपाधिक, स्वतःसिद्ध असतात. ज्ञानोपयोगी आणि कलायोगी हे दोघेहि माझ्या मतें 'आत्मक्रीडः आत्मरतिः' असतात असें वर दिग्दर्शित केलेंच आहे. ]

कलाकृति ही रसिकार्थ, परार्थ, निवेदनार्थ [ communication ] आहे का आत्मतुष्ट्यर्थ, आत्मविष्कारार्थ, स्वार्थ, [ self-expression ] आहे, या वादाचा येथें थोडक्यांत विचार करणें श्रेयस्कर होईल. कांहीं लोक असें म्हणतात कीं, भाषण हें जसें स्वाभिप्राय इतरांना कळविण्याकरितां असतें, त्याप्रमाणेंच कलाकृति ही रसिकाला सौन्दर्य-दर्शन करून त्याला आनंदित करण्याकरितां आहे. याच्या उलट कांहीं लोकांचें असें म्हणणें असतें कीं फूल जसें वनांत देखील फुलतें, रसिकाच्या दृष्टीस पडलें नाहीं तरी आत्मविकासांतच संतुष्ट असतें, त्याप्रमाणेंच कलाकृति ही कलावन्ताच्या स्वतःच्या आनंदाकरितां असते; रसिक मिळणें न मिळणें हा प्रकार केवळ गौण आणि आनुषंगिक असतो. माझें स्वतःचें मत थोडक्यांत असें कीं कलाकृति ही रसिकाकरितांच असते; पण हा रसिक कलावन्त स्वतःच असूं शकेल, स्वेतर अनेक रसिक असलेच पाहिजेत असें नाहीं. असले तर 'अधिकस्याधिकं फलम्' या न्यायानें तें उत्तमच.

बौद्धिक-क्षेत्रांतला एक साधा दाखला घेऊन अर्थ विशद करण्याचा प्रयत्न करतों. एखादें बीजगणितांतलें उदाहरण सोडवितांना व सोडवून झाल्यावर रीत आणि प्रत्येक पायरी बरोबर आहे किंवा नाहीं असें खरा गणित-प्रिय मनुष्य पाहात असतो आणि कोणाहि गणितज्ञाला आपली रीत, सर्व पायऱ्या व उत्तर हीं पटतील अशी जेव्हां त्याची खात्री होते, तेव्हांच त्याचें समाधान होतें. तो

दुसऱ्या कोणाला आपली रीत वगैरे दाखविण्यास जाणार नाहीं. दुसऱ्यानें शाबासकी द्यावी अशी त्याला स्वप्नांतही इच्छा नसेल; पण आदर्शभूत गणितज्ञाचें समाधान झालेंच पाहिजे अशी त्याची अपेक्षा असते. आइन्स्टाइनचा सिद्धान्त सामान्य लोकांनाच काय, गणिताच्या कांहीं प्राध्यापकांनाहि सर्वांग परिपूर्णतेनें समजत नाहीं, म्हणतात. सबंध जगांत १०-२० लोकांनाच त्याचा सिद्धान्त उत्तम तऱ्हेनें समजतो. त्यांना पटला म्हणजे आइन्स्टाइनचें समाधान इतरांना पटण्याचें राहोच, समजला नाहीं तरी चालेल. आतां अशी कल्पना करा कीं, त्याचा सिद्धान्त समजण्याची पात्रता दहावीस जणांमध्येंहि नाहीं, एक देखील त्याच्या बौद्धिक पातळीवर जाऊं शकत नाहीं. तथापि, आपली विचारपद्धति शास्त्र-शुद्ध आहे किंवा नाहीं, कोठें कांहीं चुकीचा संभव नाहीं ना, प्रमाणांतला दुवा एखादा तुटलेला किंवा कमजोर आहे किंवा काय, याबद्दल आइनस्टाइन दक्षता बाळगील; कोणीहि आपली चूक काढण्यास किंवा ओळखण्यास पात्र नाहीं म्हणून तो स्वस्थ बसणार नाहीं. कल्पनानिर्मित गणितज्ञाचें समाधान त्याला करावयाचें असतें.-हे गणितज्ञ दहा आहेत का वीस आहेत, का स्वतःवरच ही जबाबदारी पडणार आहे, हा प्रश्न अगदीं गौण आहे. गणितांतील शोध आदर्शभूत **गणितज्ञा**करितां असतात-मग हा एकच असो किंवा ते कितीहि असोत. त्याच-प्रमाणें कलाकृति ही आदर्शभूत रसज्ञाकरितां असते; मग हे रसज्ञ [ गीतेंत ब्रह्मज्ञ सिद्धांबद्दल कृष्णानें **'यत्ततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः'** हें जें म्हटलें आहे, त्याच न्यायानें, किंवा भर्तृहरीनें **निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः'** असें जें म्हटलें आहे त्या न्यायानें ] अत्यन्त थोडे असले तरी चालतील. किंबहुना एखाद्या काळीं उपलब्ध नसेल तरी चालतील.

**उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समान-धर्मा ।**
**कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ॥**

असें भवभूतीप्रमाणें म्हणून खरा कलावन्त आपलें समाधान मानून घेईल. असा 'समानधर्मा' केव्हांहि उत्पन्न झाला नाहीं तरी अंतर्यामींचा त्याचा कलात्मक शिव त्याच्या जिवाला समाधान दिल्याशिवाय राहणार नाहीं, आणि या शिवाचीच तो पूजा करीत राहणार!

श्वसनाला कठिण वाटणाऱ्या आणि उच्चतेचा आभास उत्पन्न करणाऱ्या या विरल वातावरणांतून जरा खालीं उतरूं या. चित्रकार चित्र काढीत असतां

स्वतःपुढें तें धरून वारंवार ते न्याहाळीत असतो व योग्य ते फेरबदल करीत असतो. आपल्यासमोर चित्र धरीत असतां तो चित्रकाराची भूमिका सोडून रसिकाची भूमिका घेत असतो. डोंगरावर जाऊन एकांतांत गाणारा होतकरूं गवई इतरांकरितां गात नसेल, पण त्याच त्याच ताना घेण्याचे त्याचे जे प्रयत्न चाललेले असतात त्यांचा हेतु रसिक श्रोत्याची भूमिका घेतलेल्या स्वतःचें पूर्ण समाधान होईतोंपर्यंत ताना घेण्याचा प्रयत्न करीत राहणें हा असतो. कवीचेंहि असेंच असतें. एखादी कविता लिहून तो ती कोणालाहि न दाखवितां दप्तरांत ठेवून देईल कदाचित्; पण लिहित असतां किंवा गुणगुणत असतां तो शब्दरचनेमध्यें वारंवार जे फेरबदल करीत असतो, ते रसिकाची भूमिका घेतलेल्या स्वतःच्या अन्तःसमाधानाकरितां असतात. खऱ्या कलावन्ताचा व रसिकाचा आनन्द हा द्रव्य, कीर्ति, बोध, इत्यादि उपाधींवर अवलंबून नसतो; तो निराकांक्ष, निरपेक्ष [ disinterested ] असतो. आपली कलाकृति पाहून दुसऱ्या कोणाला तरी आपल्यासारखाच आनंद झालेला पाहण्याचें भाग्य लाभलें नाहीं तरी चालतें.

कलावन्त हा 'आत्मक्रीडः आत्मरतिः' असतो हें मीच म्हणत असलों आणि मला तें मान्य असलें तरी या प्रश्नाचा निरोप घेण्यापूर्वी जातां जातां हें म्हणावेंसें वाटते कीं, निरपवाद नियम म्हणून नव्हे, तर **सामान्यतः** स्वेतर रसिकाशिवाय कलावन्ताचें पूर्ण समाधान होत नाहीं. प्रौढ मुलीच्या पित्याला जांवई मिळाल्याशिवाय जसें पूर्ण समाधान नसतें; त्याचप्रमाणें कविता-सुतेच्या किंवा कोणत्याहि कलाकृति-सुतेच्या बाबतींतहि रसिक जामात मिळाल्याशिवाय, त्या त्या कलावन्ताचें मन पूर्ण प्रसन्न होऊं शकत नाहीं. 'अर्थो हि कन्या परकीय एव' त्याचप्रमाणें 'अर्थो हि काव्यं परकीय एव' असें दुराग्रहानें म्हणण्यापर्यंत माझा मुद्दा मी ताणीत नाहीं; पण सामान्यतः कलाकृति ही स्वेतर रसिकाची अपेक्षा करीत असते असें मला सुचवायचें आहे. या संबंधांत विनयानें आणि भीतभीत पुढील एक मुद्दा मला मार्मिकांपुढें मांडावयाचा आहे, त्याचा ते विचार करून स्वतः निर्णय करतीलच.

मुद्दा असा कीं, ज्याप्रमाणें लहान मुलाला वेदना होऊं लागल्या म्हणजे त्याच्या दुःखाचा आविष्कार साहाजिकपणेंच रडण्यामध्यें होतो; पण हें रडणें मातेचें किंवा दुसऱ्या कोणाचें तरी लक्ष वेधण्याकरितां सृष्टीनें योजिलेलें दिसतें;

किंवा ज्याप्रमाणें डोळे वटारणें, ओंठ दातानें दाबणें, भांडणाच्या पवित्र्यांत उभें राहणें, वगैरे क्रोधाचे जे स्वाभाविक आविष्कार आहेत ते प्रतिस्पर्ध्याला भिवविण्याकरितां निसर्गानें योजिले असावेत अशी कल्पना करतां येते; किंवा ज्याप्रमाणें कोंबड्यानें किंवा मोरानें पिसारा पसरून नाचूं लागणें हा त्याच्या कामात्मक भावनेचा सहजसिद्ध आविष्कार मादीला आकर्षित करण्याकरितां असावा असें अनुमानितां येतें; त्याचप्रमाणें सौंदर्य-भावनेनें जन्म दिलेली कलाकृति ही साहजिक, स्वभावसिद्ध आविष्कारासारखी असली तरी हा आविष्कार केवळ आत्मपर नसून परापेक्ष असावा. कविता कवीनें दप्तरांत ठेवण्याचा आपण उल्लेख केला, पण असे कवि किती ? आणि त्यांना तरी पूर्ण समाधान झालेलें असतें काय ? ' जीर्णमंगे सुभाषितम् ' असें एका सुभाषितकारानें जे शोकात्मक उद्गार काढले ते रसिकांच्या अपेक्षेचा भंग झाल्यामुळेंच ना ? ' बी ' कवीनें

**महाराष्ट्र कविपरंपरा । खंड न पडला तिला जरा ।**
**उणीव रसिकांचीच परी । आज भासते खरोखरी ॥**

अशी जी तक्रार केलेली आहे ती रसिकांची उणीव तीव्रतेनें भासल्याशिवायच ?

Virtue is its own reward या म्हणींत दिग्दर्शित केल्याप्रमाणें नैतिक किंवा धार्मिक कर्म हें आत्मप्रसादाकरितां, ' आत्मनस्तुष्टी ' करितां असतें; त्याप्रमाणेंच कलात्मक आनंदहि आत्मप्रसादार्थ, आत्मपुष्ट्यर्थ असतो हें मान्य असून देखील तो ' रसिकार्थ ' असतो अशी भाषा वापरण्याचा मी जो आग्रह धरीत आहे, तो शाब्दिक वादाकरितां नाहीं, तर मी वापरूं पाहात असलेली भाषा वापरण्यानें एक दोन गोष्टींचा खुलासा चांगला होईल अशी मला आशा आहे म्हणून. एक गोष्ट अशी कीं कलावन्ताला एखाद्या सौंदर्याचें दर्शन झालें म्हणजे जो आनंद होतो, तो तेथेंच राहत नाहीं; तो व्यक्त होण्यास उत्सुक असतो. तें सौंदर्य पूर्णतेनें हस्तगत व्हावें, ' ग्रथित ' व्हावें, ' निबद्ध ' व्हावें, कोणाहि रसिकाला त्यानें आनंदित करावें, अशी इच्छा कलावन्ताच्या मनांत प्रबल असल्यामुळें आत्मानंदाच्या केवळ आत्मनिष्ठ अवस्थेनें त्याचें पूर्ण समाधान होत नाहीं आणि म्हणून स्वतःशींच गाणें म्हणणारा जसा मनांतील आदर्शभूत तान कंठांतून पूर्णतेनें निघेपर्यंत प्रयत्न करीत असतो, तसे इतर कलावन्तहि मनांतल्या आदर्शभूत रसिकाच्या निश्चित व पूर्ण तृप्तीकरितां प्रयत्न करीत असतात आणि या व्यक्तीकरणाच्या व्यापारामुळें असा प्रकार घडतो कीं कलावन्ताचा सौंदर्यदर्शन-

जन्य मूळ आनंद आणि व्यक्तिकरण करतांना त्याला होणारा आनंद, यशस्वी व्यक्तीकरण झाल्यानंतर त्याला होणारा आनंद आणि यशस्वी व्यक्तीकरणाचा आस्वाद घेणाऱ्या स्वेतर रसिकाचा आनंद, यांत भेद उत्पन्न होतो. ( २ ) तसेंच सौंदर्य-जन्य आनंदाला ग्रथित, निबद्ध, करणाऱ्या व्यापारांत [ कांहीं कलांचे बाबतींत तरी ] कांहीं गौण, आनुषंगिक गोष्टी अनिवार्यपणें, अपरिहार्यतेनें येतात. ( ३ ) या अनिवार्य अपरिहार्य गौण आनुषंगिक गोष्टीमुळें कलावन्ताला दिसलेलें मूळ सौंदर्य रसिकाला किंवा रसिकांना त्याच स्वरूपांत न दिसण्याचा संभव उत्पन्न होतो. ( ४ ) आणि रसिकाला किंवा रसिकांना आपल्या आनंदांत वांटेकरी करण्याच्या इच्छेमुळें कांहीं दोष साहजिकपणेंच [ सामान्य कलावन्ताच्या कलाकृतीमध्यें तरी ] उत्पन्न होतात.

प्रस्तावना फार लांबू लागली आहे म्हणून पहिला मुद्दा सोडून दुसऱ्याकडे एकदम वळतों. कलावन्ताच्या ध्यानांत एखादें सौंदर्य आलें तरी तें बहुधा अस्पष्ट, अनिश्चित स्वरूपांत असतें. शेक्सपिअरनें–

The poet's pen gives to airy nothing
A local habitation and a name

असें जें म्हटलें आहे, त्यांतील airy nothing या शब्दाकडे या संदर्भात मी लक्ष वेधूं इच्छितों. वरें, सौंदर्य सुस्पष्ट स्वरूपांत प्रत्ययाला आलें तरी तें व्यक्त करतांना त्याला 'local habitation and a name'—'नामरूप'—देणें प्राप्त होतें आणि सौंदर्याचें आत्मांगभूत आवश्यक गुणधर्म आणि नामरूपात्मक देह हीं उत्तम कलावन्ताच्या कलाकृतींत एकजीव होत असलीं, तरी ही सजीव एकात्मता साधण्यांत कांहीं एक दोष किंवा उणीव न राहणें सामान्यत: कठीण असतें.

व्यवहारांतलें भाषेचें उदाहरण घेऊं या. मनांतला अभिप्राय स्वाभाविकपणेंच आपण भाषेच्या द्वारें व्यक्त करतों. शब्द हे सहजोद्गार खरे; पण एखाद वेळेस या सहजोद्गारामुळें विपरीत अर्थ उत्पन्न होत नाहीं का? स्पूनर [ Spooner ] नांवाच्या एका महान् विद्वान् पण अक्षरविपर्यय करणाऱ्या प्रोफसरावरून Spoonerism हा शब्द निघाला आहे. या प्राध्यापकानें एका बाईला Will you make tea ? म्हणण्याच्या सात्त्विक उद्देशानें Will you take me ? असें म्हटल्याची दंतकथा आहे! 'स्व-जनां'ना उच्चार-

दोषामुळें 'श्व-जन' ठरविण्याची किंवा 'सकलांचें' 'शकल' करणाऱ्याची गोष्ट सुभाषितकारानें कल्पित रचलेली असली तरी ती क्वचित् प्रसंगीं दिसून येणाऱ्या विनोदास्पद वस्तुस्थितीची निदर्शक खास आहे. कलाविषयीभूत भावनेला नाम-रूपात्मक व्यक्त स्वरूप मिळतांना वाङ्मयात्मक कलाकृतींत [ व इतरत्रहि ]

विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्

अशी स्थिति होण्याचा संभव असतो. असे हे प्रकार अपवादात्मक असले आणि बेंगरूळ कलावन्ताच्या बाबतींतच ते शक्य असले तरी चांगल्या चांगल्या कला-वन्तांना देखील अभिप्रेत सौंदर्य आपल्या कृतींत पूर्णपणें उतरलें आहे असें म्हणण्याचें भाग्य वारंवार येत नाहीं. कलात्मक आत्मानंद हा केवळ आत्मनिष्ठच राहता, नामरूपात्मक व्यक्तिभवनाची किंवा व्यक्तिकरणाची आवश्यकताच नसली, तर हे दोष संभवते ना. पण या आवश्यतेमुळें हें दोष संभवनीय होतात आणि ते उत्तम कलावन्तानाच पूर्णपणें टाळणें शक्य होतें. मनांतील प्रेम, आदर, इत्यादि भावना व्यवहारांत जशा कोणाला दिसत नाहींत.–मुखचर्या, हावभाव, शब्द, कृति इत्यादिकांनीं व्यक्त केल्यावरच कळतात; आणि म्हणून कित्येक वेळां मनां-तल्या सद्भावनेचा विपरीत अर्थ होऊन संसारांत गैरसमज, भांडणें वगैरे माजतात. त्याचप्रमाणें कलावन्तानें निर्मिलेल्या कृतींतील गर्भित भावनेसंबंधानेंहि घडून येतें आणि कलावन्ताला कित्येक वेळां विनाकारण दूषणें देण्यांत येतात.

प्रस्तुत पुस्तकांत अनंत काणेकरांना मर्ढेकरांनीं जें दूषण दिलें आहे, तें कविमनांत अभिप्रेत असलेल्या भावनेबद्दलच्या विपरीत ग्रहामुळें आहे हें मी पुढें दाखविणार आहे. [ काणेकरांची आक्षेप-विषयीभूत कविता सदोष आहे असें मीहि म्हणणार आहे, पण निराळ्या कारणाकरितां. कदाचित् माझाच किंवा माझाहि विपरित ग्रह झाला असेल ! पण सध्यां दुसरीं कांहीं उदारणें घेतों. ] कला ही एक क्रीडा आहे [Play is the art of children and art is the play of grown up men] असें म्हणतात तें पूर्णशांनीं खरें नसेल; पण कित्येक वेळां तरी कलावंताची वृत्ति केवळ क्रीडा-पर असते आणि ही गोष्ट टीकाकारांच्या ध्यानांत न आल्यामुळें ह्या कवीचें परिहास-विजल्पित परमार्थानें घेण्यांत येऊन त्याच्यावर अश्लीलता, दुष्टता, इत्यादि आरोप घेण्यांत येतात. प्र. के. अत्रे यांच्या ' ब्रँडीची बाटली ' या चित्रपटांत 'कृष्णा, आम्हांला एकदां चान्स द्या ना ' अशा आशयाचें वाक्य आहे, त्या वाक्यांत [ आणि त्या प्रसंगांत ] कृष्णाची चेष्टा करण्याचा हेतु

नसून बगारामाचीच चेष्टा करण्याचा लेखकाचा हेतु आहे. आणि या हेतूच्या पाठीमागील कवि-भावना परिहास-प्रधान आहे; पण हें टीकाकारांच्या ध्यानांत न आल्यामुळें ब्रँडीच्या पेल्यांतलें एक वादळ माजलें! मोरोपंत कवीनें 'श्लोक-केकावली' व 'संशय-रत्नमालें'त ईश्वरापाशीं फाजील सलगी केली आहे, ईश्वराची अवज्ञा त्यांत आहे, अशा प्रकारचे आक्षेप एका अनभिज्ञ साहेबानेंच घेतलें असें नव्हे, तर न्यायमूर्ति माधव गोविन्द रानड्यांसारख्यांनीं देखील असे आक्षेप केले त्याचें कारणहि असेंच आहे. म्हणजे मोरोपंत हे जरी मनो-वाक्काय-शुद्धीकरितां मीं काव्य करीत आहें असें वारंवार सांगत असले आणि त्यांत सत्यांश असला, त्याचप्रमाणें ते जरी खरोखरीच भव-तप्त असे आर्त मुमुक्षु असले, तरी केकावली करतांना भाविक आर्ततेपेक्षां काव्यात्मक क्रीडावृत्ति अधिक प्रबल होती आणि याच वृत्तीनें ईश्वराला ते कधीं 'छिनल' म्हणतात, तर कधीं 'तुमच्या पत्नीनें तुम्हाला माझ्याकडे येऊं दिलें नाहीं का?' असा परिहासगर्भ संशय व्यक्त करतात! कवीनें आत्मानंद आत्मनिष्ठच ठेवून रसिकाप्रीत्यर्थ शब्दद्वारा तो व्यक्त करण्याच्या भानगडींत तो न पडतां, निदान काव्य इतरांना तो दाखवता ना, तर त्यावर मिथ्यारोप कशाला येता? पण कविता-सुता ही रसिकाकरितांच आहे असें तेच म्हणतात, तेव्हां तो तो पदार्थ ज्याच्या त्याच्या पदरांत टाकल्याशिवाय चैन कसें पडणार?

काणेकरांचें कोळ्याचें गाणें

कवि आपले 'स्वानुभव' व्यक्त करीत असतो, तो काव्यारंभींच नव्हे, तर आदिमध्य-अन्तीं sincere असला तरच तो उत्तम कवि, इत्यादि प्रकारचें मर्ढेकरांनीं जें विवेचन केलें आहे तें मला मान्य आहे; पण स्वानुभव रसिकार्थ मूर्त स्वरूपांत 'व्यक्त' व्हावयाचा असल्यामुळें, या आवश्यकतेमुळें, गैरसमज उत्पन्न होण्याचा कसा संभव आहे हें मला प्रस्तुत प्रसंगीं दाखवावयाचे आहे. त्यांचा देखील अनंत काणेकरांच्या 'आला खुशींत् समिंदर, त्याला नाहीं धिर, होडीला बघतो धरूं' असा आरंभ असलेल्या 'कोळ्याच्या गाण्या' संबंधानें थोडासा गैरसमज झालेला दिसतो. 'या गाण्याची चाल व त्यांतील शब्द यांच्या मोहजालांत सांपडून सूचित शृंगार-मोहाच्या गळाला बळी न पडतां शीरसलामत राहून त्याच्या अंतर्भूत कल्पनांना व भावनांना हात घातला म्हणजे त्या गाण्यांत लेखनपूर्व आत्मनिष्ठेचा [ sincerityचा ] किती अभाव आहे हें सहज दिसेल' असें मर्ढेकर म्हणतात आणि आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ दोन प्रमाणें देतात.

(१) 'होडीः समुद्रः प्रियाः प्रियाः प्रियकर, हें समीकरण मनांत सोडविण्याचा प्रयत्न वाचक जसजसा अधिक करील, तसतशी प्राथमिक कल्पनात्मक प्रतिक्रियेच्या अभावाची त्याला सत्यता अधिकाधिक पटेल.'

(२) ' सुसंस्कृत मनुष्य, ज्याची जानपद भाषा ही घरांतली रोजची भाषा नाहीं जेव्हां जानपदें लिहिण्याचा प्रयत्न करतो, तेव्हां त्या कृत्रिमतेच्या आड भावनानिष्ठ आत्मवंचना, किंवा कल्पनात्मक आत्मनिष्ठेचा [sincerity] चा अभाव बहुधा असतो.

या दुसऱ्या आक्षेपासंबंधानें मला असें म्हणावयाचें आहे कीं, [ अनंत काणेकर यांनीं या गाण्यावरच मुंबईत रेडिओवर जें भाषण केलें, त्यांत म्हटल्या-प्रमाणें ] जानपदभाषेचा केवळ आभास त्यांना मौज म्हणून उत्पन्न करावयाचा होता आणि हा त्यांचा हेतु बराच सिद्धीस गेला आहे. खरोखरचा कोळी आपल्या खेडवळ भाषेंत केलेलें गीत गात आहे, असें मनांत मुळांतच योजिलें नव्हतें तेव्हां मर्ढेकरांचा आक्षेप आपोआपच गैरलागू होतो.

पहिल्या आक्षेपासंबंधानें मला म्हणावयाचें कीं, अनंत काणेकर यांच्या प्रस्तुत गाण्यांत ' प्राथमिक कल्पनात्मक प्रतिक्रिया ' नाहीं असें जें मर्ढेकर म्हणतात तें खरें नाहीं. कल्पना–प्रतिक्रिया आहे ती विशेष रम्य किंवा सौंदर्यदृष्ट्या मूल्यवान् नाहीं, हा दोष असला तरी ही उणीव मीं पुढें दिग्दर्शित करणार आहे; पण कल्पनात्मक प्रतिक्रियेचा अभाव आहे हा दोष येथें लागू नाहीं असें म्हणावयाचें आहे. होडी आणि समुद्र यांचें आणि प्रिया व प्रियकर, यांचें साम्य म्हणा किंवा समीकरण म्हणा काणेकरांना सुचलें, प्रत्ययाला आलें, आणि मग चाल सुचून, जानपद भाषेचा आभास उत्पन्न केल्यास अधिक मौज होईल असें वाटून, त्यांनीं एक प्रकारच्या खेळकर वृत्तीनें कल्पनेचा विलास म्हणून गाणें रचलें. मर्ढेकरांचें म्हणणें असें कीं, " प्रिया–प्रियकरांचें सत्य किंवा काल्पनिक दृश्य पाहतांक्षणींच, विजेचा धक्का बसावा तसा धक्का बसून कवीला समुद्र व होडी दिसलीं नाहींत; किंवा समुद्रहोडीचें सत्य किंवा काल्पनिक दृश्य पाहून तितक्याच परिणामकारक रीतीनें प्रिया–प्रियकर शृंगार आठवला नाहीं. " हें खरें आहे,–काणेकरांनीं रेडिओवरील आपल्या भाषणांत तें कबूलच केलें आहे; पण अशाच प्रकारचा धक्का बसलाच पाहिजे, प्राथमिक प्रतिक्रिया अशीच असली पाहिजे असें शास्त्र नाहीं. होडी आणि समुद्र यांच्या द्वारें प्रिया–प्रियकरांचा

प्रेमसंबंध दिग्दर्शित करतां येईल हें समुद्रकाठीं [ नव्हे तर खोलींत बसले असतां, आणि प्रिया-प्रियकरांचे प्रेमविलास पाहात असतांना नव्हे, तर पूर्ण एकान्तांत असतांना ] त्यांना सुचलें. या कल्पनेंत रम्यत्व आहे असें त्यांना वाटलें, हें रम्यत्व गाण्याच्या द्वारें प्रकट करण्याची इच्छा झाली, जानपद-भाषेची जोड दिल्यास गाणें खुलेल अशी दुसरी एक कल्पना झाली, अनुकूल चाल मिळाली आणि कल्पना-विलासात्मक गाणें निर्माण झालें. विशिष्ट प्रकारचें रम्यत्व किंवा साहित्य-शास्त्रांतले शब्द वापरावयाचे म्हणजे वैचित्र्य, चमत्कृति त्यांच्या प्रत्ययाला येण्याची 'प्राथमिक कल्पनात्मक प्रतिक्रिया' त्यांच्या मनांत उत्पन्न झालीच होती, असें मीं म्हटलें तर तें चूक होईल असें वाटत नाहीं.

आतां काणेकरांना जी रम्यता किंवा जी चमत्कृति भासमान झाली ती मला विशेष पटत नाहीं, खेळकर-वृत्तीचा हा कल्पना-विलास मला विशेष आल्हाददायक होत नाहीं, हा भाग वेगळा. हें गाणें लोकप्रिय होण्याचीं कारणें त्याची चाल, तें गाणाऱ्या गायिकेचा आवाज व गायनकौशल्य, गाण्यांतील शृंगारिक सूचना, इत्यादि प्रकारचीं आहेत हें मर्ढेकरांचें म्हणणें बरोबर आहे. या गाण्याच्या काव्यात्मकतेपेक्षां इतर कारणांनीं तें गाजलें आहे, काव्य-सौंदर्य-दृष्ट्या त्याचें मूल्य बेताचेंच, असें मीहि मानतों.

माझ्या मतांत आणि मर्ढेकरांच्या मतांत केवळ शाब्दिक भेद आहे असें कोणाला वाटेल ( आणि तसें कदाचित् असेलहि ), अशी भीति वाटत असल्यामुळें माझा मुद्दा अधिक स्पष्ट करण्याकरितां प्राथमिक अनुभवाच्या खऱ्या अनुभावाचें प्रथम उदाहरण देतों आणि मग आभासात्मक अभावाचीं उदाहरणें देतों, म्हणजे काणेकरांच्या गाण्यांतील अभाव आभासात्मक आहे असें निदर्शनास येईल अशी आशा आहे. माझ्या 'रागिणी' या कादंबरींत प्रियब्रह्म-स्वामीचें आणि 'आश्रम-हारिणीं'त 'पूर्णप्रज्ञ' ऋषीचें जें चित्रण केलें आहे, त्याच्या पाठीमागें खरा किंवा कल्पना-निर्मित स्वानुभव नाहीं, हें मला ठाऊक आहे. मला असा एक ऋषि शब्दचित्रित करावयाचा होता कीं, जो जवळजवळ त्रिकालज्ञ आहे, सर्व विश्वाचें गूढ ज्याला कळलें आहे, जें आहे तें सर्व मंगल शिव-स्वरूप आहे,—

All's right with the world
God is in His Heaven.

—अशा प्रकारें ज्याला वाटत आहे, इतकेंच नव्हे तर पटलें आहे, आणि अंगीं बाणलें आहे, इत्यादि इत्यादि. पण अशा प्रकारच्या उदात्त उच्चतम ब्रह्मज्ञ-वृत्तीची संस्कृत वाङ्मयाच्या वाचनावरून बौद्धिकदृष्ट्या कल्पना आलेली असली तरी त्या वृत्तीचा क्षणार्ध देखील अनुभव नसल्यामुळें उपरिनिर्दिष्ट दोनहि कादंबऱ्यांतील हीं व्यक्ति-चित्रें जेवढीं जिवन्त व प्रत्ययकारक वाटावींत तेवढीं वाटत नाहींत आणि विसंगत्यादि अंगभूत व अक्षम्य-प्राय दोष त्यांच्या चित्रणांत आले आहेत.

ललित-कृतीला मूल-आधारभूत अनुभवाच्या अभावीं जी अंगभूत अक्षम्य सदोषता येते ती निराळी आणि कवीचा किंवा कलावन्ताचा सौंदर्यदर्शन-जन्य आनंदात्मक अनुभव रसिकाला प्रतीत व्हावा म्हणून कलावन्ताला नाम-रूप स्थळ-कालादि मूर्त-अमूर्त ज्या उपाधींचा आश्रय करावा लागतो, त्या उपाधींच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या अभावीं उत्पन्न होणारी गौण व क्षम्य सदोषता निराळी, हें माझ्याच कादंबरींतील एक उदाहरण आठवतें तें सांगून ( व नंतर दुसरीं उदाहरणें देऊन ) विशद करण्याचा प्रयत्न करतों. [ हें विशद झालें म्हणजे अनंत काणेकरांच्या 'कोळयाच्या गाण्यां' त आणि यशवंताच्या 'माहूतास' या भावगीतांत जे दोष मर्ढेकरकरांना दिसतात ते उपाधिविषयक अतएव गौण व क्षम्य आहेत असें जें मला सुचवायचें आहे तें स्पष्ट होईल. हे दोष गौण आहेत असें म्हटलें म्हणजे त्या गीतांतील मूलभूत सौंदर्यात्मक अनुभव मला विशेष रम्य किंवा मूल्यवान् वाटतो असें मात्र कोणी समजूं नये. )

रागिणीच्या तिसऱ्या खंडांत रागिणी, उत्तरा वगैरे विजयगांवकर मंडळी रानटी लोकांच्या तावडींत सांपडून त्यांच्यावर मोठे बिकट प्रसंग ओढवतात असें वर्णन आहे. वेगवेगळया प्रसंगीं त्या त्या व्यक्तींवर जे प्रसंग आले आणि त्यांच्या त्या त्या प्रसंगीं ज्या भावना होत्या, त्यांच्याशीं मीं कल्पनात्मक पर-चित्त-प्रवेश करून बराच तादात्म्य पावलों होतों आणि त्या त्या भावनांच्या बाबतींत मर्ढेकर म्हणतात ती 'आत्मनिष्ठा' म्हणजे sincerity दिसून येईल असें वाटतें. पण या भावना रसिकांच्या प्रत्ययाला आणावयाच्या म्हणजे मला विशिष्ट स्थळीं, विशिष्ट काळीं त्या उत्पन्न झाल्या असें वर्णन करणें प्राप्त होतें. अमक्या प्रसंगीं अमुक तिथि होती, चंद्रकोर अमुक ठिकाणीं होती, वगैरे जीं वर्णनें आहेत त्यांत चुका झाल्या आहेत; पण तिथि, चंद्रकलेचें स्थान,

वगैरे गोष्टी गौण आहेत. तद्विषयक चुका समर्थनीय नसल्या तरी क्षम्य आहेत असें मला वाटतें. वि. स. खांडेकरांच्या, मला वाटतें 'छाया' या चित्रपटांत लहान भावाकरितां बहीण आपल्या पातिव्रत्याचा देखील त्याग करते या कल्पनेंत खांडेकरांना एक प्रकारची सौंदर्यात्मक चमत्कृति दिसली, पण या अनुभूत चमत्कृतीचें चित्रण करतांना त्या भावाला कांहींतरी असाध्य रोग झाला होता वगैरे उपाधि-स्वरूप गौण गोष्टींचें वर्णन अपरिहार्य होतें. या उपाधि वर्णनांत त्यांनीं चूक केली आहे, म्हणजे त्या भावाला 'कॅन्सर' झाला होता हें दाखविलें आहे ही चूक आहे. (लहान मुलांना कॅन्सर होत नाहीं असें डॉक्टरी तज्ज्ञांचें मत आहे.) ही चूक गौण गोष्टीबद्दल आहे म्हणून क्षम्य आहे. असल्या गोष्टीसंबंधीं लेखकाला प्राथमिक स्वानुभूति पाहिजे, नसल्यास त्याच लिखाणांत sincerity च्या दृष्टीनें मोठा दोष उत्पन्न होतो, असें मला वाटत नाहीं. [ दोष आहे, पण तो अत्यंत अल्प स्वरुपाचा आहे, त्यानें मूळ अभिप्रेत भावना चित्रणांत बहुमुल्यता असेल तर ती विशेष कमी होत नाहीं असें मला म्हणावयाचें आहे. ]

## 'माहुतास' या वरील आक्षेप

यशवन्तराव पेंढारकरांच्या 'माहुतास' या कवितेवर मर्ढेकरांनीं जो आक्षेप घेतलेला आहे तद्विषयक माझें मत आतां थोडक्यांत सांगतां येईल. मर्ढेकर म्हणतातः—"हत्ती, माहूत व अंकुश पाहून यशवन्तांनीं ही कविता लिहिली असें वाटत नाहीं...मध्यवर्ति कल्पना डोक्यांत येतांच हत्ती, अंकुश, हें दृश्य आपोआप तीव्रतेनें त्यांच्या कल्पनाचक्षूंवर आदळलें असेल असें वाटत नाहीं. त्यामुळें कवितेचा ओघ मध्यवर्ति कल्पनेला धरून सरळ न वाहतां यमकांच्या आवर्तनाभोंवतीं घुटमळतो." माझें म्हणणें असें आहे कीं, यशवन्तरावांवर कठोर टीका करणाऱ्या संबंधानें त्यांच्या भावना स्मरणोज्जीवित व उत्कट होऊन त्यांचें मन त्यांनीं भारलें गेलें. पान ६ वर भावनांच्या ज्या सजीव तीव्रतेवर वाङ्मयाचा दर्जा अवलंबून असतो असें मर्ढेकर म्हणतात, ती 'सजीव तीव्रता' प्रस्तुत कवितेंत आहे. आपल्या भावना हत्ती, माहूत, अंकुश वगैरेंच्या वर्णनाचें निमित्त करून त्यांच्या द्वारें आपणांस दिग्दर्शित करतां येतील अशी दुसरी एक भावनागर्भ कल्पना कवींच्या मनांत उत्पन्न होऊन

कविता लिहिण्यास त्यांनीं आरंभ केला असावा. त्यांच्या स्मरणोज्जीवित उत्कट भावनांत मला रम्यत्व दिसतें; पण त्या भावना रसिकाच्या प्रत्ययाला आणून देण्याकरितां अन्योक्तिरूप जी कल्पना आहे, तींत मला विशेष रम्यत्व दिसत नाहीं म्हणून मला ती एवढ्यापुरती सदोष वाटते. हत्ती, अंकुश, माहुत वगैरेंचीं दृश्यें त्यांच्या कल्पनाचक्षूंवर तीव्रतेनें आदळलीं नाहींत हें खरें आणि हा दोष तर खराच, पण तो गौण आहे. खरा दोष अन्योक्तीकरितां जीं प्रतीकें निवडलीं त्यांत विशेष रम्यत्व नाहीं, हा आहे.

कै. माधवराव पटवर्धन यांनीं लिहिलेल्या—

**हें काय असें होई ? साशंक धपापे ऊर**
**डोळ्यांत जमे पाणी, डोक्यांत उठे काहूर**

या गज्जलांतील सौंदर्याविष्करण आणि दोषदिग्दर्शन मर्ढेकरांनीं इतक्या मार्मिकपणानें आणि हळुवारपणें केलें आहे कीं, तें प्रथम जेव्हां ‘ सह्याद्रि ’ मासिकांत प्रसिद्ध होऊन वाचकांच्या वाचनांत आलें तेव्हांपासूनच मर्ढेकरांच्या टीकानैपुण्याबद्दल त्यांची खात्री झाली आणि त्यांच्या लेखणींतून असे लेख वारंवार येतील तर फार बरें होईल, असें एकमेकांशीं ते बोलूं लागले. काव्याचा रसास्वाद घेतांना सहृदय रसिकाच्या ठिकाणीं सहानुभव आणि विवेकबुद्धि या दोहींचा सुंदर मिलाफ येथें झालेला पाहून कोणाचेंहि मन प्रफुल्लित झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

## ‘ वाटलें तें लिहिलें ’ हें कितपत बरोबर ?

वाङ्मयांतील स्वानुभूतीसंबंधीं आणखी एक थोडासा खुलासा केला पाहिजे. मीं जें प्रत्यक्ष पाहिलें, स्वतः अनुभवलें, मला जें वाटलें तें लिहिलें असें एखादा साहित्यिक म्हणाला, तर त्याची ती प्रामाणिक सहानुभूति [sincerity] ही वाङ्मय-ग्रथनाचें समर्थन नेहमींच होऊं शकेल काय हा प्रश्न आहे. ‘ स्वतःला जें बरोबर वाटतें तें लिहिणें ही वाङ्मयीन यशाची पहिली पायरी आहे ’ असें मर्ढेकर म्हणतात. मुद्दाम उल्लूपणाचें उदाहरण घेऊन ते आपला अर्थ पुढें दिल्याप्रमाणें विशद करतात. “ एखादी सुंदर स्त्री अनेकांनीं बघितली........आणि प्रेक्षकांपैकीं एकाची भावना फक्त इन्द्रियनिष्ठ सुखाची आहे. अशा वेळेस उत्तम मार्ग म्हणजे त्यानें आपल्या भावनेला वाङ्मय-स्वरूप देण्याचा प्रयत्न न करणें; पण तितका मनोनिग्रह झाला नाहीं व लेखन करणें अपरिहार्यच झालें तर निःशंकपणें आपली खरी भावना त्यानें वर्णन करावी. कारण, सकृद्दर्शनीं धक्का

देणारी ही वस्तुस्थिति शेवटीं व्यापकदृष्ट्या नीतीलाहि उपकारच होईल."
'खरोखरीच वाटलेली इन्द्रियनिष्ठ भावना लपवून तिच्याऐवजीं गुळगुळित निर्व्याज प्रेमाची गीतें लिहिणें यापेक्षां ही गोष्ट अधिक दूषणीय नाहीं.' या वाक्यांतील विचारसरणी मला मान्य आहे; पण प्रत्येकाला बऱ्यावाईट प्रत्येक भावनेला निःशंकपणें वाङ्मयस्वरुप देण्याचा अधिकार आहे, किंवा हें इष्ट आहे, असें मला वाटत नाहीं. येथें नैतिक दृष्टीनें मी बोलत नाहीं, तर वाङ्मयात्मक कलेच्या दृष्टीनें बोलत आहे आणि केवळ कलेच्या दृष्टीनें असा अधिकार नाहीं, हें इष्ट नाहीं असें मी म्हणत आहे. एखाद्याला राग आला आणि शिव्या देणें त्याला 'अपरिहार्य' झालें तर त्याचें तें वाङ्मय औचित्यदृष्ट्या एखाद वेळेस इष्ट असेल, एखाद वेळेस तें नसेल. कसेंहि असलें तरी तें 'वाङ्मय' कला-स्वरुपाचें नाहीं, तर ती केवळ लौकिक प्रतिक्रिया आहे. कला-स्वरुपांतलें वाङ्मय हें स्मरणोज्जीवित भावनेनें निर्मित केलेलें असतें, तें मननात्मक Contemplative असतें, स्वानुभूत सौंदर्यदर्शन रसिकाच्या अनुभवाला यावें या प्रेरणेंत त्याचा जन्म असतो, असें मागें थोडेंसें विवेचन आलेलें आहे तें वाचकांना येथें आठवेलच. मर्ढेकरांनीं घेतलेल्या कामुक भावनेनें 'अपरिहार्यतेनें' वाङ्मयस्वरूप घेतलें असेल, तर तें त्या स्त्रीला प्रेम-याचना इष्ट असेल तर उचित होईल किंवा दुसऱ्या एखाद्या परिस्थितींत उचित होणार नाहीं,-हा लौकिक, व्यावहारिक जीवनांतला प्रश्न आहे; त्याचा कलेशीं कांहींएक संबंध नाहीं. वाङ्मय कलात्मक केव्हां होईल, तर कलावन्ताला आपल्या संवेदनात्मक किंवा भावनात्मक अनुभवांत मनन करण्यासारखें, कोणाहि रसिकाला सांगण्यासारखें, कोणाहि रसिकाला तद्विषयक मननानें आनंद होण्यासारखें, कांहीं तरी हृद्य असें मर्म, रहस्य, वैचित्र्य, चमत्कृति, सौंदर्य आढळेल आणि तें मूर्त स्वरूपांत आणि रसिकांना समजेल, पटेल, आनंद देईल, अशा रीतीनें व्यक्त करण्याची उत्कट भावनात्मक प्रवर्तक इच्छा होईल आणि या प्रयत्नांत त्याला यश येईल तेव्हां! अनुभवांत भावना आहे म्हणूनच केवळ, त्या भावनेच्या स्मरणांत किंवा मननांत चर्वण करण्यासारखें, सांगण्यासारखें कांहीं एक हृद्य रसतत्त्व नसतांहि, ती भावना व्यक्त करण्यामध्यें कला आहे असें मला तरी वाटत नाहीं. ज्या वर्णनांत, काव्यांत, चित्रांत, गाण्यांत केवळ इंद्रियजन्य सुखाचाच छायात्मक लौकिक आस्वाद मिळतो, तें वर्णन काव्य, वगैरे इन्द्रिय-जन्य लौकिक-सुखाचें एक साधन म्हणून एखाद्याला प्रिय होऊं शकेल; पण त्यांत कलात्मकता नाहीं हें खास. उदाहरणार्थ, एखाद्या चित्रपटांत

केवळ दृष्टि-सुख देणारे शृंगारिक देखावे असले, तर त्यांत प्रकाश-चित्राची [ फोटोग्राफीची ] वगैरे केवळ नामधारी दुय्यमदर्जाची कलाकुसर असेल, पण त्यांत प्रतिभाजन्य कला म्हणून जी आपण म्हणतों ती नाहीं. कामविषयक उदाहरण सोडून दुसरें उदाहरण घेऊं या. एखाद्या चित्रपटांत अरण्यांतील वाघ वगैरेच्या दर्शनानें खरोखरी प्रेक्षकांच्या मनांत भीति उत्पन्न केली तर त्यांत भयानक 'रस' आहे असें मी म्हणणार नाहीं. भय आणि भयानक रस यांत भेद आहे. भय हें लौकिक, व्यावहारिक, जीवन-संरक्षणार्थ असतें; शरीर-कंपादि विकारांच्या द्वारें आविष्कृत होतें; पलायनादि कर्मांमध्यें परिणत किंवा फलित होण्याची त्याची प्रवृत्ति असते. भयानक-रसांत कंपादि प्रकार असलेच; तर ते अत्यन्त सौम्य स्वरूपांत असतात. भय अभासात्मक छायास्वरूप असतें, भयकारणापासून, अपसर्पणाची प्रवृत्ति नसते; इतकेंच नव्हे तर, त्याचें कल्पनात्मक मनन आणि चर्वण यांत चमत्कृति-स्वरूप, सौंदर्यजन्य आनंद असतो. करुणारसात्मक वर्णनांत देखील असाच आनंद असतो, म्हणूनच आपण शोकात्मक काव्यें, कादंबऱ्या वगैरे वाचतों. आणि नाटकें पहातों. शृंगाररसांत देखील असाच आनंद असतो आणि असाच असावा. केवळ इंद्रियजन्य सुखाची आठवण करून देणारीं, छायात्मक का होईना इंद्रियसुखच देऊं पाहणारीं, गुप्त-सुप्त इच्छेची पूर्ति करून आनंद देण्यास प्रवृत्त झालेली, शृंगारिक वर्णन हीं खरोखर शृंगार-रस उत्पन्न करणारीं नसून रसोत्पत्ति करण्याचे मिषानें, प्रच्छन्नतेनें इंद्रियसुख देणारीं साधनें आहेत. ज्या शृंगारिक वर्णनांत कामसंबद्ध अशा प्रेमलालसादि विविध भावनांतील मर्मस्वारस्यादिकांच्या प्रत्ययाला प्राधान्य असतें, ज्यांतील आस्वाद मननात्मक व पुनः पुनः मननीय असतो, ज्यांत इंद्रियविषयक संवेदनांचा कारणा-पुरता आणि आवश्यक तेवढाच केवळ वास असतो, तीं सहृदयांना कलात्मक शुद्ध आनंद देणारीं असतात. प्रच्छन्नतेनें केवळ इच्छापूर्ति करूं पाहणारीं वर्णनें, गाणीं, वगैरे अतृप्त जीवांस प्रिय वाटतील, त्यांना बाजारभाव असेल, पण तीं कलादृष्ट्या मूल्यवान, आदरणीय व शिष्ट-संमत होऊं शकणार नाहींत.

## अरिस्टॉटलचें मत

प्रस्तावना लांबत चालली आहे; पण या पुस्तकांत अरिस्टॉटलच्या एका उपपत्तीबद्दल जें विवेचन केलेलें आहे, त्याबद्दल चार शब्द सांगण्याचा मोह आवरत नाहीं. अरिस्टॉटलनें नाटकांचा व विशेषतः शोकरसात्मक नाटकांचा विचार करतांना या कलाकृतीमध्यें जें कलात्मक जीवन ऐक्य आवश्यक असतें तें संभवनीयतेच्या तत्त्वावर [ Principle of probability वर ] अधिष्ठित केलें आहे असें

मर्ढेकरांचें म्हणणें. हें तत्त्व तार्किक, बौद्धिक आहे असें त्यांचें दुसरें म्हणणें. कलाकृतींच्या घटकावयांतील जीवन्त ऐक्य सौंदर्यविषयक [ Aesthetic] तत्त्वावर अधिष्ठित असावें, तें तार्किक नसावें, असें त्यांचें तिसरें म्हणणें. या मतांचा थोडक्यांतच निरोप घ्यावयाचा आहे म्हणून एवढेंच सांगतों कीं, मर्ढेकरांचें हे शेवटलें मत मला मान्य आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या मतांच्या बाबतींत मला असें म्हणावयाचें आहे कीं, 'संभवनीयतेचें तत्त्व' [ Principle of probability ] हें सौंदर्याचें एकमेव तत्त्व किंवा प्रमुखतम तत्त्व म्हणून अरिस्टॉटलला अभिप्रेत नाहीं; तर त्याचा अव्यभिचारी सहभाव विवक्षित आहे. शोकगंभीर नाटकापासून Catharsis, म्हणजे भावना-शुद्धीकरण, कसें होतें याचें विवेचन करतांना अशा नाटकांत महानुभाव कर्मवीर पाहिजे, त्याच्यावर येणाऱ्या प्रसंगांमुळें भयानुकुलता व अनुकंपा उत्पन्न झाल्या पाहिजेत, इत्यादि आवश्यक अटी सांगणाऱ्याला या प्रसंगांतील गांभीर्याचें, किंवा त्यांतील भावनाप्राधान्याचें, महत्त्वाचें स्थान विदित होतें हें उघड आहे. तसेंच या गंभीर प्रसंगांची आणि भावनांची जीवंत संघटना असली पाहिजे, हें तत्त्व त्याच्या कार्यैक्य [ Unity of Action ] या तत्त्वावरून त्याला विदित होतें हें अनुमित होतें. कार्यैक्या-प्रमाणेंच कार्य-संभवनीयतेचा सह-भाव आवश्यक आहे असें मत अरिस्टॉटलला अभिप्रेत असावें असें वाटतें. भावनांची व प्रसंगाची घटना व संघटना, त्या त्या व्यक्तींच्या पूर्ववर्णित स्वभावांना आणि परिस्थितींना धरून, सुसंगत असाव्यात. त्याशिवाय सौंदर्यप्रतीति नाहीं, असा त्याचा भावार्थ. ही सुसंगति तार्किक असेल, पण ही एवढीच एक अट सौंदर्य-निर्मितीस पुरेशी आहे असें त्याला सुचवावयाचें नसावें; तर या अटीचे पालन करणें हे सौंदर्यात्मक संघटनेचें एक अवश्यंभावी तत्त्व आहे, असा त्याचा अभिप्राय असावा. रंगचित्रांतील आवश्यक रंगसंगति अथवा सौंदर्यजनक संघटना ही तार्किक तत्त्वावर अधिष्ठित नसते. गाण्यांतील सुरांचें वर्ज्यावर्ज्यत्व हें तार्किक तत्त्वांनीं ठरवावयाचें नसतें, तर तें कोठल्यातरी दुसऱ्या दृष्टीनें ठरवावयाचें असतें. त्याप्रमाणें नाटकांतील सौंदर्यजनक संघटनेचें तत्त्वहि तार्किक नाहीं असें मर्ढेकर म्हणतात तें मान्य आहे. रंगचित्रांतले रंग डोळ्यांना जाचक नसावेत, गाण्यांतला आवाज कर्णकटु नसावा, त्याचप्रमाणें नाटकांदिकांत ( इतर सौंदर्यजनक गोष्टी आवश्यक असल्या तरी ) पूर्वापर स्वभाव-वर्णनांत सुसंगति असावी, पूर्वापर स्वभावाविष्कार हे मनुष्यस्वभावाचे जे नित्य नियम आहेत त्यांना धरून असावेत, असा अरिस्टॉटलचा अभिप्राय असावा.

—०×०—

REFBK-0019155

**देशमुख आणि कंपनी**
१९१ शनिवार
पुणें २.

**मूल्य ४ रुपये**

★

## देशमुख आणि कंपनीचा
### शास्त्रीय विभाग

**१. सौंदर्यशोध आणि आनंदबोध**

—रा. श्री. जोग

साहित्यशास्त्रांतील मूलभूत प्रश्नाचें सांगोपांग विवेचन या ग्रंथांत केलेलें असून दक्षिण महाराष्ट्र साहित्य पुरस्कार समितीकडून या ग्रंथास पारितोषिक मिळालें आहे **किं. ८ रु.**

**२. पलें आर्थिक नियोजन**

—ह. रा. महाजनी

या ग्रंथांत आर्थिक नियोजनाचीं मूलतत्त्वें विशद केलीं असून त्यांच्या आधारें मुंबई-योजना व जनता योजना यांचा परामर्श घेतला आहे. आणि भारताची भावी अर्थ-व्यवस्था कशी असावी याविषयीं समतोल व शास्त्रशुद्ध विचार मांडले आहेत. **किं. ५ रु.**